# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

स्पेशल पेपर–११ (ब)

# मानवी हक्क

स्पेशल पेपर–१६ (ब)

# सामाजिक कल्याण

सेमिस्टर–५ व ६ करिता

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१५

बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (११ (ब) मानवी हक्क आणि १६ (ब) सामाजिक कल्याण) करिता सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN-978-81-8486-631-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
मा. कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. प्र-कुलगुरू,
इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एन. व्ही. कोंगळे**
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कॅ. डॉ. एन. पी. सोनजे** (सदस्य सचिव)
प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : समाजशास्त्र ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) आर. बी. पाटील**
विभागप्रमुख, समाजशास्त्र व मानव्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  मंगल रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज,
  ता. कराड, जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–११ (ब) मानवी हक्क,**
**पेपर–१६ (ब) सामाजिक कल्याण**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखन सहभाग** | **सत्र–५ घटक क्रमांक** | **सत्र–६ घटक क्रमांक** |
|---|---|---|
| **डॉ. दयावती पाडळकर**<br>मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव | १ | ४ |
| **प्रा. अशोक शामराव चव्हाण**<br>श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगांव | २ | २, ३ |
| **प्रा. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर | ३ | – |
| **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | ४ | – |
| **प्रा. सुषमा अर्जुन जाधव**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | – | १ |

**■ संपादक ■**

**प्रा. अशोक शामराव चव्हाण**
श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगांव

**डॉ. दयावती पाडळकर**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत बी. ए. भाग-३ अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत. या वर्गासाठी तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण १० पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी ''मानवी हक्क'' (सत्र ५ पेपर क्र. ११ (ब)) आणि ''सामाजिक कल्याण'' (सत्र ६ पेपर क्र. १६ (ब)) असे आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासून प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क हे मानवाच्या व्यक्तीमत्त्वाचा अविभाज्य भाग असतात. ते मानवाच्या संपूर्ण व्यक्तीमत्त्वाशी निगडीत असतात म्हणूनच मानवी हक्कांची परिपूर्ण ओळख व जाणीव या मानवी हक्क पेपरमध्ये अभ्यासणार आहात. मानवी हक्कांचे स्वरूप, इतिहास, दृष्टीकोन व महिला, बाल आणि कामगारांचे हक्क आपण सविस्तर अभ्यासणार आहोत. तसेच कोणत्याही समाजात असे काही विशिष्ट समुदाय असतात की जे विविध पातळ्यांवर दुर्बल असतात त्यांना किमान जीवन जगण्याकरिता सहकार्याची गरज असते. हे सहकार्य शासन, विविध सेवा सुविधा योजना कार्यक्रम व कायदेविषयक सुरक्षितता या माध्यमातून देऊन या दुर्बल घटकांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करत असते. सामाजिक कल्याण या पेपरमध्ये आपण अशा काही दुर्बल घटकांच्या सामाजिक कल्याणासाठीचे प्रयत्न अभ्यासणार आहोत.

■ **संपादक** ■

**प्रा. अशोक शामराव चव्हाण**
श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय,
पेठवडगांव

**डॉ. दयावती पाडळकर**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या
महाविद्यालय, कडेगाव

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ पेपर–११ (ब)** | |
| १. | मानवी हक्क | १ |
| २. | संयुक्त राष्ट्रे संघटना आणि मानवी हक्क | २८ |
| ३. | भारतातील मानवी हक्क | ५५ |
| ४. | मानवी हक्क आणि दुर्बल घटक | ७८ |
| | **सेमिस्टर–६ पेपर–१६ (ब)** | |
| १. | समाजकल्याण | १०१ |
| २. | युवक, अपंग व वृद्धांचे सामाजिक कल्याण | १२५ |
| ३. | सामाजिक कल्याण आणि शिक्षण | १५७ |
| ४. | कल्याणकारी योजना आणि कायदे | १८८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# मानवी हक्क

# (Human Rights)


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

१.३.१ मानवी हक्क–अर्थ व स्वरूप

१.३.२ मानवी हक्काचा इतिहास

१.३.३ मानवी हक्काबाबतचा दृष्टिकोण

१.४ सारांश

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास–

- मानवी हक्काचा अर्थ व स्वरूप स्पष्ट होईल.
- मानवी हक्कांचा इतिहास माहिती होईल.
- मानवी हक्कांबाबतचा दृष्टिकोण स्पष्ट होईल.

## १.२ प्रस्तावना

समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासूनच स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क हे मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असतात. ते मानवाच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाशी निगडीत झालेले असतात. काही झाले तरी मानवी हक्कांना आपण आपल्यापासून वेगळे करू शकत नाही. मानवी हक्कामध्ये अंतर्भुत होणारे हक्क म्हणजे जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी होत. हे सर्व हक्क आपल्या जगण्याचा भाग आहेत व हे हक्क आपणा सर्वांना प्राप्त झालेले आहेत.

विसाव्या शतकापासून मानवी हक्काच्या संकल्पनेचा जोरदार पुरस्कार करण्यात येऊ लागला. संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८ साली मानवी क्रूरतेला आळा घालण्यासाठी 'मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा' प्रसिध्द करून मानवी हक्कांचे संरक्षण, जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीला जागतिक स्तरावर जे हक्क मिळावयास पाहिजे, त्याची एक विशेष यादी त्यांनी तयार केली. हा दस्तऐवज म्हणजे मानवी हक्क प्राप्त होण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले व महत्त्वपूर्ण पाऊल होय. अर्थात, दुसऱ्या महायुद्धानंतरच खऱ्या अर्थाने मानवी हक्क या विषयाची जाणीव जागृती होण्यास प्रारंभ झाला.

## १.३ विषय विवेचन

मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे एक अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्यप्राणी' या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्कांशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारे जीवन जगता येणार नाही, असे प्रतिपादन मानवी हक्कांचे समर्थक करतात.

या घटकामध्ये आपण मानवी हक्काचा अर्थ व संकल्पना व त्याचा ऐतिहासिक आढावा घेणार आहोत. त्याचबरोबर मानवी हक्कांबाबत दृष्टिकोनही अभ्यासणार आहोत. परंतु 'मानवी हक्क' ही संकल्पना अधिक स्पष्ट समजण्यासाठी प्रथम 'हक्क' ही संज्ञा समजून घेणे आवश्यक ठरते.

### ❑ हक्क म्हणजे काय?

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजाचा घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या अनेक गरजा असतात व व्यक्तीला समाजात राहूनच या गरजा पूर्ण कराव्या लागतात. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होते. अर्थात मानवाच्या वर्तनावर काही निर्बंध घातले जातात. पण असे निर्बंध असले तरी व्यक्तीची प्रगती व्हावी म्हणूनच

हक्कांची गरज निर्माण होते, म्हणून हक्क म्हणजे व्यक्तीला तिच्या सर्वांगीण विकासासाठी समाज व राज्य यांनी प्राप्त करून दिलेली संधी होय, असे हक्कांचे वर्णन केले गेले जाते.

❑ **हक्काची व्याख्या :-**

काही राजकीय व समाजशास्त्रीय विचारवंतांनी हक्काची व्याख्या केलेली आहे ती पाहूया.

**१. प्रा. हेरॉल्ड लास्की :-**

''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.''

**२. प्रा. बोझांके :-**

''आपण ज्या समाजाचे घटक असतो, त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत.''

❑ **हक्कांचे स्वरूप व वैशिष्ट्ये :-**

१. हक्काचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हक्कांची निर्मिती ही समाजातच होत असते.

२. सामाजिक जीवनात होणाऱ्या परिवर्तनाबरोबर हक्कांचे स्वरूपही बदलत जाते.

३. हक्कांची निर्मिती समाजात होत असली तरी त्यांना राज्यांची मान्यता मिळणे ही गोष्ट तितकीच महत्त्वाची असते.

४. अर्थात राज्य हक्कांची निर्मिती करत नाही.

५. हक्काबरोबर कर्तव्येही उदयाला येतात. हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

थोडक्यात, हक्क व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत आणि समाज व राज्य त्यांना ही संधी मिळवून देतात.

## १.३.१ मानवी हक्क-अर्थ व स्वरूप (Meaning and Nature of Human Rights)

मानवी हक्क हे माणसांशी निगडीत असतात. आपले जीवन किमान सुखाने व आनंददायीपणे जगण्याच्या आपल्या नैतिक मागणीप्रती हे हक्क नैतिक हमी देण्याचे काम करतात. संकल्पनात्मक

परिभाषेत 'मानवी हक्क' हे 'हक्क' या संकल्पनेतून निर्माण झाले आहेत. हक्क या संक्लपनेत शुध्दता, सद्गुण आणि निष्कपटपणा किंवा भोळेपणा हे अर्थ अंतर्भूत आहेत. हक्क या संकल्पनेचा वापर फायदा मिळणे व त्यासाठी लायक असणे या अर्थानेही केला जातो.

१८व्या शतकात मात्र 'मानवाचे हक्क' या संकल्पनेसाठी नैसर्गिक, स्वाभाविक, अदेय आणि अनिर्धारित इत्यादी शब्दांचा वापर केला जात होता. कारण प्रत्यक्षवादी किंवा सकारात्मक कायद्यापेक्षा मानवी हक्कांचे अस्तित्व स्वतंत्र आहे व ही मानवी हक्कांची संकल्पना पुढे संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९४८ च्या मानवी हक्कांचा जाहिरनामा यात उपयोगात आणली होती.

## ❑ मानवी हक्कांचे आकलन :-

मानवी हक्कांचा तीन पातळ्यांवर विचार करता येईल. या तिन्ही पातळ्या एकमेकांशी निगडीत आहेत. तसेच त्या परस्परांशी देवाण-घेवाणही करतात. त्या पायऱ्या पुढीलप्रमाणे :-

**१. मानवी मूल्य :** आपल्या समाजव्यवस्थेत काही विशिष्ट मानवी मूल्यांचा समावेश होतो. जसे- समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, राष्ट्रप्रेम, एकात्मता ज्यांच्या आधारे आपण या हक्कांचा आनंद घेऊ शकतो. आपल्या मूल्यव्यवस्थेची पातळी ही मानवी हक्कांच्या तत्त्वांच्या अंमलबजावणीशी थेट जोडलेली असते.

**२. राजकारण :** मानवी हक्कांची दुसरी पायरी म्हणजे राजकारण होय. लोकशाही शासनव्यवस्थेत आपल्या हक्कांवर गदा आल्यास किंबहुना मानवी हक्क नाकारले गेल्यास लोक सामूहिकरित्या सरकारी ध्येय-धोरणांना विरोध करीत ठामपणे उभे राहू शकतात. उपेक्षित, वंचित वर्ग समुदायातील लोक एकत्र येऊन संघटित होऊन त्यांचे मानवी हक्क मागू शकतात. अर्थात मानवी हक्कांचे राजकीय स्वरूप हे आपल्या मूल्यांशी आणि नीतीतत्त्वांशी निगडीत असते.

**३. कायदा :** मानवी हक्कामधील तिसरा स्तर हा कायद्याच्या पातळीवरून कार्य करत असतो. त्यातही स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे तीन स्तर आहेत. कायद्याच्या मदतीने मानवी हक्कांची अंमलबजावणी करताना राजकीय दबावाशी सामना करावा लागतो.

## ❑ मानवी हक्कांची व्याख्या :-

सर्व मानवांना नैसर्गिक हक्क असतात. त्यांचे हक्क स्वत:कडून, संबंधित राष्ट्राकडून संरक्षित केले गेले पाहिजेत. मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे सर्व माणसांना असतात आणि जे त्यांच्यापासून वेगळे करता येत नाहीत. संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८ साली मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रस्तुत केला आणि मानवतेच्या विविध प्रश्नांवर करारनामे केले. या करारनाम्यांना सभासद राष्ट्रांनी मंजूरी देऊन या

करारनाम्याशी प्रतिबध्द व्हावे यासाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील आहे. राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर मानवी हक्कांना औपचारिक व वैश्विक स्वरूप प्राप्त झाले.

मानवी हक्कांचा उल्लेख काही वेळेला पायाभूत हक्क, मुलभूत हक्क, नैसर्गिक हक्क आणि स्वाभाविक हक्क या संज्ञांनी देखील केला जातो. मानवी हक्क हे मुलभूत हक्कांप्रमाणे अत्यंत महत्त्वाचे, पवित्र, सनातन व अलौकिक स्वरूपाचे असतात. काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्क हे सर्व नागरिकांसाठी व्यक्ती म्हणून स्वाभाविक स्वरूपाचे ठरतात.

मानवी हक्क या संकल्पनेची व्याख्या पुढील वेगवेगळ्या प्रकारे करण्यात आली आहे.

**१. ॲड. जे. पी. एस. सिरोही :–**

भारतीय गुन्हेगारी शास्त्रज्ञ ॲड. सिरोही यांच्या मते, ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी व्यक्तींच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी निगडीत असून सर्व संस्थांद्वारे आणि संयुक्त राष्ट्रसंघासहित सर्व राष्ट्रांच्या कायद्यामार्फत त्यांना संरक्षण प्रदान करण्यात आले पाहिजे.''

**२. १९९३ सालचा मानवी हक्क संरक्षण कायदा कलम क्र. 2(I)(d) [2(a)(5)]**

भारतातील १९९३ सालच्या मानवी संरक्षण कायद्यानुसार– ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार, भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे.''

**३. ''मानवी हक्क म्हणजे, असे सर्व हक्क जे प्रत्येकास निसर्गत:च मिळालेले असतात. ज्यांच्याशिवाय आपण माणूस म्हणून जगू शकत नाही.''**

**४. भारतातील मानीव हक्काच्या प्राचीनतेवर भाष्य करताना डॉ. के. एम. माथूर पुढील वैदिक श्लोकाची आठवण करून देतात.**

सर्वे भवन्तु सुखिन:
सर्वे संतु निरामय।

सर्वे भ्रदाणी पश्चन्तु
मा कश्चिद् दु:ख भाग्यवेत।।

अर्थात, सर्वांनी सुखी व्हावे. सर्वांना आरोग्य लाभावे, सर्वांचे कल्याण व्हावे व कोणाच्याही वाट्याला दु:ख येऊ नये. असा अर्थ स्पष्ट करणारा हा श्लोक म्हणजे मानवी हक्कांचे विश्लेषण होय.

## ५. भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क :-

भारतीय राज्यघटनेत मानवी हक्कांची चार सुत्रे प्रतिपादन केली असून ती खालील प्रमाणे :-

१. **न्याय** (Justice) **:** यात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय अभिप्रेत आहे.

२. **स्वातंत्र्य** (Liberty) **:** यात विचार, अभिव्यक्ती, श्रध्दा, विश्वास, पूजा इत्यादी स्वातंत्र्याचा अंतर्भाव आहे.

३. **समता** (Equality) **:** यात दर्जा, संधी आणि बढतीची समानता अंतर्भूत आहे.

४. **बंधुता** (Fraternity) **:** यात व्यक्तीची प्रतिष्ठा राखण्याचे आश्वासन आणि राष्ट्रांची एकता व पूर्णता अभिप्रेत आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे मानवी हक्क जन्मत: मिळालेले असे हकक आहेत, जे माणसाच्या व्यक्तीमत्व विकासासाठी, मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक व सद्सद्विवेक बुद्धीच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहेत. तसेच ते मानवाच्या अध्यात्मिक व इतर गरजा भागविण्याकरिता आवश्यक असतात.

## ❑ मानवी हक्कांचे स्वरूप :-

मानवी हक्कांच्या वरील व्याख्यांवरून मानवी हक्कांची स्वरूपात्मक वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्याच्या भूमिकेनुसार मानवी हक्क म्हणजे मानवाचे अविभाज्य, वैश्विक आणि परस्परावलंबी हक्क होत. या तीन वैशिष्ट्याद्वारे मानवी हक्कांचे स्वरूप स्पष्ट होते.

### १. अविभाज्य हक्क :-

मानवी हक्क हे अविभाज्य व परंपरागत असतात. ते आपल्याला निसर्गत: व जन्मजातच प्राप्त होतात. हे हक्क आपणास कोणी देत नाही किंवा कोणी हिरावूनही घेऊ शकत नाही. कारण प्रत्येक मनुष्याला तो माणूस आहे म्हणून हे सर्व हक्क मिळतात.

### २. वैश्विक हक्क :-

मानवी हक्क वैश्विक असतात. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला ती कोणत्याही धर्म, जाती, वंश, लिंग, सामाजिक वा आर्थिक स्तरातील किंवा भाषा व प्रांतातील असली तरी तिला मानवी हक्क प्राप्त होतात. याचाच अर्थ असा आहे की, हे हक्क सर्वांनाच असतात. मग ती व्यक्ती कोठेही असली अगदी दुसऱ्या देशात गेली तरी त्याचे हक्क त्याच्या सोबत राहतात.

### ३. परस्परावलंबी हक्क :-

मानवी हक्क हे परस्परसंबंधी व परस्परावलंबी असतात. सर्व मानवी हक्क एकत्रितपणेच पहावे लागतात. अर्थात् कोणताही हक्क स्वतंत्र काढून बघता येत नाही. हे सर्व हक्क सर्व माणसांसाठी एकाचवेळी अस्तित्त्वात असतात. आणि त्यांना तसेच पहायला हवे. कोणताही एक मानवी हक्क इतर हक्कांपेक्षा अधिक महत्त्वाचा किंवा श्रेष्ठ नसतो. जीविताचा हक्क, अन्न मिळविण्याचा हक्क, अभिव्यक्ती व भाषणाचा हक्क हे सर्व हक्क परस्परावलंबी हक्क आहेत. हे सर्व इतर मानवी हक्कांना लागू पडते.

थोडक्यात, माणूस हा जन्मत: हक्क आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहे. याला नैतिक मानवी हक्क म्हणतात. नंतर त्याचे कायदेशीर हक्कांमध्ये रूपांतर होते. जीवीताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि सुरक्षिततेचा हक्क हे मुलभूत हक्क आहेत. जगण्याचा हक्क हा नैसर्गिक हक्क आहे. मात्र सन्मानपूर्वक जीवन जगणे हे मुलभूत हक्क आहेत. एकीकडे पांरपारिक हक्क आणि राजकीय हक्क यांचा तर दुसरीकडे नव्याने विकसित झालेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचाही समावेश होतो. प्रत्येकाला जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षेचा हक्क आहेच, मात्र त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य व इतर हक्क हे त्याला सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात.

## १.३.२ मानवी हक्काचा इतिहास (History of Human Rights)

अनेक मानवी संस्कृतींना विविध स्वरूपामध्ये हक्कांच्या संकल्पनेचे आकलन झाले आणि त्या संकल्पनांचा अर्थ लावण्यात आला. हक्कांविषयीच्या संकल्पनांचा बायबल, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये विकास झाला. इतिहासकालीन डरचा राजा, डर नम्मु याने ख्रिस्तपूर्व २०५० च्या कालखंडामध्ये कायदेविषयक संहिता निर्माण केली. ही संहिता निर्विवादपणे पहिली कायदेविषयक संहिता आहे. अशाप्रकारे जतन केलेल्या दस्ताऐवजांचे हमुराब्बी (सी.ए. ख्रिस्तपूर्व १७८०) संहिता हे एक उत्तम उदाहरण आहे.

मानवी हक्क व त्यांचे जतन, संरक्षण या कल्पना प्रत्यक्षात जरी २०व्या शतकात व विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर साकार झाल्या असल्या तरी मानवी हक्कांच्या संकल्पनांचा उल्लेख अगदी प्राचीन काळापासून आढळतो. मानवी हक्कांचा इतिहास पुढील तीन कालखंडातून अभ्यासता येईल.

१) प्राचीन कालखंड.

२) मध्ययुगीन कालखंड.

३) आधुनिक कालखंड.

या तिन्ही कालखंडाचे स्पष्टीकरण आता आपण पाहू या.

## (अ) प्राचीन कालखंड :-

मानवी हक्कांच्या अभ्यासकाच्या मते, मानवी हक्कांची संकल्पना प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्याइतकीच जुनी आहे. पण ग्रीक व रोमन परंपरेपूर्वी म्हणजे ख्रिस्तपूर्व काळापासून मानवी हक्कांचा अंतर्भाव केलेला दिसतो. प्राचीन कालखंडातील मानवी हक्कांच्या इतिहासात पुढील विभागानुसार स्पष्टीकरण पाहणे आवश्यक ठरते.

### १. ख्रिस्तपूर्व परंपरा :-

पार्शियन (इराण) साम्राज्याने सम्राट सायरसच्या राजवटीमध्ये ख्रिस्तपूर्व ६व्या शतकात मानवी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली.

ख्रिस्तपूर्व ५३९ मध्ये राजाने बॅबिलॉनवर विजय मिळविला आणि आपल्या विजयानंतर त्याने सायरस वृत्तचित्ती काढली असे सन १८७९ मध्ये शोधून काढण्यात आले. आजही वृत्तचित्ती मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज म्हणून ओळखला जातो. या वृत्तचित्तीने गुलामगिरी नष्ट केली आणि त्यावेळी पार्शियन राज्यकर्त्यांचे सर्व राजवाडे पगारी मजुरांकडून बांधण्यात आले. सायरसने यहुदी धर्माच्या अनुयायांना गुलामगिरीतून मुक्त केले व त्यांना पुन्हा त्यांच्या भूमीवर स्थलांतर करण्यास परवानगी दिली.

### २. सम्राट अशोकची राजवट :-

तीन शतकानंतर प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याने खिस्तपूर्व तिसऱ्या शतकतील सम्राट अशोकाच्या राजवटीमध्ये नागरी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली. सम्राट अशोकाने ख्रिस्तपूर्व २६५ मध्ये कलिंगावर स्वारी करून पाशवी विजय मिळविला. पण त्याच्या या कृत्याचा त्याला पश्चात्ताप झाला. परिणामी, त्याने बौध्द धर्माचा स्वीकार केला. आपल्या राजवटीमध्ये त्याने अहिंसेचे अधिकृत धोरण राबविले. सर्व पंथ आणि धर्माची सहिष्णुता राखणे, पालकांच्या आज्ञेचे पालन करणे, गुरुजनांचा आदर राखणे, सर्वांशी माणुसकीने व प्रेमाने वागणे अशी मुख्य तत्त्वे लागू केली. या सुधारणा सम्राट अशोकाच्या आज्ञापत्रामध्ये वर्णन करण्यात आल्या आहेत. पुढे अशोक स्तंभावरही त्या कोरल्या.

ख्रिस्तपूर्व काळात हक्क व कर्तव्ये बहुधा धार्मिक तत्त्वावर पार पाडली जात असत. देवाने मानवाची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे सर्व मानव समान आहेत. अशी हक्कांविषयीची मर्यादित जाणीव या काळात करून दिल्याचे दिसते. मानवी हक्कांची निर्मिती करण्यात आलेली नाही किंवा ते गृहित धरले नाही, तर ते प्रत्येक व्यक्तीच्या स्वाभिमानावर व समानतेवर आधारित आहेत. असे वरील काळातील घटनाक्रमावरून दिसते.

## ३. ग्रीक परंपरा :-

पाश्चात्त्य विचारसरणीतील अभिजात परंपरांचा उगम ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये आढळतो.

स्ट्राइकस या ग्रीक-रोमन तत्त्ववेत्त्याने मांडलेल्या नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांतामध्ये मानवी हक्कांच्या आधुनिक विचारांचे बीज सापडते.

सॉक्रेटिस आणि प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार, विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यात प्रतिबिंबीत होतात, अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात. याचा अर्थ प्रामुख्याने निसर्गावर नियंत्रण ठेवणारी दैवी इच्छा असा होतो. याचे अभिजात उदाहरण ग्रीक साहित्यामध्ये आढळते. ते असे- ग्रीक नाटक 'ॲन्टीगॉन' यात मानवी हक्क हे नैसर्गिक हक्क असल्याचा उल्लेख सापडतो. ॲन्टिगॉनचा (नाटकाची नायिका) भाऊ ग्रीक राजाच्या विरोधी बंड करतो व त्यात तो मारला जातो. राजा (किंग क्रेऑन) त्याच्या दफनविधीवर बंदी घालतो. परंतु ती त्याचा आदेश धुडकावून लावते व भावाचे दफन करते. राजाज्ञा मोडल्याबद्दल तिला अटक केली असता, स्वत:च्या वर्तनाचे समर्थन करताना ती म्हणते की, तिने दैवी कायद्यानुसार कृती केलेली आहे व अशा कायद्याचे उल्लंघन प्रत्यक्ष राजासुध्दा करू शकत नाही. याचा मतितार्थ असा की, मनुष्य मेल्यानंतर त्याचे दफन करणे हा त्याचा नैसर्गिक हक्क असून राजासुध्दा तो नाकारू शकत नाही.

कालांतराने ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना काही मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले होते (नैसर्गिक हक्कांची संकल्पना येण्यापूर्वी) ते हक्क पुढीलप्रमाणे-

(i) भाषण स्वातंत्र्याचा हक्क (इसोगोरिया)

(ii) कायद्यासमोर सर्व समान असल्याचा हक्क (इसोनोमिया)

(iii) सर्वांना समान आदर दर्शविण्याचा हक्क (इसोटोमिया)

तथापि, हे हक्क स्त्रिया आणि गुलामांना देण्यास नकार दिला गेला.

प्लेटोच्या वैश्विक सत्य आणि सद्गुण यांच्या कल्पनेतून हक्कांची वैश्विक संकल्पना साकार झाली. प्लेटोच्या मते, सद्गुण हे हक्क व कर्तव्यांशी जोडले गेले आहेत. प्रत्येकाकडे सद्गुण असतातच व त्यानुसार प्रत्येकाचे हक्क व कर्तव्ये असतात.

## ४. रोमन परंपरा :-

प्राचीन रोममध्ये नैसर्गिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहिली. रोमन कायदेपंडित उल्मीमानचा असा विश्वास होतो की, कुठलीही व्यक्ती मग ती रोमन असो किंवा नसो अशा प्रत्येक व्यक्तीस नैसर्गिक हक्क असतात.

रोमन कायदा पध्दतीमध्ये मार्क्स तुल्लस सिसेरो यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सिसोरो हा एक मुत्सद्दी वकील, विद्वान व लेखक होतो. त्याच्या मते, नागरिकांनी चांगले वर्तन ठेवावे. ज्यामुळे मानवी जीवनाची सुरक्षा, शांती आणि सुख प्राप्त होते. जसे नागरी, राजकीय आणि सैनिकी कर्तव्यांना महत्त्व दिले तसेच कुटुंब ही देखील एक नैतिकता जपणारी संस्था आहे. त्यानुसार प्रत्येक माणसाने मानसिक शांती व चारित्र्य यावर आधारित वर्तणूक ठेवून जीवन जगावे व यासाठी ही सर्व माहिती सर्वांना पुरविण्याचे उद्दिष्ट होते.

## (ब) मध्ययुगीन कालखंड :–

मध्ययुगामध्ये स्वाभाविक कायद्याच्या सिध्दांताची दैवी तत्त्वावर पुनर्रचना करण्यात आली. या कालावधीमध्ये ख्रिस्ती ईश्वरासंबंधी परंपरांचा प्रमाण स्पष्टपणे दिसून येतो. मध्ययुगातील तत्त्वज्ञ अॅबेलॉर्ड (१०७९ ते ११४२), सेंट थॉमस अॅक्विनास (१२२४ ते १२७४) यांनी नैसर्गिक कायद्याची संकल्पना ही सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. कायद्याद्वारे हित साधले गेले पाहिजे आणि त्याचे अनुसरण केले पाहिजे. वाईट गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत हा कायद्याचा प्राथमिक हेतू आहे. स्वाभाविक कायद्याच्या सर्व नियमांचा हा पाया आहे.

अॅक्विनासच्या मते, कायदा म्हणजे हेतूंशी संबंधित मानवी वर्तणुकीच्या नियम आणि आदर्श होय. त्यांच्या मते, संपूर्ण विश्वावर कायद्याच्या चतु:सूत्रीची सत्ता चालते. त्यामध्ये शाश्वत कायदा, स्वाभाविक कायदा, मानवी कायदा आणि दैवी कायदा यांचा समावेश आहे. शाश्वत कायदा दैवी हेतू दर्शवितो. समाजात मानवी वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मानवाने तयार केलेले कायदे म्हणजे मानवी कायदे आणि ईश्वरी इच्छेचा व चमत्कारातून मानवाशी संपर्क साधून देण्यात आलेला दैवी आदेश म्हणजे दैवी कायदे होय. अक्वीनास आणि अन्य ख्रिस्ती मानववंश शास्त्रज्ञानी असे प्रतिपादन केलेले आहे की, दैवी कायदा हा अन्य कायद्यांपेक्षा श्रेष्ठ कायदा आहे. दैवी कायद्याची चर्चच्या संस्थेमार्फत लोकांना जाणीव करून देण्यात आली. म्हणून चर्चचे स्थान हे राज्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

ख्रिस्ती वेदान्तवाद्यांनी महत्त्वाची योगदाने दिलेली आहेत. म्हणजे त्यांनी खाजगी, मालमत्तेच्या महत्त्वावर जोर दिलेला आहे. सेंट अॅक्विनासने म्हटले आहे की संघटित आणि नियंत्रित समाजासाठी खाजगी मालमत्ता आवश्यक आहे. भौतिक स्वार्थामुळे माणूस देवाला विसरतो आणि गरिबांकडे दुर्लक्ष करतो. म्हणून तो असा युक्तीवाद करतात की, प्रत्येकास मर्यादित मालमत्तेचे हक्क असतात आणि अशी मालमत्ता निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. अर्थात जेव्हा चर्चच्या संस्थेचे राज्यावर नियंत्रण असेल.

या महत्त्वाच्या योगदानाव्यतिरिक्त, हल्लीचे मानवी हक्क आणि भूतकालीन स्वाभाविक हक्क यामध्ये मुलभूत भेद आहेत. हक्कांची ही कल्पना अत्यंत धार्मिक आहे.

## (क) पाश्चात्त्य विचारसरणी :-

सामाजिक संविदात्मक विचारवंतांनी नैसर्गिक, व्यक्तीगत हक्कांच्या कल्पनेला हातभार लावला आणि बऱ्याचशा अन्य पाश्चात्त्य विचारवंतांनी वेगवेगळ्या सिध्दांताद्वारे मानवी हक्कांच्या उत्क्रांतीस हातभार लावला. त्यातील प्रमुख विचारवंताचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :-

### १. ह्युगो ग्रॅशियस :-

ग्रॅशियस यांनी स्वाभाविक कायद्याचा त्याचप्रमाणे आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचा नवीन पाया घालण्यासाठी उत्कृष्ट रचना केली. १७ व्या शतकाच्या प्रारंभी ग्रॅशियसने प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांच्या आधुनिक कल्पनेची ओळख करून दिली. त्याच्या मते, मानवास मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क प्राप्त झालेले आहेत. म्हणून प्रत्येकाने हे मान्य केले पाहिजे की, प्रत्येक व्यक्ती स्वत:चे जीवन वाचविण्याचा प्रयत्न करण्यास हकदार आहे.

### २. हॉब्ज, लॉक आणि रुसो :-

थॉमस हॉब्ज, जॉन लॉक आणि जिन रुसो यासारख्या आधुनिक संविदात्मक सुधारकांनी असा युक्तीवाद केलेला आहे की, ज्यांच्याकडे मुळात कोणतीही शासकीय संघटना नव्हती, अशा मानवानी सहभाग घेतलेल्या करारनाम्याचा निष्कर्ष म्हणजेच राज्य होय. अशा प्रकारे सामाजिक करार ही संज्ञा तत्त्वज्ञानात्मक सिध्दांताच्या मोठ्या वर्गाचे वर्णन करते. हॉब्ज, लॉक व रुसो हे तिघेही सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते आहेत. सामाजिक करार सिध्दांत ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असून असा करार कायेदशीर राज्य व शासन करण्याजोग्या संमतीतून बनते हे सुचवितो.

हॉब्जच्या मते, मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या जीवीताच्या विशेष सुरक्षितता होय. त्यांच्या मते, हा हक्क अन्य कोणत्याही हक्कापेक्षा मुलभूत स्वरूपाचा आहे.

जॉन लॉकच्या मते, मनुष्यप्राणी हा मूळात मुक्त, समान व स्वतंत्र आहे. म्हणून शांतता व सदिच्छा आणि परस्परसहकार्य या स्वाभाविक स्थितीच्या अटी आहेत. लॉकने प्रत्येक व्यक्तीस केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला अदेय (देऊन टाकता न येणारे) असे नैसर्गिक हक्क दिले. त्यामध्ये खाजगी, मालमत्तेच्या हक्कास प्राधान्य देण्यात आले.

रुसो यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनांना महत्त्व दिले. रुसोने सामान्यपणे समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक करार सिध्दांतानी केवळ नैसर्गिक आधारावर आणि वैयक्तिक जमिनीवर आधारलेल्या लोकशाही संस्थेच्या संकल्पना प्रस्थापित केलेल्या आहेत असे नाही.

सामाजिक करार सिद्धांतवाद्यांच्या व्यतिरिक्त आणखी बरेचसे विचारवंत आहेत. ज्यांनी आपल्या सूज्ञ विचारातून मानवी हक्कांवरील आधुनिक विचारांच्या उत्क्रांतीसाठी योगदान दिले. त्यामध्ये प्राधान्याने इमॅन्युअल कांट, जे. एस्. मिल, जेरेमी बेन्थॅम आणि मॉन्टेस्क्यू इत्यादी.

### ✪ इमॅन्युअल कांट :-

इमॅन्युअल कांटच्या मते, प्रत्येक व्यक्तीत काही मुलभूत हक्क असतात. त्या हक्कांना संरक्षण मिळाले पाहिजे. कांटने स्वाभाविक हक्क आणि संपादन केलेले हक्क यांच्यात फरक केलेला आहे. त्याने केवळ एकाच नैसर्गिक हक्काला मान्यता दिलेली आहे. मानवी हक्कावरील कांटची संकल्पना नैतिकतेच्या आणि विवेकबुध्दीच्या तत्त्वावरून तयार झाली. कांटची मानवी हक्कांची संकल्पना म्हणजे नैतिक पाया आहे. कांटने या संकल्पनेला विश्वव्यापी किंवा सार्वत्रिक बनवते.

### ✪ जेरेमी बेन्थॅम :-

बेन्थमने त्याच्या प्रसिद्ध अशा उपयुक्ततावाद सिध्दांतामध्ये अदेय हक्कांच्या संकल्पनेस निराधार म्हणून नापसंती दर्शविली आहे. त्याने असा दावा केला आहे की, शासनाच्या कारवाईतून निर्माण होणारे हक्क किंवा परंपरेतून जन्म घेणारे हक्कच अदेय आहेत. नैसर्गिक हक्क व कायदे यावर तो टिका करतो. प्रत्येक माणूस सुखी होण्याच्या व दु:ख टाळण्याचा प्रयत्न करत असतो. त्याच्या मते, आनंद व दु:ख यांचे काही घटकांच्या आधारावर मूल्यांकन करता येते. म्हणून जास्तीत जास्त संख्येने लोकांना सुखी करणे हे राज्याचे व कायद्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. त्याने व्यक्तीगत हक्क किंवा आनंदाबरोबर सामुदायिक हक्क किंवा आनंदही महत्त्वाचे असतात यावर भर दिला.

### ✪ जॉन स्ट्युअर्ट मिल :-

जे. एस्. मिल यांनी On Liberty (स्वातंत्र्य) या पुस्तकाच्या सुरवातीलाच उपयुक्ततावादाला कडाडून विरोध केला. बहुमत मिळवून जुलमी राजवट अंमलात आणण्याचा तो एक प्रकार आहे, असे त्याचे मानणे आहे. तो म्हणतो की, बौध्दिक आणि सामाजिक प्रगतीसाठी मुक्त भाषण ही एक आवश्यक अट आहे. मौन राहिल्यामुळे सत्य पूर्णपणे समजत नाही. त्याच्या मते, अभिव्यक्ती व समूह-स्वातंत्र्य निरमवाद असू शकत नाही. आपआपले स्वातंत्र्य प्राप्त करण्याकडे इतर व्यक्तींची क्षमता हिरावून न घेता असे स्वातंत्र्य अस्तित्त्वात असले पाहिजे.

### ✪ मॉन्टेस्क्यू :-

मॉन्टेस्क्यू हा प्रसिध्द फ्रेंच तत्त्वज्ञ त्याच्या स्वातंत्र्याच्या संस्थेविषयक लिखाणातील तत्त्वासाठी प्रसिध्द आहे. मॉन्टेस्क्यूचा स्वाभाविक कायदा आणि हक्कांवर विशेषत: स्वातंत्र्याच्या हक्कावर विश्वास

आहे. तथापि, त्याने वैयक्तिक वर्तणूक तसेच नैतिक व सौंदर्यात्मक दृष्टिकोनातील सांस्कृतिक तफावत, धार्मिक श्रध्दा आणि स्वातंत्र्य मान्य करण्याची क्षमता यांच्या सामाजिक स्पष्टीकरणास अग्रक्रम दिला. मॉन्टेस्क्यू हा मुलभूत विचारांचा कट्टर धार्मिक असल्यामुळे तो व्यक्तीवादी नव्हता. त्याने दैवी कायद्यावर भर दिला. त्याने काही अंशी मानवी हक्कांच्या लौकिक रुपांवर जोर दिला. त्याने आनंदाचा पाया म्हणून स्वातंत्र्याकडे पाहिले. त्याला विश्वास होता की, राजकीय स्वातंत्र्य हे व्यक्ती, संस्था आणि सामाजिक वर्ग यांच्यातील सत्ता विभाजनावर अवलंबून आहे. संस्थात्मक पातळीवरसुद्धा व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी मिळविण्यासाठी वैधानिक, कार्यकारी आणि न्यायीक प्रक्रियेमध्ये सत्तेचे विभाजन होणे आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला.

## (ड) आधुनिक कालखंड :-

पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर मध्यम पातळीवर मानवी हक्कांचे सार्वभौमिकरण करण्याचे प्रयत्न व्हर्सेल्सच्या करारानुसार झाले होते. पण ते यशस्वी होऊ शकले नाही. त्यावेळची सुसभ्य किंवा सुसंस्कृत जगाची न्यायिक सद्सद्विवेक बुध्दी ही मोठ्या प्रमाणात राज्याद्वारे केल्या जाणाऱ्या हिंसाचाराविरुध्द व्यक्तींच्या हक्कांचे जतन करण्याच्या बाजूची होती. व्यक्तीचे तिच्या स्वत:च्याच राज्याकडून होणाऱ्या अन्यायाविरुध्द संरक्षण केले पाहिजे, यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा संस्थेच्या सभासदांनी मानवी हक्कांचे जतन करण्यासाठी काही उपाय सुचविणेस प्रारंभ केला. या संस्थेचे सभासद युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील विविध राष्ट्रांत विखुरलेले होते. त्यांनी मानवी हक्कांचे जतन करण्याबाबत प्रत्येक राष्ट्राच्या सहा कलमी कार्यक्रमाचा स्विकार केला. ही सहा कलमे खालीलप्रमाणे :-

१. प्रत्येक व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व मालमत्ता बाबत समान हक्कास मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये राष्ट्रीयता, लिंग, वंश, भाषा व धर्म असा भेद असणार नाही. नागरिकांच्या समान हक्कांचे जतन केले जाईल.

२. प्रत्येक व्यक्तीच्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील मुक्त श्रध्दा, धर्म व विश्वास यानुसार केल्या जाणाऱ्या आचरणास मान्यता दिली जाईल.

३. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आवडीची भाषा व त्या भाषेचे शिक्षण घेण्याचा अधिकार मान्य केला जाईल.

४. कोणत्याही राष्ट्राच्या नागरिकांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात, सार्वजनिक वा खाजगी ठिकाणी लिंग, वंश, भाषा किंवा धर्म याआधारे भेद न करण्याच्या अधिकारास मान्यता देण्यात येईल.

५. राष्ट्राच्या जनतेत समानतेचा विचार करताना ही समानता नावापुरतीच असता उपयोगी नाही, तर ती परिणामकारक असली पाहिजे.

६. स्वत:च्या सर्वसामान्य कायद्याच्या आधाराशिवाय कोणत्याही राष्ट्राला लिंग, वंश, भाषा व धर्म याद्वारे प्राप्त झालेले नागरिकांचे राष्ट्रीयत्वाचे हक्क काढून घेता येणार नाही.

एकूण वरील जाहीरनाम्यात असे म्हटले गेले की, राज्याने त्यांच्या नागरिकात राष्ट्रीयत्व, लिंग, भाषा आणि धर्म या आधारावर भेद करू नये. तसेच सर्वांना जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा, मालमत्ता संपादन करण्याचा समान हक्क प्रदान करणे आवश्यक आहे.

मानवी हक्कांचे सार्वभौमिकरण करण्याच्या प्रक्रियेचा दुसरा मैलाचा दगड ठरला तो म्हणजे जर्मनीतील नाझी यांनी वंश किंवा धर्म यांच्या नावावर केलेली ६ दशलक्ष 'ज्यू' लोकांची निर्घृण हत्या. दुसऱ्या महायुद्धातील या घटनेचा पडसाद संपूर्ण जगावर उमटला. या घटनेने व्यथित झालेले अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी मानवी हक्कांची आवश्यकता प्रतिपादन करताना चार प्रकारच्या मानवी हक्कांची पायाभरणी करून त्याआधारे मानवी जगाचे स्वप्न पाहिले. हे जार अधिकार खालीलप्रमाणे :-

१. भाषण व भावना प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य.

२. प्रत्येक व्यक्तीला तिच्या पध्दतीनुसार योग्य त्या ईश्वराची पूजा करण्याचे स्वातंत्र्य.

३. गरजा किंवा मागणीपासून स्वातंत्र्य.

४. भितीपासून मुक्ती किंवा स्वातंत्र्य.

मानवी हक्कांची ही यादी परिपूर्ण नसली तरी या यादीने मानवी हक्क चळवळींवर मोठा प्रभाव गाजिवला यात शंका नाही.

## ❑ अटलान्टिक सनद :-

ग्रेट ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान विस्टन एस्. चर्चिल आणि अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकलिन डी रुझवेल्ट हे अटलांटिक महासागरात एकमेकांना भेटले व त्यांनी एक संयुक्त पत्रक ऑगस्ट १९४८ साली जाहीर केले. हे संयुक्त पत्रक 'अटलांटिक सनद' म्हणून ओळखले जाते. हे पत्रक जरी दोन नेत्यांचे मत असले तरी त्याद्वारे त्यांनी मानवी हक्कांसंबंधी काही सर्वमान्य तत्त्वे प्रतिपादन करून सुदंर व भव्य जगाचे आशादायी स्वप्न पाहिले होते. त्यांनी त्यांच्या पत्रकात स्वातंत्र्य, स्वराज्य व आर्थिक स्वातंत्र्य या मूल्यांवर भर दिला.

मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयकरण या प्रश्नाला १९४४ साली डर्म्बटन ओक्स (Dumberton Oaks) येथे झालेल्या अधिवेशनात महत्त्व प्राप्त होणे गरजेचे होते. त्यामुळे जागतिक सत्तेचे लक्ष या मानवी हक्काच्या प्रश्नाकडे वळेल.

पुढे अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को शहरात २५ एप्रिल ते २६ जून, १९४५ या कालावधीत आयोजित संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत मानवी हक्कांच्या संदर्भात केलेल्या सनदेत 'मानवी हक्क आणि

मुलभूत स्वातंत्र्य' याबाबत अनेक तरतूदी करताना वंश, लिंग, भाषा व धर्म या आधारे सर्व नागरिकांना समान हक्क वा अधिकार प्रदान करण्यात आले. याच अधिवेशनात सामाजिक व आर्थिक मंडळाने प्राप्त अधिकारांद्वारे मानवी हक्क आयोगाची निर्मिती करून त्याद्वारे हक्कांचा आंतरराष्ट्रीय कायदा तयार करून घेतला.

सामाजिक व आर्थिक मंडळाने ऐक्याने काम करताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण संसदेच्या १० डिसेंबर १९४८ रोजी झालेल्या आमसभेतून ''मानवी हक्कांचा'' जाहिरनामा जाहीर करून तो स्विकारण्यात आला. यात मानवी हक्कांच्या विविध पैलूंवर व प्रकारांवर चर्चा करण्यात आली. आज जगातील सर्व राष्ट्रांनी (अगदी साम्यवादीसुध्दा) मानवी हक्कांची संकल्पना स्विकारली आहे. आज जागतिक स्तरावर मानवी हक्क व मानवतावादी करारांची संख्या सुमारे ९० इतकी आहे. म्हणून २० वे शतक मानवी हक्कांचे शतक मानण्यास हरकत नाही.

अशा तऱ्हेने मानवी हक्कांची प्रचलित संकल्पना ही बऱ्याचशा पाश्चात्त्य विचारवंतांनी दिलेल्या योगदानाचे फलित आहे. अर्थात प्राचीन धार्मिक परंपरांपासून ग्रीक, रोमन विचारांची कल्पनाही आपण जाणून घेतली ख्रिस्तपूर्व काळातील मानवी हक्काबाबतची कल्पनाही लक्षात येते. त्यांनी हक्कांमध्ये समानतेची कल्पना आणली. प्रत्येक व्यक्तीच्या स्वाभाविक आणि अदेय हक्कांची कल्पना म्हणजे या उत्क्रांतीचा पाया होय. जरी नैसर्गिक हक्कांच्या, सिध्दांतास, कित्येक विचारवंतांनी आव्हान दिलेले होते तरी तो पुनरुज्जीवनाचा कालावधी होता. आधुनिक युगात बऱ्याचशा विचारवंतांनी हक्कांच्या कल्पनेसाठी योगदान दिले शांतता, प्रतिनिधिक शासन, आंतरराष्ट्रीय हक्क, सत्तेचे विभाजन, लोकमान्य सार्वभौमत्त्व इ. संकल्पना दिल्या. २०व्या शतकात १९४८ साली मानवी हक्कांचा जाहीरनामा स्विकारला. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्याने पुन्हा एकदा स्वाभाविक आणि अदेय हक्कांवर भर दिला.

## १.३.३ मानवी हक्काबाबतचा दृष्टिकोण (Perspectives of Human Rights)

मानवी हक्कांची संकल्पना व ऐतिहासिक आढावा पाहिल्यानंतर मानवी हक्कांबाबतच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्कांचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी मानवी हक्कांच्या अध्ययनाचे दृष्टिकोण अभ्यासणे गरजेचे आहे. मानवी हक्क अध्ययनाचे दृष्टिकोन पुढीलप्रमाणे :-

## अ) तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन किंवा सैध्दांतिक दृष्टिकोन (Philosophical Approach or Theoretical Approach)

तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन हा प्रामुख्याने काल्पनिकतेशी निगडीत असून त्यामध्ये पाच सैध्दांतिक दृष्टिकोन अंतर्भूत आहेत ते दृष्टिकोन खालीलप्रमाणे :-

## (१) नैसर्गिक हक्क सिद्धांत (The Natural Right Theory)

एलेन पॅगेल्स (Elaine Pagels) या समकालीन विचारवंताने मानवी हक्क या संज्ञेची व्याख्या अशी केली की, ''व्यक्तीचे काही हक्क समाजाच्या संदर्भात किंवा समाजाच्या विरोधात असू शकतात की, जे हक्क समाजाने मान्य केले पाहिजेत व त्याप्रमाणे क्रिया करणे व्यक्तीवर बंधनकारक असले पाहिजे तसेच ते व्यक्तींचा विचार करता मुलभूत स्वरूपाचे असावेत.''

या व्याख्येनुसार मानवी हक्क समाजाच्या बाजूचे व समाजाच्या विरोधात असले तरी मानवी हक्काचे अस्तित्त्व स्वतंत्र असते व मानवी हक्क समाज निर्माण होण्यापूर्वीपासून अस्तित्वात असतात. फक्त त्यांची जाणीव व्यक्तींना करून देणे गरजेचे असते. या नैसर्गिक हक्कांची वैशिष्ट्ये पुढील तीन प्रकारची आहेत.

### *(अ) मानवी हक्कांना मान्यता मिळावी लागते :-*

मानवी हक्क स्वाभाविकपणे मानवी व्यक्तीत वास करीत असतात. व्यक्ती समाजात सहभागी होण्याआधीपासून ते अस्तित्वात असतात. आणि म्हणून राज्यातर्फे त्यांना मान्यता दिली जाते. तार्किक दृष्टीने विचार करता हे हक्क त्यांच्या अस्तित्त्वासाठी समाजाच्या कायदेशीर व्यवस्थेपासून स्वतंत्र असतात. त्यामुळेच अनेक कायदेतज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ इ. विद्वान मानवी हक्कांचा उगम हा सकारात्मक किंवा प्रत्यक्ष कायद्याऐवजी नैसर्गिक कायद्यात असल्याचे मानतात. म्हणजेच मानवी हक्क हे नैसर्गिक कायद्याच्या तत्त्वाप्रमाणे कोणत्याही अधिकारातर्फे तयार केले जात नाहीत वा स्विकारले जात नाही, कारण मानवी हक्क स्वयंभू असतात. पण त्या हक्कांची जाणीव कायदा करून देतो.

### *(ब) मानवी हक्क हे अदेय, नैसर्गिक व स्वाभाविक असल्याचे मानतात :-*

मानवी हक्क हे अदेय आहेत म्हणजे ते व्यक्तीला स्वत:हून काढून टाकता येऊ शकत नाही. मानवी हक्क स्वाभाविक आहेत. मनुष्याचा स्वभावाचा तो एक भाग आहेत. या संदर्भात जॉकिज मॅरिटेन (Jackgnes Maritain) असे म्हणतात की, मनुष्यहक्क धारण करतात कारण तो स्वयंपूर्ण, स्वत:चा मालक व स्वत:च्या क्रियेचा कर्ता असून नैसर्गिक कायद्यानुसार मनुष्य स्वत:च धारण केलेल्या अधिकारांचा किंवा हक्कांचा आदर करू शकतो.

नैसर्गिक हक्क हे सकारात्मक किंवा प्रत्यक्षवादी कायद्यापासून स्वतंत्र असतात. आणि म्हणून मानवी हक्कांचा वापर सकारात्मक कायद्याचे नियम उत्क्रांत करण्यासाठी केला जातो. याशिवाय मानवी हक्कांच्या माध्यमातून कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, कायदेशिवाय संस्था आणि राज्यांची कृत्ये यातही उत्क्रांती करणे शक्य आहे.

### *(क) सर्व मानवी व्यक्ती समान असतात असे मूलत:च मानले जाते :–*

नैसर्गिक हक्काचा खरा हक्कदार केवळ माणूसच असतो. व्यक्तीच्या सद्‌गुणामुळेच माणसात माणुसकी निर्माण होते की, जी नैसर्गिक हक्काच्या पालनात महत्त्वाची भूमिका बजावते. अर्थात सर्व मानव समान आहेत. हा मानवी हक्काचा पाया आहे, बर्नाड मेयो (Barnard Meyo) याविषयी म्हणतात, ''मानवी हक्क हे असे हक्क आहेत जे मनुष्याला त्याच्या सद्‌गुणांच्या वैशिष्ट्यामुळे प्राप्त झाले आहेत, कारण मानवात निश्चितपणे व सार्वभौमिकपणे मानवता आहे ही वास्तवता आहे.

## (२) कायदेशीर हक्क सिद्धांत (The Legal Right Theory)

जर्मी बेन्थम या तज्ज्ञांनी कायदेशीर हक्क सिध्दांताचे समर्थन केले. सर्वसामान्यपणे कायदेशीर हक्क सिध्दांताला पाठिंबा देणाऱ्या विचारवंताच्या मते, हक्क ही राज्याची निर्मिती आहे. म्हणून मानवी हक्क जसे निरंकुश नाहीत तसेच ते स्वाभाविकही नाहीत.

थॉम्स हॉब्ज हे देखील कायदेशीर हक्क सिध्दांताला पाठिंबा देणारे विचारवंत मांडतात की, व्यक्तीचे मुलभूत हक्क म्हणजे स्वसंरक्षणाचा हक्क होय की, ज्याचे संरक्षण राज्याने इतर कोणत्याही हक्कापेक्षा चांगल्या प्रकारे केले पाहिजे.

बी. बोसानकवेन्ट असे म्हणतात की, ''हक्काला कायदेशीर आणि नैतिक असे दोन्ही संदर्भ आहेत.''

या विविध तज्ज्ञांचे असे मत आहे की, हक्कांची अंमलबजावणी कायद्यामार्फत केली जाते. ज्यामध्ये भौतिक आज्ञाधारकता असू शकत नाही. मात्र हक्काला मान्यता राज्याने देणे गरजेचे आहे. थोडक्यात, कोणत्याही हक्काची निर्मिती व अंमलबजावणीसुध्दा कायद्यामार्फतच झाली पाहिजे.

## (३) हक्कांचा ऐतिहासिक सिद्धांत (The Historical Theory of Rights)

काही तज्ज्ञ असे मानतात की, ऐतिहासिक प्रक्रियेतून हक्कांची निर्मिती झाली. म्हणजे वाढदिवसाची किंवा लग्नाची भेटवस्तू देण्याच्या प्रथेतून ही भेट हक्क बनला. अशा ऐतिहासिक प्रक्रियेतून आकाराला आलेल्या हक्कात रस्त्याचा हक्क, दिवाबत्तीचा हक्क, इत्यादीचा समावेश होतो. परंतु हक्कांच्या ऐतिहासिक सिद्धांताला मर्यादा येतात. उदा. सती प्रथा, बहुविवाह प्रथा, बालविवाह प्रथा वगैरे. पूर्वी समाजात यांना मान्यता होती, परंतु आजच्या प्रबोधनाच्या युगात त्यावर कायद्याने बंदी घातली. त्यांचे हक्कात रूपांतर केले नाही. म्हणजेच पूर्वीच्या सर्वच प्रथांचे हक्कात रूपांतर होऊ शकत नाही.

## (४) हक्कांच्या सामाजिक कल्याण सिद्धांत (The Social Welfare Theory Rights)

हक्कांची सामाजिक कल्याण सिद्धांत हा सामाजिक स्वहितवादी किंवा उपयुक्ततावादी सिद्धांत

होय. या सिद्धांताचे समर्थन करणाऱ्या तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, कायदा, प्रथा आणि नैसर्गिक अधिकार हे सर्व सामाजिक स्वहितवादाच्या किंवा उपयुक्ततावादाच्या अटीत गुरफटले आहेत. उदा. भाषण स्वातंत्र्याचा हक्क हा निरंकुशपणे प्रदान करता येणार नाही. तर सामाजिक उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून त्याकडे पहावे लागेल.

रॉस्की पाऊंड, शकी, बेन्थम जेरेमी व जॉन स्टुअर्ट मिल यांनी या सिद्धांताला पाठिंबा दिला होता, काही तज्ज्ञांच्या मते, सामाजिक कल्याण सिद्धांत, अनेक मानवी हक्काच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. अनेक प्रकारचे सामाजिक व आर्थिक हक्क मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहिरनाम्यात समाविष्ट करण्यात आले होते. नंतर त्यांचे आंतरराष्ट्रीय करारात समावेश करण्यात आला. परंतु या सिद्धांताला काही मर्यादा आहेत. एक म्हणजे सामाजिक कल्याण प्रक्रिया ही सामूहिक साध्य आहे. अर्थात साध्य हे हक्क नसतात व दुसरी मर्यादा म्हणजे या सिध्दांताद्वारे सामान्य सामूहिक ध्येयांचा पाठलाग करण्यासाठी जे उपाय योजण्यात आले त्यात व्यक्तीच्या हक्कांच्या उल्लघंन क्रिया समाविष्ट आहेत. थोडक्यात, व्यक्तींच्या हक्कापेक्षा सामाजिक कल्याण उपाययोजनेला महत्त्व अधिक दिले जाते.

### ५) हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत (The Idealistic Theory of Rights)

हा सिद्धांत व्यक्तीमत्त्व सिद्धांत म्हणूनही ओळखला जातो. या सिध्दांतात 'मनुष्याचा अंतर्गत विकास' या संकल्पनेवर भर देण्यात आला आहे. तसेच हा सिद्धांत माणसाच्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा संपूर्ण विकास करण्याचाही प्रयत्न करतो आणि म्हणून हा हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत, व्यक्तिमतत्त्वाचा हक्क हा सर्वश्रेष्ठ व निरंकुश असल्याचे मानतो.

इतर सर्व हक्क म्हणजे, जगण्याचा, स्वातंत्र्याचा वा मालमत्तेचा हे सर्व एका मुलभूत अधिकारास निर्माण करण्यात आले. हे हक्क व्यक्तिमत्त्वाशी संबंधित आहेत. उदा. जगण्याचा हक्क.

हक्कांचा आदर्शवादी सिध्दांताचा प्रमुख गुण म्हणजे ते व्यक्तीमत्त्वाच्या हक्कांवर भर देतात. अर्थात, यालाही काही मर्यादा आहेत.

## ब) व्यावहारिक दृष्टिकोन किंवा उपयुक्ततावादी दृष्टिकोन (Progmatic or Utilitarian Approach)

मानवी हक्काच्या स्वरूपाकडे पाहण्याचा दुसरा महत्त्वाचा दृष्टिकोन म्हणजे व्यावहारिक दृष्टिकोन होय. प्रत्येक हक्क जो अदेय अथवा अन्य स्वरूपाचा आहे असा समज झाला असेल तर तो कायदेशीररित्या आणि परिणामकता काही प्रक्रियांच्या किंवा संस्थांच्यामार्फत तपासून पाहणे गरजेचे आहे. इथे भारतीय संदर्भ देवून बोलायचे झाल्यास भारताच्या राज्यघटनेत विभाग ३ मध्ये मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र मुलभूत हक्काची व्याख्या कोठेही दिलेली नाही. परंतु मुलभूत

हक्कांचे काळजीपूर्वक परिक्षण करता हे मानवी हक्क राज्याच्या अधिकारावर किंवा सत्तेवर मर्यादा घालतात आणि राज्यालाही सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या तत्त्वांना चिकटून रहावे लागते.

या दृष्टिकोनातून विचार करता मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यांचा संदर्भ संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीशी जोडावा लागतो.

संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची यादी जाहीर केली ती तीन वर्गात विभागता येते.

### (अ) जागतिक पातळी :-

जागतिक पातळीचा विचार करता यात मानवी हक्क सार्वभौमिक जाहिरनामा, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय लेखी करार, नागरी व राजकीय हक्काबाबत लेखी करार वंशभेद निर्मूलनाचा करार, मानवी क्रूर वागणूकीविरोधी करार, स्त्री सरंक्षण, बालकांचे हक्क अशा अनेक करारांचा व जाहिरनाम्याचा आंतरभाव यामध्ये होतो.

### (ब) प्रादेशिक पातळी :-

यामध्ये मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यासंबंधी युरेजियन राष्ट्रांची परिषद, युरोपियन सामाजिक सनद, माणसाचे हक्क व कर्तव्ये याबाबतचा अमेरिकेचा जाहिरनामा मानवी हक्काची अमेरिकेतील परिषद, आफ्रिकन सनद इत्यादीचा समावेश होतो.

### (क) अन्य दुय्यम करार :-

यामध्ये छोटे-छोटे करार येतात. जे मानवी कराराची हाताळणी करतात. उदा. निर्वासितांच्या दर्जासंबंधीचा ठराव किंवा राज्यविरहित म्हणजे कोणत्याही देशाचा नागरिक नसलेल्या व्यक्ती वगैरे यामध्ये आश्रित व्यक्तीच्या मानवी हक्काची नोंद ही मानवी हक्काच्या सार्वभौमिक जाहिरनाम्याच्या कलम १४ मध्ये, तर अमेरिकन मानवी हक्क कराराच्या कलम २२ मध्ये व आफ्रिकेत कलम १२ मध्ये निर्देशित केली होती.

मानवी हक्काच्या संदर्भात विविध प्रकारचे मतभेद होते. परंतु सध्या मात्र मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यांचा अर्थ हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क जाहिरनाम्यात दिलेल्या मानवी हक्कांच्या यादीसंदर्भात लावताना तिथे सार्वभौमिक जाहिरनाम्याचा विचार करणे गरजेचे आहे.

## ❒ मानवी हक्काबाबत अन्य दृष्टिकोन किंवा सिद्धांत :-

जेरोमि जे शेस्टॅक यांनी मानवी हक्कांच्या तत्त्वज्ञानशास्त्रीय पायावर सविस्तर चर्चा करताना मानवी हक्क सिद्धांताचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला होता.

## अ) तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन किंवा सैध्दांतिक दृष्टिकोन

### १. धार्मिक दृष्टिकोन :-

धार्मिक दृष्टीने विचार करता मनुष्य हा पवित्र प्राणी मानला आहे. जर परमेश्वर जगातील सर्व प्राणीमात्रांचा सार्वभौमिक पिता म्हणून स्विकारला गेला असेल तर मग त्यातून सामान्य मानवतेचा जन्म होतो, जी मानवता काही हक्कांचे सार्वभौमिकत्व प्रवाहित करते. हक्कांचा उदय हा दैवी असल्यामुळे ते अदेय असतात. ही संकल्पना केवळ ज्यू-ख्रिस्ती धर्माचीच परंपरा नसून ती ईस्लाम, हिंदू धर्माचीही परंपरा आहे. या सर्वांनी मानवी हक्कांना दैवी आधार दिला आहे. अर्थात् मानवी हक्कांच्या बाबतीत धार्मिक सिद्धांत आशादायी असले तरी ते मोठ्या प्रमाणात अविकसित आहेत. मूलभूत समानतेचे तत्त्वज्ञान व न्यायाचे तत्त्वज्ञान व्यवहारात आणण्यात हे धर्म अपयशीच ठरले आहेत.

### २. नैसर्गिक दृष्टिकोन :-

हक्काचा नैसर्गिक सिद्धांत याबाबतचे स्पष्टीकरण या आधीच्या स्पष्टीकरणात सविस्तर आहे, त्याचाच इथे विचार केला जावा.

### ३. प्रत्यक्षवादी दृष्टिकोन :-

प्रत्यक्षवादी सिध्दांतकार हे मानवी हक्कांच्या उगमस्रोत कायद्याच्या कायदे तयार करण्याच्या व्यवस्थेत व त्यांना मान्यता मिळविण्याच्या प्रक्रियेत शोधतात. प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान कायद्याला अत्यंतिक महत्त्व देतात. मात्र ते समाजाच्या नैतिक तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करतात. यामुळे समाजाच्या अस्तित्त्वाला धोका येतो. म्हणजेच मानवी हक्काकडे वास्तवतेच्या दृष्टिकोनातून पाहणारा व मानवी हक्कांचा उगम स्रोत कायदा व अधिकार आहे असे मानणारा हा एक वेगळा सिद्धांत आहे.

### ४. मार्क्सवादी दृष्टिकोन :-

मार्क्सवाद हा मानवी व्यक्तीच्या स्वभावाशी संबंधित आहे. परंतु या ठिकाणी असा विचार केला आहे की, स्त्री-पुरुष स्वायत्त व्यक्ती नसून त्यांचे अधिकार हे दैवी आधारावर निर्धारित आहेत व ते स्वाभाविक स्वरूपाचे आहेत. हे जरी खरे असले तरी मानवी हक्कांचे मार्क्सवादी सिध्दांतकार हे स्त्री व पुरुष या स्वतंत्र जाती व वर्ग असल्याचे मानतात.

मार्क्स यांच्या विचारानुसार 'मानवी हक्कासंबंधीचा निसर्गाचा कायदा' हा दृष्टिकोन आदर्शवादी व ऐतिहासिक बनलेला होता. त्यांच्या मते, मानवी हक्कात नैसर्गिक आणि अदेय असे काही नसते. ज्या समाजात भांडवलशहांकडे उत्पादन साधनांच्या मालकीचा एकाधिकार असतो त्या समाजात मानवी हक्क म्हणजे एक प्रकारचे मध्यमवर्गीय मोहजाल असते.

मार्क्सवादाच्या मते, कायदा, न्याय, नैतिकता, लोकशाही, स्वातंत्र्य या आणि यासारख्या कल्पना ऐतिहासिक वर्ग म्हणून विचारात घेतल्यास त्यातील आशय मात्र भौतिक परिस्थिती आणि लोकांची सामाजिक वस्तुस्थिती याद्वारे निर्धारित केले जातात. मानवी जीवनाच्या परिस्थिती बदलल्या की, संकल्पनांचा आशय किंवा कल्पना यातही बदल होतो.

मार्क्सवादाचा थोडक्यात सारांश असा की, जरी मानवी हक्कांना मान्यता दिली असली तरी व्यवहारात मात्र साम्यवादी राष्ट्रांनी त्यांच्या राष्ट्रात अनेक मानवी हक्क नाकारले होते व आजही ते नाकारले जात आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

## ५. समाजशास्त्रीय दृष्टिकोन :–

२०व्या शतकात अनेक शास्त्रज्ञांचे मानवी हक्काच्या अध्ययनाकडे लक्ष वेधले गेले. नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रातही लोक, त्यांची संस्कृती, त्यांच्यातील संघर्ष, त्यांचे हितसंबंध याबाबतच्या अध्ययनाला आणि आकलनाच्या प्रक्रियेला गतिमानता प्राप्त झाली. सामाजिक शास्त्रज्ञांनी कायदेशास्त्राच्या संदर्भातून मानवी हक्काची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला.

समाजशास्त्रीय न्यायतत्त्वशास्त्र हे पूर्वाश्रमीचे सिध्दांत आणि न्यायतत्त्वशास्त्राचे विश्लेषणात्मक प्रकारचे सिद्धांत या दोन्हीपासून दूर जात आहेत. त्यांच्या मानवी हक्कांशी संबंध जोडायचे म्हटले तर काही वेळा हा दृष्टिकोन संस्थात्मक विकासाच्या प्रश्नांकडे प्रत्यक्ष लक्ष देतो किंवा काहीवेळा सरकारी धोरणांच्या विशेष समस्यांवर प्रकाशझोत टाकतो.

मानवी हक्कांचा विचार करता समाज आणि कायदा या दोन घटकांच्या वर्तनात्मक पैलूंकडे समाजशास्त्रीय सिद्धांत आपले लक्ष वेधतो. मानवी हक्कांच्या संदर्भात विचार करता हा दृष्टिकोन मानवी हक्क व्यवस्थेचे प्रायोजिक अंगभूत घटक, सामाजिक प्रक्रियेच्या संदर्भात ओळखतो.

समाजशास्त्रीय संप्रदायाचे प्राथमिक स्वरूपाचे योगदान हे की, त्यात प्रचलित नैतिक भावना आणि प्रचलित काळी व स्थळी अस्तित्त्वात असलेली सामाजिक–आर्थिक परिस्थिती यातील हितसंबंधात संतुलन प्राप्त करण्यावर भर दिला आहे. या दृष्टिकोनाची बांधणी विल्यम जेम्स यांच्या पुढील व्यावहारिक तत्त्वावर करण्यात आली आहे. 'वस्तूंचा आवश्यक गुणधर्म हा केवळ मागणीचे समाधान वा पूर्तता करण्यात आहे.' हा दृष्टिकोन २०व्या शतकातील समाजातील विविध गरजांच्या वाढत्या मागणीच्या विकासाशी संबंधित आहे. या मागण्या प्राधान्याने बेरोजगारांना, अपंगाना, विशेषाधिकारांपासून वंचित असलेल्यांना, अल्पसंख्यांकांना व समाजातील अन्य मूलभूत तत्त्वांना सहाय्य करण्यासाठी केल्या आहेत.

तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोनाचे वरीलप्रमाणे मानवी हक्कबाबतचे विविध दृष्टिकोन होते. पण त्याचबरोबर मानवी हक्कांच्या काही आधुनिक सिध्दांतही आहेत, त्याचाही अभ्यास आपल्याला करावा लागेल.

## क) आधुनिक दृष्टिकोन :-

जेरोमि जे शेस्टॅक यांनी आधुनिक मानवी हक्कांवर चर्चा केली आहे. हे हक्क पुढीलप्रमाणे :-

### १. नैसर्गिक हक्कांवर आधारित हक्क :-

दुसऱ्या महायुध्दानंतर नैसर्गिक हक्क सिद्धांताचे पुनरुज्जीवन करण्यात आले. आधुनिक हक्कांचे समर्थन करणारे विद्वान पूर्वीच्या सिध्दांतकाराप्रमाणे आधुनिक/अध्यात्मिक पोषाख न घालता माणसाच्या हक्कांचे विश्लेषण करताना हे हक्क 'गुणवत्ताधारक नैसर्गिक हक्क' असल्याचे प्रतिपादन करतात व ते मूल्यांची ओळख शाश्वत आणि सार्वभौमिक पैलूंच्या आधाराने करून देतात.

आधुनिक हक्काचे समर्थक या गोष्टीला सहमती दर्शवितात की, फक्त प्रत्यक्षवादी कायदेशीर व्यवस्था ही मूल्यांच्या कार्याद्वारे परिणामकारक कायदेशीर व्यवस्था म्हणून कार्य करू शकते. नैसर्गिक हक्कांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलून ते 'काय पाहिजे' च्या ऐवजी काय आहे असे करण्याचा प्रयत्न यात होता.

नैसर्गिक हक्कांच्या संदर्भात सामान्य विषयाचा जो उदय झाला तो अवाढव्य अशा कुटुंबाच्या सिध्दांताद्वारे ज्यामध्ये निरंकुश हक्क मध्यवर्ती गृहिततत्त्व हे कामापुरते असते असे मानून व्यक्तीच्या मूल्य स्वातंत्र्याला किंवा स्वायत्ततेला हक्कांच्या सार्वभौमिक व्यवस्थेत मान्यता मिळवून देणे महत्त्वाचे मानले गेले होते.

### २. उपयोगिता मूल्यावर आधारित हक्क :-

मूल्य हा तत्त्वज्ञानाचा एक सार्वसामान्य भाग आहे, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समानता, न्याय, नीतीशास्त्र आणि नैतिक तत्त्वे इत्यादी मूल्ये समाजातील मानवी संबंधाना आकार देण्याचे कार्य करतात. मानवी मूल्यांची भूमिका ही मानवी हक्कांची निर्मिती, संरक्षण व संवर्धन यासाठी महत्त्वाची आहेत.

सर्वसामान्यपणे आपण मूल्यांचा विचार हा दैनंदिन जीवनात जी मूल्ये अंगीकारतो त्याविषयी करतो. व्यक्ती-व्यक्तीनुसार मूल्यांचे स्वरूप वेगळे असते व ते अनुभव व परिस्थितीनुसारही वेगळे असते. हे काही प्रमाणात बरोबर असेल तरी मूलभूत मूल्ये सर्वांसाठी समान असतात. स्वातंत्र्य, संरक्षण, सवलत तसेच जीवसंरक्षण, दयाळूपणा, दु:ख, आनंद इत्यादी भावनांवर आधारित मूल्ये समान असतात व समान मूल्यावरच मानवी हक्काची उभारणी होते. काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्कांचे तत्त्वज्ञानशास्त्र हे मूल्यासारखेच समान आहे. म्हणून मूल्य हे मानवी हक्कांचे मूलभूत अधिकार आहेत.

मानवी हक्क आणि मूल्य यांची सांगड घालताना समाजशास्त्र उपयोगितेला महत्त्व देतात. त्यांच्या

मते, समानता, सुखासीनता, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, मानसन्मान आणि अन्य मूल्ये मानवी वर्तनाशी संबंधित आहेत आणि ही मूल्ये समाजाच्या दृष्टीने उपयोगी आहेत व त्या मूल्यांचेच रूपांतर मानवी हक्कात होते. मानवी हक्कांचा मूलाधार हा मूल्यांची उपयोगिता असला पाहिजे असे उपयोगितावादी विचारवंतांचे मत आहे.

## ३. न्यायावर आधारित हक्क :-

'सामाजिक संस्थांचा सद्गुण म्हणजे न्याय' अशी न्यायाची व्याख्या जॉन रावल्स यांनी केली आहे. त्यांच्या मते, 'मानवी हक्क' म्हणजे न्यायाचा शेवट होय. म्हणून मानवी हक्कांचे आकलन करण्यात न्यायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आधुनिक समाजात मानवी हक्कांचा कोणताही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सिध्दांत रावल्स यांच्या सिध्दांताचा संदर्भ घेऊनच केला जातो.

रावल्स यांनी न्यायाची दोन तत्त्वे सांगितली आहेत ती म्हणजे - (१) रावल्स यांचे न्यायाचे पहिले तत्त्व हे की, प्रत्येक व्यक्तीला समान हक्क मिळाले पाहिजेत. (२) रावल्स यांचे न्यायाचे दुसरे तत्त्व हे वितरणात्मक न्यायाशी संबंधित आहे.

रायल्स यांचे पहिले तत्त्व मूलभूत स्वातंत्र्यावर प्रकाशझोत टाकते, तर दुसरे तत्त्व न्यायाच्या वितरणात्मक समस्यांवर प्रकाशझोत टाकते.

कायदेतज्ज्ञांच्या मते, न्याय म्हणजे साध्या शब्दात सदाचरणी, प्रामाणिक, योग्य आणि समानतेच्या पार्श्वभूमीवर वापरण्यात येणारी संज्ञा होय. न्यायाच्या संकल्पनेची जर मोजणी करावयाची असेल तर अनेक साधनांचा वापर करावा लागतो. जर तुम्हाला परिपूर्ण न्याय साध्य करावयाचा असेल तर तुम्हाला समानता, नैतिकता, नीतिशास्त्र इत्यादी संकल्पनांवर भर द्यावा लागतो. मानवी हक्कांचा हेतू हा प्रत्येक राज्याने आपल्या नागरिकांना स्थिर परिस्थिती प्राप्त करून दिली पाहिजे असा असतो. शेवटी न्यायाच्या साहाय्यानेच अनेक मानवी हक्क साध्य करणे शक्य असल्याने मानवी हक्कांच्या अभ्यासात न्यायाचे अध्ययन तितकेच महत्त्वाचे आहे.

## ४. प्रतिष्ठेवर आधारित हक्क :-

अनेक मानवी हक्क सिध्दांतकारांनी बहुव्यापक मानवी हक्क व्यवस्था ही मूल्यधारणेच्या स्थितीज्ञानावर आधारित दृष्टिकोनावर स्थापित करून, मानवी प्रतिष्ठेला संरक्षण प्राप्त करून दिले. परस्परावलंबी मूल्ये ही मानवी प्रतिष्ठेच्या नियमाअंतर्गत येतात. मानवी प्रतिष्ठेत मान, सत्ता, प्रबोधन, कल्याण, आरोग्य, कौशल्य, प्रेम आणि नीतिमत्ता यांचा अंतर्भाव होतो.

मॅक्‌ड्युगल यांच्या मतानुसार मानवी हक्कांच्या मूल्यांचे अंतिम उद्दिष्ट हे आहे की, जागतिक समुदायात मूल्यांचे लोकशाहीवर आधारित वितरण करण्यास उत्तेजन देणे आणि उपलब्ध संसाधनांचा

जास्तीत जास्त वापर करणे. तसेच सामाजिक धोरणांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामाजिक प्रतिष्ठेला संरक्षण देणे. समाजातील मानवी प्रतिष्ठा व तद्संबंधीची मूल्ये जतन करणे हे मानवी हक्क संरक्षण यंत्रणेचे महत्त्वाचे कार्य आहे.

मानवी संबंध व मानवी हक्क यांचे नियमन करण्यात प्रतिष्ठा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. ज्या मानवी हक्कांचे नियमन प्रतिष्ठा करते त्यात प्रामुख्याने स्वातंत्र्य, समानता, स्वायत्तता इत्यादी मूलभूत हक्कांचा समावेश होतो. मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहिरनाम्यात हे नमूद केले आहे की, 'कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत.' मूल्य प्रतिष्ठेशी निगडीत आहे. थोडक्यात प्रतिष्ठा एक मूल्य असून प्रतिष्ठेचे रक्षण म्हणजे एक प्रकारे मानवी हक्कांचे रक्षण होय व त्यासाठी राज्य व व्यक्ती यांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

## ५. समानतेवर आधारित हक्क :-

रोनाल्ड द्वारकीन ह्यांच्या सिध्दांताची सुरवात राजकीय नैतिकतेच्या गृहीततत्त्वापासून करतात. राजकीय नैतिकता या गृहीततत्त्व म्हणजे सरकारने त्यांच्या सर्व नागरिकांना समानतेने व सन्मानाने वागवावे.

द्वारकीन यांचा असा विश्वास होता की, स्वातंत्र्य ही संज्ञा अत्यंत मोघम स्वरूपाची आहे. परंतु काही विशिष्ट स्वातंत्र्यांना विशिष्ट स्वरूपाचे संरक्षण व हस्तक्षेपापासून मुक्ती मिळाली पाहिजे. या प्रकारच्या स्वातंत्र्यात भाषण स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य आणि वैयक्तिक व लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याच्या स्वातंत्र्यांना विशेष संरक्षण मिळणे गरजेचे आहे. ही सर्व स्वातंत्र्ये समानतेचे द्योतक आहेत. द्वारकीन यांचा समानतेचा सिध्दांत हा मौल्यवान आहे. कारण या सिध्दांताने संघर्षात्मकतेपेक्षा तर्कसंगततेवर भर दिला होता. कायदेतज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून मानवी हक्काचा अंगभूत घटक म्हणजे समानता होय.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न ❊

❒ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते हक्क म्हणजे काय?

२. १९९३ सालच्या मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार मानवी हक्क म्हणजे काय?

३. ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना कोणते तीन मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले होते?

४. सॉक्रेटिस व प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार नैसर्गिक कायदा म्हणजे काय?

५. मानवी हक्क समजण्यासाठी हक्कांच्या कोणत्या तीन पातळ्यांचा विचार करणे आवश्यक आहे?

६. सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते कोण होते?

७. नैसर्गिक हक्काची तीन वैशिष्ट्ये कोणती?

८. रावल्स यांनी न्यायावर आधारित हक्कांबाबत कोणती दोन तत्वे सांगितली आहेत?

९. मानवी हक्काबाबतचे प्रमुख दोन दृष्टिकोण कोणते?

## १.४ सारांश

मानवी हक्क हे मूलभूत हक्कांप्रमाणे अत्यंत महत्त्वाचे, पवित्र, सनातन व अलौकिक स्वरूपाचे असतात. मानवी हक्क हे सर्व नागरिकांसाठी व्यक्ती म्हणून स्वाभाविक स्वरूपाचे असतात. प्रस्तुत घटकामध्ये आपण मानवी हक्काची संकल्पना, स्वरूप, मानवी हक्कांचा इतिहास व मानवी हक्काबाबतच्या दृष्टिकोनाचे सविस्तर विवेचन केले.

प्राचीन काळी मानवी हक्कांच्या संकल्पनेची जाणीव जनतेत नव्हती व कायदेशीर दृष्टीने, विचार करता मानवाला तसे कोणतेच हक्क सरकारतर्फे दिले गेले नव्हते. मानवी हक्कांची तीव्रतेने जाणीव दुसऱ्या महायुध्दानंतर झाली. जर्मनीतील नझिने ज्यूंची केलेली निर्घृण हत्या. अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेले अणुबाँब यात अनेक निरपराध व्यक्तींचा बळी गेला. या घटनेनंतर संपूर्ण जगातील नेते अंतर्भुख झाले व परिणामत: १९४८ साली 'मानवी हक्काच्या सार्वभौमिक जाहीरनामा प्रसिद्ध झाला व मानवी हक्कांच्या रक्षणाच्यादृष्टीने पहिले पाऊल टाकले.

मानवी हक्कांचे ऐतिहासिक समालोचन पाहता मानवी हक्कांचे विशेष कायदे व नियम, मानवी हक्कांचा उदय, विकास तसेच डॉ. उमेश चन्द्र यांनी प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील मानवी हक्काच्या परिस्थितीवर चर्चा केली. तसेच मानवी हक्काच्या अध्ययनाच्या दोन दृष्टिकोनावर सविस्तर चर्चा केली.

सर्वसाधारणपणे या घटकात आपण मानवी हक्कांचा अर्थ, ऐतिहासिक विकास व त्याबाबतच्या सैध्दांतिक दृष्टिकोनावर स्पष्टीकरण दिलेले आहे.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते, ''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय

की, ज्याशिवाय व्यक्तीला स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.''

२. १९९३ सालचा मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार- ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार, भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे.''

३. ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना तीन मुलभूत हक्क प्रदान केले होते ते असे- (१) भाषण स्वातंत्र्याचा हक्क (इसोगोरिया), (२) कायद्यासमोर सर्व समान असल्याचा हक्क (इसोनोमिया), (३) सर्वांना समान आदर दर्शविण्याचा हक्क (इसोटोमिया).

४. सॉक्रेटिस व प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार ''विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यात प्रतिबिंबीत होतात अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात.''

५. मानवी हक्क समजण्यासाठी मानवी मूल्य, राजकारण आणि कायदा या हक्कांच्या तीन पातळ्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

६. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक व जॅक्स रुसो हे राजकीय तत्त्वज्ञ सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते होते.

७. नैसर्गिक हक्कांची तीन वैशिष्ट्ये- (१) मानवी हक्कांना मान्यता मिळावी लागते. (२) मानवी हक्क अदेय नैसर्गिक व स्वाभाविक असल्याचे मानतात. (३) सर्व मानवी व्यक्ती समाज असतात असे मूलत:च मानले जाते.

८. रावल्स यांनी न्यायाची दोन तत्त्वे सांगितली ती अशी- (१) प्रत्येक व्यक्तीला समान हक्क मिळाले पाहिजेत. (२) वितरणात्मक न्यायाशी संबंधित.

९. मानवी हक्काबाबतचे प्रमुख दोन दृष्टिकोण- (१) तत्त्वज्ञानशास्त्रीय किंवा सैद्धांतिक दृष्टिकोण (२) व्यावहारिक किंवा उपयुक्ततावादी दृष्टिकोण.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❒ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्कांचा अर्थ व स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. मानवी हक्कांचा अर्थ सांगून मानवी हक्कांचा ऐतिहासिक आढावा विशद करा.

३. मानवी हक्काबाबतचा तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोण स्पष्ट करा.

४. मानवी हक्कांबाबतचा व्यावहारिक दृष्टिकोण विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **कोतापल्ले लक्ष्मण**, *''भारतातील सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाज कार्य''*, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

२. **य. च. म. मु. नाशिक**, *''मानवी हक्कातील मुलभूत संकल्पना''*.

३. **प्रा. पी. के. कुलकर्णी**, *''मानवी हक्क आणि सामाजिक न्याय''*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३.

❀ ❀ ❀

### घटक–२

# संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क

# (United Nations Organizations and Human Rights)

**२.१ उद्दिष्ट्ये**

**२.२ प्रस्तावना**

**२.३ विषय विवेचन**

- **२.३.१ मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८**
- **२.३.२ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६**
- **२.३.३ नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६**

**२.४ सारांश**

**२.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**२.६ सरावासाठी प्रश्न**

**२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

## २.१ उद्दिष्ट्ये :–

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरण प्रक्रियेत संयुक्त राष्ट्रांची भूमिका समजावून घेता येईल.
- ज्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रे मानवी हक्कांच्या संदर्भात कार्य करते त्या माध्यमांची म्हणजेच संयुक्त राष्ट्रातील संस्था, विधेयके यांची ओळख होईल.

- मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा (१९४८) समजून घेता येईल.
- आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) स्पष्ट होईल.
- नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) समजून घेता येईल.

## २.२ प्रस्तावना

प्राचीन काळापासून 'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार झालेला आढळतो. भारतात ऋग्वेदातील काही ठिकाणी यासंदर्भाचे लिखाण दिसून येते. तसेच संत वाङ्मयातही विषमता संपवून समता प्रस्थापित करण्याचा विचारही दिसून येतो. परंतु १८७९ मध्ये सापडलेली पार्शियन सम्राट सायरसच्या ख्रिस्तपूर्व ६व्या शतकातील 'सायरस वृत्तचित्ती'त मानवी हक्काबाबतची महत्त्वपूर्ण तत्त्वे अंतर्भूत केलेली आहेत. हिच 'सायरस वृत्तचित्ती', 'मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज' म्हणून मानला जातो. भारतात ख्रिस्तपूर्व ३ऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी 'नागरी हक्कांची तत्त्वे प्रस्थापित केली. तथापि, मानवी हक्कांच्या आधुनिक विचारसरणीची सुरवात स्टॉईक्स या ग्रीक तत्त्ववेत्याच्या 'नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांता'पासून झाल्याचे मानले जाते. परंतु ग्रीक परंपरेचा हक्कांच्या संदर्भात विचार करता तेथे हक्कांची संकल्पना वर्गानुसार होती. कारण ग्रीकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, कायद्यासमोर समानतेचा हक्क व समतेचे हक्क यांना मान्यता दिली असली तरी स्त्रिया व गुलाम यांना मात्र ते नाकारण्यात आले होते. अशीच विसंगती जगातील अनेक परंपरांच्यामध्ये 'हक्कांच्या'संदर्भात आढळते. त्यामुळेच जगातील विविध देशांनी त्यांच्यावर प्रभाव असणाऱ्या परंपरा, विचारधारेनुसार आपल्या देशासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. त्यामुळे विविध देशातील 'मानवी हक्का'संदर्भात एकवाक्यता किंवा समानता नव्हती. ही एकवाक्यता आणण्याची सुरवात संयुक्त राष्ट्रांकडून झाली. म्हणूनच मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात संयुक्त राष्ट्रांचे योगदान खूपच असाधारण आहे. त्या योगदानाची माहिती घेणे आवश्यक आहे.

## २.३ विषय विवेचन

'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार विविध देशात प्राचीन काळापासून केलेला आढळतो. तसेच या देशांनी आपल्या नागरिकांना काही हक्क दिल्याचेही आढळते. पण यामध्ये सर्व देशात, राज्यात समानता नव्हती. एखाद्या देशाने एखादा विशिष्ट हक्क 'मानवी हक्क' म्हणून दिलेला आहे व तोच हक्क दुसऱ्या एखाद्या देशाने नाकारलेला असेल असे चित्र होते. कारण जगातील या विविध देशांनी त्यांच्यावर ज्या परंपरांचा, विचारधारेचा प्रभाव आहे, त्यानुसार आपल्या देशासाठी, राज्यासाठी मानवी हक्कांची

निश्चिती केली होती. साहजिकच त्यामुळे देशा-देशातील, राज्या-राज्यातील 'मानवी हक्क' संदर्भात एकवाक्यता नव्हती.

तथापि, संपूर्ण जगच दोन जागतिक महायुद्धांच्या भयावह व गंभीर परिणामांना सामोरे गेले. मानवी हक्कांच्या उल्लंघनाने परिसिमा गाठली होती. जागतिक शांतता व सुरक्षितता तसेच व्यक्तीस्वातंत्र्य व हक्कांची जागतिक स्तरावर पुर्नस्थापना करण्याची, यामध्ये एकवाक्यता आणण्याची गरज निर्माण झाली. याच उद्देशाने १९४५ ला स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेला सुरवात केली व तिचा विकास केला. त्याकरिता आयोग, विधेयके, विविध संस्था स्थापन केल्या. त्या माध्यमातून मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करणे, जाहिरनामा तयार करणे, आंतरराष्ट्रीय करारनामे तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीची यंत्रणा कार्यान्वित करणे हे कार्य मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांनी केले. या कार्याची ओळख व अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ❑ मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयीकरण व संयुक्त राष्ट्रे

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी व त्याकरिता व्यक्तिस्वातंत्र्य व हक्कांची पुर्नस्थापना करण्याच्या विचारातून २४ आक्टोबर, १९४५ ला 'संयुक्त राष्ट्रांची' स्थापना झाली.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत जे उद्देश अथवा भूमिका स्पष्ट केल्या गेल्या, त्यातील एक उद्देश म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होय. इथपासून आजपर्यंत मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेत संयुक्त राष्ट्र सातत्याने महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. मानवी हक्कांची यादी व नियमावलीबरोबरच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणाही निर्माण करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाची प्रक्रिया पुढील माध्यमातून गतिमान केल्याचे स्पष्ट होते.

१. महासभा/आमसभा

२. आर्थिक व सामाजिक परिषद.

३. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग.

४. सुरक्षा परिषद.

५. मानवी हक्काने आंतरराष्ट्रीय विधेयक.

६. मानवी हक्कांसाठीचा उच्चायुक्त.

७. आंतरराष्ट्रीय न्यायालय.

८. मानव अधिकार सभा.

## ❁ संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग :-

सन १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्थापन केलेला 'मानवी हक्क आयोग' हा मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या आयोगाची निश्चित केलेली उद्दिष्टे व कार्ये यावरून हे अधिक स्पष्ट होईल. तथापि, या आयोगाचे मुख्यालय 'जिनिव्हा' येथे होते.

### ✪ उद्दिष्टे :-

१. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रात मानवी हक्क संरक्षणाच्या स्थितीचा आढावा घेणे.

२. मानव हक्क बाबत जाणीव जागृती व संरक्षण.

३. अल्पसंख्यांक, महिला, बालक व युध्दकैदि यांच्या हक्कासंदर्भात जाणीव-जागृती करणे.

### ✪ कार्ये :-

१. मानवी हक्कांची यादी तयार करणे.

२. नागरी व राजकीय हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

३. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

४. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करणे.

५. वंश, धर्म, भाषा, लिंग इ. आधारावरील भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.

## ❁ मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक :-

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून मानवी हक्कांच्या प्रसार व संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांकडून जे अनेकविध ठराव संमत करण्यात आले. त्यातील महत्त्वाच्या पाच ठरावांना एकत्रित करून, त्यांच्या संचास 'मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक' असे म्हटले जाते. ते पाच ठराव म्हणजे-

१. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८.

२. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६.

३. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६.

४. नागरी व राजकीय हक्काविषयीचा ऐच्छिक ठराव.

५. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांविषयीचा ऐच्छिक ठराव.

यातील प्रमुख ठरावांचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :-

## २.३.१ मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८ (Universal Declaration of Human Rights 1948)

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील पहिले महत्त्वाचे पाऊल म्हणून 'संयुक्त राष्ट्रांची सनद' ओळखली जाते. कारण या सनदेत जो उद्देश किंवा भूमिका निश्चित करण्यात आले, त्यापैकी एक उद्देश म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होता. तथापि, या सनदेत मानवी हक्काबाबतच्या सुस्पष्टतेचा, नेमकेपणाचा अभाव होता. मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी व त्यांच्या संरक्षणाकरिताच्या आवश्यक तरतूदी निश्चित व स्पष्ट होत नव्हत्या. म्हणूनच संयुक्त राष्ट्रांच्या अनेक सदस्य राष्ट्रांनी, मानवी हककांची सर्वसमावेशक यादी तयार करावी व दुसरे म्हणजे या हक्कांच्या संरक्षणासाठीच्या तरतूदी निश्चित व स्पष्ट कराव्यात अशा दोन मागण्या संयुक्त राष्ट्रांकडे केल्या. या मागण्यांचा विचार करून संयुक्त राष्ट्राने आपल्या 'मानवी हक्क आयोगा'कडे मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करण्याचे कार्य सोपवले. आयोगाने त्याकरिता, 'मानवी हक्कांचा जाहिरनामा' तयार करून तो आमसभेपुढे ठेवला. १० डिसेंबर, १९४८ ला आमसभेने हा जाहिरनामा स्विकारून, 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' म्हणून घोषित केला.

### ❀ जाहिरनाम्याचे उद्देश व भूमिका :-

१. मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची राजकीय मान्यता प्राप्त करून घेणे.

२. जगातील प्रत्येक व्यक्तीला त्यांची जन्मजात प्रतिष्ठा व त्यांच्या समान, मूलभूत हक्कांना मान्यता देणे. याकरिता जगात स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांच्या प्रस्थापनेकरिता प्रयत्न करणे.

३. प्रत्येक व्यक्तीला भाषण, श्रध्दा इत्यादी स्वातंत्र्याची प्राप्ती झाली पाहिजे व भिती, अभावग्रस्ततेपासून मुक्त असे जग साकार व्हावे ही लोकांची सर्वोच्च आकांक्षा पूर्ण करणे.

४. मानवी हक्कांना कायदेशीर संरक्षण प्राप्त करून देणे.

५. राष्ट्रा-राष्ट्रांत मित्रत्वाच्या नात्याचे संवर्धन करणे.

६. जास्तीतजास्त मुक्त वातावरणात सामाजिक प्रगती आणि चांगल्या दर्जाच्या जीवनमानाचे संवर्धन करणे.

७. संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने मानवी हक्कांचा आणि मूलभूत स्वातंत्र्याचा सार्वत्रिक सन्मान व आचरण यांचे संवर्धन करणे.

## मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा (१९४८) मधील मानवी हक्कांची यादी–

संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगाकडून तयार केलेला व संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ ला स्विकारलेल्या व घोषित केलेल्या 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' यामध्ये एकूण ३० कलमे आहेत. यातून मानवी हक्काबाबत आश्वासन, राजकीय व नागरी हक्क व आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्क स्पष्ट केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

- **कलम १ :** सर्व मानवी व्यक्ती या जन्मत: स्वतंत्र असून त्यांना समान अधिकार/हक्क व समान प्रतिष्ठा आहे.
- **कलम २ :** या जाहिरनाम्यातील सर्व हक्क व स्वातंत्र्य प्रत्येकास आहेत. वंश, लिंग, धर्म, वर्ण, भाषा, राजकीय अथवा इतर मतप्रणाली, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूलस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा इ.च्या आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही.
- **कलम ३ :** प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्याचा, जिविताचा व सुरक्षित राहण्याचा हक्क आहे.
- **कलम ४ :** कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून ठेवता येणार नाही व गुलामगिरी तसेच गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध केला पाहिजे.
- **कलम ५ :** कोणत्याही व्यक्तीस अमानुष, अपमानास्पद, क्रूर व कमीपणा आणणारी वागणूक कोणीहि देता कामा नये व कोणाचा छळ करू नये.
- **कलम ६ :** प्रत्येक व्यक्तीस कायद्यासमोर 'माणूस' म्हणून मान्यता मिळवण्याचा हक्क आहे.
- **कलम ७ :** कायद्याच्या दृष्टिकोणातून सर्व व्यक्ती समान आहेत व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.
- **कलम ८ :** मूलभूत हक्क जे घटनेने अथवा कायद्याने दिले आहेत. त्या हक्कांचा भंग झाल्यास, त्या विरोधात सक्षम राष्ट्रीय न्यायाधीकरणाद्वारे परिणामकारक उपाययोजना करवून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

- **कलम ९ :** कोणत्याही व्यक्तीस कोणीही मनमानी पध्दतीने हद्दपार, स्थानबध्द किंवा अटक करता कामा नये.

- **कलम १० :** कोणाहि व्यक्तीस त्याचे हक्क, जबाबदाऱ्या व दंडनीय आरोप याबाबतच्या निर्णयासाठी स्वतंत्र व नि:पक्षपाती अधिकरणाद्वारे न्याय व जाहिर सुनावणीचा हक्क आहे.

- **कलम ११ :** न्यायालयीन चौकशीत आरोप सिध्द होण्यापूर्वी संबंधित आरोपीस निरपराध गृहित धरण्याचा हक्क तसेच एखाद्या व्यक्तीने केलेले कृत्य हे कृत्य केले त्यावेळेच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याने गुन्हा ठरत नसेल तर त्या व्यक्तीस दोषी धरता कामा नये तसेच गुन्हा घडला, त्यावेळी त्या गुन्ह्याबाबत जी शिक्षा असेल तीच्यापेक्षा जास्त कडक शिक्षा करता येणार नाही.

- **कलम १२ :** कोणाच्याहि खाजगी जीवनात कोणालाही मनमानी पद्धतीने हस्तक्षेप करता येणार नाही. तसेच त्याच्या प्रतिष्ठेवर आघात करता कामा नये. यासाठी प्रत्येकास कायद्याने संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम १३ :** प्रत्येकाला संचार व वास्तव्य यांच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे.

- **कलम १४ :** छळ होणाऱ्या कोणाही व्यक्तीस त्या छळापासून स्वत:ची मुक्तता करून घेण्याचा तसेच इतर देशात आश्रय मिळविण्याचा हक्क आहे.

- **कलम १५ :** प्रत्येकाला राष्ट्रीयत्व मिळवण्याचा हक्क आहे. तसेच कोणालाही कोणाचेही राष्ट्रीयत्व मनमानीपणे हिरावून घेता येणार नाही व राष्ट्रीयत्व बदलण्याचा हक्क नाकारता येणार नाही.

- **कलम १६ :** सज्ञान स्त्री-पुरुषांना कोणत्याही बंधनाशिवाय परस्पर संमत्तीने विवाह करण्याचा व कौटुंबिक जीवन जगण्याचा हक्क आहे. तसेच वैवाहिक जीवन व विवाह विच्छेद याबाबत प्रत्येकास समान अधिकार आहे. तसेच कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम १७ :** प्रत्येकाला मालमत्ता धारण करण्याचा, मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क आहे. तसेच कोणाही व्यक्तीची मालमत्ता कोणीहि मनमानी पद्धतीने हिरावून घेता कामा नये.

- **कलम १८ :** प्रत्येकास विचार व आचार स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याच्या अधिकारामाध्ये व्यक्तीला आपला धर्म व श्रध्दा बदलण्याचा हक्क, तसेच आपण स्वीकारलेल्या धर्म व श्रध्दा जाहिरपणे अथवा खाजगीत व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

- **कलम १९ :** प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, माहिती व विचार प्राप्त करण्याचा व ती प्राप्त माहिती, विचार इतरांना देण्याचा अधिकार आहे.

- **कलम २० :** प्रत्येकास संघटना व शांततापूर्ण सभा घेण्याचा हक्क असून कोणीही कोणासही कोणत्याही संघटनेचा सदस्य होण्याची सक्ती करता कामा नये.

- **कलम २१ :** प्रत्येकाला स्वत:ला किंवा त्याने निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत शासनात सहभागी होण्याचा हक्क आहे. तसेच शासकीय सेवेत प्रवेश मिळविण्याचा समान हक्क आहे. निवडणूका या गुप्त मतदान पद्धतीने व निर्बंधरहित पध्दतीने झाल्या पाहिजेत.

- **कलम २२ :** प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षा प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे व प्रत्येकास आपली प्रतिष्ठा, व्यक्तीमत्त्व यांच्या मुक्त विकासास आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार प्राप्त करण्याचा हक्क आहे.

- **कलम २३ :** प्रत्येकास काम मिळवण्याचा, आपल्या इच्छेनुसार काम निवडण्याचा व बेकारीपासून मुक्त होण्याचा हक्क आहे. तसेच समान कामासाठी समान वेतन प्राप्त करण्याचा व व्यापारी संघ निर्माण करणे किंवा अशा संघात सहभागी होण्याचा हक्क आहे.

- **कलम २४ :** निश्चित केलेले कामाचे तास व पगारी सुट्ट्या या माध्यमातून प्रत्येकास विश्रांती मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम २५ :** प्रत्येकास तो व त्याचे कुटुंबीय यांना आरोग्य व स्वास्थ्य यासाठी आवश्यक राहणीमान प्राप्त करण्याचा हक्क आहे. तसेच त्याला उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसेल तर सुरक्षितता प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. त्याचबरोबर माता व मुले यांना आवश्यक मदत मिळवण्याचा हक्क असून सर्व मुलांना सारखेच संरक्षण प्राप्त झाले पाहिजे.

- **कलम २६ :** प्रत्येकास शिक्षण मिळवण्याचा हक्क असून प्राथमिक शिक्षण मोफत असले पाहिजे व माध्यमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. उच्च शिक्षण गुणवत्तेनुसार सर्वांना समान उपलब्ध झाले पाहिजे. व्यावसायिक व तंत्र शिक्षणाची सोय उपलब्ध असली पाहिजे. आपल्या मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे ठरवण्याचा अधिकार त्याच्या माता-पित्यांना आहे. तथापि, त्या शिक्षणातून परस्पराप्रती सलोखा, सहकार्य, शांतता वृध्दिंगत झाली पाहिजे.

- **कलम २७ :** प्रत्येकास समाजाच्या सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा, वैज्ञानिक प्रगतीतून प्राप्त लाभ मिळविण्याचा व स्वनिर्मित गोष्टीतून निर्माण होणाऱ्या हितसंबंधाना संरक्षण प्राप्त करून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

- **कलम २८ :** जाहिरनाम्यातील हक्क, स्वातंत्र्य प्राप्त होण्यासाठी सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा लाभ घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.
- **कलम २९ :** प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा आदर राखावा. नितीमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व लोकांचे कल्याण यासंबंधी न्याय गोष्टीचे आचरण करावे. तसेच कायद्याच्या चौकटीत प्रत्येने रहावे.
- **कलम ३० :** वरीलपैकी कोणत्याही हक्कात ढवळाढवळ, हस्तक्षेप करण्यास, ते नष्ट करण्यास प्रतिबंध.

अशाप्रकारे जाहिरनाम्यातील कलम एक व दोन हे मानवी हक्कांबाबतचे आश्वासन सर्वांना देतात. तर,

कलम तीन ते कलम एकवीस अशी एकोणीस कलमे नागरी व राजकीय हक्क स्पष्ट करतात. तसेच,

कलम बावीस ते कलम तीस मानवी हक्कांच्या सनदेतील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क स्पष्ट करतात.

## * स्वयं-अध्ययन प्रश्न-१ *

- **रिक्त जागा भरा.**

१. संयुक्त राष्ट्रांची सनद ............... ला लागू करण्यात आली.

२. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय ............... येथे होते.

३. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा संयुक्त राष्ट्राने ................ तारखेस घोषित केला.

४. 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' या जाहिरनाम्यात एकूण ................ कलमे आहेत.

५. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यातील कलम ................. नुसार गुलामगिरी व गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध करण्यात आले.

६. प्रत्येकाला संचार व वास्तव्य आपल्या इच्छेनुसार करण्याचे स्वातंत्र्य आहे हे संयुक्त राष्ट्राच्या 'मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यातील' कलम ................ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

७. कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क 'मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यामध्ये कलम ................ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

## २.३.२ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ (International convenant on Economic, Social and Cultural Rights, 1966)

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १६ डिसेंबर १९६६ ला 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' स्विकारला. परंतु या करारनाम्याच्या अंमलबजावणीसाठी ३५ सदस्य राष्ट्रांचे समर्थन या करारनाम्यास आवश्यक होते. हे समर्थन प्राप्त झाल्यानंतर ३ जानेवारी १९७६ ला हा करारनामा अंमलात आला.

व्यक्तीगत विकासासाठी आणि प्रतिष्ठेकरिता आवश्यक असलेले सर्व आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क या करारनाम्यात प्रस्थापित करण्यात आले आहेत. केवळ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा अंतर्भाव असलेला आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिला करारनामा म्हणून या करारनाम्यास ओळखले जाते. या करारास मान्यता देणाऱ्या सदस्य राष्ट्रांनी तो तात्काळ अंमलात आणावा असे बंधन घालण्यात आले नव्हते कारण यातील काही अधिकारांची अंमलबजावणी ही त्या राष्ट्रांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून होती. म्हणून सदस्य देशांनी आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार उत्तरोत्तर या करारनाम्याची अंमलबजावणी करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या करारनाम्याच्या अंमलबजावणीसाठी एक विशेष समिती स्थापन करण्यात आली. या करारातील हक्कांच्या प्रचार-प्रसाराची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांच्या 'सामाजिक व आर्थिक परिषदेकडे' सोपवण्यात आली.

या करारनाम्याचे उद्देश व भूमिका तसेच करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क आणि त्यांचा अर्थ तसेच त्या हक्कांच्या संरक्षणासाठीची उपाययोजना पुढीलप्रमाणे.

### करारनाम्याचे उद्देश व भूमिका

१. प्रत्येकाला व्यक्तिगत विकास व प्रतिष्ठा याकरिता आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांची सर्वसमावेशक यादी करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता प्राप्त करून घेणे.

२. वंश, धर्म, वर्ण, लिंग, भाषा, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा इत्यादीवरून कोणताही भेदभाव न करता सर्वांना आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत समान हक्क प्राप्त करून देणे.

३. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या शारीरिक व मानसिक उत्तम आरोग्यासाठी आवश्यक हक्क प्राप्त करून देणे.

४. प्रत्येक व्यक्तीस शिक्षणाचा हक्क व त्यासंदर्भातील सोयी-सुविधा प्राप्त करण्याचा हक्क आहे, तो त्यांना प्राप्त करून देणे.

५. प्रत्येकाला काम मिळवण्याचा, काम करण्याचा व यासंदर्भातील सोयी-सुविधा प्राप्त करण्याचा हक्क आहे. तो त्यांना प्राप्त करून देणे.

६. प्रत्येकास आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क प्राप्त करून देणेसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर योग्य समन्वय, नियोजन व कार्यवाहीची यंत्रणा स्पष्ट करणे.

या उद्देशपूर्तीसाठी करारनाम्यात अंतर्भूत केलेली कलमे व त्यातून स्पष्ट होणारे हक्क व कार्यवाहीची यंत्रणा पुढीलप्रमाणे :-

## ❁ आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) मधील कलमे :-

या करारनाम्यामध्ये एकूण २६ कलमे आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण या करारनाम्याचे पुढील तीन भागात विभाजन करू.

(अ) करारनाम्यात देण्यात आलेली आश्वासने, हमी व वचने (कलम १ ते ५)

(ब) करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क (कलम ६ ते १५)

(क) करारनाम्याचे समर्थन, स्वीकृती व अंमलबजावणी/कार्यवाहीची पध्दत (कलम १६ ते २६)

## (अ) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यात देण्यात आलेली आश्वासने, हमी व वचने :-

- **कलम १ :** प्रत्येकास स्वयंनिर्णयाचा तसेच स्वत:चा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास साधण्याचा व त्याकरिता स्वत:च्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापराचा हक्क असून त्यापासून कोणाला वंचित केले जाणार नाही. अर्थात, हे करताना परस्परांचा लाभ सिध्दांत, आंतरराष्ट्रीय कायद्यावर आधारित आंतरराष्ट्रीय सहकार्यावर प्रतिकूल परिणाम केला जाणार नाही, असे आश्वासन या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे देतात.

- **कलम २ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे अशी हमी देत आहेत की, या करारनाम्यातील हक्क कोणताही भेदभाव न करता (उदा. वंश, वर्ण, धर्म, लिंग, ......) प्रत्यक्षात आणले जातील. तसेच विकसनशील देश बिगर नागरिकांना या करारनाम्यातील आर्थिक हक्क कधीपर्यंत देऊ शकतील यासंदर्भातला निर्णय ते स्वत: घेऊ शकतील.

- **कलम ३ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे करारनाम्यातील सर्व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क पुरुष व स्त्रियांना समानतेने उपभोगता येतील अशी हमी देत आहेत.

- **कलम ४ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे अशी हमी देतात की, कोणत्याही राष्ट्रातील अस्तित्वात असणाऱ्या हक्कांच्या उपभोगावर तीच नियंत्रणे लादली जातील, जी कायद्याने निश्चित केली असतील व त्यांचा हेतू लोकशाही समाजाच्या सार्वजनिक कल्याणाचा विकास असेल.

- **कलम ५ :** या करारनाम्यातील स्वीकृत हक्क व स्वातंत्र्य यांची हमी किंवा नाश होईल असा या करारनाम्यातील कोणत्याही भागाचा अर्थ लावू नये व लावला जाणार नाही. तसेच,

  कोणत्याही देशातील मान्यताप्राप्त व प्रचलित मूलभूत मानवी हक्क की जे या करारनाम्यात नाहीत म्हणून त्या देशाच्या अशा मूलभूत मानवी हक्कांवर निर्बंध लादले जाणार नाहीत व त्यांची अप्रतिष्ठा केली जाणार नाही.

## (ब) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क

- **कलम ६ :** प्रत्येक व्यक्तीला रोजगार प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. तसेच कोणता रोजगार अथवा काम करावयाचे हे ठरवण्याचा हक्क आहे व निवडलेले काम करण्याचा हक्क आहे. या हक्काच्या सुरक्षेसाठी राष्ट्र आवश्यक ती पाऊले उचलेल. यामध्ये त्या व्यक्तींच्या राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याचे रक्षण होईल, अशी परिस्थिती निर्माण करणे व पूर्ण वेळ, उत्पादक रोजगार निर्माण करणे यांचा समावेश होतो.

- **कलम ७ :** प्रत्येक व्यक्तीला न्याय व अनुकूल परिस्थितीत रोजगाराच्या हक्काचा उपभोग घेण्याचा हक्क आहे.

  यामध्ये सुयोग्य वेतन, समान काम, समान वेतन, सुरक्षित आणि स्वास्थ्यकारक कामाची परिस्थिती, सेवाज्येष्ठता व सक्षमता या कसोटीवर पदोन्नती मिळवण्याची समान

संधी, योग्य प्रमाणात कामाचे तास, विश्रांती, मनोरंजन व त्याच्या कुटुंबियांचा योग्य जीवन स्तर इत्यादीचा समावेश होतो.

- **कलम ८ :** कोणत्याही कामगाराला स्वत:च्या विकासासाठी व सुरक्षेसाठी कामगार संघटना स्थापन्याचा, स्वइच्छेनुसार कामगार संघटनेचा सदस्य होण्याचा हक्क आहे. तसेच त्यास राष्ट्रीय महासंघ किंवा संयुकत संघ स्थापन्याचा तसेच या माध्यमातून आंतरराष्ट्रीय मजूर महासंघ बनवणेचा, त्यामध्ये सामील होण्याचा हक्क आहे. तसेच त्या-त्या देशाच्या कायद्याच्या चौकटीत राहून संपावर जाण्याचा हक्क आहे. तसेच,

  कामगार संघटनेस कायद्याच्या माध्यमातून, राष्ट्रीय सुरक्षितता व सार्वजनिक सुव्यवस्था तसेच इतरांचे हक्क व स्वातंत्र्याचे रक्षण इत्यादी संदर्भातील निर्बंध सोडून इतर कोणत्याही निर्बंधाशिवाय स्वतंत्रपणे कार्य करण्याचा हक्क आहे.

  तथापि, सशस्त्र दले, पोलीस किंवा राज्याच्या प्रशासनातील कर्मचारी यांना या हक्कांच्या वापराबाबत जे निर्बंध घातले आहेत त्या निर्बंधाना हे कलम प्रतिबंध करणार नाही.

- **कलम ९ :** प्रत्येक व्यक्तीस सामाजिक विम्यासह सामाजिक सुरक्षिततेचा हक्क आहे.

- **कलम १० :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे या गोष्टींचा स्विकार करतात की,

  (१) प्रत्येक कुटुंबाला संरक्षण व साहाय्य द्यावयास हवे.

  (२) हे संरक्षण व साहाय्य कुटुंबातील मूलांचे पालन-पोषण व शिक्षण याबाबत प्राधान्याने मिळावे.

  (३) विवाहास इच्छुक जोडीदारांच्या परस्पर संमत्तीनेच विवाह होईल.

  (४) प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात मातांना योग्य काळ आवश्यक संरक्षण मिळावे. कामकरी मातांना पगारी रजा किंवा सामाजिक सुरक्षिततेच्या फायद्यासह रजा द्यावी.

  (५) बालके व लहान मुले यांना कोणत्याही भेदभावाशिवाघय सहाय्य व आर्थिक-सामाजिक शोषणापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांना धोकादायक कामाच्या रोजगारास ठेवणे कायद्याने शिक्षेस पात्र व्हावे व बालमजूरांची वयोमर्यादा निश्चित करावयास.हवी.

- **कलम ११ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे प्रत्येक व्यक्तीला भुकेपासून मुक्ती मिळविण्याच्या हक्कास मान्यता देतात. त्याकरिता प्रत्येक व्यक्ती व तिच्या कुटुंबास अन्न, वस्त्र, निवारा व आवश्यक जीवनस्तराचा हक्क मान्य करतात.

- **कलम १२ :** प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक उत्तम आरोग्यासाठी आवश्यक हक्क व कृतींचा स्वीकार केला आहे. यामध्ये –

  (१) मृतावस्थेत जन्म व बालमृत्यू दर कमी करणे.

  (२) साथीचे रोग व अन्य रोगासाठी प्रतिबंधक उपाय.

  (३) वैद्यकीय सेवा व देखभाल इ. सोयी उपलब्ध करून देणे.

  (४) पर्यावरणीय व औद्योगिक आरोग्यविषयक सुधारणा करणे यांचा समावेश होतो.

- **कलम १३ :** प्रत्येक व्यक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा स्वीकार केला आहे. यामध्ये शिक्षणविषयक पुढील बाबी स्पष्ट केल्या आहेत.

  (१) शिक्षणाचा उद्देश हा मानवी व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास तसेच मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य याबाबत आदरभाव वाढवणे हा मान्य केला गेला.

  (२) प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे व मोफत असेल.

  (३) तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासह विविध प्रकारचे माध्यमिक शिक्षण सर्वांना उपलब्ध असावे.

  (४) उच्च शिक्षण क्षमतेनुसार सहज उपलब्ध करून देण्यात येईल.

  (५) सर्व स्तरावर शाळा पध्दतीचा विकास, शिष्यवृत्ती पुरेशा प्रमाणात उपलब्ध व शिक्षकांच्या भौतिक सोयीसवलतीत सतत सुधारणा करण्यात येतील.

  (६) मातापिता अथवा पालक यांना मूलासाठी शाळा निवडण्याचे स्वातंत्र्य असेल.

- **कलम १४ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे आपल्या राष्ट्राने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण अंमलात आणू शकले नाहीत त्यांनी दोन वर्षांच्या आत त्याबाबत नियोजन करून त्याबाबत खात्री देत आहेत.

- **कलम १५ :** हे कलम सांस्कृतिक हक्काबाबत आहे. यानुसार प्रत्येक व्यक्तीला सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा, वैज्ञानिक प्रगतीचा लाभ घेण्याचा, साहित्य व कलात्मक कृतीतून होणाऱ्या नैतिक, भौतिक संरक्षणाच्या लाभाचा हक्क आहे. तसेच वैज्ञानिक संशोधन आणि सर्जनशील निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्याच्या हक्काचा आदर करण्याची खात्री सर्व पक्षकार राष्ट्रे देत आहेत.

## (क) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्याचे समर्थन, स्वीकृती व अंमलबजावणी/कार्यवाहीची पध्दत

- **कलम १६ :** पक्षकार राष्ट्रे या करारनाम्यात मान्य झालेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्कांच्या अंमलबजावणीचा व प्रगतीचा अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवाकडे सादर करतील.

- **कलम १७ :** पक्षकार राष्ट्रे आर्थिक व सामाजिक परिषदेने ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार आपल्या कार्याचा अहवाल एक वर्षाच्या आत सादर करतील. या कार्यात कोणत्या बाबी सहाय्यभूत ठरल्या व कोणत्या अडचणी आल्या हे अहवालात नमूद करतील.

- **कलम १८ :** संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत अंतर्भूत असणाऱ्या मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्ये याबाबत पक्षकार राष्ट्रांनी पार पाडावयाच्या जबाबदारीचा पाठपुरावा, आर्थिक व सामाजिक परिषद करेल व यासंबंधीच्या प्रगतीचा अहवाल मागवण्यासंबंधी विशेष समित्यांच्या माध्यमातून सोय करेल.

- **कलम १९ :** पक्षकार राष्ट्राकडून उपरोक्त १६, १७ व १८ या कलमात स्पष्ट केलेले अहवाल तसेच कलम १८ नुसार विशेष समित्यांनी मानवी हक्कासंबंधी केलेले अहवाल मानवी हक्क आयोगाकडे अभ्यासासाठी, शिफारशीसाठी व माहितीसाठी पाठवू शकेल.

- **कलम २० :** मानवी हक्काबाबत पक्षकार राष्ट्रे, विशेष समित्या व आर्थिक व सामाजिक परिषदेकडून प्राप्त अहवालात केलेल्या शिफारशी किंवा मानवी हक्क आयोगाने त्यांच्या कोणत्याही अहवालात अशा सर्वसाधारण शिफारशीसंबंधी दिलेल्या संदर्भाविषयी मानवी हक्क आयोग स्वत:ची टिप्पणी सादर करू शकतील.

- **कलम २१ :** या करारनाम्यातील हक्कांच्या अंमलबजावणीचे आर्थिक व सामाजिक परिषदेकडे प्राप्त झालेल्या पक्षकार राष्ट्रांच्या अहवालाची माहिती परिषद महासभेला देईल.

- **कलम २२ :** या करारनाम्याच्या परिणामकारक व प्रगतीशील अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील.

- **कलम २३ :** मान्यताप्राप्त हक्कांच्याप्राप्तीसाठी पक्षकार राष्ट्रासोबत आंतरराष्ट्रीय कृती करणे. उदा. संमेलने व विभागीय बैठकांचे आयोजन, शिफारशी स्वीकारणे, तांत्रिक साहाय्य देणे इत्यादी.

- **कलम २४ :** संयुक्त राष्ट्रांच्या संसदेतील तरतुदी व या करारनाम्यातील बाबीसंबंधी संयुक्त राष्ट्रांच्या विविध जबाबदाऱ्यांची व्याख्या करणाऱ्या इतर विशेष समित्यांच्या घटना यांना बाधा पोहचेल अशा पध्दतीने या करारनाम्यातील कोणत्याही बाबींचा अर्थ लावण्यात येऊ नये.

- **कलम २५ :** या करारनाम्यातील कोणत्याही बाबींचा असा अर्थ लावू नये की, ज्यामुळे नैसर्गिक हक्क व उपभोगावर विपरित परिणाम होईल.

- **कलम २६ :** (१) या करारनाम्यावर पुढील घटक स्वाक्षरी करू शकतील. संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्य, त्याच्या विशिष्ट समित्यांचे सदस्य, आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या सनदेतील पक्षकार राष्ट्रे तसेच महासभेद्वारा या करारनाम्यातील पक्षकार म्हणून निमंत्रित राष्ट्र. (२) हा करारनामा समर्थनाच्या अधीन असेल व समर्थनाचे दस्तऐवज संयुक्त राष्ट्राच्या महासचिवाकडे जमा केले जातील. त्यानंतर या करारनाम्याची स्वीकृती निश्चित धरली जाईल.

## * स्वयं-अध्ययन प्रश्न-२ *

- **रिक्त जागा भरा.**

१. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' संयुक्त राष्टांच्या आमसभेने ......................... तारखेस स्विकारला.

२. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मधील हक्कांच्या प्रचार-प्रसाराची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांनी आपल्या ................. सोपवली.

३. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' च्या अंमलबजावणीसाठी संयुक्त राष्ट्राच्या ........................... सदस्य राष्ट्रांचे समर्थन आवश्यक होते.

४. रोजगार निवडीचा हक्क, स्वातंत्र्य हे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मधील ....................... कलमात नमूद करण्यात आला.

५. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६' मधील ........................... कलमात 'कामगार संघटने' संदर्भातील हक्क नमूद करण्यात आला आहे.

## २.३.३ नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ (International Convenant on Civil and Political Rights, 1966) :-

संयुक्त राष्ट्राने, 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा' १० डिसेंबर १९४८ ला घोषित केला. या जाहिरनाम्यात मानवी हक्कांची एक सर्वसमावेशक यादी प्रथमच आंतरराष्ट्रीय पातळीवरून जाहिर केली गेली. परंतु हा जाहिरनामा मार्गदर्शक स्वरूपाचा होता. त्याची अंमलबजावणी करणे सदस्य राष्ट्रावर बंधनकारक नव्हते. परिणामी, हा जाहिरनामा मानणारे काही राष्ट्रे याच जाहिरनाम्यातील मानवी हक्कांचे उल्लंघन करत होती. त्यामुळे मानवी हक्कांचे संरक्षण सदस्य राष्ट्रांनी केलेच पाहिजे असे बंधन करण्याची गरज निर्माण झाली. म्हणूनच मानवी हक्कांचे संरक्षण सदस्य राष्ट्रावर बंधनकारक करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने दोन महत्वाचे करार केले. त्यापैकी पहिला करार म्हणजे 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' हा होय. हा करारनामा संयुक्त राष्ट्राने १६ डिसेंबर, १९६६ ला स्विकारला, परंतु त्याच्या अंमलबजावणीसाठी ३५ राष्ट्रांची स्वीकृती गरजेची होती. ही स्वीकृती प्राप्त झाल्यानंतर १९७६ ला हा करारनामा खऱ्या अर्थाने अस्तित्वात आला. या करारनाम्यातील तरतुदी केवळ मार्गदर्शक स्वरूपाच्या नव्हत्या तर त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांवर त्यांची अंमलबजावणी बंधनकारक होती.

हा करारनामा ५३ कलमासह एकूण सहा भागात विभागण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रथमच एवढ्या विस्तृत स्वरूपात नागरी व राजकीय हक्कांचा समावेश करण्यात आला असून यातील हक्क स्वातंत्र्य, न्याय आणि शांततेच्या तत्वावर आधारलेली आहेत. या करारनाम्याचे आणखी एक विशेष म्हणजे यामध्ये व्यक्तींच्या हक्काबरोबरच समूहाचे हक्कही स्पष्ट करण्यात आले.

या करारनाम्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी १८ सदस्यांची, 'मानवी हक्क समिती' स्थापन करून तिला या कराराच्या अंमलबजावणीचे अधिकार देण्यात आले आहेत.

### करारनाम्याचे उद्देश व भूमिका :-

१. जगात स्वातंत्र्य, न्याय व शांततेच्या निर्माणासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत समावेश असलेल्या सर्व व्यक्तींच्या मूलभूत हक्कांना कायदेशीर स्वरूप देत त्या हक्कांना आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता प्राप्त करून घेणे.

२. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत समावेशीत मानवी हक्क हे मूलत: मानवाच्या अंत:करणातील आत्मसन्मानातून आलेले असल्याने ते त्यांना प्राप्त करून देणे.

३. प्रत्येकाला स्वत:चे नागरी व राजकीय हक्क तसेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क उपभोगता येतील तेव्हाच भय व अभाव यांच्यापासून मुक्त मानव ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करणे.

४. संयुक्त राष्ट्राच्या सनदेवर स्वाक्षरी करणारे देश हे मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांच्याबद्दल सार्वत्रिक सन्मान जागवणे व त्याची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द असल्याने नागरी व राजकीय हक्काबाबत करारनामा करून त्यास कायदेशीर स्वरूप देणे.

५. प्रत्येक व्यक्ती व समुदायाची, दुसऱ्या व्यक्ती व समुदायाप्रती काही कर्तव्ये आहेत. या कर्तव्याकरिता व मानवी हक्क, मूलभूत स्वातंत्र्य यांचा विकास व बंधनकारक अंमलबजावणीसाठी करारनामा करणे.

## नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) मधील कलमे :-

हा करारनामा सहा भागात विभागला असून यामध्ये एकूण ५३ कलमांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण त्याची पुढील तीन भागात विभागणी करू.

(अ) व्यक्तीच्या जगण्याशी अथवा अस्तित्वाशी संबंधीत व व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यासंबंधीचे हक्क, (ब) समूहाचे हक्क, (क) राजकीय हक्क.

उपरोक्त तीन भागातून आपण नागरी व राजकीय हक्कांचा करारनामा पुढीलप्रमाणे समजावून घेवू.

## (अ) व्यक्तीच्या जगण्याशी अथवा अस्तित्वाशी संबंधित व व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यासंबंधीचे हक्क :-

१. या करारनाम्यातील कलम सहाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीस जीविताचा हक्क जन्मजात आहे. त्यामुळे कोणाचेही प्राण मनमानीपणे कोणालाही हिरावून घेता येणार नाही. कायद्याद्वारे प्रत्येक व्यक्तीच्या जगण्याच्या व जीवनाच्या जन्मजात हक्काचे रक्षण करण्यात येईल हे स्पष्ट केले आहे.

याचबरोबर देहान्ताची शिक्षा झालेल्या व्यक्तीस दयेचा अथवा शिक्षा कमी करण्यासाठी विनंती अर्ज करण्याचा हक्क आहे, आणि वयवर्ष अठरा खालील व्यक्ती तसेच गर्भवती स्त्रीस देहान्ताची शिक्षा दिली जाणार नाही.

२. कलम सात मध्ये हे स्पष्ट केले आहे की, कोणत्याही व्यक्तीचा छळ केला जाणार नाही. तसेच कोणत्याही व्यक्तीला अमानवी, क्रूर व अपमानास्पद वागणूक अथवा शिक्षा दिली जाणार नाही. यामध्ये विशेषत: कोणत्याही व्यक्तीच्या पूर्वसंमतीविना त्याच्यावर वैज्ञानिक, वैद्यकीय प्रयोग केले जाणार नाहीत. अशाप्रकारे छळ व क्रूर अमानवी वागणूकीविरुध्दचा हक्क देण्यात आला आहे.

३. कलम आठ नुसार प्रत्येक व्यक्तीला गुलामगिरी अथवा दास्यत्वाविरुध्दचा अधिकार देण्यात आला. या अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून ठेवता येणार नाही तसेच सर्व प्रकारची गुलामी व गुलामांच्या व्यापारास बंदी घालण्यात आली आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीचा अपवाद वगळता कोणाही व्यक्तीकडून वेठबिगारी किंवा जबरदस्तीने श्रम करून घेतले जाणार नाही.

४. या करारनाम्यातील कलम नऊ अन्वये प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्याचा व संरक्षणाचा हक्क स्पष्ट केला आहे. त्यानुसार,

कायद्याने निश्चित केलेली कारणे व प्रक्रियेशिवाय कोणाही व्यक्तीची मनमानी पध्दतीने धरपकड केली जाणार नाही व त्या व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. ज्या व्यक्तीला अटक केली जाईल तेव्हा त्यास अटकेची कारणे व त्याच्यावरील आरोप त्याला त्याचवेळी सांगितले जातील. तसेच त्या व्यक्तीला सुयोग्य काळात खटला चालविण्याचा व त्यातून सुटकेचा हक्क असेल. तसेच त्याला न्यायालयीन प्रक्रियेचा लाभ घेण्याचा हक्क असेल.

त्याचबरोबर बेकायदेशीर अटक झालेल्या व्यक्तीस नुकसान भरपाई मागण्याचा हक्क आहे.

५. कलम दहा अन्वये ज्या व्यक्तीला अटक, स्थानबध्द केले आहे; स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे, त्या व्यकतीस मानवतेची वागणूक देत त्याच्या जन्मजात आत्मसन्मानाचा आदर केला जाईल. तसेच,

आरोपी व्यक्तीस शिक्षा झालेल्या व्यक्तीपासून वेगळे ठेवण्यात यावे. शिवाय बाल अरोपीवरील खटला लवकरात लवकर चालवण्यात यावा व त्यांना प्रौढ आरोपीपासून वेगळे ठेवण्यात यावे.

६. कलम अकरा अन्वये कोणत्याही व्यक्तीस, त्याने झालेल्या करारानुसार जबाबदारी पार पाडली नाही म्हणून किंवा घटनात्मक उत्तरदायित्वाची पूर्तता करण्यास सक्षम न ठरल्यावरून कोणालाही शिक्षा करता येणार नाही.

७. कलम बारामध्ये प्रत्येक व्यक्तीला देशाच्या सीमांच्या अंतर्गत स्वइच्छेने संचार करण्याचा व वास्तव्य करण्याचा हक्क स्पष्ट केला आहे. तसेच, प्रत्येक व्यक्तीला आपला देश किंवा इतर कोणताही देश सोडण्यास कायद्याने निश्चित केलेल्या प्रतिबंधाशिवाय इतर कोणतेही निर्बंध घालण्यात येणार नाहीत. त्यास देश सोडण्याचा हक्क असेल व कोणत्याही व्यकतीचा स्वदेशात परतण्याचा हक्क मनमानी पद्धतीने कोणालाही हिरावून घेता येणार नाही.

८. या करारनाम्यातील कलम सोळानुसार, प्रत्येक व्यक्तीला सर्व ठिकाणी कायद्यासमोर ‘एक व्यक्ती’ म्हणून मान्यता मिळवण्याचा हक्क आहे.

९. कलम सतरानुसार, कोणाही व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात इतर कोणासही मनमानीपद्धतीने हस्तक्षेप करता येणार नाही व त्याच्या आत्मसन्मान तसेच प्रतिष्ठेवर आघात करता येणार नाही. तसे झाल्यास त्या व्यक्तीस अशा हस्तक्षेपाविरोधात कायदेशीर संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

१०. कलम अठरानुसार प्रत्येक व्यक्तीला धर्म, पंथ व विचार याबाबतचे स्वातंत्र्य आहे. तो आपल्या इच्छेनुसार धर्म, पंथ व विचार निवडू शकतो. त्याच्या इच्छेशिवाय त्याच्यावर कोणताही धर्म, पंथ, विचार स्वीकारण्याची सक्ती कोणासही करता येणार नाही. तसेच,

कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत राहून प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क असेल. तसेच माता-पिता अथवा कायदेशीर पालकांना त्यांच्या मुलांचे धार्मिक, नैतिक शिक्षण निश्चित करण्याचे स्वातंत्र्य व हक्क असेल.

११. कलम एकोणिसनुसार, प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्कानुसार प्रत्येक व्यक्तीला जगातील कोणतीही माहिती, विचार मिळवण्याचा, ती स्विकारण्याचा तसेच ती हस्तांतरित करण्याचा हक्क आहे. अर्थात, यास कायद्याने निश्चित केलेल्या बाबींची मर्यादा असेल.

## (ब) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील समूहसंबंधी हक्क :-

१. या करारनाम्यातील कलम तेरानुसार एखाद्या देशात कायदेशीररित्या एखादा विदेशी नागरिक वास्तव्य करीत असेल तर त्या व्यक्तीस राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कारणास्तव कायद्याद्वारे झालेल्या निर्णयानुसारच त्या देशाबाहेर घालविता येईल. अर्थात त्या देशाच्या अशा निर्णयाचा त्यांना पुर्नविचार करण्याची विनंती करण्याचा हक्क त्या नागरिकास असेल.

२. कलम चौदानुसार न्यायालये व न्यायाधिकरणे यांच्यासमोर सर्व व्यक्ती समान असतील. तसेच कायद्याने जोपर्यंत गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत त्या गुन्ह्याच्या आरोप असलेल्या व्यक्तीस निरपराध मानले जाईल. त्याचबरोबर त्याला पुढील अधिकार असतील.

(अ) त्याच्यावरील आरोप त्याला समजेल अशा भाषेत लवकरात लवकर समजून देणे.

(ब) स्वत:च्या बचावासाठी स्वत:च्या वकिलासोबत चर्चा करता येईल.

(क) त्याला कायदेशीर सहाय्य उपलब्ध नसेल तर आवश्यक कायदेशीर सहाय्य प्राप्त करून घेणे.

(ड) न्यायालयातील प्रचलित भाषा समजत नसेल तर विनाशुल्क दुभाषा मिळवून घेण्याचा हक्क असेल.

(इ) शिक्षा झाल्यास किंवा न्याय मिळाला नाही असे वाटल्यास उच्च न्यायाधिकरणाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.

(ई) एकाच गुन्ह्यामध्ये एकदा अंतिम निर्णय झाला असेल तर त्याच गुन्ह्यासाठी त्या व्यकतीवर पुन्हा खटला भरता येणार नाही.

३. कलम पंधरानुसार एखाद्या व्यक्तीने केलेली एखादी कृती अथवा वर्तन हे ज्यावेळी ती कृती केली त्यावेळी ती कृती राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार दंडनीय गुन्हा ठरत नसेल तर त्या कृतीबाबत त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरविता येणार नाही.

४. कलम एकवीसनुसार लोकांना शांततापूर्ण रितीने एकत्र येण्याचा, सभा, संमेलने भरवण्याचा हक्क आहे. अर्थात, त्यास कायदेशीर परवानगी घ्यावी लागेल.

५. कलम बावीसनुसार प्रत्येक व्यक्तीला संघटना स्थापन करण्याचा हक्क आहे. याअंतर्गत कामगार संघटना स्थापण्याचा अथवा अशा संघटनात सामील हाण्याचा हक्क असेल.

६. कलम तेवीसनुसार, कुटुंब ही समाजातील एक मुलभूत सामाजिक संस्था व समाजाचा घटक आहे. त्याला समाज व राजसत्ता या दोहोकडून आवश्यक संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे. तसेच,

सज्ञान स्त्री व पुरुष यांना परस्परांच्या संमतीने विवाह करण्याचा आणि कुटुंब स्थापन्याचा हक्क आहे.

तथापि, या करारनाम्याचा स्वीकार केलेली राष्ट्रे विवाह, पती-पत्नीचे वैवाहिक जीवनातील हक्क व भूमिका तसेच घटस्फोट व घटस्फोटानंतर मुलांना योग्य संरक्षण देण्यासंबंधी तरतुदी करतील हे स्पष्ट करण्यात आले आहे.

७. कलम चोवीसनुसार सर्व बालकांना त्यांचा वंश, वर्ण, धर्म, पंथ, भाषा, राष्ट्रीय व सामाजिक उगम, संपत्ती इत्यादी कोणत्याही भेदभावाशिवाय स्वत:चे कुटुंब, समाज व राजसत्तेमार्फत संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे. तसेच,

प्रत्येक बालकाची जन्माची नोंद तात्काळ करण्यात येईल व त्याचे एक नाव असेल व त्याला एक राष्ट्रीयत्व प्राप्त करण्याचा हक्क असेल.

८. कलम सत्तावीसनुसार असे लोक जे वांशिक, धार्मिक, भाषिक अल्पसंख्यांक आहेत. त्यांना स्वत:ची भाषा, संस्कृती, धर्म यांची जपणूक व संवर्धन करण्याचा अधिकार या अल्पसंख्यांक समाजाला असेल.

## (क) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील राजकीय हक्क :-

१. या करारनाम्यातील कलम एक असे स्पष्ट करते की, सर्व लोकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे, ज्यायोगे ते त्यांच्या राजकीय दर्जाविषयी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतील. तसेच,

सर्व लोकांना आपल्या स्वत:च्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्वत:च्या नैसर्गिक संपत्ती व साधनांचा मुक्तपणे वापर करण्याचा अधिकार आहे. आणि,

सर्व सदस्य राष्ट्रे वरील स्वयंनिर्णयाच्या हक्कप्राप्तीच्या दिशेने आवश्यक कार्यवाही करतील.

२. कलम दोन अन्वये या करारनाम्यावर स्वाक्षरी करणारे प्रत्येक राष्ट्र, आपल्या राष्ट्रातील व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या बाबतीत वंश, वर्ण, धर्म, भाषा, राष्ट्रीय किंवा सामाजिक उगम, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जासंबंधात कोणताही भेदभाव न या करारनाम्यातील हक्कांचा सन्मान करतील व त्यासाठीची अंमलबजावणी करण्याचे वचन देत आहेत. या करारनाम्यातील हक्क व स्वातंत्र्याचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत सक्षम न्याय देण्याचे वचन देत आहेत.

३. कलम तीननुसार या करारनाम्यावर स्वाक्षरी करणारी राष्ट्रे, करारनाम्यात सामील सर्व नागरीकांना, स्त्री-पुरुषांना सर्व राजकीय हक्क समानतेने वापरता व उपभोगता येतील याचे वचन देतात.

४. कलम चार अन्वये हे स्पष्ट केले आहे की, या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रांपैकी एखाद्या राष्ट्रात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास, तेथील लोकांचे, समूहांचे अस्तित्व धोक्यात आल्यास अशा परिस्थितीत आवश्यक त्या मर्यादेपर्यंत आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे कोणताही भेदभाव न करता हक्कांचा, बांधिलकीचा संकोच करण्याचा त्या राष्ट्रास अधिकार आहे.

५. कलम पाच अन्वये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, या करारनाम्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या कोणत्याही तरतुदीचा, भागाचा असा अर्थ लावू नये की, ज्यामुळे कोणतेही राष्ट्र अथवा समुदाय, स्वीकृत हक्क, स्वातंत्र्य यांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर अनिर्बंध बंधने लादतील असा अर्थ लावण्यात येवू नये.

६. कलम वीस नुसार युध्दाचा प्रचार करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. तसेच वंश, वर्ण, धर्म, जात यासंबंधाने वंशा-वंशात, धर्मा-धर्मात, जाती-जातीत मत्सर व द्वेष, हिंसा घडवून समूह जीवनावर आघात करणाऱ्या व्यक्ती, गट, संघटना यांना कायद्याने बंदी असेल.

७. कलम पंचवीस अन्वये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, सर्व नागरिकांत, समूहांना वंश, वर्ण, धर्म, भाषा, पंथ, संपत्ती, राष्ट्रीय व सामाजिक उगम यावरून भेदभाव न करता सर्वांना पुढील हक्क देण्यात येत आहेत.

(अ) प्रत्यक्षपणे अथवा स्वतंत्रपणे निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत सार्वजनिक कार्यामध्ये सहभाग घेणेचा हक्क आहे.

(ब) नियमित व पारदर्शीपणे होणाऱ्या निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीने आपल्या पसंतीच्या व्यक्तीस मतदान करण्याचा हक्क आहे.

(क) आपल्या देशातील सार्वजनिक सेवामध्ये दाखल होण्यासाठी सर्वांसाठी समान नियम, अटी असतील.

८. कलम सव्वीस द्वारे सर्व लोकांस कायद्याने समानता दिली असून, सर्वांना समान आणि प्रभावी संरक्षणाची हमी दिली जाईल. याबाबत कायद्याने वंश, वर्ण, धर्म, पंथ, भाषा, जन्म, संपत्ती, राष्ट्रीयता किंवा सामाजिक उमग, दर्जा या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

## य नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा-अंमलबजावणी, संचालन पध्दती :-

या करारनाम्याच्या अंमलबजावणीचे सर्व अधिकार 'मानवी हक्क समिती'स आहेत. तथापि, या करारनाम्यातील कलम अठ्ठावीस ते कलम त्रेपन्न ही या करारनाम्याच्या अंमलबजावणी, संचालन संबंधीची, करारावर स्वाक्षरी करणेसंदर्भात व कराराच्या भाषेच्या संदर्भात आहेत.

कलम अठ्ठावीस ते पंचेचाळीसमध्ये आपणास 'मानवी हक्क समिती'ची रचना व तीच्या कार्यपध्दतीबाबतच्या तरतुदी आहेत. ढोबळमानाने या कार्यपध्दतीचे वर्णन असे करता येईल की,

१. सर्व सदस्य राष्ट्रे व करारनाम्यावर स्वाक्षरी करणारे राष्ट्रे 'नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यात' समाविष्ट अधिकाराच्या अंमलबजावणीची आपल्या राष्ट्रात काय परिस्थिती आहे याबाबत मानवी हक्क समितीकडे प्रतिवर्षी अहवाल पाठवतील.

२. सदस्य राष्ट्राकडून आलेल्या अहवालाचे समिती अवलोकन करेल व त्यासंदर्भात काही सूचना असतील तर त्या सूचना संबंधित राष्ट्राला करेल 'मानवी हक्क समितीचे' अधिकार व कर्तव्ये या करारनाम्यातील कलम एकेचाळीसमध्ये स्पष्ट केलेले आहेत.

३. एखाद्या पक्षकार राष्ट्रांकडून या करारनाम्यातील अधिकारांचा भंग अथवा उल्लंघन झाले आहे अशी दुसऱ्या पक्षकार राष्ट्राला वाटत असेल तर त्यांनी त्या उल्लंघनासंबंधी आपले म्हणणे अथवा तक्रार 'मानवी हक्क समिती'समोर सादर करावे.

४. एखाद्या पक्षकार राष्ट्राकडून या करारनाम्यातील अधिकाराचा भंग झाल्याची तक्रार आलेनंतर त्याबाबत आवश्यकता भासल्यास त्या तक्रारीच्या चौकशीसाठी समिती 'विशेष आयोगाची' स्थापना करते. हा आयोग आपला 'चौकशी अहवाल' अथवा 'शिफारशी' समितीसमोर सादर करतो.

५. मानवी हक्क समिती आपल्याकडे प्राप्त झालेले सर्व अहवाल, तक्रारी, विशेष आयोगाच्या शिफारशी इत्यादीच्या माध्यमातून आपला 'वार्षिक अहवाल' तयार करून आवश्यक त्या शिफारशींसह संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्राच्या महासभेसमोर सादर करते.

६. करारनामा पुढील भाषेत तयार करून तो संयुक्त राष्ट्रांच्या 'अभिलेख संग्रहालयात' जमा करण्यात येईल. त्या भाषा- चायनीज, इंग्लिश, फ्रेंच, रशियन व स्पॅनिश इत्यादी.

## ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ※

❑ **रिक्त जागा भरा.**

१. 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मध्ये एकूण .............. कलमे आहेत.

२. 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' च्या अंमलबजावणीसाठी .............. स्थापन करण्यात आली.

३. देहांताची शिक्षा झालेल्या व्यक्तीस दयेचा किंवा शिक्षा कमी करण्यासंदर्भातील विनंती अर्ज करण्याचा हक्क 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील' ............... कलमामध्ये देण्यात आला.

४. प्रत्येक व्यक्तीला धर्म, पंथ व विचारबाबतचे स्वातंत्र्य 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा'तील ............... कलमामध्ये दिले आहे.

५. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील ................... कलमामध्ये अशी तरतूद केली आहे की, लोकांना शांततापूर्णरीतीने एकत्र येणे, सभा, संमेलने भरवण्याचा अधिकार आहे.

## २.४ सारांश

या घटकामध्ये आपण मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्राचे योगदान याचा अभ्यास केला आहे. मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाची गरज व त्यासाठी संयुक्त राष्ट्राने केलेले कार्य अभ्यासताना, या कार्यासाठी संयुक्त राष्ट्राने यंत्रणा कार्यान्वित केल्या त्यांचा आढावा घेतला आहे. हा आढावा आपण संयुक्त राष्ट्राची आमसभा, आर्थिक व सामाजिक परिषद, संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग, सुरक्षा परिषद, मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक, मानवी हक्कासाठीचा उच्चायुक्त, आंतरराष्ट्रीय न्यायालय, मानव अधिकार सभा यांच्या आढावातून घेतला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रानी मानवी हक्कांच्या संदर्भातील 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा, १९४८', 'आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६', 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' यांचाही सविस्तर आढावा घेतला. यातून एक बाब स्पष्ट होते की, मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात संयुक्त राष्ट्रांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❊ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-१ ❊

१. २४ ऑक्टोबर १९४५.

२. 'जिनिव्हा'.

३. १० डिसेंबर, १९४८.

४. ३० कलमे.

५. कलम ४० नुसार (०४).

६. कलम १३ मध्ये.

७. कलम १६ मध्ये.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-२ ❊

१. १६ डिसेंबर, १९६६.

२. सामाजिक व आर्थिक परिषद.

३. ३५ सदस्य राष्ट्रांचे.

४. कलम ०६ मध्ये.

५. कलम ०८ मध्ये.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-३ ❊

१. एकूण ५३ कलमे.

२. मानवी हक्क समिती.

३. कलम ०६ अन्वये.

४. कलम १८ अन्वये.

५. कलम २१ अन्वये.

## २.६ सरावासाठी प्रश्न

**प्रश्न १ : टीपा लिहा.**

१. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८-उद्देश व भूमिका.

२. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग.

३. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' ची उद्देश व भूमिका.

४. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मध्ये देण्यात आलेली आश्वासने, हमी, वचने.

५. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्याचे उद्देश व भूमिका.

**प्रश्न २ : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयकरण व संयुक्त राष्ट्रे यावर चर्चा करा.

२. 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' स्पष्ट करा.

३. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा स्पष्ट करा.

४. 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 'मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल', नाशिक, २००९.


❑ ❑ ❑

## घटक–३

# भारतातील मानवी हक्क

# (Human Rights In India)

**३.१ उद्दिष्ट्ये**

**३.२ प्रस्तावना**

**३.३ विषय विवेचन**

**३.३.१ भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क**

**३.३.२ भारतातील मानवी हक्क अंमलबजावणी यंत्रणा**

**३.३.३ स्वयंसेवी संस्था आणि मानवी हक्क**

**३.४ सारांश**

**३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**३.६ सरावासाठी प्रश्न**

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

## ३.१ उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- भारतीय राज्यघटना व त्यावर आधारित मानवी हक्क यावर चर्चा करता येईल.
- भारतातील मानवी हक्क अंमलबजावणी यंत्रणा यांचा आढावा घेता येईल.
- मानवी हक्क मिळवण्यासाठी व त्याच्या अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका पाहता येईल.

## ३.२ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रामुख्याने भारतीय राज्यघटना व घटनेने प्राप्त करून दिलेले मुलभूत मानवी हक्क, भारतीय घटनेने मानवी हक्क अंमलबजावणीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणा व मानवी हक्क मिळवून देण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांची (Non-Government Organization) भूमिका या मुद्यांनंतर भर टाकणार आहोत. अशा प्रकारे मानवी हक्कांचे संरक्षण करत असताना हक्कांची पायमल्ली होते का? यावरदेखील प्रकाश टाकणार आहोत. संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनाम १० डिसेंबर १९४८ साली जाहीर झाला. त्यापूर्वी सुमारे १७ महिने अगोदर भारत स्वतंत्र झाला, त्यानंतर भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती निर्माण झाली. भारताची राज्यघटना २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी तयार केली गेली, त्यानुसार २६ जानेवारी, १९५० रोजी संविधानावर आधारित असे, भारत एक स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य म्हणून अस्तित्वात आले. भारतीय राज्यघटना मंजूर होण्यापूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा जाहीर झाल्यामुळे त्या जाहीरनाम्याचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत उमटणे अपरिहार्य होते. भारतीय समाजरचनेचा विचार करता, भारतीय समाज रचना ही विषमतेवर आधारलेली असून जातीव्यवस्था हे या विषमतेचे प्रतिक होय. भारतातील विषमता ही इतर देशांच्या तुलनेत कर्तृत्वापेक्षा जन्मावर आधारलेली आहे. भारतातील जातीवर आधारित विषमता समानतेच्या हक्कातील फार मोठा अडथळा आहे आणि हाच अडथळा आधुनिकीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील महासत्ताक बनु पाहणाऱ्या भारतासाठी अडचणीचा बनून राहिला आहे.

## ३.३ विषय विवेचन

लोकशाही देशामध्ये प्रत्येक व्यक्तीला राज्यघटनेने अधिकार, हक्क मिळवून दिलेले आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अनेक प्रयत्न केलेले आहेत. मानवी हक्कांच्या अमलबजावणीसाठी राज्य घटनेच्या मार्गदर्शनानुसार वेगवेगळ्या प्रकारची यंत्रणासुध्दा राबवण्यात आलेली आहे. तसेच राज्यघटनेसोबतच स्वयंसेवी संस्थासुध्दा (Non-Government Organization) मानवी हक्क सुरक्षित व त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतानाचे दिसतात.

### ३.३.१ भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क (Indian Constitution and Human Rights)

भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा अमेरिकेच्या राज्यघटनेवरून घेतला आहे. जिथे लोक सर्वश्रेष्ठ असून सरकार हे प्रतिनिधीक आणि लोकांना जबाबदार असणारे सरकार असते. अशी समाजव्यवस्था हे राज्यघटनेच्या सरनाम्याचे ध्येय आहे. राज्यघटनेचा सरनामा हा राज्यघटनेचे मुलभूत तत्त्वज्ञान आणि

राज्यघटनेच्या कर्त्याची मते जाणून घेण्याची गुरुकिल्ली मानली गेली आहे. जरी सरनाम्याच्या अमलबजावणीसाठी न्यायालयामध्ये दाद मागता येत नसले तरी लिखित राज्यघटनेसाठी सरनाम्यामुळे तीन महत्त्वाच्या हेतूसाठी उपयोगी पडते. भारत हा देश सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे. परंतु ही उद्दिष्ट्ये, न्याय स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, ऐक्य आणि अखंडता या मूल्यासह साध्य करावयाची आहे.

## १. सर्वसाधारण हक्क (कलम १२, १३)

राज्य या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यापैकी प्रत्येक राज्यांचे शासन, विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व स्थानिक किंवा प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

## २. समानतेचा हक्क (कलम १४ ते १८)

- **कायद्यापुढे समानता :** राज्य कोणत्याही व्यक्तिस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे आणि सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे येथे प्रवेश देण्यात येईल.

- **सार्वजनिक सेवायोजनेच्या बाबीमध्ये समान संधी :** राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील नियुक्तीसंबंधीच्या बाबीमध्ये सर्व नागरिकास समान संधी असेल.

  कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, निवास यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा भेदभाव केला जाणार नाही.

- **अस्पृश्यता नष्ट करणे :** घटनेच्या निर्मितीपासूनच अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेच्या भेदभावातून उद्‌वणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

## ३. स्वातंत्र्याचा हक्क (कलम १८ ते २२)

भारतामध्ये वास्तव्य असणाऱ्या सर्व नागरिकांस स्वातंत्र्याचा हक्क भारतीय राज्यघटनेने प्रदान केले आहे, त्यामध्ये भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क, शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा

हक्क, संघ बनवण्याचा हक्क, सर्वत्र देशभर मुक्तपणे संचार करण्याचा हक्क, राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचा हक्क, मालमत्ता संपादन करण्याचा हक्क, कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याचा हक्क असे अनेक प्रकारचे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. थोडक्यात, भारतीय राज्यघटनेने भारतीय नागरिकास कोणत्याही बंधनामध्ये न ठेवता मुक्तपणे राहण्याचा हक्क मिळवून दिला आहे.

## ४. शोषणाविरुध्द हक्क (कलम १८ ते २२)

माणसाचा अपव्यापार आणि वेठबिगारी यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे ह्या कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

**कलम २४ अन्वये :** चौदा वर्षाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर लावले जाणार नाही.

## ५. धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या या भागातील अन्य तरतुदींच्या अधिनतेने सदसद्विवेकबुध्दीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकारासाठी सर्व व्यक्ति सारख्याच आहेत अशा प्रकारच्या तरतुदी भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ (१) मध्ये मांडण्यात आल्या आहेत.

## ६. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ ते ३१)

भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या, कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा, लिपी व संस्कृती असेल त्याला जतन करण्याचा हक्क असेल.

राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्यनिधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

राज्य घटनेचा सरनामा हा राज्यघटनेच्या मुलभूत तत्त्वज्ञान आणि राज्यघटनेच्या कर्त्यांची मने जाणून घेण्याची गुरूकिल्ली मानली गेली आहे. सरनामा स्पष्टपणे अधिकाराचा स्रोत सांगतो. तो म्हणजे– भारतीय लोक सरनाम्याचे सुरुवातीचे शब्द 'आम्ही भारताचे लोक हे दर्शवितो की, भारताच्या सरकारचे अधिकार हे लोकांपासून प्राप्त होतात. भारताच्या सरकारास आणि राज्यांना जी ताकद दिली गेली आहे.

ती कुणा विशिष्ट मंडळाने प्रदान केलेली नाही. तर भारतीय लोकांनी प्रदान केलेली आहे. सरनाम्यामध्ये लोकांच्या उत्कठ इच्छा आणि त्या उत्कठ इच्छा ज्या आदर्शांच्याद्वारे पूर्ण करावयाच्या आहेत, ते आदर्श समाविष्ठ केलेले आहेत. भारत देश हा सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे. परंतु इ. उद्दिष्ट्ये न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, ऐक्य आणि देशाची अखंडता या मूल्यासह साध्य करावयाची आहेत.

## ❁ सार्वभौमत्त्व :-

सार्वभौमत्व हा स्वतंत्र राज्याचा विशेष गुणधर्म आहे. ते राज्याला सर्वोच्च शक्ती असल्याचे दर्शवते. साध्या शब्दात सांगायचे तर देश त्याच्या मुलखाबाहेरील कोणाचाही अधिकार मान्य करत नाही आणि मुलखाअंतर्गतच ते सर्वोच्च असतात. परंतु वर्तमान जगात सार्वभौमत्वावर अनेक नैतिक आणि कायदेशीर निर्बंध असतात, त्यामुळे कोणताही देश पूर्णपणे सर्वोच्च नसतो. कलम ५१ वे असे सांगते की, सरकारने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वृध्दिंगत करावी. राष्ट्राराष्ट्रामध्ये न्यायाचे आणि आदराचे नाते राखावे. आंतरराष्ट्रीय कायदा आणि तह यांच्यातील आदर बाळगावा. आंतरराष्ट्रीय स्तरावरील तंटे मिटवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अशा रितीने राज्यघटनेच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा कलम ५१ सह विचार केल्यास विश्वशांतीचे संवर्धन करण्याचा संदेश ध्वनीत होतो. अशा रितीने मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अनेक प्रयत्न केले पाहिजेत. भारतीय सार्वभौमत्वाची संकल्पना 'एक विश्व' आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्नेहभाव या संकल्पनाशी मिळतीजुळती आहे.

## ❁ समाजवादी :-

भारतीय राज्यघटनेचा सरनामा राज्यघटनेच्या समाजवादी दृष्टिकोणावर भर देतो. समाजवाद म्हणजे ऑक्सफर्ड शब्दकोशामध्ये सांगितल्याप्रमाणे 'उत्पादन, भांडवल, जमीन, संपत्ती' इत्यादी साधनांची मालकी आणि नियंत्रण हे पूर्णपणे समाजाकडे असावे आणि त्यांचा कारभार आणि वितरण सर्वांच्या हितासाठी व्हावे, या मताचे समर्थन करणारे सामाजिक संघटन असावे. लोकशाही असो किंवा साम्यवादी दोन्ही प्रकारच्या राज्यघटनांमध्ये ही संकल्पना वापरली गेली आहे. म्हणजेच उत्पादनाच्या साधनावर राज्याचे पूर्णपणे नियंत्रण असणारी शासनव्यवस्था होय. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, समाजवादाचा मूळ हेतू लोकांना सन्मानपूर्वक जीवन जगता येईल असे वातावरण उपलब्ध करून देणे.

## ❁ धर्मनिरपेक्ष :-

धर्मनिरपेक्ष हा राज्यघटनेचा मुलभूत गुणधर्म आहे. भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपावर भर देण्याच्या दृष्टिकोणातून १९७६ साली ४२ व्या घटना दुरुस्तीद्वारे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये

'धर्मनिरपेक्ष' हे विशेषण नव्याने घालण्यात आले. युरोपियन परंपरेनुसार धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे धर्मापासून राज्याची फारकत. तथापि, भारतीय वास्तवाच्या संदर्भातून त्याला दोन अर्थ आहेत. एक म्हणजे राज्य कोणत्याही धर्माचा अनुनय करत नाही, दुसरे म्हणजे राज्यासाठी सर्व धर्म समान आहेत.

सर्व धर्माविषयी राज्य वा शासन नेहमीच समानतेची भूमिका पार पाडत असते. म्हणजेच सर्वांना कायद्यासमोर समान लेखने व त्यांना संरक्षण पुरविणे. धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थान यावरून भेदभाव केला जात नाही. धर्माच्या नावाखाली भेदभाव न करता समानसंधी दिली जाते. प्रत्येक व्यक्तीला धर्म पाळण्याचा व धर्माचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे, म्हणजे धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.

## ❁ लोकशाही (Democracy)

भारताच्या राज्यघटनेमध्ये लोकशाही ही संज्ञा मतदानाच्या हक्कापुरती मर्यादित न ठेवता बहुसमावेशक अर्थाने वापरली गेली आहे. भारतीय राज्यघटना अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीचे समर्थन करते. त्यामध्ये ठराविक काळानंतर मुक्त आणि नि:पक्ष न्याय निवडणुकांची तरतूद आहे. धर्म, वंश, वर्ग, निवासाचे स्थान यासारख्या इतर कारणासाठी भेदभाव करण्यास राज्याला प्रतिबंध केलेला आहे. सरकार चालविण्याचे सर्वाधिकार लोकशाही पध्दतीने लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातात असतात. लोकशाहीच्या संकल्पनेत राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीदेखील अभिप्रेत आहे. म्हणून राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, विचारांचे, अभिव्यक्तिचे, विश्वासाचे, श्रध्देचे आणि उपासनेचे स्वातंत्र्य, एकसमान जीवनमान, संधी आणि बंधुता यावर भर दिला आहे. नागरिकांच्या निर्णायक सहभागाविना लोकशाही प्रत्यक्षात येणे अशक्य आहे. बलवान लोकशाही समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी नागरिकांचे नागरी शिक्षण, नेतृत्व, प्रशिक्षण आणि नैतिक मूल्ये बिंबवणे आवश्यक आहे.

## ❁ न्याय :-

मानवी हक्कांच्या सर्व पैलूना न्यायाची संकल्पना व्यापून टाकते. राज्यघटनेचा सरनामा सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचे आश्वासन देतो. मतदानाच्या हक्काद्वारे राजकीय न्यायाची हमी मिळते. सामाजिक आणि आर्थिक न्याय, हा राजकीय न्याय आणि नागरिकांमधील असमानता दूर करण्यामध्ये राज्याची सकारात्मक भूमिका याद्वारे प्राप्त केला जातो. आर्थिक न्यायाच्या संकल्पनेत समाजवादी समाजरचना आणि अस्पृश्यता, जातिव्यवस्था यासारख्या सामाजिक रूढींचे उच्चाटन अपेक्षित आहे. सामाजिक न्यायाच्या परिपूर्तीसाठी स्वातंत्र्याबरोबर सामाजिक आणि आर्थिक समानतेची समज असणे गरजेचे आहे. राज्य घटनेचे शिल्पकार अणि घटनेचे संस्थापक जवाहरलाल नेहरू यांना स्पष्ट कल्पना होती की, आर्थिक न्यायाविना राजकीय न्याय मिळणे अर्थहीन आहे. धार्मिक, जाती

आणि सांप्रदायिक भेदभावांचे प्राबल्य असलेल्या या समाजात सामाजिक न्यायाशी सांगड घातल्याशिवाय फक्त आर्थिक न्याय मिळणे पुरेसे नाही.

### ❁ स्वातंत्र्य :-

राज्य घटना सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य असल्याचे आश्वासन देते. असे स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या वर्तनावर जुलमी निर्बंधाचा अभाव असणे. ही लोकशाहीची महत्त्वाची अट आहे. भारतीय राज्यघटना सकारात्मक आणि व्यापक दृष्टिकोणातून स्वातंत्र्याला मान्यता देते. समाजातील इतरांच्या स्वातंत्र्याविषयी आदर बाळगत स्वत:चे स्वातंत्र्य उपभोगायचे असते. भारतीय राज्यघटना जनतेच्या मुलभूत अधिकाराच्या रक्षणासाठी न्यायपालिका स्वतंत्र राहिल असे आश्वासन देते.

### ❁ समानता :-

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे तिसरे उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना समान जीवनमान जगण्याची संधी देणे हे आहे. राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये समानतेची संकल्पना आढळते. व्यक्तीच्या समाजाच्या विकासासाठी समानता असणे फार आवश्यक आहे. भेदभावरहित व्यक्तिमत्त्व विकासासाठी समानता असणे आवश्यक आहे. समानता असणे म्हणजेच वंश, वर्ण, धर्म, जात, भाषा, लिंग, राजकीय मत किंवा दर्जा यावरून भेदभाव अस्तित्वात नसणे, कायद्यासमोर सर्वजण समान आहेत आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळवण्याचा अधिकार आहे.

### ❁ बंधुभाव :-

ब्रिटिश वसाहतीच्या काळातील अन्याय व अत्याचार सोसलेला असल्यामुळे राज्यघटनेचे कर्ते बंधुभावाचा आदर्श किती महत्त्वाचा आहे, हे जाणून होते. त्यांनी ब्रिटिश सत्तेचा अनुभव घेतलेला होता आणि देशाला फाळणीकडे नेणाऱ्या घटना जवळून पाहिलेल्या होत्या. त्यामुळे राज्यघटनेच्या कर्त्यांनी बंधुभावाचा आदर्श अंगीकारला. बंधुभाव म्हणजे परस्पर प्रेम की ज्यामुळे इतरांनी एखाद्यासाठी काय करावे असे वाटणे, तेच त्याने इतरांसाठी करावे किंवा तसे वागावे याकडे माणसाचा कल असणे होय. जर भारत देशाला एक राष्ट्र म्हणून अस्तित्व टिकवायचे असेल तर बंधुभाव रुजविणे गरजेचे आहे.

### ❁ ऐक्य आणि अखंडता :-

भारतीय राज्यघटनेचा सरनामा ऐक्य आणि अखंडतेवर भर देतो. देशाच्या एकतेला आणि अखंडतेला धोका पोहचविणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. देशाचे ऐक्य आणि अखंडता टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. त्याविना देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक इ. प्रगती

करणे शक्य नाही. जर देशामध्ये एकता व अखंडता टिकली तरच विकास शक्य आहे. भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा महात्मा गांधी, नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी सज्ज आहे, म्हणजेच असा भारत की जिथे गरिबातल्या गरीब माणसालासुध्दा हा देश त्याचा आहे याची जाणीव होते, असा भारत की जिथे सर्वजण गुण्यागोविंदाने राहतील.

### ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✲

(अ) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये कोणकोणते हक्क नमूद करण्यात आले आहेत?

(ब) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची उद्दिष्ट्ये सांगा?

(क) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यानुसार समाजवाद म्हणजे काय?

## ३.३.२ भारतातील मानवी हक्क अंमलबजावणी यंत्रणा (Mechanisms for Implemetation of Human Rights in India) :-

भारतीय राज्यघटनेने भारतातील प्रत्येक नागरिकास त्याचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला त्यानुसार प्रत्येक व्यक्ती आपले अधिकार व कर्तव्य पार पाडण्यास बांधिल आहे हे आपणा सर्वांना माहितच आहे. पण याबरोबरच एक प्रकारची यंत्रणा मानवी हक्क अंमलबजावणीसाठी सज्ज आहे, याचाही विसर आपणास पडता कामा नये, म्हणजेच यामुळे समाजातील उपेक्षित घटकांचे मानवी हक्क जपणाऱ्या वैधानिक यंत्रणांची माहिती असणे गरजेचे आहे. या मानवी हक्क अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा कोणत्या आहेत? काय स्वरूपाच्या आहेत? त्यांची उद्दिष्ट्ये, कार्ये या सर्व गोष्टींची माहिती असणे एक अभ्यासक व नागरिक म्हणून महत्त्वाचे आहे.

### ❁ राष्ट्रीय महिला आयोग :-

भारतीय राज्यघटनेमध्ये भाग ३ व ४ मध्ये स्त्रियांच्या हक्काविषयी कांही महत्त्वाच्या तरतुदी सांगितल्या आहेत. भारतातील स्त्रियांच्या विकासासाठी, सबलीकरणासाठी संस्थात्मक पाठबळाचा विकास करणे हा लिंगभाव समता प्रस्थापित करण्याचा अविभाज्य भाग होय. लिंगभाव न्यायतेची जाणीव आणि स्त्रियांच्या प्रगतीकरिता सक्षम भूमिका वटवण्याच्या उद्देशाने व वातावरण निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने दोन आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यातील पहिला आयोग आहे 'राष्ट्रीय महिला आयोग' (National Commission for Woman) आणि दुसरा आयोग आहे 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' (National Human Right Commission) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ साली झाली. तर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना १९९३ साली झाली. भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ साली केली. महिला अत्याचाराविरुध्दच्या कायद्याचे पुनर्मूल्यांकन

करून विशिष्ट वैयक्तिक तक्रारीमध्ये हस्तक्षेप करणे हे महिला आयोगाचे कार्य मानले जाते. तसेच स्त्रियांमध्ये कायदेविषयक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन या आयोगामार्फत केले जाते. त्याचसोबत 'कौटुंबिक महिला लोक अदालतीचे' आयोजन या आयोगामार्फत केले जाते अणि त्यात कौटुंबिक तक्रारींबाबत समुपदेशन केले जाते. स्त्रियांचे अधिकार त्यांची वंचितता या संबंधातील तक्रारींचे परीक्षण करताना कायद्यामध्ये तरतूद केलेल्या सुरक्षा कवचाचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास, त्यासंदर्भात आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार मिळतात. त्याचप्रमाणे एखाद्या दस्तऐवजाची आणि प्रतिज्ञापत्राची मागणी आयोगाला संबंधितांकडे करता येते. स्त्रियांच्या संदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत भारत सरकारला राष्ट्रीय महिला आयोगाशी सल्लामसलत करणे बंधनकारक असते. राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे प्रत्येक प्रांत सरकारने त्यांच्या त्यांच्या प्रांतात (State Government) स्वतंत्र महिला आयोग स्थापन करण्याचा सल्ला केंद्र सरकारने सर्व प्रांतिक सरकारना दिला आहे. एकूणच उपलब्ध माहितीनुसार २००२ पर्यंत भारतातील केवळ १३ राज्यांमध्ये स्वतंत्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये (Functions of the National Commission for Women)

१९९२ साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर भारत सरकारने 'राष्ट्रीय महिला आयोगाने पुढील कार्ये पार पाडावीत असा सल्ला आयोगाला दिला होता. ही कार्ये खालीलप्रमाणे :-

१. संविधान आणि इतर कार्यामध्ये स्त्रियांसाठी केलेल्या इतर सुरक्षा संदर्भातील बाबींचा शोध घेवून त्याचे परीक्षण करण्याचे कार्य आयोगाचे आहे.

२. स्त्रियांसंबंधीच्या सुरक्षा कवचाची परिणामकारक अंमलबजावणी करून स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक त्या योग्य शिफारशी करणे.

३. स्त्रियांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणे, कायद्याची अंमलबजावणी न करणे, धोरणात्मक निर्णयांना संमत्ती न देणे याबाबतच्या तक्रारींची स्वत:हून दखल घेण्याचे कार्य आयोगाचे आहे.

४. स्त्रियांचे प्रतिनिधीत्व सर्व क्षेत्रात वाढवण्यासाठी योग्य मार्ग सुचवणारे सुचनात्मक आणि शैक्षणिक संशोधन करणे की, ज्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीत अडथळा आणणारे घटक ओळखण्याचे कार्यही आयोगाला करावे लागते.

५. साधारणपणे स्त्रियांनंतर अन्याय होईल अशा घटनेच्या विरोधातील खटले चालविण्यासाठी आवश्यक तेवढा निधी संबंधितांना उपलब्ध करून देण्याचेही कार्य आयोगाला करावे लागते.

६. तुरुंग, सुधारगृह, स्त्रियांच्या संस्था किंवा इतर जागा की जेथे स्त्रियांना बंदिस्त करून ठेवले जाते. अशा ठिकाणचे परीक्षण करणे आणि अत्यावश्यक असेल तर संबंधित अधिकाऱ्यांबरोबर उपाययोजनात्मक कृती करण्यास सांगण्याचे कार्य महिला आयोगाला पार पाडावे लागते.

## तक्रार व समुपदेशन केंद्र :-

राष्ट्रीय महिला आयोग कायदा कलम १० अंतर्गत तक्रार व समुपदेशन गट हा महिला आयोगाचा गाभा असून तेथे लेखी, मौखिक किंवा स्वयंप्रेरणेने पुढाकार घेवून तक्रारीची दखल घेतली जाते. या तक्रारी कौटुंबिक छळ, हुंड्यासाठी छळ, अत्याचार, बलात्कार, दुहेरीसंबंध ठेवणे, परित्याग, नवऱ्याकडून अमानुष वागणूक, सापत्नभाव व कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ अशा प्रकारच्या असतात. या तक्रारींचे निवारण खालील पध्दतीने केले जाते.

१. पोलिसांच्या तपासावर नियंत्रण व सुसूत्रतता आणणे.

२. कौटुंबिक समस्यांचे समुपदेशनाद्वारे निवारण करणे.

३. गंभीर गुन्ह्याबाबत चौकशी समिती नेमून चौकशी करणे, साक्षी पुरावे मिळविणे व शिफारशी देऊन अहवाल तयार करणे, तसेच अहवालाच्या अंमलबजावणीसाठी सतर्क राहणे.

४. या प्रयत्नामध्ये राज्य आयोग, स्वयंसेवी संस्था व इतर तज्ज्ञही सहभागी असतात.

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग :-

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९३ अंतर्गत महाराष्ट्र राज्य महिला आयोगही एक कायदेशीर यंत्रणा आहे. आयोगाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

१. समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा सुधारणे.

२. स्त्रियांना मिळणारी मानहानीची वागणूक थांबवणे.

३. स्त्रियांसाठी असणाऱ्या कायद्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे.

४. स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि आत्मसन्मान राखण्यासाठी शासनाला मार्गदर्शन करणे.

स्त्रियांच्या संदर्भात होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन आयोग पोलीस, संबंधित अधिकारी किंवा शासन यांना त्वरित कारवाई करावयास भाग पाडणे. स्त्रियांच्या अत्याचारांच्या प्रकरणामध्ये आयोग कोणतीही कारवाई सुरू करण्यापूर्वी गरजू महिलांचे समुपदेशन करते. त्याकरिता आयोगाच्या मुंबईच्या कार्यालयामध्ये १९९५ पासून समुपदेशन व मोफत कायदा, सल्ला केंद्र सुरू केले आहे. आयोगाने सर्व

जिल्हा परिषदा, नगरपालिका व स्थानिक यंत्रणा, महिला व बालविकास खात्याकडून मिळणाऱ्या आर्थिक साहाय्याने समूपदेशन केंद्र सुरू करण्यास सांगितले आहे. महिलामध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करण्यासाठी आयोग स्वयंसेवी संस्थांबरोबर शिबीरे आयोजित करते. आयोग काही विशिष्ट मुद्यांबाबत सतर्क असते, जसे गर्भ लिंग तपासणी (गैरवापराचे नियम व प्रतिबंध) कायदा, १९९४ आणि प्रसार माध्यमातील स्त्रियांच्या सादरीकरणाबाबत असंवेदनशीलता इत्यादीबाबत.

महिलांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन यासाठी राज्याने काही तरतुदी सुचविल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे :-

### अ) महिलांसाठी विशेष न्यायालये :-

महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी विशेष न्यायालये अहमदनगर, औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलढाणा, बीड, जळगांव, नागपूर, ठाणे, यवतमाळ, पुणे, कोल्हापूर, मुंबई येथे स्थापन झाली आहेत. या न्यायालयामध्ये भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ), ३०६(ब), ३७५ व महिलांवरील अत्याचाराविषयक इतर तक्रारी दाखल केल्या जातात.

### ब) महिलांसाठी कौटुंबिक न्यायालये :-

कौटुंबिक न्यायालये कायदा १९८४ अंतर्गत भारतात कौटुंबिक न्यायालये स्थापन झाली. महाराष्ट्रातील पहिले महिला कौटुंबिक न्यायालय १९८८ साली पुणे येथे स्थापन झाले. आज महाराष्ट्रात १६ कौटुंबिक न्यायालये आहेत. या न्यायालयामध्ये कौटुंबिक मतभेद, वैवाहिक समस्या यांचे जलद व यशस्वी निवारण केले जाते. १० लाखांच्यावर लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात असे न्यायालय असणे गरजेचे आहे. या न्यायालयामध्ये अनेक प्रकारचे वैवाहिक मुद्दे हाताळले जातात. उदा. घटस्फोट, विवाह रद्द करणे, पती-पत्नी दोघांची किंवा कोणा एकाची मालमत्ता, व्यक्तिचे कायदेशीर असण्याबाबत घोषणापत्र, एखाद्या व्यक्तीचे पालकत्व किंवा सज्ञान नसलेल्या मुलाचा हक्क, फौजदारी दाव्याचा भाग व अंतर्गत पोटगी.

### क) महाराष्ट्र शासनाचे महिलाविषयक धोरण :-

'महिला व बालविकास' या स्वतंत्र खात्याची स्थापना राज्यात जून, १९९३ साली करण्यात आली. राज्याची महिलाविषयक धोरणे या खात्यामध्ये जातात. महिलासाठी एका व्यापक धोरणाची आखणी १९९४ साली केली गेली व त्याची अंमलबजावणीदेखील करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व वाढावे ही यामागची भावना आहे. राज्यातील महिलांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक दर्जा सुधारून त्यांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनावे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## ❁ राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग :–

अनुसूचित जाती आणि जमातीचे होणारे शोषण रोखण्यासाठी तसेच त्यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी भारतीय राज्यघटनेने काही धोरणे राबविली आहेत. या धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होण्यासाठी घटनेतील कलम ३३८ अंतर्गत एका विशेष अधिकाऱ्याच्या नियुक्तीची तरतूद सांगितली आहे. पण भारत सरकारने १९७८ साली यामध्ये बदल करून 'अनुसूचित जाती व जमाती आयोग' हे नाव बदलून 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग' असे नाव ठेवण्यात आले. सामाजिकदृष्ट्या दबल्या गेलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी केलेल्या विविध धोरणाबाबत सरकारला सल्ला देणारी राष्ट्रीय सल्ला समिती हे आयोगाचे उद्दिष्ठ आहे.

१९९० मध्ये ५६ व्या घटना दुरुस्तीद्वारे राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग कायदा अस्तित्वात आला आणि त्यानंतर २००३ मध्ये ८९ व्या घटना दुरुस्तीनंतर 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' असे दोन भाग करण्यात आले.

## ❑ राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोगाची कार्ये :–

संविधानात नमूद केलेल्या तरतुदीनुसार या आयोगाने खालील कर्तव्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

१. अनुसूचित जाती व जमाती यासाठी या संविधानाखाली किंवा शासनाच्या कोणत्याही आदेशाखाली तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाय योजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे नियंत्रण करणे व त्यांचे मूल्यमापन करणे आयोगाच्या कर्तव्यात येते.

२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना त्यांच्या हक्कापासून आणि संरक्षक उपाययोजनांपासून वंचित केल्यासंबंधीच्या तक्रारींची चौकशी करणे.

३. अनुसूचित जाती व जमाती यांच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील त्यांच्या विकासाचे मूल्यमापन करणे.

४. त्या संरक्षण उपाययोजनेच्या कार्यवाहीवरील अहवाल, दरवर्षी व आयोगाला योग्य वाटेल अशावेळी राष्ट्रपतीला सादर करणे.

५. अशा प्रकारच्या अहवालामध्ये, राज्याने त्या संरक्षक उपाययोजनांची प्रभावी अशी अंमलबजावणी करण्याकरिता योजण्याचे उपाय आणि अनुसूचित जाती व जमाती यांचे संरक्षण, कल्याण, सामाजिक व आर्थिक विकास याकरिता करावयाचे इतर उपाय याबाबत शिफारशी करणे.

५. अनुसूचित जाती व जमाती यांचे संरक्षण, कल्याण, विकास आणि अभिवृध्दी यासंबंधात संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीना अधीन राहून, राष्ट्रपती नियमाद्वारे विनिर्दिष्ट करतील, अशी कर्तव्ये पार पाडणे.

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग :-

इंदिरा साहनी विरुध्द भारत सरकार, १९९२ या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला अनुसरून भारत सरकारने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कायदा, १९९३ साली अधिनियमित केला. या बरोबरच केंद्र पातळीवर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. या कायद्याद्वारे आयोगाची स्थापना करून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांची परिस्थिती व त्यांना येणाऱ्या अडचणींची पाहणी करून त्यावर उपाय सुचविण्याची तरतूद आहे.

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची रचना, कार्ये व अधिकार :-

भारत सरकारने ऑगस्ट १९९३ मध्ये तीन वर्षाच्या कालावधीसाठी आयोगाची स्थापना केली होती. ज्याला पुढे मुदतवाढ देण्यात आली.

## कार्ये :-

केंद्रीय मागासवर्गीय यादीमध्ये नागरिकांच्या कोणत्याही गटाचा अंतर्भाव करण्याच्या विनंतीची तपासणी करणे आणि एखाद्या गटाचा जास्त किंवा कमी प्रमाणात अंतर्भाव झाल्याच्या तक्रारीची दखल घेणे ही आयोगाची कार्ये आहेत. यावरील आयोगाच्या सुचना केंद्रशासनाला बंधनकारक असतात. कायदा अस्तित्वात आल्यापासून कोणत्याहीवेळी किंवा दहा वर्षे होवून गेल्यावर आणि त्यानंतर दर दहा वर्षांनी ही यादी तपासून त्यातील जे वर्ग मागासलेले राहिलेले नाहीत अशांची नावे कमी करून नवीन वर्गाचा अंतर्भाव करण्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे. मात्र वरील प्रकारचे कोणतेही फेरबदल करताना केंद्र शासनाने आयोगाचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

## अधिकार :-

आयोगाने ठरविलेल्या पध्दतीनुसार केंद्रशासनाच्या यादीत मागासवर्गीयांचा अंतर्भाव, अतिरिक्त अंतर्भाव किंवा कमी प्रमाणातील अंतर्भाव याबाबतच्या तक्रारींचे निवारण केले जाते. या तक्रारी एक व्यक्ती, संस्था किंवा संघटना, राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश यांना करता येतात. आयोगाला मिळालेल्या माहितीच्या आधारे आयोग प्रत्येक जात, पोट जात, समाजाबाबतच्या याचिका तक्रारीचा अभ्यास करते.

## ❀ क्रीमी लेयर म्हणजे काय?

सर्वोच्च न्यायालयाने मंडल आयोगाच्या शिफारशींवर आधारित दिलेल्या निकालानुसार सरकारी सेवा व नोकऱ्यांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणातून काही सामाजिकदृष्ट्या सक्षम वर्गांना वगळल्याबाबत भारत सरकारने कांही निकष ठरविले आहेत. या सक्षम वर्गाला 'क्रीमी लेयर' असे संबोधले जाते. क्रीमी लेयर मधील इतर मागासवर्गीयांना आरक्षणाच्या कांही तरतुदींचा लाभ मिळत नाही. घटना कलम १६ (४अ) नुसार असे स्पष्ट होते की, इतर मागासवर्गीयांना सरकारी नोकरीत नियुक्तीच्या व बढतीच्या बाबतीत आरक्षणाचा मुलभूत हक्क नाही. क्रीमीलेयर ही संकल्पना अनुसूचित जाती व जमातीसाठी लागू नाही.

## ❀ राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग (National Commission for Minorities)

तसे पाहता अल्पसंख्यांक ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थळ, काळ परिस्थितीनुसार अल्पसंख्यांक गटाचे स्वरूप वेगळे असते. नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय कराराच्या कलम २७ नुसार फक्त तीन प्रकारच्या अल्पसंख्यांक गटांचा उल्लेख जागतिक पातळीवर करण्यात आला आहे.

अ) वांशिक अल्पसंख्यांक (Ethnic Minorities)

ब) धार्मिक अल्पसंख्यांक (Religious Minorities)

क) भाषिक अल्पसंख्यांक (Lingiuistic Minorities)

या करारानुसार अल्पसंख्यांकाचे हे तीन गट जागतिक पातळीवर अस्तित्वात असले तरी राष्ट्रीय पातळीवर अल्पसंख्यांकाचे मात्र तीन पेक्षा जास्त गट पडू शकतात. युरोप परिषदेच्या संसदीय विधिमंडळाने राष्ट्रीय अल्पसंख्यांकाचे पाच गटात विभाजन केले आहे.

अ) राज्याच्या भूभागावर राहणारे आणि त्या राज्याचे नागरिकत्व स्विकारलेले परदेशीय राज्याचे लोक वा नागरिक उदा. अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये कायमचे स्थायिक होवून त्या देशाचे नागरिकत्व स्विकारलेले भारतीय.

ब) परकीय राज्यात प्रदीर्घ काळापासून चालत आलेला व्यवसाय, कारखाना व त्या राज्याशी संबंध प्रस्थापित केलेले परकीय नागरिक.

क) स्वत:चे वेगळे वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक गुणवैशिष्ट्ये परक्या देशात टिकवून ठेवणारा लोकांचा गट.

ड) राज्याच्या किंवा प्रांताच्या एकूण लोकसंख्येत स्वत:चे वेगळेपण टिकवणाऱ्या लोकांचा प्रातिनिधीक गट.

इ) परक्या देशात आपली स्वत:ची वेगळी अस्मिता जतन करणाऱ्या, स्वत:ची संस्कृती, परंपरा, भाषा आणि धर्म जपणाऱ्या लोकांचा गट.

वर नमूद केलेल्या गोष्टींचा अर्थ असा होतो की, परक्या देशात, आपले, आपल्या गटाचे विविध प्रकारचे वेगळेपण टिकविणारे गट हे 'अल्पसंख्य गट' या संज्ञेला पात्र ठरतात व त्या देशात या परकीय नागरिकांच्या विविध हक्कांचे जतन करणे त्या-त्या राष्ट्रांची जबाबदारी मानली जाते व त्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या सभासद राष्ट्रांनी त्यांच्या राज्यातील अल्पसंख्यांक नागरिकांच्या हक्कांचे जतन होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी 'अल्पसंख्य आयोगाची स्थापना' करण्याचा सल्ला संयुक्त राष्ट्राने दिला होता.

## ❀ राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग : भारतीय रचना किंवा स्वरूप (National Commission for Minorities : Indian Nature)

सांस्कृतिक व शैक्षणिक स्वातंत्र्याचा हक्क या अंतर्गत कलम २९ ते ३१ अंतर्गत अल्पसंख्यांक गटाच्या संदर्भात संविधानाने केलेल्या तरतुदींचा आढावा घेतला आहे. परंतु घटनेच्या कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती व जमाती आयोग स्थापन करण्याची जशी तरतूद आहे, तशी तरतूद घटनेत अल्पसंख्यांक आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात नाही, असे असले तरी अल्पसंख्याकांच्या हक्काच्या घटनेतील तरतुदींची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की, यावर देखरेख ठेवण्यासाठी एखादा आयोग नेमावा अशी मागणी भारतीय अल्पसंख्यांक जनतेकडून सातत्याने होती. या मागणीचा दबाव सातत्याने वाढत असल्याने भारत सरकारने 'अल्पसंख्यांकासाठी राष्ट्रीय आयोगाची' (National Commission for Minorities) स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार भारतीय अल्पसंख्यांक जनतेला तिच्या हक्कांचे संरक्षण, पालन योग्य प्रकारे होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी भारत सरकारने १९७८ साली अल्पसंख्यांकासाठी एक स्वतंत्र आयोग राष्ट्रीय पातळीवर स्थापन करण्याचा आदेश काढला. हा आयोग 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग' या नावाने ओळखला जाईल, परंतु या आयोगाला वैधानिक दर्जा मात्र १९९२ साली म्हणजे जवळपास १४ वर्षांनी प्रदान करण्यात आला.

## ❑ राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची कार्ये (Functions of National Commission for Minorities)

अ) अन्य आयोगाप्रमाणे या आयोगाने प्रामुख्याने संविधानात्मक आणि वैधानिक सुरक्षा यांच्यावर देखरेख ठेवताना त्यासंबंधीच्या तरतुदींचे योग्य पालन होते की नाही हे पाहावे. तसे होत नसल्यास त्यासंबंधी वार्षिक अहवाल व शिफारशी सरकारला सादर कराव्यात.

ब) अल्पसंख्यांकांच्या अहवालाचे मूल्यमापन करणे.

क) अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे उल्लंघन झाले आहे अशा विशिष्ट स्वरूपाच्या तक्रारी आल्यास त्यांचा तपास आयोगाने करावा यासाठी या आयोगाला दिवाणी न्यायाधिशांच्या समकक्ष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

## बालहक्क संरक्षण कायदा, २००५ साठी असणारा आयोग (Commission for Protection of Child Right Act, 2005)

बालहक्क संरक्षण कायदा, २००५ यातील तरतुदीनुसार व धोरणानुसार बालकांच्या हक्कांच्या संरक्षणाची योग्य अंमलबजावणी व्हावी म्हणून भारत सरकारने २० जानेवारी १९०६ रोजी एका आयोगाची नेमणूक केली. बालहक्क संरक्षण कायदा, २००५ आयोगात एक अध्यक्ष असावा, तसेच अध्यक्षांची नेमणूक करताना, ती व्यक्ती सुप्रसिध्द व बालकांच्या कल्याणासाठी अतिविशेष कार्य करणारी असावी, अशी दक्षता घेतली गेली. अध्यक्षांशिवाय या समितीत अन्य सहा सभासद असावेत व या सहापैकी कमीत कमी दोन सभासद स्त्रिया असतील व त्यांची नेमणूक केंद्र सरकार करेल, अशी योजना आखली गेली. या सभासद स्त्रिया सुप्रसिध्द, क्षमताधारक, एकात्मवादी, शिक्षण क्षेत्रात कार्यस्त असणाऱ्या, बाल आरोग्य - बालकल्याण-बाल विकास-बाल गुन्हेगार काळजी केंद्र- दुर्लक्षित बालके यांच्या कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या असाव्यात आणि याशिवाय अन्य सभासद बाल मानसशास्त्र, बालसमाजशास्त्र, बालकायदा या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात व आयोगाचे कार्यालय दिल्लीत असावे हे सूचित केले गेले.

## बालहक्क आयोगाची कार्ये (Functions of Child Rights Commission)

बाल संरक्षण कायद्याच्या विभाग १३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयोगाला अनेक प्रकारची कार्ये करावी लागतात ती पुढीलप्रमाणे :-

१. प्रचलित असलेल्या बालहक्क संरक्षण कायद्यानुसार केलेल्या सुरक्षाविषयक तरतुदींचे परीक्षण करणे व समालोचन करणे.

२. बालकांच्या सुरक्षाविषयक तरतुदींच्या अंमलबजावणीचा अहवाल, दरवर्षी किंवा आयोगाने निर्धारित केलेल्या काळात, केंद्र सरकारला पाठविणे.

३. बालहक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याची चौकशी करणे व अशा प्रकरणात कोणती कारवाई करावयाची यासंबंधीच्या सूचना केंद्र सरकारला करणे.

४. आतंकवाद, सामुदायिक हिंसाचार, दंगे, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसा, एड्स किंवा एच.आय.व्ही. बाधितता, बालकांचा अनैतिक व्यापार, बालकांना गैरवागणूक देणे, त्यांचा

छळ आणि शोषण, बालकांचा अश्लील कामासाठी वापर करणे आणि वेश्याव्यवसायात त्यांचा वापर करणे इत्यादी बाबीतील प्रतिबंधात्मक घटकांच्याद्वारे बालहक्कांच्या उल्लंघटनाच्या घटनांचे परीक्षण करून त्यासंबंधात योग्य त्या शिफारशी सरकारला देणे.

५. बालकांची विशेष काळजी घेण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठी बालकांशी त्यांच्या संबंधित गरजाकडे विशेष लक्ष पुरविणे.

६. बालहक्कांच्या संदर्भातील क्षेत्रात संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे.

७. बालहक्क साक्षरता विचारांचा प्रसार आणि विस्तार समाजातल्या विविध घटकात करणे.

८. बालगुन्हेगार कोठडी, गृह किंवा बालकांच्या निवासी संस्था किंवा सुधारगृह यांचे वारंवार पर्यवेक्षण करण्याचा अधिकार हा बालहक्क आयोगाला आहे.

९. बालहक्क प्रोत्साहनासाठी आवश्यक अशी कार्ये जी आयोगाला योग्य वाटतात ती कार्येही आयोग पार पाडते.

या कायद्यांतगृत राज्य सरकारे त्यांच्या राज्यात बालहक्कांचे झतन करण्यासाठी त्यांच्या-त्यांच्या राज्यात 'राज्य बालहक्क आयोगा'ची निर्मिती करू शकतात. या आयोगाचे कार्यालय सर्वसाधारणपणे त्या राज्याच्या राजधानीचे शहर किंवा राज्य सरकार निर्धारित करेल त्या शहरात स्थापन करण्यात येते. बालहक्क संरक्षण कायद्याच्या २५ व्या विभागात नमूद केल्याप्रमाणे बालहक्काविरुध्दचे गुन्हे यासंदर्भात दाखल होणाऱ्या खटल्यांचा त्वरित निकाल लागावा, म्हणून राज्यसरकार राज्याच्या उच्चन्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांच्या सल्ल्यानुसार व त्यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार राज्यात स्वतंत्र बालन्यायालय, प्रत्येक जिल्ह्यात बालहक्क न्यायालय स्थापन करू शकतात. तसेच या न्यायालयासाठी स्वतंत्र सरकारी वकीलाची नेमणूक उच्च न्यायालयाच्या सल्यानुसार राज्य सरकार करू शकते. या सरकारी वकीलाला विशेष सरकारी वकील या पदाने संबोधले जाईल. सरकारी वकील म्हणून सात वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा झालेल्याच वकीलांची नेमणूक विशेष सरकारी वकील म्हणून केली जाईल.

### ३.३.३ स्वयंसेवी संस्था आणि मानवी हक्क (Non-Government Organisations and Human Rights)

भारताच्या संदर्भात आधुनिक कालखंडामध्ये पाहिल्यास अनेक प्रकारच्या स्वयंसेवी संस्था आपली भूमिका आपआपल्या पध्दतीने लोककल्याणसाठी पार पाडत असतानाच्या दिसतात. फक्त आर्थिक नफा मिळविणे हाच उद्देश ठेवून या संस्था कार्यरत नसतात. तर मानवी हक्कांचे हणन, पर्यावरणाचे नुकसान, महिलांचे प्रश्न, विस्तापितांचे प्रश्न, स्थलांतर करणाऱ्यांचे प्रश्न, एच.आय.व्ही. व एड्स सारख्या

जीवघेण्या आजारातून जीवन जगणाऱ्या लोकांसाठी नव्या उमेदीने जीवनात उभे राहण्यासाठीचे प्रयत्न, अशा अनेक गोष्टीशी आजच्या स्वयंसेवी संस्था संबंधित आहेत आणि याबरोबरच अशा प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांना समाजातील सर्व घटकाकडून प्रोत्साहन मिळत असल्याचे जाणवते. या स्वयंसेवी संस्था ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालत असतात.

## ❁ स्वयंसेवी संस्थांची मुख्य कार्ये :-

- जनतेमध्ये मानवी हक्काविषयी माहिती व आदर निर्माण करणे.
- मानवी हक्कभंगाविरुध्द पीडित व्यक्तीला प्रत्यक्ष मदत करणे.
- मानवी हक्क संरक्षणाचे विविध कायदे आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवणे.
- सर्वसामान्य जनतेला हक्कभंगाविरुध्द आवाज उठविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

स्वयंसेवी संस्थांचे एक महत्त्वाचे कौशल्य म्हणजे जनतेला आपल्या कार्यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी न करता सामावून घेणे हे होय. स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा जनतेकडून नेहमीच वाहवा होत असते म्हणजेच त्यांच्या कामाची पोहोचपावती होय. कोणत्याही प्रकारचे आर्थिक हित न ठेवता, अराजकीय आणि नि:पक्षपाती वृत्ती ही त्यांची महत्त्वाची बाजू आहे. मानवी हक्कांच्या चळवळीमध्ये स्वयंसेवी संस्थांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्ये मोठ्या प्रमाणात झालेली जीवितहानी व वित्तहानी पाहून सर्व जग हादरून गेले. अशा स्वरूपाच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी नागरी समाजातील सदस्यांनी एकत्र येवून विविध संघटना स्थापन्यास सुरुवात केली. परिणामी, मानवाचा आत्मसन्मान व जीविताचा हक्क जपणाऱ्या अनेक सामाजिक संस्थाचा उदय झाला. त्यावेळी नवीनच स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये मानवी हक्क संरक्षणाची तरतूद करण्याची महत्वाची कामगिरी सामाजिक संस्थांनी केली.

मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्यात विविध सामाजिक संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावणी. आयोगाच्या सुरुवातीच्या काळात ज्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली ते लेबेनॉन देशाचे चार्ल्स मलिक म्हणतात– ''सामाजिक संस्थांनी जागतिक जाहीरनामा लिहिणाऱ्या प्रतिनिधींना अनेक मौलिक कल्पना व सूचना देवून अनधिकृतपणे सल्लागाराचे काम केले आहे. त्यांचे असे मत आहे की, ''जाहीरनाम्यातील तत्त्वे आपल्या लेखामधून दैनिकामधून सर्वदूर पोहोचविण्यात या संस्था अग्रेसर आहेत. जवळपास १९७० च्या कालखंडात या संस्थानी संयुक्त राष्ट्रसंघासमोर मानवी हक्कभंगाचे मुद्दे मांडण्यास यशस्वीपणे सुरुवात केली. या कालखंडापासून पुढे मानवी हक्क संरक्षण आणि संवर्धन तसेच हक्कभंगाची प्रकरणे उघडकीस आणण्यात सामाजिक संस्थांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय

ठरली आहे. मग ते मुद्दे वर्गविरोधी धोरणाचे असोत, जुलमाने डांबून ठेवल्याचे असोत किंवा अल्पसंख्यांकावर झालेल्या अत्याचारांचे असोत. या गुन्ह्याविरुध्द प्रतिबंधक उपाय करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी आंतरराष्ट्रीय समाजावर दबाव टाकण्यात यश मिळविले आहे.

## ❁ स्वयंसेवी संस्थांची ठळक कामगिरी :–

१९८० च्या कालावधीत स्वयंसेवी संस्थांचे सांघिक काम दिसू लागले. एखाद्या व्यक्तिस बळजबरीने नाहिसे केले जाण्याबद्दल चौकशी करणारा संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाने एक गट स्थापन केला. त्यानंतर दोन वर्षांनी जुलमाने व बेकायदेशीरेपणे केलेल्या पाक्षघातांची चौकशी करणारा विशेष अधिकारी नेमला गेला व लवकरच धार्मिक असहिष्णुता, वर्णभेद आणि माहितीविरध्द अत्याचारांची चौकशी करणाऱ्या विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. विशेषत: इराण, इराक, बर्मा, क्युबा, आणि सुदान या कुख्यात राजवटींची सखोल तपासणी करण्यासाठी विशेष अधिकारी नेमले गेले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हककावरील अनेक सभा या सामाजिक संस्थांच्या दबावामुळे घडून आल्या. यामध्ये महिला विरुध्द सर्व प्रकारच्या भेदभावांचा अंत (१९८१), अत्याचार विरोधी परिषद (१९८७) आणि बालहक्क (१९९०) या परिषदा आहेत. नागरी आणि राजकीय हक्क करारनाम्याप्रमाणेच या परिषदांनी एक यंत्रणा स्थापन केली व या यंत्रणेला कराराबाबतची सर्व माहिती पुरविण्याचे काम या स्वयंसेवी संस्थांनी केली. त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघालाही मानवी हक्क भंगाचे अनेक गुप्त अहवाल सादर केले आहेत. एकूणच असे लक्षात येते की, स्वयंसेवी संस्थांची भूमिका संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क संरक्षणाच्या कामामध्ये महत्त्वाची आहे.

## ❁ भारतीय स्वयंसेवी संस्था व मानवी हक्क :–

भारताच्या संदर्भात पाहिल्यास असे दिसते की, दोन प्रकारच्या सामाजिक संस्था कार्यरत आहेत. एक म्हणजे शासनाद्वारे केल्या जाणाऱ्या जनतेच्या हक्कभंगावर काम करणाऱ्या संस्था व दुसरे म्हणजे समाजातील उच्चवर्णीय लोकांकडून खालच्या वर्गाच्या होणाऱ्या हक्कभंगाविरोधी काम करणाऱ्या संस्था.

भारतामध्ये १९३६ साली स्थापन झालेल्या भारतीय नागरी स्वातंत्र्य संघटना (Indian Civil Liberities Union) ही प्रसिध्द मानवी हक्क संघटना पहिल्या प्रकारात मोडणारी संघटना आहे. हक्कभंगाचा अर्थ स्पष्ठ करताना भारतीय नागरी स्वातंत्र्य संघटना असे म्हणते की, ''हक्कभंग म्हणजे शासनाला विरोध करण्याचा हक्क''. भारतीय नागरी स्वातंत्र्य संघटनेचे संस्थापक पं. जवाहरलाल नेहरूंच्या मते, ''अशा संस्था शासनाला आरेरावी, हुकूमशाहीपासून दूर ठेवण्यात मदत करतात.'' या भूमिकेचा ब्रिटिश राजवटीमध्ये व आजही उपयोग होत आहे.

दुसऱ्या प्रकारच्या संस्थांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील जन आंदोलनाचाही समावेश होतो. त्याकाळी महात्मा गांधी, राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जी. के. गोखले, धो. के. कर्वे इत्यादींनी अस्पृश्यता, सती, बालविवाह, हुंडा इत्यादीच्या विरोधात अनेक जनआंदोलने उभी केली. तसेच महिला साक्षरता, दलितांना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे, विधवा, पुनर्विवाह अशा मुद्यांवरही काम सुरू केले होते. त्यानंतरच्या काळात इतरही प्रकारच्या सामाजिक संस्था उदयास आल्या. आज भारतात काश्मीरमध्ये स्वातंत्र्य मिळवण्याच्या नावाखाली लष्कर-ए-तोयबा सारख्या विघातक संस्था निर्माण झाल्या आहेत. भारत सरकार त्यांचा हक्क मानत नसल्याने अशा संघटनांना दहशतवादी संघटना म्हटले जाते. तर दुसऱ्या बाजूला या संघटना काश्मीरमध्ये भारतीय लष्करच मानवी हक्कभंग करत असल्याचा दावा करतात. या संघटना केवळ काश्मिरी जनतेच्या हितासाठी लढत आहेत, हे मान्य करणे अशक्य आहे. त्यामुळे या संघटना मानवी हक्कांचे संरक्षण करणाऱ्या सामाजिक संस्था म्हणता येणार नाही. हीच व्याख्या लोकशाही हक्क संरक्षण संघटना आणि आंध्रप्रदेश नागरी स्वातंत्र्य समिती या नक्षलवादी संघटनानाही लागू होते. आणखी एका वर्गात मोडणाऱ्या संस्था म्हणजे मजलीस, मनुषी, स्त्री अत्याचार समिती आण स्त्री आधार केंद्र या संस्था हुंडा, कौटुंबिक अत्याचार आणि लैंगिक अत्याचाराच्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी कार्यरत आहेत. काही सामाजिक संस्था समलिंगी स्त्री-पुरुष आणि वेश्या यांच्या हक्कासाठी कार्य करतात. अशा अनेक प्रकारच्या संस्थामुळे व त्यांच्या सक्रिय सहभागामुळे सरकारही मानवी हक्कभंगाची गंभीर दखल घेत आहे. जनतेच्या सेवेसाठी असणारे लष्कर व पोलीस यांच्याकडून घडणाऱ्या हक्कभंग विषयक कृत्यांवर योग्य प्रकारची कारवाई करून लष्कर व पोलीस यांची प्रतिमा लोकाभिमुख करण्यासाठी सरकारे आणि सामाजिक संस्था मिळून केंद्र तसेच राज्य पातळीवर पोलिसांना संवेदनशील करण्याचे उपक्रम हाती घेत आहेत.

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व स्वयंसेवी संस्था :-

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करून शासनाने मानवी हक्क संरक्षणाच्या कार्यात सामाजिक संस्थांना सहभागी करून घेण्याबाबत आस्था दाखविली आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ कलम १२(१) अंतर्गत आयोगाने मानवी हक्क संरक्षणाच्या कार्यात सामाजिक संस्थांना सहभागी करून घेणे बंधनकारक आहे. यासाठी आयोगाने एक केंद्रीय गट तयार केला आहे व एका विशेष अधिकाऱ्याची नेमणूकही केली आहे. या गटाची कार्ये खालीलप्रमाणे :-

१. मानवी हक्क संरक्षणाच्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या सामाजिक संस्था शोधून त्यांच्याबरोबर सल्लामसलत व माहितीची देवाण-घेवाण करणे व सामाजिक संस्थांच्या माहितीचा डेटाबेस तयार करणे.

२. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि सामाजिक संस्था एकत्र काम करू शकतील अशी ढोबळ कार्यक्षेत्रे ठरवणे.

३. महत्त्वाचे मानवी हक्क प्रश्न शोधून संस्थांकडून आलेल्या सूचनांच्या आधारे व संस्थाबरोबर काम करणे.

### ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न ✻

१. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केव्हा करण्यात आली?

२. राष्ट्रीय महिला आयोगात स्त्रियांच्या कोणकोणत्या तक्रारीबाबत दखल घेतली जाते?

३. महाराष्ट्र राज्य महिला आयोग केव्हा अस्तित्वात आला?

४. भारतात कौटुंबिक न्यायालये कधी स्थापन केली?

५. महिला व बालविकास या स्वतंत्र खात्याची निर्मिती केव्हा केली?

६. राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग केव्हा अस्तित्वात आला?

७. अल्पसंख्याक कोणाला म्हटले जाते?

८. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची निर्मिती केव्हा झाली?

९. भारतात बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना केव्हा झाली?

१०. बालहक्क आयोगाची कोणतेही दोन कार्ये सांगा?

११. स्वयंसेवी संस्था म्हणजे काय?

१२. स्वयंसेवी संस्थांच्यामध्ये कोणते सामर्थ्य असते?

१३. भारतामध्ये किती प्रकारच्या सामाजिक संस्था आहेत? कोणत्या?

## ३.४ सारांश

राष्ट्रीय महिला आयोगाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे महिलांचे सबलीकरण आणि महिलांचे सबलीकरण योग्य प्रकारे होण्यासाठी शासनाला सुधारणा व तरतुदी सुचविणे, राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोग सर्वोतोपरी महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते व त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी आयोग महत्त्वाची भूमिका पार पाडते.

अनुसूचित जाती व जमातीच्या उध्दारासाठी व त्यांना वंचित न ठेवता मानवधर्माची वागणूक देवून समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्यासाठी, त्यांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असते, फक्त त्याचा पाठपुरावा करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य दिशा देण्याचे काम अनुसूचित जाती व जमाती आयोग करत असतो.

भारत हा लोकशाही, धर्मनिरपेक्ष, सार्वभौम असा देश आहे, म्हणजेच देशातील तमाम जनतेला धर्म, भाषा व संस्कृती याबाबत कोणताही भेदभाव न करता जगण्याचा समान हक्क देतो म्हणून प्रत्येकाने आपला धर्म, भाषा, संस्कृती, आचार, विचार यासोबतच संख्येने कमी असणारे अल्पसंख्यांक यांचेही धर्म, भाषा, संस्कृती टिकवून व जपून ठेवण्यासाठी एका विशेष राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली.

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांची परिस्थिती व त्यांना येणाऱ्या अडचणींची पाहणी करून त्यावर उपाय सुचविण्याची तरतूद आहे. यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कायदा, १९९३ साली अधिनियमित केला.

बालहक्क आयोग निर्माण करण्यामागचा उद्देश पाहिल्यास आपल्याला आढळून येते की, लहान बालके ही देशाचे भवितव्य आहे व त्यांची शारीरिक व मानसिक वृध्दी सकारात्मक पध्दतीने होणे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे आणि म्हणून बालकांचे मुलभूत मानवी हक्क जपण्यासाठी २००६ साली कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गतच केंद्र व राज्यस्तरीय बालहक्क आयोग व बालन्यायालयांची स्थापना केली गेली.

वर नमूद केलेल्या सर्व आयोगांची भूमिका जरी वेगवेगळी असली तरी उद्देश मात्र मानवी हक्क सुरक्षित ठेवणे हाच आहे.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ मध्ये करण्यात आली.

२. राष्ट्रीय महिला आयोगामध्ये स्त्रियांच्या कौटुंबिक छळ, हुंड्यासाठी छळ, अत्याचार, बलात्कार, दुहेरी संबंध ठेवणे इ. तक्रारींबाबत दखल घेतली जाते.

३. महाराष्ट्र राज्य महिला आयोग १९९३ मध्ये अस्तित्वात आला.

४. भारतात कौटुंबिक न्यायालये १९८४ मध्ये स्थापन झाली.

५. महिला व बालविकास या स्वतंत्र्य खात्याची निर्मिती राज्यात जून १९९३ साली करण्यात आली.

६. १९९० मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग अस्तित्वात आला.

७. भाषा, धर्म आणि संस्कृतीनुसार कमी असलेल्यांना अल्पसंख्यांक म्हणून संबोधले जाते.

८. १६ मे, १९९३ रोजी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना झाली.

९. भारतामध्ये बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना २००६ मध्ये झाली.

१०. बालहक्क आयोगाची कार्ये : (१) बालकांच्या हक्काच्या सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यातील तरतुदींची तपासणी करून त्यांच्या अंबलबजावणीसाठी प्रयत्न करणे व (२) बालहक्क भंगाच्या प्रकरणांची चौकशी करून त्याविरुध्द कारवाई करण्यास सुचविणे.

११. स्वयंसेवी संस्था म्हणजे विना नफा संघटना व समाजातील प्रत्येक वंचीत व मुख्य प्रवाहाच्या बाहेर असलेल्या घटकासाठी त्यांच्या उध्दारासाठी प्रयत्न करणे होय.

१२. स्वयंसेवी संस्थामध्ये असणारे सामर्थ्य म्हणजे कोणत्याही प्रकारची बळजबरी न करता सामान्य जनेतला आपल्या कार्यामध्ये सहभागी करून घेणे.

१३. भारतामध्ये दोन प्रकारच्या सामाजिक संस्था कार्यरत आहेत. एक म्हणजे शासनाद्वारे केल्या जाणाऱ्या जनतेच्या हक्कभांवर विशेष काम करणाऱ्या संस्था व दुसरे म्हणजे समाजातील उच्चवर्णीय वर्गाकडून खालच्या वर्गाच्या होणाऱ्या हक्कभंगाविरोधी काम करणाऱ्या संस्था.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

१. भारतीय राज्यघटना व घटनेने प्रदान केलेल्या मानवी हक्कांची चर्चा करा?

२. समाजवाद, न्याय, धर्मनिरपेक्ष सार्वभौमत्व या संकल्पना स्पष्ट करा?

३, मानवी हक्क अंमलबजावणीसाठी असणाऱ्या यंत्रणाची थोडक्यात माहिती द्या?

४. भारतीय स्वयंसेवी संस्था व मानवी हक्क यांची भूमिका स्पष्ट करा?

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **प्रा. पी. के. कुलकर्णी :** मानवी हक्क आणि सामाजिक न्याय.

२. **य. च. म. मु. वि. नाशिक :** मानवीहक्क आणि भारतीय राज्यघटना.

३. **य. च. म. मु. वि. नाशिक :** मानवीहक्क आणि अंलमबजावणी यंत्रणा.


❒❒❒

**घटक–४**

# मानवी हक्क आणि दुर्बल घटक

# (Human Rights and Weaker Sections)


**४.१ उद्दिष्ट्ये**

**४.२ प्रस्तावना**

**४.३ विषय विवेचन**

**४.३.१ मानवी हक्क आणि महिला**

**४.३.२ मानवी हक्क आणि बालक**

**४.३.३ मानवी हक्क आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती**

**४.४ सारांश**

**४.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**४.६ सरावासाठी प्रश्न**

**४.७ चिंतन आणि कार्य**

**४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**


## ४.१ उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांची व्याख्या करता येईल.

२. महिलांचे मानवी हक्क समजावून घेता येतील.

३. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या मानवी हक्कांची कल्पना येईल.

४. बालकांच्या मानवी हक्कांची जाणीव होईल.

## ४.२ प्रस्तावना

या परिच्छेद ३८ (१) मध्ये म्हटले आहे की, राज्य अशी सामाजिक व्यवस्था आहे की, ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सर्वांना प्रधान करेल, लोकांच्या कल्याणास अग्रक्रम देईल. ज्यायोगे देशात समता, स्वातंत्र्य आणि बंधूभाव वाढीस लागेल. हे तीन मंत्र १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने सर्व विश्वाला दिले आहेत. राज्याची भूमिका व कर्तव्य हे आहे की, आपल्या राज्यातील सर्वच स्तरातील लोकांचे संरक्षण, सुरक्षितता, कल्याण करणे. सर्व लोक जन्मत: स्वतंत्र व समान असून सर्वांना समान हक्क आहेत. धर्म, वंश, जात, रंग, भाषा, विचारप्रवाह, सामाजिक स्थान, संपत्ती, दर्जा असा कोणताच भेदभाव करता येणार नाही. जीवन जगण्याचे त्यांना स्वातंत्र्य आहे. कोणत्याही कारणास्तव महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींचा छळ होणार नाही याची काळजी राज्यांनी घ्यावयाची आहे.

भारतामध्ये आज अनेक सामाजिक समस्या आहेत. त्यामध्ये वेठबिगारी, बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य, आरोग्यविषयक समस्या या सर्व समस्या मोठ्या प्रमाणात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकांमध्ये आढळतात. यांना त्यांच्या हक्कापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्याची निती उच्च जातींकडून आखली जाते. अनुसूचित जाती-जमातींचा विकास साधावयाचा असेल तर त्यांना त्यांचे हक्क बहाल करणे आवश्यक आहे.

'स्त्री' म्हणून स्त्रियांना हुंडाबळी, हुंडा, बलात्कार, मारहाण, लैंगिक अत्याचार अशा अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क नाकारले जातात. स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्रियांचे मूलभूत हक्कांची जोपासना करणे पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे कर्तव्य आहे व स्त्री-पुरूष प्रधान समाजव्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

समाजाचे सातत्य हे प्रजोत्पादनातून राहत असते. प्रजोत्पादनातून जी बालके जन्माला येतात. त्या बालकांच्या सर्वांगीण संगोपनाची जबाबदारी हे राज्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. आज बालकांना कुपोषण, बालमृत्यू, बाल कामगार, बालकांचा दुरूपयोग व इतर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उद्याची भावी पिढी हीच जर कमकुवत निपजली तर उद्या उभे राहणारे राष्ट्र हे कमकुवतच उभे राहील. म्हणून बालकांच्या हक्कांचे संवर्धन करणे व त्यांना सुरक्षित ठेवणे हे राष्ट्राचे आद्य कर्तव्य आहे.

थोडक्यात, अनुसूचित जाती-जमाती, महिला व बालकांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवून कोणताही देश आपली सर्वांगीण प्रगती साध्य करू शकत नाही.

## ४.३ विषय विवेचन

या घटकात आपण दुर्बल घटकांचे मानवी हक्क समजावून घेणार आहोत. त्या दृष्टीने या घटकांचे प्रामुख्याने तीन विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या विभागात महिला आणि त्यांचे मानवी हक्कांची चर्चा केली आहे. दुसऱ्या विभागात बालकांच्या मानवी हक्कांचा अभ्यास करणार आहोत. आणि तिसऱ्या विभागात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या हक्कांची चर्चा करणार आहोत.

### ४.३.१ मानवी हक्क आणि महिला (Human Rights and Women)

मानवी हक्कांच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या मानवी हक्कांची वेगळी चर्चा करणे संयुक्तीक ठरत नाही कारण मानवी हक्काचा आधार लिंगभेद नाही. परंतु संपूर्ण विश्वभर स्त्रियांना पुरूषांच्या समकक्ष मानले जात नाही. यामुळे स्त्रियांच्या मानवी हक्काची चर्चा करणे अनिवार्य आहे. स्त्री जगाची जननी मानली जाते आणि विश्वाचे पालनपोषणकर्ती. परंतु स्त्रियांना सदैव दुय्यम स्थान देण्यात आले आहे. स्त्रियांविरूद्ध हिंसाचार हा सर्वच समाजात कमी अधिक प्रमाणात पहावयास मिळतो. मग तो प्रगत समाज असो वा अप्रगत, तो आशियायी खंडातील विकसनशील असो वा युरोप खंडातील प्रगत समाज. जीवनाच्या सर्वच स्तरावर स्त्रियांना भेदभावनांना सामोरे जावे लागत आहे. स्त्रियांना अभद्र व्यवहारांना कुटुंबात, कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी सामोरे जावे लागत असते. पोलिसही महिलांवरील हिंसाचाराकडे डोळेझाक करताना दिसतात. स्त्रियांना बलात्कार, हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, मानसिक अत्याचार यासारख्या अनेक अत्याचारांना सोसावे लागत असते. वर्णव्यवस्थेत आणि जातीव्यवस्थेत जे तळातील वर्ण व जातींना ज्या अत्याचारांना सामोरे जावे लागते त्याहीपेक्षा अधिकच्या अत्याचारांना स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे.

भारतीय संविधान प्रत्येक भारतीय नागरिकाला समता न्याय आणि प्रतिष्ठा कोणताही भेदभाव न करता प्रदान करते. भारतीय संविधानात म्हटले आहे की, राज्य कोणत्याही नागरिकाविरूद्ध धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान इत्यादी आधारावर भेद करणार नाही. परंतु स्त्रियांना वास्तविक एक मानव म्हणून जो हक्क प्राप्त होणे अपेक्षित आहे तो प्राप्त होत नाही. व्यक्तिगत स्वार्थासाठी पुरूष त्यांचा एक उपभोगी वस्तू म्हणून वापर करतात. स्त्रियांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होताना आढळून येते.

परंतु असे नाही की, स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी शासन काहीच करत नाही. सरकारने या संदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्या दृष्टीने प्रयत्नही सरकार करत आहे. स्त्रियांचे सबलीकरण आणि त्यांना न्याय प्राप्त होण्यासाठी अनेक कायदे बनवित आहे. परंतु या लाभांपासून

स्त्रिया आजही दूर आहेत याची अनेक कारणे आहेत. या कारणांचा विचार न करता अनेक महिला आज पुढाकार घेऊन आपल्या हक्काविषयी जागरूक झाल्या आहेत. त्यांची संख्या नगण्य आहे. समाजाचे उत्तरदायित्त्व आहे की, स्त्रियांना त्यांचे हक्क त्यांना प्राप्त करून देणे आणि त्याचा सबल बनविणे. कायद्यासमोर सर्व समान आहेत. धर्म, जात, लिंग, जन्मस्थान व वंश या आधारावर भेदभाव करणे न्यायीक नाही. स्त्रियांना सशक्त बनविणे आज महत्त्वपूर्ण बाब आहे. स्त्रियांना सशक्त बनविण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे स्त्रियांना त्यांचे कायद्याधिष्ठ हक्क, नोकरी/काम करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, वैवाहिक हक्क, धार्मिक हक्क, सामाजिक हक्क, व्यावसायिक हक्क, संपत्तीविषयक हक्क, कौटुंबिक हक्क, भावनात्मक हक्क, सौंदर्याविषयक हक्क, शिक्षणाविषयी हक्क इत्यादी हक्काविषयी स्त्रियांमध्ये जाणीव-जागृती करणे आजची गरज बनली आहे.

मानवाच्या सर्वांगीण विकासात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही समान हक्क आहेत. विकासात त्यांचा समान सहभाग व समान वाटा आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या (यूनो) मानवी हक्क सनदेत सर्वांना समान अधिकार बहाल केले आहेत. १८ डिसेंबर १९७९ रोजी या मानवी हक्कांना यूनोची मंजूरी मिळाली व प्रत्यक्ष कार्यवाही ३ सप्टेंबर, १९८० पासून सुरू झत्तली. मानवी हक्कांमध्ये स्त्रियांच्या हक्कांविषयी एकूण ३० कलमे आहेत. त्यात स्त्रियांच्या १६ क्षेत्राचा विचार केलेला आहे. या स्त्रियांच्या हक्कांना अनुसरूनच भारतात महिला आयोग कायदा १९९० मध्ये मंजूर करण्यात आला. महिलामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय जागृती घडवून आणणे तसेच त्यांना सामाजिक न्याय मिळवून देणे हा उद्देश आहे.

## ४.३.१ अ) महिलांच्या हक्काविषयी घटनात्मक तरतुदी

भारतीय समाज रचना ही पुरूषप्रधान असल्याने या समाजात महिलांना दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. भारतात काही समाजात महिलाविषयी काही विकृत चालीरीती व परंपरा असल्याचे अनेक घटनांच्या माध्यमातून दिसून येते. असे असले तरी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाज सुधारकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरवात झाली. स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. त्या आपली क्षमता आजमावू लागल्या. पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्य करू लागल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेष करून स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले आहेत. राज्यघटनेतच, स्वातंत्र्य, समता व बंधुता आणि स्त्री-पुरूषभेद केला जाणार नाही. यासारखे घटनात्मक स्वातंत्र्य देण्यात आले. राज्यघटनेत विस्ताराने मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे नमूद केलेली आहेत.

भारतीय राज्यघटनेत महिलांच्या संदर्भात विविध तत्त्वांची तरतूद करण्यात आली आहे. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वांना समान मानले आहे.

२. कलम १५ नुसार स्त्री-पुरूष असा भेद केला जाणार नाही याची खात्री देण्यात आली आहे.

३. कलम १६ नुसार सर्व स्त्री-पुरूषांना समान संधी देण्यात आली आहे. त्यांची प्रतिष्ठादेखील समान मानली आहे. त्यामुळे शतकानुशतके असणारे स्त्रियांचे गौण स्थान नष्ट होण्यास मदत होत आहे. स्त्री-जन्म ही एक आपत्ती मानली जात होती. ती कायद्याने नियंत्रित करण्यात आलेली आहे.

४. कलम ३९ नुसार उपजीविकेसाठी साधने स्त्री-पुरूषांना समान आहेत. शिवाय समान कामाबद्दल समान वेतनही देण्यात आले आहे.

३१ (क) नुसार स्त्री-पुरूष व बालके यांचे आरोग्य व ऊर्जा यांचा दुरूपयोग करू नये. घटनेतील यासारख्या कलमांच्या माध्यमातून स्त्रियांना समान हक्क प्राप्त करून देण्यात आलेले आहेत. राज्यघटनेतील या सर्व तरतुदींना अनुसरून भारत सरकारने अनेक कायदेदेखील वेळोवेळी केलेले आढळतात. ते खालीलप्रमाणे काही उदाहरणादाखल सांगता येतील.

(१) सतीप्रथा बंदी कायदा-१८८७, (२) वारसा हक्क अधिनियम - १८९०, (३) बालविवाह प्रतिबंधक कायदा - १९२९, (४) मजुरी दर अधिनियम - १९४८, (५) हिंदु विवाह कायदा -१९५५, (६) मातृत्त्व लाभ अधिनियम - १९६१, (७) हुंडा प्रतिबंधक कायदा - १९६१, १९८४, (८) समान वेतन कायदा - १९७६, (९) अश्लील व बिभत्स प्रदर्शन बंदी कायदा-१९८६, (९) अनैतिक व्यापार कायदा - १९८६.

## ४.३.१ ब) स्त्रियांचे मूलभूत हक्क

वय वर्ष १८ नंतर स्त्री ही प्रौढ असते आणि ती स्वत:चे निर्णय घेण्याचे तिला अधिकार आहे. कायद्याने स्त्रीविरुध्द, तिच्या इच्छेविरुध्द कोणताही निर्णय घेण्यासाठी सक्ती करू शकत नाहीत. स्वत:चे माता-पिता सुद्धा उदा.बंदिस्त वर्तावणे शिक्षणाचा हक्क नाकारणे, जबरदस्तीने विवाह करणे, या सर्व बाबींविरुध्द आवाज उठवू शकता, कोर्टात जाता येते.

- घटस्फोटाचा अधिकार आहे.
- आपण आपले नाव विवाहानंतर बदलणे कायद्याने आवश्यक बाब नाही. विवाहानंतर आपण आपले मुळ नावाचा उपयोग करू शकता.
- स्वत: वेतन, मानधन, मजूरी या पूर्ण आपला हक्क आहे.

- तुम्ही स्वत:च्या नावावर बँक खाते सुरू करू शकता.
- विवाहापुर्वी आणि विवाहानंतर आई-वडील व सासरकडून जी मालमत्ता मिळते त्यावर तुमची मालकी आहे.
- पती-पत्नी यांच्याजवळ असलेल्या मालमत्तेचे रजिस्टर करता येते.
- रेशन कार्ड हे पत्नीच्या नावे कुटुंबप्रमुख म्हणून मिळते.
- शाळेत मुलांच्या प्रवेश घेताना स्वत: चे नाव लावू शकते व पालक म्हणूनही.
- समजा गर्भधारणा झाली आणि हा गर्भ स्त्रीला नको असेल तर कोणाच्याही परवानगीशिवाय ती सरकारी दवाखान्यात जाऊन गर्भपात करू शकते.
- एकटी, स्त्री, कुमारी, विवाहीत स्त्री दत्तक मूल घेण्यास हक्कदार आहे.
- पत्नी-पतीमध्ये भांडण झाल्यानंतर पती-पत्नीला घरातून बाहेर काढू शकत नाही. कारण जेवढा अधिकार त्या घरावर पतीचा असतो तेवढाच अधिकार पत्नीचाही असतो.
- माता-पिता यांच्या घटस्फोट झाल्यानंतर मुले पित्याजवळ असणाऱ्या संपत्तीचे पूर्ण हक्कदार असतात.
- पतीने स्त्रीचा सांभाळ करणे कोणत्याही कारणाने नाकारले तरी पतीला पत्नीच्या खर्चासाठी कलम १२५ अन्वये पोटगी देणे बंधनकारक आहे.
- समान काम, समान वेतन हे तत्त्व सरकारने १९७६ ला स्विकारले आहे.

## ४.३.१ क) महिलांचे मानवी हक्क

(१) स्त्रियांचे वैवाहिक हक्क, (२) स्त्रियांचे व्यावसायिक हक्क, (३) स्त्रियांचे नोकरीविषयक हक्क, (४) स्त्रियांचे सामाजिक हक्क, (५) स्त्रियांचे संपत्तीविषयक हक्क, (६) स्त्रियांचे कौटुंबिक हक्क, (७) स्त्रियांचे शिक्षणाविषयक हक्क

राज्यघटनेने स्त्रियांच्या हक्काचे जतन करणे, स्त्रियांना एक मानव म्हणन सन्मानाने जगता यावे यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करणे व स्त्रियांना सबल व स्वावलंबी बनविणे.

### १. महिलांचे वैवाहिक हक्क :-

भारतीय समाजात विवाह हा एक संस्कार मानला जातो. याला मान्यता आहे. भारतीय संस्कृतीमध्ये विवाहबंधन अतूट मानले जाते. पत्नीने पतिव्रता व पुरूषाने समर्पण अशा भावनेतून एकत्र जीवन व्यतीत करावे असे मानले आहे.

प्राचीन कालखंडात विधवांना पुर्नविवाहाचा अधिकार प्राप्त झाला होता. की, जो पुरूषांना प्राप्त झाला होता त्याचप्रमाणे प्राप्त झाला होता. स्त्रियांवर कोणत्याही प्रकार निर्बंध नव्हते. विधुर, परितक्त्यांना, विधवांना विवाह करण्याचे हक्क प्राप्त झाले होते. थोडक्यात पुरूषाप्रमाणे स्त्रियांनाही पुर्नविवाहाचे हक्क प्राप्त झाले होते. प्राचीन काळी प्रौढ विवाहाला मान्यता होती. प्राचीन काळी स्त्री–पुरूषांना वैवाहिक हक्क अबाधित ठेवण्यात यशस्वी काळ मानला जातो. परंतु मध्ययुगाच्या कालखंडामध्ये स्त्रियांचे अनेक हक्क नाकारल्याचे अनेक संदर्भ प्राप्त होतात. त्यामध्ये स्त्रियांचे वैवाहिक हक्क हे हिरावून घेतले होते. स्त्रियांना विवाहाविषयक निर्णय घेण्याचे कोणतेही अधिकार घेण्यावर निर्बंध लादण्यात आले. हे सर्व अधिकार पुरूषप्रधान समाजव्यवस्थेचे हात घट्ट ठेवले गेले. यामुळे स्त्रियांचे विवाहविषयक हक्क नाकारण्यात आले. बालविवाह, विवाहाच्या प्रथेची सुरवात, पुर्नविवाहावर निर्बंध, कौमार्यशील हा स्त्रियांचा दागिना हे लेबल लावले, स्त्रियांच्या विक्रीला परवानगी, गहाण ठेवणे, पणास लावते, शैक्षणिक हक्क, धार्मिक हक्क नाकारले गेले. हे निर्बंध कित्येक शतके त्यांच्यावर लादण्यात आले. आज स्त्रियांना वाटते की तो आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे. तो अन्याय, अत्याचार आहे असे त्यांना वाटत नाही म्हणून स्त्रियांना त्यांच्या हक्काविषय जाणिव करून देणे व ती त्यांनी करून घेणे आवश्यक बाब आहे ते हक्क खालीलप्रमाणे आहेत.

❑ **जन्माला येणाऱ्या सर्वच स्त्रियांना विवाह केलाच पाहिजे असे बंधन नाही.**

१. विवाह करण्याकरिता स्त्री प्रौढ असली पाहिजे.

२. स्त्रियांची मानसिक तयारीशिवाय विवाह करू नये.

३. विवाहविषयक निर्णय घेण्याचे तीला पूर्ण स्वातंत्र्य आहे.

४. विधवेला पुर्नविवाह करण्याचा हक्क आहे.

५. परीतक्त्या स्त्रियांना पुर्नविवाह करण्याचे स्वातंत्र्य आहे.

६. विवाहानंतर आपल्या नावापुढे पतीचे का पित्याचे नाव लावणेस सक्ती नाही.

७. आंतरधर्मीय विवाहानंतर स्त्रीने आपला पुर्वीचा धर्म बदलावा अशी सक्ती करता येणार नाही.

८. विवाहानंतर पतीच्या सर्व प्रकारच्या मालमत्तांवर तिला पती इतकाच हक्क असतो आणि तो त्यांचा अधिकार आहे.

९. विवाहानंतर आपत्यांना जन्म देणे न देणे हा तिचा पूर्ण हक्क आहे.

१०. घटस्फोटानंतर पोटगी मागण्याचा पूर्ण अधिकार आहे.

वरील हक्काचे जतन करण्यासाठी भारत सरकारने अनेक कायदे निर्माण केले आहेत. या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या वैवाहिक हक्कांचे संरक्षण केले जाते. उदा.हिंदू विवाह कायदा, बालविवाह कायदा, पोटगी, मालमत्ताविषय कायदे इत्यादी.

## २. महिलांचे व्यावसायिक हक्क :-

महात्मा गांधीजींनी म्हटले होते की, स्त्रियांना त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची संधी त्यांना द्या, चार भिंतीतून त्यांना बाहेर येवू द्या, बघा देशाच्या विकासाला कशी गती येते ती. गांधीच्या प्रेरणेने १९२९ मध्ये अहमदाबाद येथे टेक्सटाईल मजूर संघटना स्थापन झाली. १९५४ मध्ये टी.एल.ए. ने महिला कक्ष स्थापन केला. या संघटनामध्ये अशा स्त्रियांचा समावेश करण्यात आला की, ज्या स्त्रिया रोजगार करीत होत्या त्यांना बँकेची सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या बालकांचे संगोपन करणे, त्यांच्यासाठी अनेक कल्याणकारी योजनांची निर्मीती केली.

मध्यप्रदेशामध्ये स्त्रियांच्या विकासासाठी अनेक योजनांची सुरवात केली. महाराष्ट्र सरकारने महिला उद्योग, महिला बचत गट, महिलांसाठी व्यावसायिक अर्थसाह्य या माध्यमातून महिलांचे कल्याण करून त्यांचे सबलीकरण करणे आणि स्त्रियांच्या कार्यक्षमतेचा देशाच्या प्रगतीकरिता उपयोग करून घेण्यास आज वेग आला आहे. स्त्रिया ह्या कार्यक्षम आहेत हे अनेक क्षेत्रातील त्यांची अतिउच्च कामगिरीतून स्पष्ट दिसून येते आहे. व्यावसायिक हक्क स्त्रियांना फार पुर्वीच देणे आवश्यक होते. परंतु दुर्देवाने पुरूषप्रधान संस्कृती आणि समाज व्यवस्थेने ते नाकारले होते. परंतु स्त्रियांचे व्यावसायिक हक्क पुरूषांच्या हक्काइतकेच ते समान आहेत, असले पाहिजेत हा त्यांचा हक्क आहे.

❑ **स्त्रियांच्या व्यावसायिक हक्काविषयी खालील स्पष्टीकरण करता येईल.**

- सर्व सहकारी संस्थामध्ये स्त्रियांना पन्नास टक्के सदस्य म्हणून स्विकार करणे.
- सर्व सहकारी संस्थामध्ये स्त्रियांना भागीदारी देणे.
- स्त्रियांना सर्व शासकीय, अर्ध शासकीय व खाजगी क्षेत्रामधील नोकरीमध्ये स्त्रियांच्या प्रमाणात आरक्षण.
- स्त्रियांना नोकरीकरिता अधिकतम वयामध्ये सुट देणे.
- लघुउद्योगाकरिता स्त्रियांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे.
- काम, नोकरी, उद्योग-व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या बालकांच्या संगोपनाची सोय शासनाने करावी खाजगी संस्थावर बालसंगोपन करण्याविषयी नियम करावेत.

याचबरोबर खालील हक्क स्त्रियांना प्राप्त होणे क्रमप्राप्त आहे.

***(अ) तांत्रिक प्रशिक्षण हक्क :*** स्त्रियांना उद्योग व्यवसाय, लघुउद्योग, कुटीर उद्योग, शेतीपुरक उद्योग, इत्यादीकरिता तांत्रिक प्रशिक्षण देणे व कुशल कामगार या वर्गात त्यांचा समावेश करणे. स्त्रियांना तांत्रिक शिक्षण हे प्राथमिक शाळेत देणे अनिवार्य करावे. हे प्रशिक्षण मोफत असावे, प्रशिक्षण विद्यार्थी म्हणून त्यांना दैनिक भत्ता उपलब्ध करून देणे. हे प्रशिक्षण त्यांच्या राहत्या ठिकाणापासून जवळ असावे.

***(ब) वेतन विषयक हक्क :*** स्त्री-पुरूष यांना समान काम, समान वेतन हा त्यांचा हक्क आहे. या हक्कापासून त्यांना वंचित ठेवता येवू नये. मग ते काम मजूरी असो वा उद्योग व्यावसायिक, समान काम समान वेतन असो.

***(क) गर्भवती व माता कामगार स्त्रियांचे हक्क :*** गर्भवती स्त्रिया सरकार तसेच खाजगी सर्वच क्षेत्रातील काम करणाऱ्या स्त्रियांना पगारी रजा देणे अनिवार्य असले पाहिजे. तसेच मजूरी करणाऱ्या वा रोजंदारी करणाऱ्या स्त्रियांनाही गर्भवतीच्या कालावधीमध्ये सरकार मजूरीच्या दराने त्यांना सहा महिने वेतन देणे आवश्यक आहे. नोकरदार स्त्रियांना वेतन देणे व मजूरी, लघुउद्योग, व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना वंचित ठेवणे योग्य नाही असे केल्यास त्यांचे व्यावसायिक हक्क नाकारले जातील. हे हक्क सर्वच क्षेत्रात काम, मजूरी, व्यवसाय, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना प्राप्त व्हावेत.

माता असणाऱ्या स्त्रियांना सकस आहार तसेच त्यांच्या बालकांना सकस आहार, कामाच्या ठिकाणी बालकांची संगोपन व्यवस्था, त्याच्या संस्थेत काम करतात अशा सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी स्त्रियांची व बालकांच्या आरोग्याची नियमित तपासणी करणे. तसेच मजूरी, व्यवसाय, उद्योग करणाऱ्या माता व बालकांची नियमित तपासणी शासकीय दवाखान्यांच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. सर्वच संस्थांनी मातांना बालकांच्या निर्वाहाकरिता बालक निर्वाह भत्ता देणे आवश्यक आहे. तसेच मजूरी, उद्योग, रोजंदारी करणाऱ्या महिलांनाही बालकभत्ता म्हणून अधिकची मजूरी ते मूल १४ वर्षाचे होईपर्यंत देणे अनिवार्य करणे आवश्यक आहे.

### ३. नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क :-

वर्तमान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांचा शिक्षणाचा स्तर उंचावत आहे. शिक्षणामुळे अनेक सेवाक्षेत्रामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. स्त्रियांच्या पारंपरिक कर्तव्याबरोबरच स्त्रिया सेवाक्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने कर्तव्य बजावताना आढळून येत आहे. कुटुंबाची आर्थिक स्थिती बळकट होत आहे. स्त्रिया आज आत्मनिर्भर होत आहेत. कुटुंबाबरोबर समाजाच्या प्रगतीतही सहभाग नोंदवत आहेत.

असे असताना स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा पारंपरिक दृष्टिकोण पुर्णत: बदलला असे नाही.

त्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे पुढील हक्क अधोरेखित करणे आवश्यक आहे. समान काम, समान वेतन आवश्यक आहे. सर्वच क्षेत्रामध्ये स्त्रियांची नोकरभरती करणे. खाजगी व सरकार सेवांमध्ये शासन ठरविलेले वेतन देणे त्या ज्या सेवांमध्ये कार्यरत आहेत. त्यांना बंधनकारक आहे. गर्भवती स्त्रियांना कामांच्या वेळामध्ये सवलती देणे, पगारी रजा देणे, कामाच्या ठिकाणी मेडिकल सोईसुविधा, पाळणाघर यांची सुविधा मिळणे, गर्भवती किंवा मातांसाठी विवाहाची अट बंधनकारक असू नये. कामासाठी रात्री उशीरापर्यंत स्त्रियांना कामाच्या ठिकाणी थांबावे लागत असेल तर तिला घरी पोहचविण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे लैंगिक शोषण, छळ, अत्याचार होणार नाही यासाठी कडक कायद्यांची निर्मिती व अंमलबजावणी करणे, कामाच्या ठिकाणी (कार्यालयामध्ये) या प्रकारचे सूचना फलक व कायदा आणि शिक्षेची संक्षिप्त माहिती लावणे आवश्यक आहे.

स्त्रियांची भूमिका ही दुहेरी असते तर पुरुषांची भूमिका एकेरी असते म्हणजे प्रजोत्पादनाबरोबर कुटूंबाची आर्थिक स्थितीची बळकटी त्यामुळे तिला अधिकच्या सवलती हा तिचा मानवी हक्क आहे.

### ४. महिलांचे सामाजिक हक्क :-

आरस्टू चे कथन आहे की, स्त्रियांची उन्नती व अवनती ही राष्ट्राची उन्नती व अवनती निर्धारीत करते. सामाजिक संरचनेमध्ये स्त्रियांचा सहभाग हा पुरूषांच्या बरोबरीने असणे आवश्यक आहे. समान सातत्य हे स्त्री-पुरूष या दोहांशिवाय शक्य नाही. त्यामुळे अधिक महत्त्वाचे कोण ही चर्चाच किंवा यावर विवाद होऊ शकत नाही. परंतु समाजात स्त्रियांना अनेक सामाजिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले आहे. कौटुंबिक अधिकार, निर्णय अधिकार, आर्थिक अधिकार यापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

स्त्रियांना सामाजिक हक्कांप्रती जागरूक करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, व्यक्तिमत्त्व विकासाकडे अधिकचे लक्ष देणे. स्त्रियांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व औद्योगिक विकास करून त्यांना स्वावलंबी बनविणे. स्त्रियांना आर्थिक आत्मनिर्भर बनविणे. स्त्रियांमध्ये राष्ट्रीयता आणि सहकार्याची भावनेचा विकास करणे. स्त्रियांना निडर व स्वतंत्र होऊन जीवन जगण्यासाठी तयार करणे. स्त्रियांचा एकूण सामाजिक स्तर उंचावण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्त्री म्हणून जे पारंपरिक समाजाने अनेक शतके मानवी हक्क नाकारले आहेत. ते त्यांना प्राप्त होईपर्यंत सामाजिक चळवळींचे जाळे सर्वत्र पसरविणे आणि त्यांना त्यांचे सामाजिक प्रधान करणे.

### ५. महिलांचे संपत्तीविषयक हक्क :-

वर्तनमानात स्त्रिया ह्या अनेक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कर्तव्य बजावताना आढळत आहे.

काही क्षेत्रामध्ये अग्रेसर आहेत. प्रशासन, मेडिकल, राजकीय, वैज्ञानिक क्षेत्र अशा सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. आज स्त्रियांचा विकास आणि प्रगती होत असताना त्यांना संपत्तीविषय हक्कापासून वंचित रहावे लागते. ही बाब एकविसाव्या शतकात योग्य वाटत नाही. स्त्रियांना त्यांचे संपत्तीविषयक हक्क प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रियांना संपत्तीची खरेदी करण्याचा व ती स्वत:च्या नावावर खरेदी करण्याचा हक्क आहे. संपत्तीविषयक निर्णय घेण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे. मग ती संपत्ती प्राप्त झालेली असो वा प्राप्त केलेली असो. स्त्रियांना हक्क आहे की, तिने केलेल्या कामाचा मोबदला ती स्वत: घेणेचा.

भारतामध्ये अनेक धर्म आहेत. स्त्रियांवर अनेक धार्मिक बंधने आहेत. परंतु स्त्रिया ह्या कोणत्याही धर्माच्या सदस्य असल्या तरी त्यांचे हक्क धार्मिकतेच्या नावावर कोणीही हिरावून घेऊ नयेत. सांपत्तिक वारसा हक्क पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही प्राप्त झाला पाहिजे. पूर्वजांच्या संपत्तीवर सर्वांचा समान हक्क आहे. स्त्री पुढीलप्रमाणे संपत्तीची वारस बनण्याचा हक्क आहे. मुलगी, पत्नी, आई, विधवा, आजी व नात. संपत्तीविषयक हक्क प्राप्त झाल्याने स्त्रियांचा मानसिक, शारीरिक छळ थांबेल आणि आर्थिक व सामाजिक स्तर उंचावेल.

## ६. महिलांचे कौटुंबिक हक्क :–

समाजव्यवस्थेची निर्मीतीचा मुख्य घटक हा कुटुंब हा आहे. अस्तित्त्वासाठी संघर्ष हा अनिर्वाय आहे. परंतु हा संघर्ष इतर प्राण्यांप्रमाणे करणे मानवाला शक्य नाही. सहकार्यात्मक संघर्षाशिवाय समाजसातत्य व मानव प्राण्याचे अस्तित्त्व टिकू शकत नाही. सहकार्यात्मक संघर्षप्रक्रिया ही कुटुंबसमूहाच्या निमिर्तीत आढळून येते. कुटुंबाच्या निर्मितीतून समाज निर्मीत झाला आहे. यावर सर्वच अभ्यासकांचे एकमत आहे.

थोडक्यात समाजव्यवस्थेतील कुटुंबाचे महत्त्वाची कल्पना येते. कुटुंबसंस्था जेव्हा कधी ऱ्हासाच्या दिशेने परिवर्तीत होईल. तेव्हा समाजव्यवस्था ही ऱ्हासात परिवर्तीत झालेली असेल. कुटुंब स्त्री–पुरूष या भिन्न लिंग समूहातून निर्मित होतो. त्यामुळे कुटुंबात स्त्री आणि पुरूष हे दोघेही महत्त्वाचे घटक आहेत. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांच्या निर्णयांना गौण ठरविणे चुकीचे आहे. आर्थिक निर्णय, मुलांच्या भविष्याविषयक निर्णय, वैवाहिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना सामावून घेणे. घरातील कामांना बाहेरील कामा इतकेच महत्त्व देणे. आठवड्यातून किमान एक दिवस स्त्रियांना घरकामातून मोकळीक मिळावी. विवाहानंतर आपल्या आई–वडिलांचा सांभाळ करणेचा निर्णय घेण्याचा हक्क तिला प्राप्त व्हावा. सासू–सासऱ्यांची सेवा करणे बंधनकारक करणे योग्य नाही. कुटुंब सातत्य व स्वास्थ्य टिकविणे ही सहकार्यात्मक प्रक्रिया आहे. थोडक्यात स्त्रियांमुळे कुटुंब बनते तर स्त्रियांना कुटुंबात प्राथमिक स्थान असणे गरजेचे आहे.

## ७. महिलांचे शैक्षणिक हक्क :–

शैक्षणिक क्षेत्रात येण्याचा मार्ग जेंव्हा स्त्रियांचा मोकळा झाला तेव्हा पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांनी करून दाखविलेली प्रगती हा कौतुकाचा विषयच आहे. वैदिक व प्राचीन काळात स्त्रियांना शिक्षणाचा हक्क होता. स्त्री शिक्षण हे समृध्द होते. परंतु मध्ययुगीन काळापासून स्त्रीया शिक्षणापासून वंचित ठेवले जाऊ लागले. ब्रिटिश राजवट येईपर्यंत स्त्री म्हणजे केवळ 'चूल व मूल' इतकेच अस्तित्व राहिले. ब्रिटिश काळापासून स्त्री शिक्षणाची पुन्हा सुरवात झाली. स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले जाऊ लागले.

१९१४ ते १९४७ स्त्रियांच्या शैक्षणिक प्रगतीला सुरवात झाली. असे असले तरी स्त्रिया काही शैक्षणिक हक्कापासून वंचित आहेत ते त्यांना प्राप्त व्हावेत. आधुनिक काळात स्त्रियांना शिक्षण दिले जात आहे. तरीही काही हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. मुलींच्या शिक्षणामध्ये रूढीप्रियता अडसर आहे. मुलगी ही परक्याचे धन आहे. तिच्या शिक्षणावर जादा खर्च करणे यामुळे आवश्यक वाटत नाही. पुरूषांपेक्षा अधिक शिक्षित स्त्री ही त्यांच्या अहंपणाला हानी पोहचवते. या कारणास्तव कमी शिक्षण घेतलेल्या मुलींशी विवाह करण्याची प्रथा रूढ झाली. स्त्रियांना विवाह योग्य शिक्षण दिले जाते. स्त्री शिकली तर कुटुंब शिकले असे म्हटले जाते. म्हणजे स्त्री शिक्षण हे कुटुंबापुरते मर्यादित केले जाते.

शैक्षणिक हक्क म्हणजे स्त्रियांना शिक्षणातून स्वावलंबी बनविणे, उच्चपदस्थ सेवामध्ये संधी उपलब्ध करणारे शिक्षण देणे, आर्थिक स्वावलंबी बनविणारे शिक्षण देणे. विवाहयोग्य वय झाल्यानंतर मुलींचे शिक्षण थांबविले जाते. परंतु विवाहानंतरही तिच्या शिक्षण घेण्यावर कोणत्याही मर्यादा येवू नयेत. लैगिंक शिक्षणाच्या अभावामुळे कुटुंब नियोजन, गर्भधारणा, या ज्ञानापासून वंचित राहतात.

शिक्षण हा स्त्रियांचा मूलभूत हक्क आहे. स्त्रियांना शिक्षण मिळाल्याने त्या सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहतील. स्त्री शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोण हा निकोप असला पाहिजे. स्वावलंबनासाठी शिक्षण असा दृष्टिकोण असणे आवश्यक आहे.

## ४.३.२ मानवी हक्क आणि बालक (Human Rights and Children)

समाज सातत्यासाठी प्रजोत्पादन महत्त्वाचे मानले जाते. पण समाजसातत्य टिकवून राहण्यासाठी व समाज हा सशक्त होण्यासाठी प्रजोत्पादनातून जन्माला येणाऱ्या बालकांची काळजी घेणे आवश्यक आहे. कोणतेही अर्भक जन्माला आल्यानंतर ते समाजाचे क्रियाशील सदस्य बनविण्याची जबाबदारी व समाजसदस्याचे भान त्याच्यात रूजविणे हे समाजाचे आद्य कर्तव्य आहे. राष्ट्र उभारणीची बीजे ही बालकांचा चांगला विकास करण्यात आहे. शारीरिक, बौद्धिक, मानसिक, नैतिक विकास हा त्यांचा हक्क

आहे. हा विकास करताना बालके, कोणत्या धर्माची, जातीची, वंशाची, भाषेची, प्रांताची, लिंगाची आहेत, असा भेदभाव न करता ती बालके उद्याच्या राष्ट्राची संपत्ती आहे. असा विचार विकासामागे असणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव बालके शारीरिक, बौद्धिक, मानसिक व नैतिक विकासापासून दूर राहता कामा नये याची काळजी घेणे हा त्या बालकांचा मानवी हक्क आहे. बालकांच्या मानवी हक्काचे जतन म्हणजे उद्याच्या सशक्त राष्ट्राची उभारणी होय. थोडक्यात समाजसातत्य, राष्ट्रीय एकात्मता, सशक्त राष्ट्र उभारणीकरिता आजच्या बालकाचे हक्क त्यांना निकोप, विषमताविरहीत मिळणे आवश्यक आहे.

बालकांचा सर्वांगीण विकास हा बालकांचा मुलभूत हक्क आहे. बालकांचा शारीरिक, भाषीक, सामाजिक, बौध्दिक, भावनात्मक व नैतिक विकास या बालविकासाच्या अवस्था आहेत. बालक उद्याच्या समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या विकासाला समाजात अग्रक्रम देणे आवश्यक आहे.

बालकांचे मानव समाजातील अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारत हा जगातील तरूण देश म्हणून संबोधला जातो. बालकांची काळजी घेणे. हे ज्या-त्या देशाचे अगत्याचं कार्य आहे. याशिवाय कोणत्याही कामाला अग्रक्रम देणे योग्य नाही असे वाटते. बालकांच्या कल्याणासाठी अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले आहेत. बालकल्याण संदर्भात अनेक धोरणे ठरविण्यात आली आहेत. जेणेकरून बालकांचा संपूर्ण विकास पर्यायाने देशाचा सर्वंकश विकास होय.

### १. यूनो व बालकल्याण :-

युनायटेड नेशन्सने १९८९ साली बालकांचे हक्क मान्य केले आहेत. त्यांचे अधिकार आंतरराष्ट्रीय कायद्याचा एक भाग मानले आहेत. मानवी अधिकारात त्यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आढळतो. सर्वसामान्य माणसाप्रमाणे सर्वच हक्क बालकांनाही देण्यात आलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

१. मुलांचे सर्वोत्तम कल्याण व विकास साध्य करणे.

२. सर्व क्षमतांचा विकास हा सर्व बालकांचा हक्क आहे.

३. प्रत्येक बालकास सर्वोत्तम आरोग्य, सेवा व काळजीचा हक्क आहे.

४. आपले विचार व्यक्त करणे व माहिती मिळविण्याचा अधिकार आहे.

५. जन्मानंतर त्वरित नाव नोंद, राष्ट्रीयत्त्व हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे.

६. खेळण्याचा व बागडण्याचा हक्क मान्य केला आहे.

७. कोणत्याही प्रकारच्या लैंगिक शोषणापासून संरक्षण होणे हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे.

८. आहार, आरोग्य, सर्जनात्मकता, शिक्षण घेणे, मनोरंजन, खेळ खेळणे हे सर्व अधिकार व हक्क सर्व जगाने मान्य केले आहेत. भारतानेही आपले बालकल्याण धोरण निश्चित करताना वरील सर्व हक्कांचा त्यात समावेश केलेला आहे.

## २. बालकासाठी शिक्षण धोरण – १९८६

२१ व्या शतकात बालकांना शिक्षण देण्यासाठी राजीव गांधी यांनी १९८५ साली नवीन शिक्षण धोरणाचे सुरूवात केले. स्वातंत्र्यपूर्व काळातील आदर्श डोळ्यांसमोर ठेवून शिक्षण धोरण असावे. भारतीय प्राचीन संस्कृतीची ओळख नवीन युवा पिढीला व्हावी, असे त्यांनी सांगितले. तेव्हाचे शिक्षणमंत्री कृष्णचंद्रपंत यांनी आपला अहवाल सादर केला. त्यातील प्रमुख तत्त्वे.

१. शिक्षण हे माणसाला सुसंस्कृत बनविण्याचे माध्यम आहे.

२. राष्ट्रीय एकता व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा.

३. संविधानातील तत्त्वे प्रत्यक्षात अमलात आणणारे शिक्षण.

४. संशोधन व विकास यावर भर असावा.

## ३. धोरणे :–

१. बालविकास घडवून आणण्यासाठी पौष्टिक आहार, शारीरिक, नैतिक, भावनात्मक विकास व शिशू पालनपोषण, शिक्षणासंबंधी प्राधान्य दिले जाईल.

२. 'दिवा देखरेख केंद्र' स्थापन करून खेडेगावातील मुले शाळेत जाऊ शकतील, गरीब घरातील मुले शाळेत जाऊ शकतील अशी व्यवस्था करण्यात येईल.

३. नवीन शिक्षणात क्रीडेला महत्त्व असेल व बालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष देतील. मुलांना गणित लिखाणाऐवजी स्वाभाविकपणे खेळणे, बागडण्यासाठी मोकळे सोडले जाईल.

४. प्राथमिक शिक्षणाबरोबर मुलांच्या पालनपोषणाकडे लक्ष दिले जाईल. ज्यामुळे भविष्यात मानवी संसाधनांचा विकास होईल यासाठी शाळेतच मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

५. प्राथमिक बाल्यावस्थेतील देखरेख व शिक्षण कार्यक्रम (Early Children Care and Edcuation) यात बालकांचा विकास करण्यासाठी सेवा असतील त्या पुढीलप्रमाणे –

(अ) प्रसूतीपूर्व काळजी घेणे.

(ब) नवजात बालकांची काळजी

(क) दूध पिणाऱ्या बालकांची काळजी घेणे.

(ड) पोषक आहार देणे.

(इ) रोगप्रतिबंधात्मक लस देणे.

(ई) बालकांची काळजी घेण्यासाठी आई-वडिलांना प्रशिक्षण देणे.

(उ) शाळेत जाण्यापूर्वीच बाल्यावस्थेत विकास करणे.

(ऊ) आरोग्य व पोषक आहार उपलब्ध करून देणे.

इ. स. २००० पर्यंत या सेवा ७०% लहान मुलांना उपलब्ध होतील असे ठरविण्यात आले आहे. सर्व साधनांचा विचार केला असता, गरजेप्रमाणे पुढीलप्रमाणे तीन नमुने दिले आहेत.

१. ७०० ते १००० लोकसंख्येसाठी एक अंगणवाडी स्थापन केली जाईल. अंगणवाडी कार्यकर्त्यांना वर्षातून एकदा प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच दोन वर्षांनी पुन्हा प्रशिक्षण देण्यात येईल. साहाय्यकांना दररोज चार तास काम असेल. १२ ते २० अंगणवाड्यांना एक सुपरवायझर असेल. वरील सर्व सेवा अंगणवाडी स्तरावर उपलब्ध करून दिल्या जातील.

२. ग्रामीण किंवा शहरी भागात ५०० लोकसंख्येला एक अंगणवाडी तर आदिवासी प्रदेशात ३०० लोकसंख्येसाठी एक अंगणवाडी असेल.

## ४. बालक व मानवी हक्क :-

१. सर्व मुलांना सामाजिक संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे.

२. प्राथमिक व मूलभूत शिक्षण मोफत व सक्तीचे मिळणे हा मानवी हक्क आहे. ते राज्याचे उत्तरदायित्त्व असते.

३. संघटित व असंघटित क्षेत्रात १४ वर्षांखालील काम करणाऱ्या मुलांना बालकामगार असे समजले जाते.

## ५. भारतीय राज्यघटना व बालकामगारासंबंधी तरतुदी :-

१. घटनेच्या कलम २४ प्रमाणे १४ वर्षांखालील मुलांना कोणत्याही कारखान्यात काम करणे किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्याची बंदी करण्यात आलेली आहे.

२. कलम ३९ (१) नुसार लहान मुलांचे शोषण, नैतिक व शारीरिक हानीपासून रक्षिले जाईल.

३. कलम ४५ नुसार सर्व लहान मुलांना १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात येईल.

### ४.३.३ मानवी हक्क आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (Human Rights and Scheduled Castes and Scheduled Tribes)

भारतीय समाजरचना ही स्तरीकरणावर आधारित आहे. हे स्तरीकरण सुरवातीस वर्ण या घटकाच्या आधारावर होती याचे ऐतिहासिक साहित्यामध्ये अनेक संदर्भ आढळतात. वर्ण व्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी विभागणी असल्याचे दिसते. या विभागणी व्यतिरिक्त भारतीय समाजात अस्पृश्य आणि आदिवासी हेही लोकसमूदायाचे विभाग आहेत. या लोक समूदायांचा स्तर हा भारतीय समाजरचनेच्या तळातील होय. अस्पृश्य आणि आदिवासींना कलम ३४१ व ३४२ नुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती असे संबोधण्यात आले. याचे जे निकष होते की, जे आधार ही यादी तयार करताना वापरलेले होते. त्या आधारावरून आपणास त्यांना नसणाऱ्या हक्काची जाणीव होते. ज्या लोकांना गावात प्रवेश निषिद्ध होता, त्यांनी काय खावे, काय खाऊ नये, त्यांनी कोणते कपडे वापरावित, पाणी वापरासंबंधीची व्यवस्था, सामाजिक अधिकार, उदरनिर्वाह विषयक साधने व क्रिया हे ठरविण्याचा त्यांना हक्क वा अधिकार नव्हता. यांचे सामाजिक वर्तन व्यवहार ठरविणारे उच्च जातीचे लोकसमूह होते. या उच्च जातीच्या लोक समूहाने ठरविले की, अस्पृश्य जातींनी कसे रहावे हा प्रभाव कित्येक शतकांचा आहे. अस्पृश्य लोकांना असे वाटून गेली की, हे सामाजिक वर्तन व्यवहार आपल्या जगण्याचा अविभाज्य घटक आहे. हे जगणे ही प्रामाणिक जगले पाहिजे ही त्यांची संस्कृती होऊन बसले. आणि आपले काही हक्क आहे. आपण मानव आहोत. मानवाप्रमाणे आपण जगले पाहिजे, जगता येते याची जाणीव समाज सुधारकांच्या प्रयत्नातून तसेच अनेक सामाजिक क्रांत्यामधून निर्मिती प्रक्रिया सुरू झाली. यामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, संत गाडगे महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारख्या बुद्धीवादी महामानवांनी अस्पृश्य, मागास, आदिवासी अशा सर्व कनिष्ठ स्तरातील लोक समूहांमध्ये मानवी हक्काच्या जाणिवा निर्मीतीचे कार्य केले.

भारतातील आदिवासी समाज हा दुर्गम भौगोलिक प्रदेशात राहतो आहे. हा समूदाय भारताच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात येणे गरजेचे आहे. याशिवाय भारताचा विकास झाला आहे अशी चर्चा करता येणार नाही. आदिवासी समूदाय शिक्षण, आरोग्य, उदरनिर्वाह साधने, मूलभूत सुविधा (रस्ते, वीज, पाणी) यांच्या पासून वंचित आहे. या समूदायांचा मूलभूत हक्क आहे की त्यांना त्यांच्या मानवी गरजा सुलभरित्या पूर्ण करता याव्यात.

अस्पृश्य व आदिवासी समूदायांना कोणत्याही निकषांच्या आधारावर त्यांच्या मूलभूत गरजांपासून वंचित ठेवता कामा नये. तसे ठेवण्याचा प्रयत्न होऊ नये. तसे ठेवण्याचा प्रयत्न होऊ  नये तसे झाल्यास त्यांचे मानव हक्क हिरावून घेतल्यासारखे होईल.

थोडक्यात, अस्पृश्य, आदिवासी हे मानव आहेत या जाणिवेतून त्यांच्या मूलभूत हक्कांकडे पाहणे आवश्यक आहे ते कोणत्या धर्माचे, लिंगाचे, जातीचे, भाषेचे याचा विचार न करता विकासाच्या मुख्य प्रवाहात त्याचा समाज होणे इतर समाजाचे ते कर्तव्य आहे आणि त्याचा तो मूलभूत हक्क आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे मानवी हक्क पुढीलप्रमाणे :-

**१. जमीन आणि पाणी :-**

परंपरागत समाज व्यवस्थेमध्ये विशेषकरून ज्या जातींचे स्थान उच्च होते. आजही सर्वच क्षेत्रात त्याच जाती अग्रेसर असल्याचे आढळून येते. अस्पृश्य व आदिवासी लोकसमूहांचा मागासलेपणा हा अयोग्य नियोजन व कायदे यांना दोष दिला जातो. परंतु जाती व्यवस्थेचे स्वरूप जरी बदलत असले तरी त्यांची मूळ विशेषता बदललेली आढळून येत नाही. मानवाला जीवन जगण्यासाठी जमीन आणि पाणी ह्या महत्त्वाच्या आवश्यकता आहेत. अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहांना या मूलभूत घटकांपासून जाणिवपूर्वक वंचित ठेवण्यात आले आहे. पाण्याच्या संदर्भात ऐतिहासिक दाखले अनेक प्राप्त होतात. चळवळी, आंदोलन, कायदे, वतन या माध्यमातून अनुसूचित जाती आणि जमातींना ज्या जमीन प्राप्त झाल्या होत्या त्या जमीनींचा या लोकसमूहांना वापर करता येऊ नये याचीही जाणिवपूर्वक काळजी घेण्यात आली. या जमीन मालकांना कोर्ट कचेऱ्यांमध्ये अडकविले, या जमीन लीज म्हणून उच्च जातींच्या लोकांकडे आल्या, यातूनही ज्या जमीनी राहतील त्याचा त्यांना उपयोग करता येणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली. ज्यायोगे जमीनीचा उपयोग अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहांना करता येवू नये.

थोडक्यात मानवी जीवन जगण्यासाठी ज्या मूलभूत गरजा आहेत, त्या म्हणजे जमीन आणि पाणी यापासून वंचित ठेवण्यात आले. जमीन आणि पाणी या मूलभूत घटकावर स्वामीत्व असणाऱ्या लोकसमूहांचा विकास झाल्याचे आढळून येते. जर अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहांचा विकास करावयाचा असेल तर त्यांना जमीन व पाणी ह्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवता कामा नये. जमीन आणि पाणी ह्या गोष्टी योग्य प्रमाणात मिळाव्यात ही जशी सर्वच प्राणीमात्रांची गरज आहे, तीच गरज अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहांची आहे, नव्हे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे.

**२. मूलभूत नागरी सुविधा :-**

राज्यांचे आपले अधिकार आणि उत्तरदायित्त्व असते. नागरीकांच्या आवश्यकतांचा विचार करून

काही सांविधानिक नियम व कायदे तयार करणे. नागरिकांच्या मूलभूत गरजा ज्या की, पाणी, वीज, घर, शिक्षण, आरोग्य, रस्ते इत्यादी पुरविणे. असे असतानाही आज भारतात अनुसूचित जाती आणि जमातींना या मूलभूत सुविधापासून वंचित रहावे लागत आहे. ज्या गलिच्छ वस्त्यांचा उल्लेख होतो किंवा दुर्गम भागातील आदिवासींचा विचार केला असता, मूलभूत नागरी सुविधांपासून हा लोकसमूह वंचित आहे. 'लवासा'सारखे एखादे शहर उच्चप्रभू व्यक्तींच्या नागरी गरजांसाठी विनासायास पूर्ण होते. परंतु एखाद्या दलित वस्तीमध्ये किंवा आदिवासी क्षेत्रामध्ये समाजमंदिर किंवा नाला बांधणी किंवा रस्त्याची सुविधा देण्यासाठी कित्येक वर्ष लोकांना संघर्ष करावा लागतो.

वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य या सुविधा प्राप्त होणे कोणत्याही मानवी समूहाचे मूलभूत हक्क आहेत. ते त्यांना प्राप्त करावेत. आपल्या देशातील राजकीय उदासिनता व उच्च जातींचा अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहाच्या नागरी सुविधांकडे केलेले दुर्लक्ष यामुळे हे लोकसमूह आजही मूलभूत नागरी सुविधापासून वंचित आहेत. कोणत्याही लोकसमूहाला मूलभूत नागरी सुविधा प्राप्त होणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. आणि त्या त्यांना प्राप्त करून देणे त्या-त्या राज्यांचे आद्य कर्तव्य आहे.

**३. उदरनिर्वाहांच्या साधनांची उपलब्धता :-**

एक केस मध्ये ए.आर्द.आर.१९८६ ए.सी.१८० ए.सी.सी. उदरनिर्वाहा विषयी साधनांबाबत न्यायमुर्ती सावंत म्हणतात की, जीवन जगण्याचा अधिकार व्यक्तींना आहे आणि जगण्यासाठी काम करणे आवश्यक आहे आणि लोकांना काम उपलब्ध करून देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. लोकांना काम उपलब्ध करून देणे हा लोकांचा मूलभूत हक्क आहे. भारतामध्ये कामाचेही जातीच्या आधारावर स्तरीकरण झालेले आहे. त्याचबरोबर अशा अनेक जमाती व अस्पृश्य जाती आहेत की, त्यांच्याकडे काम नाही असलेच तर ते निकृष्ठ दर्जाचे उदा.बंदिस्त मजूरी, शेतमजूरी, सफाई कामगार, कारकून, यासारख्या क्षेत्रात काम करताना आढळतात. प्रत्येक हाताला काम मिळाले नाही किंवा मिळालेच तर त्या कामामुळे मिळणाऱ्या मोबदल्यातून दोन वेळचे पोटभर जेवण मिळत नाही. किंवा तशी व्यवस्था केलेली आहे. एकीकडे एकाच कुटुंबातील किंवा उच्च जातीतील लोकांकडे, जमीन, व्यवसाय, प्रशासकीय अधिकार, नोकरी एकवटलेली दिसते. ही विषमता असल्याचे आढळते. पोटभर अन्न, निवारा, शिक्षण व आरोग्याच्या मूलभूत सुविधा भागविता याव्यात इतके उत्पन्न प्राप्त होईल एवढे काम अस्पृश्य आणि आदिवासी लोकसमूहांना प्राप्त व्हावे. हा त्यांचा मूलभूत हक्क आहे.

१९९७ मध्ये युनीसेफ अहवालात म्हटले आहे की, भारतात बालमजूरी करणाऱ्या बालकांच्यामध्ये अनुसूचित जातींच्या बालकांची संख्या अधिक आहे. यामध्ये विशेषत: मुलींची संख्या अधिक आहे. उदरनिर्वाहविषयक गरजांसाठी अनुसूचित जाती आणि जमातीमधील लोकांना आपल्या मुलांना विकावे लागते, स्त्रियांना वेश्या व्यवसाय करावा लागतो. पुरूषांना आपल्या शरीराचे अवयवांची विक्री करावी

लागते. मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी लोकांना पुरेसा रोजगार उपलब्ध करून देणे हा त्यांचा अधिकार आहे.

### ४. राज्यांची निरपेक्ष भूमिका :-

संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहिरनाम्यातील विकासाचा अधिकार स्विकार्य आहे. यामध्ये विकास व प्रगतीचा लाभ समानतेच्या पातळीवर सर्व नागरीकांना वितरित करणे राज्यांचे कर्तव्य आहे. परंतु वास्तविक पाहता विकास व प्रगतीच्या लाभाची चर्चा होते तेव्हा हा विकास व प्रगती ही मूठभर लोकांच्या हातातच एकवटलेली आहे. नवनवीन आर्थिक धोरणांचा लाभ हा सर्वच स्तरातील लोकसमूहांना मिळेल असे जोर देवून सांगितले जात होते. भारतात एक समाज असा आहे की, जो प्लेन ते कार आणि कार ते कारपेट असा राहतो त्याचा जमीनीला पाय लागत नाही आणि समाजापासून अवघ्या ४० ते ५० कि.मी. अंतरावर राहणारा आदिवासी समाज की, ज्याला काडीपेटीचा शोध लागला आहे हे माहित नाही. (ठाणे जिल्ह्यातील आदिवासी) विकास व प्रगती सर्व लोकसमूहांना समानतेच्या पातळीवर लाभ प्राप्त करून देण्याची जबाबदारी राज्यांची असते. राज्यांनी निरपेक्षपणे सर्व लोकसमूहांना विकासाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ठ करून हे राज्यांचे कर्तव्य असते. विकास आणि प्रगती आमच्याही अंगात आली पाहिजे नव्हे. त्यामध्ये आमचा समावेश करून धेणे राज्यांची प्रमुख जबाबदारी आहे.

### ५. शैक्षणिक सुविधा :-

कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील साक्षर लोकांच्या संख्येवर मोजली जाते. ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक तो समाज अधिक संपन्न म्हटले जाते. कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील साक्षर लोकांच्या संख्येवर मोजली जाते. ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक तो समाज अधिक संपन्न म्हटले. अनुसूचित जाती आणि जमातींच्या मागासलेपणामागील अनेक कारणांपैकी शैक्षणिक मागासलेला हे एक आहे. या लोकसमूहांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होत नाही. आदिवासी ज्या दुर्गम भागात राहतात. तेथे शाळा नाहीत, शाळा आहेत तर शिक्षक नाही आणि या दोन्ही गोष्टी असतील तर मुले शाळेत नाहीत. अशी परिस्थिती पहायला मिळते. शाळा नसते, शिक्षकांनी दुर्गम भागातील नोकरी शिक्षा समजते व मुलांचे गैरहजेरीचे प्रमाण ह्या मागील कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. शाळा असेल, शिक्षक असतील तर शाळेमध्ये असणाऱ्या सुविधांचे काय? असाही प्रश्न उपस्थितीत होतो.

अस्पृश्य आणि आदिवासी मुलांचे व लोकांचे निरक्षरतेचे प्रमाण एक निरक्षर लोकांच्या प्रमाण अधिक आहे. मुले शाळेत गेली पाहिजेत, शाळेत जाऊन शिक्षणाची गोडी निर्माण होईल व आवडेल असा अभ्यासक्रम असणे अपेक्षित आहे. कुटुंबाच्या आर्थिक क्रियामध्ये मुले हातभार लावतात म्हणून मुलांना शाळेत पाठवत नाहीत, अर्धपोटी मुले शाळेत तरी जाणार कसे. 'प्रकाशवाटा' या पुस्तकात असे

नमूद केले आहे की, 'शहरी-ग्रामीण व आदिवासी मुलांचा अभ्यासक्रम एकच असतो आणि उदाहरणेही एकच, उदाहरणे आपल्या आजूबाजूला घडणारी व अभ्यासक्रम आपल्या जीवनाशी संबंधित असेल मुले आवडीने शिक्षण घेतात.' अस्पृश्य मुलांना शिक्षणातील आरक्षण, नोकरीतील आरक्षण हे उच्चजातीय लोकांना पटत नाही. अनुसूचित जाती व जमातींच्या मुलांच्या शिक्षण घेण्याने व नोकरीत येण्याने दर्जात्मक शिक्षण व्यवस्था निर्माण होणार नाही. म्हणून शिक्षण नाकारण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या प्रकारे सुरू आहेत. खाजगी शिक्षणव्यवस्था याच मानसिकतेमधून निर्माण झाल्याचे आढळून येते. उच्च जातींच्या मुलांना उच्च दर्जाचे खाजगी शिक्षण व वर्ग खोल्या नसणारे सरकारी शिक्षण हे मागासवर्गीय लोक समूहांसाठी अशी काही एक शिक्षण व्यवस्था निर्माण झाली आहे की काय अशी शंका निर्माण होत आहे. अनुसूचित जाती आणि जमातींच्या मुलांना मोफत, सक्तीचे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. प्राथमिक नव्हे तर सर्व स्तरातील शिक्षण हे मोफत मिळणे आवश्यक आहे.

**६. राजकीय हक्क :-**

ज्याच्या हातात ससा तो पारधी अशी म्हण रूढ आहे. राजकिय सत्ता ज्या लोकांच्याकडे असते ते आपली सत्ता कशी निरंतर आबाधित राहील याची एक व्यवस्था करतो. कारण सत्ताधीश नियम व धोरण ठरवित असतात. भारतामध्ये अनेक शतकांपासून आजपर्यंत सत्ता ही विशिष्ट जातीय समूहांमध्ये एकवटलेली आहे आणि समूह अस्पृश्य आणि आदिवासी समूदायांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवण्याची प्रत्येक काळात एक व्यवस्था तयार करत आला आहे. वर्णव्यवस्थेच्या आधारावर बराच काळ सत्ता विशिष्ट वर्णीय लोकसमूहामध्ये एकवटलेली होती. त्यानंतर जातीव्यवस्था निर्माण झाली. वर्ण व्यवस्थेतील उच्चवर्णीय लोक उच्च जातींचे बनले आणि सत्तेत तेच राहील. काळ बदलत गेला, अनेक परिवर्तने झाली. परंतु राजकीय सत्तेची समीकरणे बदलताना दिसत नाहीत. आजही आरक्षणाच्या माध्यमातून अस्पृश्य व आदिवासी लोकांचा समावेश राजकारणात झाला. परंतु आज कित्येक अनुसूचित जातीतील आणि जमातीतील नेत्यांना भ्रष्टाचार, अनैतिकतेत अडकवून त्यांचे राजकीय अस्तित्त्व संपविण्याचे अनेक प्रयत्न केले जातात. जाती-जातींमध्ये फुट निर्माण केली जाते व आपली राजकीय पोळी भाजून घेतली जाते. अस्पृश्य व आदिवासी लोकांच्यातील व्यक्ती सरपंच झाली तरी गावातील परंपरागत राज्यसत्तेच्या भोगत्यांना विचारणा नव्हे तर ते सांगतील त्याप्रमाणे कारभार करावा लागतो. आरक्षणामुळे आणखी एक नविन राजकीय व्यवस्था सुरू झाली आहे. पुर्वी उच्च जातीचा सरपंच, नगराध्यक्ष, मुख्यमंत्री हा आपला पुर्णकालखंडाचा उपभोग घेवून राज्यकारभार पूर्ण करत होता. त्यातून त्यांना राजकीय व प्रशासकीय परिपक्वता प्राप्त होत होती व प्रशासकीय अधिकार त्यांना योग्य ती मदत करीत होते. परंतु आज अनुसूचित जातीतील किंवा जमातीतील सरपंच किंवा इतर राजकीय पद प्राप्त झाल्यास सर्वांना समान संधी या गोंडस तत्त्वज्ञानाखाली सहा-सहा महिने सरपंच किंवा इतर पद उपभोगावयाची व राजकीय कारभार करावयाचा. या सहा-सहा महिन्याच्या कालावधीमध्ये कोणतेही राजकीय परिपक्वता येत नाही आणि ही येवूच नये म्हणून की, काय ही व्यवस्था निर्माण केली आहे असा समज होतो. मागासवर्गीय

व्यक्ती जेंव्हा राजकीय पदावर विराजमान होते तेंव्हा त्यांना प्रशासकीय अधिकारी मदत करताना दिसत नाहीत.

जाणीवपूर्वक मागास प्रवर्गातील लोकांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवण्याचे अनेक प्रयत्न केले जात आहेत. परंतु राजकीय सहभाग हा त्यांचा हक्क आहे. तो त्यांना पूर्ण मिळणे आवश्यक आहे. तरच मागास प्रवर्गातील लोकांचा विकास होईल. एवढेच नव्हेतर त्यांना सक्षम राजकीय नेता होण्यासाठी, नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी नियम व धोरणाची आखणी व योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या असणाऱ्या समस्या म्हणजे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आरोग्यविषयक, सांस्कृतिक, अत्याचार व शोषण वगैरे समस्यांना आळा घालण्यासाठी त्यांचे असलेले मानवी हक्कांची जाणीव व अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न ❊

❑ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. युनोची मानवी हक्काला मंजूरी केंव्हा मिळाली?

२. भारतात महिला आयोग कायदा कोणत्या साली मंजूरी करण्यात आला?

३. कोणत्या कलमानुसार अस्पृश्य आणि आदिवासींना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती असे संबोधण्यात आले?

४. अनुसूचित जाती-जमातींच्या कल्याणासाठी कशाची आवश्यकता आहे?

## ४.४ सारांश

दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांची या घटकात चर्चा केली आहे. दुर्बल घटकांना स्वावलंबी व सशक्त बनविण्यासाठी दुर्बल घटकांना त्यांचे मानवी हक्क किती गरजेचे आहेत हे वरील विवेचनावरून आढळून येते. स्त्रियांना समाजव्यवस्था कोणकोणत्या हक्कांपासून वंचित ठेवले आहे याची जाणीव होते. बालकांच्या हक्कांचे जतन करणे, राष्ट्राच्या उभारणीसाठी किती महत्त्वाचे आहे याची जाणीव आपणास बालकांचे मानवी हक्क या विषयाच्या चर्चेतून स्पष्ट होते. भारताचा विकास याची चर्चा जेंव्हा होते तेव्हा अनुसूचित जाती व जमातींच्या विकासाकडे दुर्लक्ष करून चर्चा होऊ शकत नाही याची जाणीव होते. तसेच अनुसूचित जाती-जमातींच्या हक्काविषयीची माहिती आपणांस प्राप्त होते.

थोडक्यात, दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या घटकांच्या मानवी हक्काकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. याचे महत्त्व या घटकाच्या अभ्यासातून अधोरेखित होते.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. युनोची मानवी हक्काला मंजूरी दि.१८ डिसेंबर १९७९ रोजी मिळाली.

२. भारतात महिला आयोग कायदा १९९० साली मंजूरी करण्यात आला.

३. कलम ३४१ व ३४२ नुसार अस्पृश्य आणि आदिवासींना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती असे संबोधण्यात आले.

४. अनुसूचित जाती-जमातींच्या कल्याणासाठी मानवी हक्कांची आवश्यकता आहे.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

❐ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्क म्हणजे काय सांगून महिलांचे मानवी हक्क स्पष्ट करा.

२. बालकांच्या मानवी हक्काविषयी चर्चा करा.

३. अनुसूचित जाती-जमातींच्या मानवी हक्कांची चर्चा करा.

❐ **टिपा लिहा.**

१. महिलांचे मानवी हक्क.

२. बालकांचे मानवी हक्क.

३. अनुसूचित जाती-जमातींचे मानवी हक्क.

## ४.७ चिंतन आणि कार्य

१. मानवी हक्क संदर्भात कार्य करणाऱ्या एखाद्या सामजिक संस्थेस भेट देणे.

२. अनाथाश्रम व बालकाश्रम यांना भेट देणे.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **प्रा. व्ही. बी. पाटील** (२००९) : *'मानवी हक्क'*, के सागर पब्लिकेशन्स, पुणे - ४११ ०११.

२. **डॉ. कृष्णकुमार शर्मा** (२०११) : *'मानवाधिकार विश्वकोश'*, अर्जुन पब्लिशिंग हाऊस नवी दिल्ली - ११००२.

३. **नंदकुमार भारंबे** (२०१२) : *'मानवी हक्क'*, निराली प्रकाशन, पुणे - ४११००५.

४. **प्रा. पी. के. कुलकर्णी** (२०१३), *'मानवी हक्क आणि सामाजिक न्याय'*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे - ४११०३०.

५. **Ashwani Kant Gauntam** (2013) : *`Human Rights and Justice System',* A.P.H. Publishing Corporation, New Delhi - 110002.

६. **Priyadarshnini Gautam** (2014) : *`Women and Human Rights'*, Swastik Publications, Delhi - 110002.

७. **B. K. Biswal** (2015) : *`Dalit and Human Rights',* Astha Publishers and Distributors, New Delhi - 110002.


❑ ❑ ❑

घटक–१

# समाजकल्याण

# (Social Welfare)


**१.० उद्दिष्ट्ये**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ समाजकल्याणाचा अर्थ व स्वरूप**

**१.२.२ समाजकल्याणाची तत्त्वे**

**१.२.३ समाजकल्याणाचा इतिहास**

**१.३ सारांश**

**१.४ महत्त्वाच्या संज्ञा**

**१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**१.६ सरावासाठी प्रश्न**

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**


## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या प्रकरणाच्या अभ्यासामध्ये आपण,

- समाजकल्याण ही संकल्पना जाणून घेऊ.
- समाजकल्याणाची तत्त्वे कोणती हे समजू शकतो.
- समाजकल्याण या संकल्पनेचा इतिहास किंवा ती कशी उत्क्रांत झाली हे समजू शकतो.

## १.१ प्रस्तावना

समाजकल्याण ही एक व्यापक संकल्पना आहे. समाज कल्याण मानवी कल्याणाचे साधन म्हणून कार्य करीत असते. यामध्ये निराश्रितांना आश्रय देणे, दलित, महिला, बालके, वृध्द, अपंग, परित्यक्त्या स्त्रिया अशा अनेक समाजातून जे उपेक्षित घटकाचे कल्याण हेच समाजकल्याणाचे केंद्रभूत उद्दिष्ट्ये आहे. समाजकल्याणमार्फत गरजू, उपेक्षित लोकांच्या भौतिक, मानसिक, भावनिक व आर्थिक गरजा व त्यांचे हितसंबंध अशा व्यापक कल्याणाचा समावेश होतो.

भारताच्या दृष्टीने विचार केल्यास, समाज कल्याणची एक प्रदीर्घ परंपराच भारतास लाभलेली आहे. समाजकल्याण या संकल्पनेची प्रमुख दोन वैशिष्ट्ये आहेत.

१. कुटुंबाकडे एक मुलभूत सामाजिक संस्था म्हणून आपण पाहतो. समाजकल्याणमार्फत या कुटुंबसंस्थेस दृढ, बळकट करण्यासाठी कल्याणात्मक उपाययोजनांचा अवलंब करणे, हे पहिले महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

२. जीवन जगताना येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्राप्त परिस्थितीशी समायोजन साधण्यासाठी व्यक्तीला सशक्त, सक्षम करणे हे दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य होय.

वरील दोन समाजकल्याणाची अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्ये असून, ती केंद्रस्थानी ठेवून समाजकल्याण योजनांची आखणी करीत असते.

## १.२ विषय विवेचन

'समाजकल्याण' ही संकल्पना समजून घेणे हा या प्रकरणाचा गाभा आहे. सामाजिक कल्याणाचा वेगवेगळ्या देशात वेगवेगळा अर्थ लावला जातो. प्रस्तुत प्रकरण पुढील उपविभागात विभागले आहे.

(अ) समाजकल्याणाचा अर्थ व स्वरूप.

(ब) समाजकल्याणाची तत्वे.

(क) समाजकल्याणाचा इतिहास.

### १.२.१ समाजकल्याणाचा अर्थ व स्वरूप
### (Meaning & Nature of Social Welfare)

"Social Welfare' या इंग्रजी शब्दासाठीच समाजकल्याण हा मराठी शब्द वापरला आहे. समाजकल्याण हा शब्द व्यवहारामध्ये बराचवेळा वापरला जातो. समाजकल्याण या संज्ञेची ''सामाजिक

सेवा, सामाजिक सुधारणा, सामाजिक कार्य'' या संज्ञांशी गल्लत केली जाते. समाजकार्यात तसेच समाज कल्याणाच्या क्षेत्रात काही शब्द वारंवार वापरले जातात. समाज कार्यक्षेत्रात देखील समाजासंबंधीची विविध कार्ये आणि सेवाद्वारा समाजकल्याणाचेच कार्य केले जाते. समाजकल्याण या संकल्पनेच्या चौकटीमध्ये कोणतेही छोटे-मोठे सामाजिक कार्याचा उल्लेख करता येतो. उदा. अपंगांसाठी योजना राबविणे, अनुसूचित जाती-जमातींच्या मुला-मुलींसाठी वसतिगृहांची योग्य सोय करणे, वंचित निराश्रित महिलांसाठी निवारा व आधारगृहांची योजना राबविणे, वा शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करून देणे, वृध्दांकरिता योजना राबविणे, इतकेच नव्हे तर देवदासी पुनर्वसन, विस्थापितांचे पुनर्वसन, बालगुन्हेगार व गरजू मुलाची राहण्याची, शिक्षणाची व प्रशिक्षणाची सोय करणे इत्यादी योजना समाजकल्याण या सदरात मोडतात.

## ❐ समाजकल्याणाची व्याख्या :-

### १. १९६८ साली डॉ. चार्लस् शॉटलॅड यांच्या अध्यक्षतेखाली समितीनुसार -

''समाजात जे व्यथित गट किंवा ज्या व्यथित व्यक्ती आहेत, त्यांना सहाय्य देणे म्हणजे समाजकल्याण होय.''

समाजातील व्यथित गट म्हणजे अंध, मूक-बधिर, विविध असाध्य रोगाने पिडीत व्यक्ती, मानसिक रुग्ण, अपंग, मागास, वंचित गट, सावकाराच्या जाळ्यात अडकलेली माणसे एकूणच शोषित अशा सर्व घटकांचा समावेश होतो. या सर्व व्यथित व गरजू लोकांना, गटांना सेवासुविधांचा (शिक्षण, रोजगार, आरोग्य) लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याकरिता करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना समाजकल्याण म्हटले जाते.

### २. ब्रिटानिका ज्ञानकोषामधील -

''बेकारी, अपघात, आजारपण, वृध्दत्त्व इत्यादीला सामाजिक विम्याचे संरक्षण देऊन आपल्या नागरिकांचे आर्थिक व सामाजिक कल्याणाचे संवर्धन करण्यासाठी शासन, कायदा व संस्थात्मक व्यवस्थांच्या माध्यमातून शासनाकडून केले जाणारे प्रयत्न म्हणजे कल्याणकारी राज्य होय.''

संयुक्त राष्ट्रांने देखील आधुनिक राज्यातील कल्याणकारी कार्यक्रमांचा याच धर्तीवर पुरस्कार केला आहे.

### ३. फ्रेडलँडर यांची समाजकल्याणाची व्याख्या -

"Social Welfare is the organised system of Social Services & institutions,

designed to aid individuals & groups to attain satisfying standards of life & health & personal & social relationship that permits them to develop their full capacities & to promote their well being in harmoney with the needs of their families & the community."

समाजकल्याण ही एक विशिष्ट अवस्था असते. ही व्यक्ती व गटाच्या विकासाच्या प्रक्रियेदरम्यानही असते. संपूर्ण समाजाचे लोकसंख्येचे जीवनमान, सामाजिक व आर्थिक जीवन अपेक्षित प्रकारचे ठेवण्याची जबाबदारी समाज कल्याणमुळे शासनावर येते. समाजकल्याण करताना अनेकसामाजिक कायदे, सामाजिक आंदोलने, सामाजिक प्रशासन, सामाजिक सुधारणा इत्यादींचा संबंध येत असतो.

थोडक्यात, व्यक्ती आणि कुटुंबाना सामाजिक स्विकृत पातळीइतके जीवनमान उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सहाय्य करणे, त्यासाठी सार्वजनिक आरोग्यसेवा, वैद्यकीय सेवा, पुरेसा निवारा अणि मनोरंजनपर सेवा पुरवून सामाजिक संतुलन साधण्यासाठी प्रयत्न करणे असा अर्थ समाजकल्याणातून ध्वनित होतो. या व्यतिरिक्त शोषीत समुदायांकरिता कायदे करणे, संरक्षण योजना राबविणे असा समाजकल्याणाच्या संज्ञेचा अर्थ सांगता येईल.

समाजकल्याणामध्ये व्यापक अर्थाने सामाजिक हितसंबंधाची म्हणजे शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक गरजा इत्यादीची जोपासना किंवा संवर्धन अंतर्भूत आहे.

समाजकल्याण या संकल्पनेची दोन वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे गरजा भागविणारी मूलभूत सामाजिक संस्था म्हणून कुटुंब दृढ करणे आणि दुसरे म्हणजे जीवन जगण्यासाठी व्यक्तीगत क्षमता दृढ करणे. समुदायातील सदस्यांना आपल्यातील सुप्त क्षमतांची जाणीव करून आत्मनिर्भर होण्याच्यादृष्टीने मूलभूत परिस्थिती निर्माण करणे हे सामाजिक कल्याण व्यवस्थेचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. तसेच पंचवार्षिक योजनांनुसार सामाजिक स्वास्थ्य हेच समाजकल्याणाचे उद्दिष्ट्ये आहे.

भारतामध्ये सामाजिक कल्याण ही संज्ञा अत्यंत मर्यादित अर्थाने वापरली जाते. सामाजिकदृष्ट्या जे उपेक्षित, दुर्बल समूह, अनुसूचित जाती-जमाती, भटक्या व विमुक्त जमाती, अनाथ, विधवा, अविवाहित माता, अनैतिक व्यवसायातील स्त्रिया, वृध्द स्त्रिया आणि मुली, सामाजिक अपसमायोजित, भिकारी, बालगुन्हेगार, अपंग, विकलांग, मनोरुग्ण, बेकार, निराश्रीत, निराधार यांचे जगणे सुसह्य करण्यासाठी समाजकल्याण कार्यक्रमाची आखणी केली जाते.

## ❒ समाजकल्याणाचे स्वरूप (Nature of Social Welfare)

सामाजिक कल्याणासंबंधीची कार्ये स्वातंत्र्यपूर्व काळात काही स्वयंसेवी संघटना, समाज कार्यकर्ते आणि सामाजिक सहभागातून केली जात असत.

स्वातंत्र्यानंतर मात्र लोककल्याणकारी, समाजवादी राज्याची स्थापना व पंचवार्षिक योजनामुळे ही कार्ये शासनाकडे आली व त्यातही ही कार्ये सामाजिक कल्याण प्रशासनाला करावी लागतात. या कार्यातून सामाजिक कल्याण प्रशासनाच्या स्वरूपाची माहिती मिळते, ते स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## १. व्यक्तीला प्रतिष्ठा मिळवून देणे :-

समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रांच्या मते, कोणताही मनुष्य जन्मतःच दुर्गणी किंवा वाईट नसतो. गरीब, श्रीमंत, पीडित आणि असहाय्यही नसतो. तर परिस्थिती व्यक्तीला त्या पद्धतीने बनवित असते. तसेच निसर्ग प्रत्येकाला समान बौध्दिक क्षमता देऊन निर्माण करीत असतो. निसर्गत: प्रत्येक मनुष्य समान असतो. परंतु समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक विषमता असल्यामुळे समाजात असहाय्य पीडित, दुर्बल, अपंग, रोगी, परित्यक्ता असे उपेक्षित समाजघटक निर्माण होतात.

हे उपेक्षित समाजघटक किंवा व्यक्ती अतिशय अप्रतिष्ठित समजले जातात. त्यांना सर्वसामान्य जीवन जगता यावे, त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य, त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य, हे समाजकल्याण प्रशासनाला करावे लागते. या कार्याकरिता या उपेक्षित, दुर्बल, समाजातील दुर्लक्षित घटकाकरिता विविध कायदे, कार्यक्रम योजनांची निर्मिती करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य या समाजकल्याण प्रशासनाला करावे लागते.

## २. समाजकल्याणामार्फत सामाजिक कल्याण प्रशासन हे एक आधुनिक शास्त्र असून ती लोकप्रशासनाची एक महत्त्वाची शाखा आहे :-

लोकप्रशासनाचा एक महत्त्वाचा घटक/भाग म्हणजे सामाजिक कल्याण प्रशासन असेही म्हटले आहे. सामाजिक कल्याण प्रशासनाचा संबंध समाजसेवा, सामाजिक सुधारणा, सामाजिक परिवर्तनाशी तसेच समाजकल्याणाशी आहे. सामाजिक कल्याण प्रशासन समाजासाठीच कार्य करते. लोकप्रशासन सर्व समाजातील सर्व घटकासाठी सर्वसाधारण कार्य करते; परंतु समाजकल्याणाचे सामाजिक कल्याण प्रशासन मात्र समाजातील विशिष्ट लोकांसाठी किंवा विशिष्ट समुदायासाठी कार्य करते. उदा. कोणत्याही देशातील समाजात किंवा प्रामुख्याने अविकसित देशातील समाजात असा एक विशिष्ट समुदाय असतो, जो समुदाय जगण्यास असमर्थ असतो व आपली उपजीविका करू शकत नाही. असा समुदाय म्हणजे- आंधळे, लुळे, पांगळे, बहिरे, वेडे, कमजोर, लंगडे, विक्षिप्त, आजारी व्यक्ती तसेच अनाथ मुले, वृध्द, निराश्रित व्यक्ती, विधवा महिला, भिकारी, बालगुन्हेगार, बालकामगार, गर्भवती स्त्रिया, महिला आणि लहान मुले, मद्यपि, भिक्षेकरी इ. या सर्व दुबळ्या आणि असहाय्य घटकांची काळजी घ्यावी लागते. या सर्व

व्यक्तींच्या कल्याण आणि पुनर्वसनासाठी कायदे, धोरण, कार्यक्रमाची निर्मिती करून त्यांची अंमलबजावणी करावी लागते. म्हणून साधारणत: दुबळ्या लोकांसाठी त्यांच्या कल्याणासाठी कार्य करणारे प्रशासन म्हणजे सामाजिक कल्याण प्रशासन असे म्हटले जाते.

महात्मा गांधींच्या मते, ''कल्याणकारी राज्य तेच, जे प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे कार्य करते.''

## ३. सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे :-

भारतीय राज्यघटनेने सर्वाना समान संधी जरी दिली असली तरी भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषमता असल्यामुळे वंचित, स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके, बालकामगार, बालगुन्हेगार, विधवा स्त्रिया, बेकार, वृध्द यांच्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारतीय लोकशाही आणि कल्याणकारी राज्यात सर्वांना समान संधी द्यावी लागते. व्यक्ती-व्यक्तीत कोणत्याही प्रकारचा म्हणजे जात, वंश, लिंग, धर्म, भाषा, क्षेत्र, उत्पन्न या आधारे भेदभाव न करता सर्वांना समान सेवा देणे योग्य असले तरी देखील भारतीय विषमताप्रधान समाजव्यवस्थेत त्यांना त्यांच्या मानवी अधिकारापासून दूर ठेवणयत आले. लोकशाहीमध्ये सर्वांना समान संधी देत असताना या वंचित घटकांना विशेष संधी द्यावी लागते. त्याची विशेष सेवा करावी लागते. त्यांची शोषणापासून मुक्तता करणे, त्यांना न्याय देणे व समानता निर्माण करण्याचे कार्य, हे समाजकल्याण प्रशासनाला करावे लागते. उदा. बालकल्याणांतर्गत आदिवासी, दलित मुलांकडे अधिक लक्ष देणे, त्यांना योग्य आणि पौष्टिक व सकस अन्न पुरवठा करणे, मृत्यू, रोग, कुपोषण थांबविणे, झोपडपट्टीतील मुलांची अधिक काळजी घेणे, तसेच त्यांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देणे. महिला कल्याणात महिलांसाठी रोजगार निर्मिती, वसतिगृहाची व्यवस्था, शिक्षण देणे, निराश्रित, परित्यक्त्या, विधवा स्त्रियांचे पुनर्वसन करणे, स्त्रिया आणि मुलांच्या विक्रीला बंदी/प्रतिबंध करणे, विकलांग आणि आपणाकडे अधिकाधिक लक्ष केंद्रित करणे, तसेच सामाजिक न्याय व समानतेची स्थापना करण्याचे कार्य समाजकल्याण प्रशासनाला करावे लागते.

## ४. मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोनातून समाजकल्याणाचे कार्य करणे :-

मनुष्यावर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि जातीय विचारांचा प्रभाव असतो. प्रशासनातील कर्मचाऱ्यांवरही या प्रतिगामी मूल्याचा प्रभाव असतो. प्रशासनातील अधिकार व कर्मचाऱ्यांवर प्रतिगामी व विषमतावादी मूल्याचा प्रभाव असेल तर त्यांच्याकडून सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता निर्माण होऊ शकणार नाही. याउलट पुरोगामी विचारांनी, पुरोगामी मूल्यासाठी, पर्यायाने समाज परिवर्तन, समाज सुधारणा व सामाजिक कल्याणासाठी कार्ये केली जातील. मूल्यनिरपेक्ष

दृष्टिकोणातून जर कार्ये केली नाही तर कायदे, योजना, कार्यक्रम यांची अंमलबजावणी गरीब आणि वंचितांसाठी न करता समाजातील अभिजन वर्ग आणि श्रीमंतांसाठी केली जाईल. परंतु समाजकल्याण प्रशासनाला मात्र पुरोगामी मूल्यांच्या आधारे परिवर्तनावादी समाजसुधारणा आणि समाज कल्याणाचा दृष्टिकोण समोर ठेवूनच कार्य करावे लागेल.

### ५. व्यक्तीला सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे :-

व्यक्तीनी मिळून समाज बनतो. या समाजात व्यक्ती-व्यक्तीचे संबंध असतात. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजात राहिल्यामुळेच व्यक्ती सभ्य, शिक्षित तसेच अर्थपूर्ण जीवन जगू शकतो. अशावेळी प्रत्येक मनुष्याला आपली जबाबदारी ओळखावी लागते. परंतु आजच्या आधुनिक काळात पाश्चिमात्त्य संस्कृती आणि भौतिकवादाच्या प्रभावामुळे वाढत्या चंगळवादी प्रवृत्तीमुळे व्यक्ती सामाजिक जबाबदारी विसरत चालला आहे. त्यामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन, बालकामगार, मद्यपान आणि मानसिक तणाव यासारख्या अनेक सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. सामाजिक कल्याण प्रशासनाला वा सामाजिक समस्या निर्मूलन करून व्यक्तीला सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करावी लागते.

थोडक्यात, प्रस्थापित समाजातील ज्या व्यक्ती, कुटुंबे, आणि त्यांचे अवलंबित स्वप्रयत्नाने आपला भौतिक, आरोग्यविषयक प्रश्नांची सोडवणूक करू शकत नाहीत, अशा सर्वांना सेवासुविधा उपलब्ध करून देणे हेच समाजकल्याणाचे उद्दिष्ट्य आहे. समाजातील उपेक्षित, दुर्बल घटकांचा विकास करून इतर समाजाबरोबर त्यांना प्रगत होता यावे. तसेच त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावेत म्हणून अनेक विकासात्मक व कल्याणात्मक योजना व कार्यक्रम आखले जातात. योग्य धारेण आखणे हा अध्या विकासाचाच एक भाग म्हणता येईल.

## ❊ स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-१ ❊

### (अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१. ............. हा इंग्रजी शब्द समाजकल्याणाकरिता वापरला जातो.

*(अ) सोशल वर्क* *(ब) सोशल वेलफेअर*

*(क) सोशल रिफॉर्म* *(ड) सोशल चेंज.*

२. समाजकल्याण हे मानवी कल्याणाचे ............ म्हणून कार्य करीत असते.

*(अ) साध्य* *(ब) मागणी*

*(क) साधन* *(ड) नैतिकता.*

३. ............ या संस्थेस बळकट करण्यासाठी कल्याणात्मक उपाययोजनांचा अवलंब केला जातो.

*(अ) कुटूंब* *(ब) विवाह* *(क) धर्म* *(ड) जाती.*

४. समाजात जे व्यथित गट/व्यक्ती आहेत त्यांना सहाय्य देणे म्हणजे समाजकल्याण असे .............. यांनी म्हटले आहे.

*(अ) ब्रिटानिक शब्दकोष* *(ब) ॲरिस्टॉटल*

*(क) फ्रेडलॅडर* *(ड) डॉ. चार्लस् शॉटलॅड.*

५. पंचवार्षिक योजनेनुसार ............ हेच समाजकल्याणाचे उद्दिष्ट्य आहे.

*(अ) सामाजिक स्वास्थ्य* *(ब) भौतिकता*

*(क) राजकीय स्वास्थ्य* *(ड) धार्मिक स्वास्थ्य.*

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ब्रिटानिका ज्ञानकोशातील समाजकल्याणाची व्याख्या सांगा.

२. समाजकल्याणाशी समानार्थी संज्ञा कोणत्या?

३. कोणत्या दृष्टिकोनातून समाजकल्याण कार्य करते?

४. समाजकल्याणाचे केंद्रभूत उद्दिष्ट्ये कोणते?

५. स्वातंत्र्यापूर्वी समाजकल्याणाची कार्ये कोणाकडून केली जात होती?

## १.२.२ समाजकल्याणाची तत्त्वे (Principles of Social Welfare)

व्यक्ती-व्यक्तींनी मिळून समाज बनतो. परंतु या समाजामध्ये सर्व स्तरावर म्हणजेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी ठिकाणी विषमता आढळून येते. या विषमतेतून अनेक समुदाय हे उपेक्षित, दुर्लक्षित असलेले दिसून येतात. या उपेक्षित लोकांच्याकडे सामाजिक कल्याणाकडून अनेक प्रकारच्या सेवा पुरवून त्या समुदायांन उत्कृष्ट जीवन जगण्याची संधी प्राप्त करून दिली जाते.

सामाजिक कल्याणामध्ये 'प्रशासन' ही संज्ञा वेगवेगळ्या अर्थांनी वापरली जाते. २०वे शतक हे कल्याणकारी, समाजवादी आणि लोकशाहीचे शतक होते. यात जनतेच्या कल्याणाला महत्त्व देण्यात आले. लोककल्याणाकरिता सामाजिक कल्याण संघटनेतील प्रशासकीय कार्याकरिता अनेक धोरणे व कार्यांचे निर्धारण करणे, सर्वाकष नियोजन करणे, कार्यालयीन कामकाज व सेवा राखणे इत्यादीचा

समावेश होतो. सामाजिक कल्याण प्रशासनामध्ये शासकीय व निमशासकीय कृतींचा समावेश केला जातो. यांच्याकडून अपंग, संकटकालीन उपाययोजना, समस्याग्रस्तांचे पुनर्वसन, निराधार, दु:खशामक, परिहारक व निवारण कार्याबरोबरच उपचारात्मक व प्रतिबंधात्मक कार्य केली जातात. तसेच व्यक्ती आणि समुहांच्या सामाजिक समस्यांनी सोडवणूक करण्यासाठी कायदा, वैद्यकीय व्यवस्थापन, सार्वजनिक संबंध आणि सांख्यिकी इत्यादी बाबतीत ज्ञान आणि कौशल्यांचा व्यवहारात उपयोग करणे अपेक्षित आहे. एकदा का सामाजिक कल्याण सेवासंबंधी कायदे स्वीकारून योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडून संघटनेची निर्मिती झाली की प्रशासनाची सुरुवात होते.

सामाजिक कल्याण प्रशासनात पुढील गोष्टी अंतर्भूत असतात. (१) कर्मचारी निवड, वर्गीकरण आणि व्यवस्थापन, (२) निधी व्यवस्थापन, (३) संप्रेषण, (४) रेकार्डस्, (५) सार्वजनिक संबंध, (६) व्यावसायिक सेवा, (७) नियोजन इत्यादी.

## ❐ सामाजिक कल्याणाची तत्त्वे

सामाजिक कल्याण प्रशासनामध्ये पुढील तत्त्वांच्या मार्गदर्शनावर सामाजिक कल्याण धोरणाचा आणि कार्यक्रमांचा विकास आधारित आहे.

### १. संदिग्धता नसावी (स्पष्टता असावी)

सामाजिक कल्याणाची अनेकवेळा समाजकार्य, सामाजिक सुधारणा या शब्दांशी गल्लत केली जाते. समाजकार्य आणि सामाजिक कल्याण हे एकच असल्याचे ही बऱ्याचदा व्यावहारिक जीवनामध्ये बोलले जाते. अशा प्रकारची शाब्दीक गफलत टाळण्याकरिता सामाजिक कल्याण म्हणजे काय? या सामाजिक कल्याण संस्थेची उद्दिष्ट्ये कोण-कोणती? आणि ती कशा पध्दती कार्ये करीत असते. याची स्पष्टपणे व्याख्या करणे आवश्यक असते. असे केल्यास सामाजिक कल्याणाबाबतची संदिग्धता नष्ट होवून, समाजकल्याणास आपले ध्येय साध्य करण्याकरीता मार्गदर्शक ठरेल म्हणून सामाजिक कल्याणाची स्पष्टपणे व्याख्या केलेली असावी.

### २. मुलभूत संरक्षण कल्याण हक्क (Securing basic Welfare rights)

सामाजिक कल्याण प्रशासनाकडून समाजसहकार्याच्या साहाय्याने समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना प्राथमिक/मुलभूत संरक्षण देण्यात यावे. जेणेकरून समाजातील उपेक्षित, दुर्बल जे घटक आहेत, जसे की, महिला, बालक, वृध्द, अपंग, विस्थापित, दरिद्री, बालगुन्हेगारी यासारख्या असहाय्य घटकांची काळजी घेवून त्यांच्या ज्या मूलभूत प्राथमिक गरजा आहेत. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण यांचे संरक्षण मिळणे आवश्यक आहे. कारण या उपेक्षित लोकांच्या जीवनाला स्थैर्य आणि सुरक्षिततेची

गरज असते. निदान या लोकांच्या दैनंदिन उदरनिर्वाहप्रधान मुलभूत गरजांची पुर्ततेकरिता, समाजकल्याणामार्फत शासनाकडून प्रयत्न करण्यात यावेत. संपूर्ण समाजाच्या विकासाकरिता या उपेक्षित लोकांचा विकास करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे आवश्यक आहे, आणि सर्वांगीण विकास हा हेतू डोळ्यासमोर ठेवून शासन प्रयत्नशील असावेत. जेणे करून लोकसहभागातून सर्वस्तरातील व्यक्तींना समाजात संरक्षण मिळेल.

## ३. गरजाधिष्ठित कार्यक्रम

समाजकल्याणामार्फत जे विविध कार्यक्रम, धोरणांची आखणी केली जाते. या समाजकल्याण कार्यक्रमामध्ये ज्या मुलभूत प्राथमिक गरजा आहेत. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्याकरिता समाजकल्याण कार्यक्रमामार्फत उपेक्षित समाजातील लोकांना सक्षम करून त्यांना उदरनिर्वाह प्रधान व्यवसायाची उपलब्धता करून केवळ चालणार नाही तर व्यावसायिक प्रशिक्षणाचाही कार्यक्रम आखावेत. जेणेकरून त्यांच्या ज्या मुलभूत गरजा आहेत, त्या गरजा पूर्ण करण्याकरिता ते सक्षम होतील. थोडक्यात, समाजातील मूलभूत गरजा पूर्तीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे. हे समाजकल्याणाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. तसेच गरजाधिष्ठित कार्यक्रम परिणामकारक राबविण्याकरिता त्यांचे प्रादेशिक क्षेत्र आणि व्याप्ती मर्यादित असावी. तसेच हे कार्यक्रम समुदायातील साधनाशी व प्रतिमानांशी संबंधित असावेत.

## ४. समानता/समानसंधी (Equity)

भारतीय समाजव्यवस्थेत विषमता मोठ्या प्रमाणात आढळून येते. ही विषमता सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय स्तरावर आढळून येते. परंतु भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये सर्वांना समता निर्माण करण्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत. यानुसार जन्म, वंश, जात, धर्म, लिंग किंवा जन्मस्थळ (भौगोलिक क्षेत्र-ग्रामीण-नागरी) या आधारावर भेदभाव न करता. सर्वांना सर्व क्षेत्रात समानसंधी उपलब्ध करून देण्यात यावी. थोडक्यात, सर्व क्षेत्रामध्ये सर्व स्तरातील व्यक्तींना समानसंधी उपलब्ध करून देणे हे समाजकल्याणाचे महत्त्वाचे तत्त्व सांगितले आहे.

## ५. भेदभाव नसणे (Non-discrimination)

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही चार भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीलाच उद्देशपत्रिकेत दिलेली तत्त्वे आहेत आणि या तत्त्वानुसार समाजातील सर्व समूहातील लोकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता, सर्वांना समान वागणूक देणे हे सामाजिक कल्याणाचे महत्त्वाचे तत्त्व असावे. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थळ या आधारावर नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. सर्वच सार्वजनिक ठिकाणे सर्व लोकांना खुली करण्यात यावीत.

## ६. लोकशाही (Democracy)

लोकांनी लोकांच्यापासून लोकांच्याकरिता, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. भारत हा लोकशाही प्रधान देश असल्यामुळे, भारतीय समाज व्यवस्थेत, लोकशाही समाजवाद, कल्याणकारी राज्य व धर्मनिरपेक्षता या तत्त्वाचा स्विकार करण्यात आला आहे. याप्रमाणेच समाज-कल्याणामार्फत जनकल्याणाकरिता अत्यंत प्रभावी कार्यक्रमाची आखणी करून या कार्यक्रमामध्ये जनसहभाग मोठ्या प्रमाणात असावा. तसेच मानवतावादी दृष्टिकोनातून गरजू व्यक्तींची सेवा लोकशाहीवादी दृष्टीने करण्यात यावी हे एक अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे तत्त्व म्हणता येईल.

## ७. उत्कृष्ट जीवन जगण्यात वाढ करणे (Improved Quality of Life)

सामाजिक कल्याण प्रशासनाला मानवी कल्याणाचे साधन म्हणूनही कार्य करावे लागते. सेवा साधनाचे न्याय पद्धतीने वितरण करून जे लोक विकलांग, असहाय्य, अपंग, वृध्द व गरजू आहेत. त्यांचे जीवनमान उंचाविण्याची जबाबदारी ही समाजकल्याण कार्याद्वारे पूर्ण करण्यात येण्यासाठी कार्यरत असावे. उदा. निराश्रितांना आश्रय देणे, अपराध्यांना योग्य मार्गावर आणणे, मागासवर्गीयांची प्रगती करणे, विकलांगांना सन्मान प्रदान करणे, थोडक्यात सामाजिक दोष नष्ट करून समाजातील प्रत्येक व्यक्तीला उत्कृष्ट जीवन कशा पध्दतीने जगता येईल, याकरिता समाजकल्याण सदैव तत्पर असावे. जेणेकरून सर्वच वंचित घटकांना उत्कृष्ट जीवनमान उंचावून चांगल्या पद्धतीने जीवन व्यतित करता येईल.

## ८. मानवी हक्क (Human Rights)

मानवी हक्क संरक्षणाचा विचार दुसऱ्या महायुद्धानंतर करण्यात आला; जगात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. आणि या संघटनेच्या सनदेमध्ये मानवी हक्कांचा उल्लेख सर्वप्रथम करण्यात आलेला दिसतो.

तसेच भारतीय राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय या मुलभूत तत्त्वाचा समावेश असून कायद्यासमोर सर्वस्तरातील, वर्गातील व्यक्तींना समान अधिकार/हक्क आहेत. तसेच विचार स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य हा व्यक्तीचा महत्त्वाचा मानवी हक्क याठिकाणी सांगता येईल. भारतीय नागरिकांना आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास स्वतंत्ररित्या करता यावा. यासाठी मुलभूत हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपविण्यात आली. अशा तऱ्हेने सर्वांना समान संधी, कोणताही भेदभाव न करणे, या तत्त्वाचादेखील मानवी हक्कामध्ये समावेश होतो. या सर्व तत्त्वाचा समावेश समाजकल्याण प्रशासनामध्ये केला जात असून सर्व स्तरातील व्यक्तींना मग ती व्यक्ती अपंग, विकलांग, वयोवृध्द, महिला, बालक, बालगुन्हेगार यासारख्या उपेक्षित घटकाकरिता त्याचे मानवी हक्क त्यांना मिळावेत, सर्व स्तरावर त्यांना समानसंधी प्राप्त व्हावी, याकरिता समाजकल्याणमार्फत अनेक उपक्रम राबविले

जात असावेत. मानवी हक्क त्यांना प्राप्त करून देणे, त्याची जाणीव करून देणे हे समाजकल्याणाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

## ९. लोककेंद्रीत धोरण (People Centred Policies)

भारतीय समाजकल्याण प्रशासनामध्ये लोकांना केंद्रस्थानी ठेवूनच धोरणाची आखणी केली जाते. समाजकल्याणामार्फत नागरिकांच्या सुखी व समृध्द जीवनासाठी सातत्याने प्रयत्न केले जावेत. व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाकरिता पोषक वातावरण निर्माण व्हावे. तसेच ज्या व्यक्ती शारिरीक व मानसिक दृष्टीने ज्या व्यक्ती अपंग आहेत. उदा. अपंग, विकलांग, वयोवृध्द व्यक्ती, विधवा स्त्रिया, दुर्लक्षित लहान बालके, महिला त्यांच्यासाठी विशेष योजनांची अंमलबजावणी केली जाते. सामाजिक कल्याणामार्फत न्याय व लोककेंद्रीत धोरणांद्वारे जुनी धोरणे जी सध्याच्या काळामध्ये अनपयोगी ठरत आहेत. ती जुनी धोरणे पुनर्रचित करण्यात यावी आणि नवीन धोरणांची निर्मिती करण्यासाठी लोकहित केंद्रस्थानी ठेवूनच करण्यात यावी. हे अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे तत्त्व सांगता येते.

## १०. मनुष्यबळ वाढविणे (Investment in Human Capital)

भारत लोककल्याणकारी राज्य असल्यामुळे सरकारकडून राष्ट्राच्या विकासासाठी अनेक योजना आणि कार्यक्रमाची निर्मिती केली जाते. हे कार्यक्रम प्रामुख्याने जनतेच्या जीवनस्तरात सुधारणा करणे, सामाजिक न्याय आणि समानता प्रस्थापित करणे व सामाजिक, आर्थिक नियोजनाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी निर्माण केली जातात. यामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजना ते दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सरकार, समाजकल्याण विभागामार्फत नियोजित कार्यक्रमात जनतेचा सहभाग वाढविणे व या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात स्वयंसेवी संस्था हे प्रभावशाली माध्यम असल्याचा सरकारने वारंवार उल्लेख केलेला आहे. यात अनुसूचित जाती-जमाती विकास, दुर्बल कल्याण, महिला व बालविकास, गुन्हेगारात सुधारणा करणे, बालकामगारांचे कल्याण, निराश्रितांना आश्रय देणे व शिष्यवृत्तीचे निमूर्लन करून त्यातील निष्क्रीय व्यक्तींना सक्रीय करून त्या समुदायांचे मनुष्यबळ वाढविण्याचा प्रयत्न या समाजकल्याण कार्यक्रमात असतो.

सामाजिक कल्याण उपक्रमांद्वारे उपेक्षित व्यक्तीच्या व्यक्तीगत, कौटुंबिक आणि सामुदायिक पातळीवरील सामाजिक विकासामध्ये योगदान असते आणि असावेच. यातूनच मानवी विकास व त्यातून आर्थिक विकासाचा हातभार लागत असतो. तसेच सामाजिक कल्याण विभाग सर्व शासकीय साधनांची समान व न्याय विभागणी करण्यास सदैव तत्पर असावेत. ज्यामुळे अपंग, विकलांग, महिला, बालक, वृध्द, दुर्बल या व्यक्तीसमूहाचे मनुष्यबळ वाढवून त्याचे कुटुंबास योग्य असा जीवननिर्वाह करता येतील. हे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व समाजकल्याणाचे सांगता येईल.

## ११. भागिदारी (Partnership)

समाजकल्याण प्रस्थापित समाजातील दुर्बल जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक हिसंबंधाचे रक्षण करेल. ज्यामुळे ते कोणत्याही अन्याय आणि शोषणाला बळी पडणार नाहीत. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यापूर्वी समाजकल्याणाचे कार्य हे स्वयंसेवी संस्थांकडून केली जात. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र अतिशय सक्रियपणे ही जबाबदारी सरकारने स्वीकारलेली आहे. तसेच ऐच्छिक स्वयंसेवी संस्थांना आवश्यक ती आर्थिक मदत देवून समाजकल्याणाचे कार्य सरकार करून घेत असते.

समाजकल्याणाचे कार्य हे केवळ सरकारचे व स्वयंसेवी संस्थांचे नसून ते कार्य लोकसहभागातून अधिक प्रभावीपणे होत असते. या कार्यामध्ये नागरी समाजातील संघटना, खाजगी क्षेत्र/स्वयंसेवी संघटना आणि प्रशासन याच्या संयुक्तिक कार्यातूनच समाजकल्याणच्या धोरणाचा आणि उपक्रमांचा विकास व दर्जा वाढविला पाहिजे. हे अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे तत्त्व आहे.

## १२. आंतरक्षेत्रिय सहकार्य (Intersectoral Collaboration)

सामाजिक कल्याण विभागामार्फत विविध धोरणाचा व कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी होण्याकरिता आंतरक्षेत्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. आंतरक्षेत्रीय दृष्टिकोनातून समाजातील दुर्बल घटकाच्या समूहातील दारिद्र्य निर्मूलन योजनेकरिता वेगवेगळे धोरणाची, कार्यक्रमांची आखणी केली जाते. या नियोजित कार्यक्रमाची कार्यवाही आणि अंमलबजावणी करण्याकरिता आंतरक्षेत्रिय दृष्टिकोन मार्गदर्शन करीत असतो. त्यामुळे कार्यक्रमाची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊन, दारिद्र्य निर्मूलनास हातभार लागत असतो. त्यामुळे आंतरक्षेत्रीय सहकार्यातून नवनवीन योजनाची कल्पना येवून दुर्बल समूहाचा सहभाग दारिद्र्यरेषेच्यावर होईल.

## १३. सेवेचे विकेंद्रीकरण (Decentralisation of Service Delivery)

सामाजिक कल्याणामार्फत समाजातील दुर्बल, उपेक्षित घटकांचे कल्याण करण्याकरिता स्थानिक प्रशासन पातळीवर योग्य कल्याणकारी उपक्रमांचे विकेंद्रीकरण केले जाते. २०वे शतक हे कल्याणकारी, राज्याचे शतक मानले जाते. कल्याणकारी राज्यात जनतेच्या कल्याणकारी कार्याला महत्त्व दिले जाते. कल्याणकारी राज्यात प्रशासनाकडून जनतेच्या कल्याणाची कार्ये केली जातात. या समाजकल्याणाच्या कार्यासाठी वेगवेगळे विभाग सुरू केले जातात. जसे- महिला कल्याण, बालकल्याण, युवाकल्याण, वृध्दापकल्याण, अपंग कल्याण इत्यादी. या विविध विभागातून त्या-त्या समूहांच्या कल्याणाकरिता सेवांची उपलब्धता करून दिली जाते. तसेच सेवेच्या सहकार्यातील वाढ केली जाते. तसेच स्थानिक सबलीकरण करून, गरजूच्या गरजा भागविण्याची जबाबदारी पार पाडणे. या सर्व कार्याशी शासन बांधिल

असते. थोडक्यात, सेवेचे विकेंद्रीकरण हे अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे तत्त्व असून यामुळे कामाचे विभाजन होऊन प्रत्येक विभाग आपआपले काम जबाबदारीने पूर्ण करीत असते.

## १४. गुणात्मक सेवा (Quality Services)

समाजकल्याणामार्फत दुर्बल, उपेक्षित जनतेच्या कल्याणासाठी त्यांना सेवा पुरविल्या जातात. आर्थिक सुरक्षितता, किमान आरोग्याचा दर्जा, जीवन जगण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे, आणि सामाजिक व सांस्कृतिक क्षमतेप्रमाणे जीवन जगण्यास हातभार लावणे यावर समाजकल्याण लक्ष केंद्रित करीत असते. समाजकल्याण विभागामार्फत केवळ कार्यक्रमाची आखणी किंवा धोरणे न करता, हे कार्यक्रम गरजू जनतेपर्यंत कसे पोहचविता येतील, त्याची उत्कृष्ट व दर्जेदार अंमलबजावणी करणे तितकेच आवश्यक आहे. केवळ कार्यक्रम किंवा उपक्रमांची संख्यात्मक वाढ न करता, सर्व नियोजित कार्यक्रम हे उत्कृष्ट व दर्जेदार सेवांची पूर्तता करण्यासाठी समर्थ असतील. हे अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे एक तत्त्व सांगता येईल.

## १५. पारदर्शकता व उत्तरदायित्त्व (Transparancy & Accountability)

सामाजिक कल्याण विभागाकडून जी विविध प्रकारचे कार्य केली जातात. त्या कार्यामध्ये पारदर्शकता असावी, हे समाजकल्याण महत्त्वाचे तत्त्व सांगितले जाते. ही समाजकल्याणाची कार्य अनेक स्वयंसेवी संघटना आणि शासकीय पातळीवर देखील दुर्बल घटकाना किमान चांगले जीवननिर्वाह करता यावे, याकरिता सातत्याने कार्य करीत असतात. या उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये अत्यंत पारदर्शकता व उत्तरदायित्त्व असते. थोडक्यात, याठिकाणी आपल्या सार्वजनिक आणि खाजगी अशा सर्व कल्याणकारी संघटना आणि संस्था या सर्व पातळीवर पूर्णपणे पारदर्शी आणि उत्तरदायित्व मानणाऱ्या असाव्यात.

## १६. उपलब्धता (Accessibility)

सामाजिक कल्याणामध्ये सर्व स्वयंसेवी संस्था, संघटना तसेच शासन यांचा समावेश होतो. या सर्व शासकीय-निमशासकीय संस्थांद्वारे सर्व गरजू, उपेक्षित लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याकरिता सदैव तत्पर असतात. यामध्ये गरजू व अपंगांना शिक्षण, काळजीवाहू उत्तरसेवा, तसेच विशेष सेवा, त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देवून रोजगारांची संधी उपलब्ध करून देणे इत्यादी अनेक कार्य समाजकल्याणामार्फत उपलब्ध करून दिली जातात. याबाबत समाजकल्याण संवेदनशील होऊन कार्य करीत असते. हे अत्यंत महत्त्वाचे समाजकल्याणाचे तत्त्व सांगता येईल.

अशाप्रकारे सामाजिक कल्याण संस्थेचे संघटन भक्कम असावे. जेणेकरून धोरणे व त्यांची अंमलबजावणी याची स्पष्ट जाणीव असावी. तसेच सामाजिक कल्याणामार्फत लोकसहभागाद्वारे अनेक कल्याणकारी योजना राबवून सर्वच उपेक्षित लोकांच्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी विशेष कार्य करीत असते. सामाजिक कल्याणामध्ये सर्वच उपेक्षित घटकांचा मानवतावादी व परोपकारी दृष्टिकोनातून काळजी घेवून या सर्व घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो.

## * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ *

**(अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. ............. शतक हे कल्याणकारी, समाजवादी आणि लोकशाहीचे शतक होते.

*(अ) १७ वे* *(ब) १५ वे* *(क) १८ वे* *(ड) २० वे.*

२. व्यक्ती-व्यक्तीनी मिळून ............. बनतो.

*(अ) मूल्ये* *(ब) नैतिकता*

*(क) समाज* *(ड) तत्त्वे.*

३. सामाजिक कल्याण कार्यक्रमात ............ गरजांना प्राधान्य देण्यात येते.

*(अ) प्राथमिक* *(ब) दुय्यम*

*(क) महत्त्वाच्या* *(ड) मूल्यांकन.*

४. कल्याणकारी उपक्रमांचे स्थानिक पातळीवर उपक्रमांचे ............ करावे.

*(अ) केंद्रीकरण* *(ब) लोकशाहीकरण*

*(क) राजकारण* *(ड) विकेंद्रीकरण.*

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रशासनाची सुरुवात केव्हा होते?

२. समाजकल्याण कार्यक्रम हे गरजाधिष्ठित असते का?

३. लोककेंद्रित धोरण म्हणजे काय?

४. कोण-कोणत्या विभागामार्फत सामाजिक धोरणे व उपक्रमांचा विकास वाढवावा?

५. समाजकल्याण प्रशासनामध्ये कोणा-कोणाचा अंतर्भाव होतो?

## १.२.३ समाजकल्याणाचा इतिहास (History of Social Welfare)

सामाजिक कल्याणकारी राज्याची सुरुवात ब्रिटन, जर्मनी, अमेरिकेचे संघराज्य या देशात २०व्या शतकात झाली म्हणूनच २०वे शतक हे कल्याणकारी राज्याचे शतक मानले जाते. यात व्यक्तीचे कल्याण हे राज्याचे ध्येय असते. तसेच जास्तीत-जास्त लोकांच्या जास्तीत-जास्त कल्याणावर भर दिला जात असे. कल्याणाकारी राज्य समाजकल्याणाच्या अग्रेसरत्वाचे श्रेय ब्रिटनकडे जाते. तसे असले तरी व्यक्ती व समाजाच्या संपूर्ण विकासाची, कल्याणाची जबाबदारी राज्यावर पूर्वीपासूनच होती. समाजातील गरजू व दुर्बल घटकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी खास प्रयत्न करणारे राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य असे म्हटले जाते. या राज्याची संकल्पना ही व्यक्तीवादी सिध्दांत आणि भांडवलशाहीच्या विरोधातून निर्माण झालेली असली तरी ही संकल्पना अतिशय प्राचीन स्वरूपाची आहे असे मानले जाते. उदा. प्राचीन काळातसुध्दा नैतिक, आदर्श व कल्याणकारी कार्ये राज्ये पार पाडत होती. महाभारताच्या शांतीपर्वात व अनुशासन पर्वात प्रजेच्या कल्याणासाठी, राजाने कोणती कार्ये करावीत याचा उल्लेख आहे. तसेच दातृत्व, परोपकार, औदार्य, मानवता इत्यादी मूल्यांबाबत संपूर्ण जगात भारताची ख्याती आहे. समाजातील उपेक्षित/दुर्बल घटकांना कर्तव्यबुध्दीने सहाय्य करण्याचीही भावना मुळातच संयुक्त कुटुंब आणि समुदायामध्ये होतीच, पण राजाने सुध्दा आपल्या प्रजाजनांच्या कल्याणाचे उत्तरदायित्त्व जाणले. अशा या समाजकल्याणाची परंपरा लाभलेल्या भारतीय समाजाच्या समाजकल्याणांची उत्पत्ती व विकासाचा इतिहास पुढीलप्रमाणे :-

### (अ) प्राचीन कालखंड :-

प्राचीन धर्मग्रंथात, वेद, सूत्रे, महाकाव्ये, जातक, स्मृती, धर्मशास्त्र इत्यादी प्राचीन धार्मिक वाङ्मयामध्ये राजाने आपल्या प्रजाजनांचे संरक्षण करून त्यांचे कल्याण साधणे हेच राजाचे कर्तव्य असल्याचे म्हटले आहे. राजाने आपल्या संपत्तीचा उपयोग दुर्बलासाठी करावा आणि दुर्बलसुध्दा बलवान होतील हेच उद्दिष्ट राज्याचे असावे. प्रजेची सार्वत्रिक समृध्दी अणि प्रजेचा सर्वांगीण विकास करणारा राजा स्वर्गलोकात जातो, असा विश्वास होता. वडील आपल्या मुलाचे पालनपोषण ज्या भावनेने करतात त्याच भावनेने राजाने प्रजेचा सांभाळ केला पाहिजे. थोडक्यात, शासन हे पित्तृवत असावे अशीच अपेक्षा होती. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात 'प्रजेच्या सुखात राजाचे सुख सामावलेले असते. विद्याविभूषित राजाला स्वकर्तृत्वाची जाणीव असते आणि तोच प्रजेचा हितासाठी झटतो. अपंग, अनाथ, वृध्द, त्याचप्रमाणे मृत सैनिकांच्या कुटुंबातील मंडळी इत्यादींच्या रक्षणाची जबाबदारी राज्यावर असते.' असे सांगितले आहे. मनुनेसुध्दा 'नागरिकांच्या चांगल्या आणि उत्कृष्ठ जीवनासाठीच राज्य असते.' असे सांगितले. तसेच अशोक राजाच्या काळातदेखील लोकांचे कल्याणकारी कार्य करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. गौतमबुध्दानी 'राजाने स्वजनाची सेवा करावी व त्याच्या उपयोगी पडावे' असे

सांगितले.

मौर्य कालखंडातील कल्याणकारी राज्याच्या प्रारूपाची तुलना आधुनिक कल्याणकारी राज्याशी करता येते. सर्व लोक ही माझी मुले असून त्याचे सुखसमाधान, कल्याण मी साधले पाहिजे असे थोर राजा अशोकाने आपल्या राजपत्रामध्ये म्हटले होते. त्याचप्रमाणे लोकहिताच्या अनेक योजना म्हणजे जलसिंचन, रस्तेबांधणी, वन लागवड, विहिरी खणणे इत्यादी योजना त्यानी राबविल्या. तसेच सामाजिक आरोग्य आणि औषधोपचाराच्या सेवाही राजा अशोकने पुरविल्या. पूर, दुष्काळ, आग, साथीचे रोग इत्यादी आपतकालीन परिस्थितीमध्ये राजा आपल्या निधीतून मदत सहाय्यता देत असे. निराधार, निराश्रित, अपंग, अबला, वृध्द, वेडसर इत्यादीला शक्य ती मदत केली जाई.

मौर्य राजवटीनंतरच्या गुप्त राजाच्या कारकिर्दीमध्ये समाजकल्याण सेवांमुळे प्रजाजनांची भरभराट आणि सुखी-समाधानी जीवन इतके उंचावले की, या कालखंडाला ‘सुवर्ण कालखंड’ म्हटले जाते. तसेच हर्षवर्धन राजाच्या कारकिर्दीमध्येदेखील अनेक भिक्षागृहे, विश्रामगृहे, पाणपोयी इ. दानशूर लोकांच्यासाठी उभारल्या. अशा पध्दतीने समाजकल्याणाची सुरुवात ही भारतीय समाजव्यवस्थेमध्ये प्राचीन काळापासूनच सुरू आहे.

## (ब) मध्ययुगीन कालखंड :-

मध्ययुगीन कालखंडामध्ये प्रामुख्याने राजपूत, सुलतानी राजवट आणि मोगल प्रशासनाचा समावेश होतो. सार्वजनिक भरभराटीपेक्षा व्यक्तीगत उत्कर्षामध्ये राजपूत राजांना स्वारस्य होते. या कालखंडात सरकारला मिळणारे महसूल उत्पन्न हे आपली व्यक्तीगत खाजगी मालमत्ता समजून आपल्या लहरीनुसार चैनीसाठी हा पैसा खर्च करू लागले. त्या काळात सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

तरीही काही व्यक्तींनी समाजकल्याणाचा पवित्रा टिकवून ठेवलेला दिसून येतो. अल्लाउद्दीन खिलजी आणि मुहमद तुघलकासारख्या सुलतानांनी शिक्षण व सार्वजनिक दानधर्माला प्रोत्साहन दिले. अफगान राज्यकर्त्यांपैकी फिरोझ शहा तुघलक आणि शेरशहा सुरी यांनी कल्याणकारी राज्याचे प्रारूप निर्माण केली. फिरोज शहानी त्यांच्या राज्यातील गरीब मुसलमानांच्या मुलींचे विवाह लावून दिले. बेकारांना, गरजूंना मदत केली; सार्वजनिक कामे करून लोकांच्या आर्थिक भरभराटीला प्रोत्साहन दिले. शेरशाह सुरी-एक कार्यक्षम प्रशासक आणि न्यायव्यवस्थेत भरीव योगदान देणारा एवढीच ओळख नाही तर त्याने आपल्या प्रजेचे व्यापक कल्याण संवर्धन केले. सर्व समुदायातील शैक्षणिक संस्था शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यास तो आश्रयदाता ठरला. गरजू व गुणवंताना विद्यावेतनाची सोय करून दिली. मोफत भोजनगृहे, कृषि विकास, रस्ते व पूल बांधणी, सुंदर बगीचे, भिक्षागृह, इस्पितळे इत्यादी तयांनी अनमोल असे योगदान या कालखंडात केले.

या कालखंडातील सम्राट अकबराचे योगदान ही लक्षणीय आहे. गरजू व पीडितांसाठी विशेष कल्याणकारी योजना राबविण्यामध्ये त्यांनी मोठा हातभार लावला. व्यापारावर आकारल्या जाणाऱ्या जकातीचा काही भाग हा पूर्णपणे समाजकल्याणविषयक बाबींवर खर्च केला जाई. अकबराच्या अन्य कल्याणविषयक बाबींमध्ये गरीब पालकांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी सरकारी निधी देणे, दुष्काळग्रस्तांना धान्य वाटप करणे, आपतग्रस्तांना कर्जवाटप, इस्पितळे, भिक्षागृहे, अनेक सेवाभावी संस्थांची उभारणी तसेच 'मदरसा'च्या माध्यमातून शिक्षण, खाजगी संस्थांना शाळा उभारण्यात प्रोत्साहन, शासनाकडून निधी उपलब्ध करून देणे, गरजू विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत आणि मोफत पुस्तके, विद्यावेतन इत्यादीचा उल्लेख करावा लागेल. महत्त्वाचे म्हणजे सम्राट अकबराने सहिष्णुता आणि समेटाचे धोरण राबविले, त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथांचे उच्चाटन करून जसे की- बालविवाह, सती जाणे इ. विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले. अशा तऱ्हेने मध्ययुगीन कालखंडात देखील अनेक समाज उपयोगी, योजना राबविलेल्या दिसतात.

## (क) इंग्रज राजवट :-

सुरवातीस ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य हे इंग्रज राजवटीत होते. यांचा प्राथमिक हेतू हा विजयांकित केलेल्या प्रदेशांचे एकत्रिकरण करणे, त्यांचा विस्तार करणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे हा होता. परिणामी, समाजसेवा आणि समाजकल्याण दुर्लक्षितच राहिलेले दिसून येते. इंग्रज राजवटीचे दोन भाग केले जातात. एक- ईस्ट इंडिया कंपनीची राजवट आणि दुसरी १८५७ मध्ये इंग्रज प्रशासनपद ग्रहण केले तेव्हापासूनचा काळ.

१८५४ साली सार्वजनिक आरोग्य ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे, हे तत्त्व स्विकारले. इंग्रजाकरिता स्थापन केलेल्या इस्पितळात भारतीयांना औषधोपचार मिळू लागले. सांडपाणी व्यवस्था सुरक्षित करून पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून दिला. १८२९ मध्ये सतीबंदी कायदा केला. तसेच अनुसूचित जाती-जमाती व सामाजिक उपेक्षित, वंचित घटकांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणामुळे अनेक समाजसुधारक निर्माण झाले. तसेच ब्रिटिश राजवटीत अनेक स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार झाले. परंतु शिक्षित बुद्धिजीवी भारतीय वर्ग प्रभावित होऊन अनेक समाजसुधारकांनी आंदोलने केली. यामध्ये सर्वप्रथम प. बंगालमधील थोर समाज सुधारक राजा राममोहन रॉय याचे कार्य अतिशय मोलाचे आहे. म्हणूनच त्यांना भारतातील समाजसुधारकांचा जनक असे म्हटले जाते. महाराष्ट्रात म. जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी न्या. रानडे, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, सानेगुरुजी आणि महात्मा गांधी इ. यांच्यासारखे कर्तृत्वाने बलाढ्य असे समाज कार्यकर्ते लाभले. डॉ. आंबेडकरांनी तर समानतेसाठी अनेक आंदोलने उभारली. समाजसुधारणा व कल्याणात शाहूमहाराजांची कामगिरीही अतिशय मोलाची

आहे. त्यांनी शिक्षण, विद्यार्थी वसतिगृह, आरक्षण, शेती सिंचन इत्यादी धोरणे आपल्या संस्थानात राबविले, कृष्ठरोगासाठी बाबा आमटे, प्रकाश आमटे, विकास आमटे, भ्रष्टाचार निर्मूलनासाठी अण्णा हजारे, कुपोषण निर्मूलनासाठी डॉ. अभय बंग व राणी बंग, तसेच निर्वासित व विस्थापितांचे पुनर्वसन करण्यात मेधा पाटकर या सर्वांचे काम अतुलनीय आहे.

## (ड) औद्योगिकीकरण :-

कल्याणकारी राज्याची संकल्पना जरी जुनी असली तरी १९व्या शतकाच्या शेवटी जी औद्योगिक क्रांती झाली. त्यामुळे या व्यवस्थेचा खऱ्या अर्थाने अधिकच विस्तार झाला. केवळ उद्योगप्रधान राष्ट्रांनीच कल्याणकारी राज्य निर्माण केले नाही, तर लोकशाही, साम्यवादी, भांडवलशाही या सर्वांनी कल्याणकारी राज्यसंस्था निर्माण झाली.

औद्योगिक क्रांतीमुळे नवीन उत्पादन पद्धती निर्माण झाल्या. सामाजिक गतिशीलताही वाढली, तसेच अनेक सामाजकि, आर्थिक बदल झाले. व्यक्तीहिताला प्रोत्साहन देण्याचे प्रमाण वाढले. थोडक्यात, औद्योगिकरणाने अनेक समस्या निर्माण झाल्या. विशेषत: कामगारांचे शोषण, नागरीकरण त्यामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन, निवासाची समस्या, झोपडपट्ट्या, प्रदूषण, बेकारी, गुन्हेगारी, बालकामगार, सामाजिक-आर्थिक अन्याय, दोन महायुद्धातून निर्माण झालेली १९३० मधील मंदी, दोन परस्परविरोधी वर्गाची निर्मिती. कामगार संघटना व त्यांच्या हक्कांची जाणीव-जागृतीतून कामगार संघटना निर्माण झाल्या. सार्वत्रिक शिक्षण व हक्काची जाणीव. गरीब व निराधारांना सक्षम करण्यासाठी स्वयंसेवी संघटनांच्या मर्यादा किंवा अपुरेपणा. यामुळे समाज कल्याणकारी विचारांना अधिकच चालना मिळाली. यातून वाढते शिक्षणाचे प्रमाण, आपल्या हक्काची जाणीव-जागृती निर्माण झालेली दिसून येते. यातून पुढे समाज कल्याण कार्यक्रमांना गती प्राप्त झाली.

## (इ) स्वातंत्र्यानंतर समाजकल्याण विभागाची स्थापना :-

व्यक्ती किंवा विशिष्ट समूहासाठी करण्यात आलेल्या कल्याणकारी सेवांचा समावेश समाजकल्याण या शब्दात करण्यात येतो. स्वातंत्र्यापूर्वी या कार्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्थांकडून केली जात होती. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र अतिशय सक्रियपणे ही जबाबदारी सरकारने स्वीकारलेली आहे. पुरेशी आर्थिक मदत देऊन सरकार अधिक प्रभावीपणे व गंभीरपणे काम करणाऱ्या ऐच्छिक समाजकल्याण संस्थांना मदत करते व आवश्यक असेल त्या ठिकाणी सरकार आपल्या संस्थेमाफृत ही कार्य करते. समाजकल्याण विभागात शिक्षण, बालकल्याण, महिला कल्याण, कुटुंब कल्याण, शारीरिक आणि मानसिक दृष्टीने अपंगाचे कल्याण इत्यादी कार्यावर देखरेख ठेवते. केंद्रीय समाजकल्याण बोर्डाची नियमबद्ध स्थापना १९५३ मध्ये करण्यात आली. या बोर्डाचे प्रमुख कार्य म्हणजे स्वयंसेवी संघटनांना आर्थिक मदत करणे

आणि गैरसरकारी संघटनांच्या माध्यमातून नवीन कल्याण सेवाच्या विकासात साहाय्य करणे असे उद्दिष्ट्ये पार पाडले जातात.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✻

**(अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. ............. शतक हे कल्याणकारी राज्याचे शतक मानले जाते.

*(अ) १८ वे* *(ब) १९ वे*

*(क) १७ वे* *(ड) २० वे.*

२. कल्याणकारी राज्य समाजकल्याणाच्या अग्रेसरत्वाचे श्रेय ............. जाते.

*(अ) जपान* *(ब) फ्रान्स*

*(क) ब्रिटन* *(ड) फ्रेंच.*

३. ............... यांनी प्राचीन कालखंडात 'राजाने स्वजनाची सेवा करावी व त्याच्या उपयोगी पडावे' असे सांगितले.

*(अ) गौतमबुध्द* *(ब) महावीर*

*(क) प्लेटो* *(ड) कौटिल्य.*

४. ............. कालखंडात सम्राट अशोकाचे योगदान हे लक्षणीय आहे.

*(अ) प्राचीन* *(ब) आधुनिक*

*(क) मध्ययुगीन* *(ड) ब्रिटीश.*

५. केंद्रीय समाजकल्याण बोर्डाची नियमबध्द स्थापना ................ मध्ये करण्यात आली.

*(अ) १९३५* *(ब) १९५३*

*(क) १९८८* *(ड) १८५३.*

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्राचीन कालखंडात निराधाराना आधार देण्याबाबत कोणती संस्था अग्रेसर होती?

२. कौटिल्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथात सामजकल्याणाबद्दल काय लिहिले आहे?

३. कोणत्या सुलतानाने सार्वजनिक शिक्षण व सार्वजनिक दानधर्माला उत्तेजन दिले?

४. ईस्ट इडिया कंपनीचा प्राथमिक हेतू काय होता?

५. स्वातंत्र्यानंतर समाजकल्याणाची जबाबदारी ही कोणाकडे आली?

## १.३ सारांश

स्वातंत्र्यापूर्वी समाजकल्याणाचे कार्य हे अनेक स्वयंसेवी संस्थांद्वारे, सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे केले जात होते. भारतात स्वातंत्र्यानंतर मात्र राज्यघटनेद्वारा लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यात आली. समाजकल्याण ही संकल्पना अत्यंत व्यापक अशी आहे. प्रस्तुत प्रकरणात समाजकल्याण या संकल्पनेचा अर्थ व स्वरूप यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ज्या व्यक्ती किंवा कुटुंब उपेक्षित आहेत. त्या आपल्या दैनंदिन गरजांची, आरोग्याची पूर्तता करू शकत नाही. अशा महिला, बालक, वृध्द, विकलांग, अपंग, निराधार, परित्यक्त्या, देवदासी इत्यादीचा अभ्यास केला जातो. तसेच या प्रकरणाच्या दुसऱ्या उपविभागामध्ये सामाजिक कल्याण प्रशासनास कोणकोणत्या मार्गदर्शनपर तत्त्वांवर सामाजिक कल्याण धोरणाचा आणि कार्यक्रमांचा विकास आधारित आहे. हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच पुढील भागात भारतीय सामाजिक कल्याणाचा इतिहास यामध्ये प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड, इंग्रज राजवट, औद्योगिकीकरण आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समाजकल्याणाचे कार्य याचा अभ्यास केला आहे. थोडक्यात, प्राचीन ते आजपर्यंत थोडक्यात समाजकल्याणाच्या इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### १.२.१ अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे :-

(१) ब, (२) क, (३) अ, (४) ड, (५) अ.

### (ब) उत्तरे :-

१. बेकारी, अपघात, आजारपण, वृध्दत्व इत्यादीला सामाजिक विम्याचे संरक्षण देऊन आपल्या नागरिकांचे आर्थिक व सामाजिक कल्याणांचे संवर्धन करण्यासाठी शासन, कायदा व संख्यात्मक व्यवस्थांच्या माध्यमातून शासनाकडून केले जाणारे प्रयत्न म्हणजे समाज कल्याण होय.

२. समाजसेवा, सामाजिक सुधारणा, सामाजिक कार्य आणि सामाजिक सुरक्षितता या समाजकल्याणाला समानार्थी संज्ञा योजल्या जातात.

३. मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोणातून समाजकल्याणाचे कार्य करते.

४. निराश्रितांना आश्रय देणे, दलित, महिला, बालके, वृध्द, अपंग, परितत्या स्त्रिया, देवदासीचे पुनर्वसन अशा अनेक समाजातून उपेक्षित घटकाचे कल्याण हेच समाजकल्याणाचे उद्दिष्ट्य आहे.

५. समाजकल्याणसंबंधीची स्वातंत्र्यपूर्व काळात ही कार्ये स्वयंसेवी संघटना, समाज कार्यकर्ते आणि सामाजिक सहभागातून केली जात असत.

६. गरजापूर्ती करणारी मुलभूत सामाजिक संस्था म्हणून कुटुंब संस्थेला पाठबळ, दृढ करण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आणि जीवनप्रवासात प्राप्त परिस्थितीशी समायोजन साधण्यासाठी व्यक्तीला सक्षम बनविणे ही दोन वैशिष्ट्ये आहेत.

## १.२.२ अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे :-

(१) अ, (२) क, (३) अ, (४) क.

## (ब) उत्तरे :-

१. सामाजिक कल्याण सेवासंबंधी कायदे स्विकारून योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडून संघटनेची निर्मिती झाली की, प्रशासनाची सुरुवात होते.

२. समाजकल्याण कार्यक्रम हे गरजाधिष्ठित असते. तसेच हे कार्यक्रम स्थितीनिष्ट नव्हे तर गतिनिष्ठ असावेत, आणि कालानुरूप बदलाबरोबर गरजा भागविण्याइतपत लवचिक असावे.

३. सामाजिक कल्याणामध्ये न्याय व लोककेंद्रित धोरणांद्वारे जुनी धोरणे पुनर्रचित करण्यात यावी. आणि महत्त्वाचे लोकांना केंद्रस्थानी ठेवून नवीन धोरणाची निर्मिती करावीत.

४. नागरी समाजातील संघटना, खाजगी क्षेत्र आणि प्रशासकीय विभागामार्फत सामाजिक धोरणे व विकास वाढवावा.

५. (१) कर्मचारी निवड, वर्गीकरण आणि व्यवस्थापन, (२) निधी व्यवस्थापन, (३) संप्रेषण, (४) सार्वजनिक संबंध (५) व्यावसायिक सेवा (६) नियोजन इ. गोष्टी अंतर्भूत होतात.

## १.२.३ अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे :-

(१) ड, (२) क, (३) अ, (४) क, (५) ब.

**(ब) उत्तरे :-**

१. प्राचीन कालखंडात निराधाराना आधार संयुक्त कुटुंब आणि समुदाय जागृत तत्पर शेती.

२. कौटिल्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथात 'प्रजेच्या सुखात राजाचे सुख सामावलेले असते.'

३. अल्लाउद्दीन खिलजी आणि मुहंमद तुघलक या सुलतानने सार्वजनिक शिक्षण व सार्वजनिक दानधर्माला प्रोत्साहन दिले.

४. ईस्ट इंडिया कंपनीचा प्राथमिक हेतू हा विजयांकित केलेल्या प्रदेशांचे एकत्रीकरण करणे, त्यांचा विस्तार करणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे हा होता.

५. स्वातंत्र्यानंतर समाजकल्याणाची जबाबदारी ही अतिशय सक्रियपणे सरकारने, प्रशासनाने स्विकारली आहे.

## १.५ सरावासाठी प्रश्न

**(अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. समाजकल्याणाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२. सामाजिक कल्याणाची तत्त्वे सांगा.

३. समाजकल्याणाचा इतिहास विशद करा.

**(ब) टिपा लिहा.**

१. समाजकल्याण अर्थ सांगा.

२. समाजकल्याण स्वरूप.

३. समाजकल्याण आणि प्राचीन कालखंड.

४. मध्ययुगीन कालखंड आणि समाजकल्याण.

५. औद्योगिकीकरण आणि समाजकारण.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले,** *'भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, जून, २०१४.

२. **भारती शहा, श्रीमती भारती शहा,** *'समाजकार्य परिचय'*, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९९.

३. **डॉ. देवानंद शिंदे,** 'व्यावसायिक समाजकार्य (शिक्षण व व्यवसाय)', डायमंड पब्लिकेशन्स, २०१२.

४. **दिलीप अग्रवाल,** *'जनकल्याण एवं समाजकार्य'*, प्रिज्म बुक्स (इंडिया), जयपूर.

घटक–२

# युवक, अपंग व वृध्दांचे सामाजिक कल्याण

(Social Welfare of Youths, Differently Abled and Aged)

## घटक संरचना


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

२.३.१ युवक व सामाजिक कल्याण

२.३.२ युवक कल्याण – शिक्षण व रोजगार

२.३.३ अपंग कल्याण – आरोग्य, शिक्षण व रोजगार

२.३.४ वृध्द कल्याण – आरोग्य व सुरक्षितता

२.४ सारांश

२.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून युवक कल्याणासाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
- अपंग कल्याणासाठी आरोग्य, शिक्षण व रोजगार या माध्यमातून झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
- वृध्द कल्याणांतर्गत वृध्दांचे आरोग्य व त्यांना सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी झालेले प्रयत्न समजून घेणे.

## २.२ प्रस्तावना

२०व्या शतकाला 'कल्याणकारी राज्याचे शतक' म्हणून संबोधले जात होते. तथापि, महात्मा गांधी म्हणतात, 'कल्याणकारी राज्य तेच, जे प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे कार्य करते.' कारण प्रत्येक देशात कमी-जास्त प्रमाणात असे विशिष्ट समुदाय असतात, ज्यांना आपल्या किमान गरजा स्वत:हून भागवणे शक्य नसतात. अशा दुर्बल, असहाय्य घटकांचे कल्याण जोपर्यंत साधले जात नाही, तोपर्यंत ते राज्य 'कल्याणकारी राज्य' होऊ शकत नाही. म्हणूनच कोल यांच्या मते, 'राष्ट्रातील नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करणारे व प्रत्येकाच्या विकासाची हमी घेणारे, विकासासाठी समान संधी उपलब्ध करून देणारे राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य होय,' या स्वरूपाच्या कल्याणकारी राज्याची संकल्पना प्राचीन असली तरी विशेषत: औद्योगिक क्रांतीनंतर या संकल्पनेचा स्विकार व विकास गतीने झाला. त्यातून देशातील दुर्बल, असहाय्य घटकांचे कल्याण ही जबाबदारी राज्यांकडे आली. त्यांनी या विशिष्ट घटकांच्या कल्याणासाठी केलेले कार्य हे 'सामाजिक कल्याण' होय.

भारताच्या संदर्भातून 'सामाजिक कल्याण'चा अभ्यास करता भारतात प्राचीन काळापासून सामाजिक कल्याणाचा विचार व कार्ये झालेले आढळते. परंतु एक राष्ट्र म्हणून भारतात सामाजिक कल्याण संकल्पनेचा विकास स्वातंत्र्यानंतर गतीने झालेला आढळतो. कारण भारतीय राज्यघटनेने पर्यायाने भारताने 'लोकशाही कल्याणकारी राज्याची' संकल्पना स्वीकारली आहे. सामाजिक कल्याणासाठी आवश्यक बाबींचा समावेश राज्यघटनेत करण्यात आलेला आहे. या बाबी पुढीलप्रमाणे :-

(१) भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत जनतेला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचे आश्वासन दिले आहे. याशिवाय (२) मूलभूत अधिकार, (३) मार्गदर्शक तत्त्वे याचबरोबर (४) सामाजिक धोरण, (५) सामाजिक नियोजन व (६) सामाजिक कायदे इत्यादी.

स्वातंत्र्यानंतर गत साठ वर्षात भारतात दुर्बल, असहाय्य, उपेक्षित, वंचित, शोषित घटकांच्या कल्याणासाठी विविध धोरणे, नियोजने, कायदे, पंचवार्षिक योजना यांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्यातील तरुण, अपंग व वृध्दांच्या कल्याणासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा आपण या घटकात अभ्यासणार आहोत. तो पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

## २.३ विषय विवेचन

या घटकात आपण युवक, अपंग व वृध्दांच्या कल्याणासाठी भारतात आजपर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणार आहोत. कोणत्याही समाजातील 'युवक वर्ग' हा त्या समाजातील प्रमुख उत्पादक वर्ग असतो. या युवावर्गांच्या समस्या जाणून, त्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न केले, त्यांचे कल्याण साधले तर हा युवा वर्ग विकासाला गती देऊ शकेल. भारताच्या संदर्भात युवक कल्याण

साधावयाचे असेल तर त्यांना शिक्षण व रोजगार या क्षेत्रा जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असलेने त्यासाठी अनेक योजना, धोरणे, कार्यक्रम, आयोग, सेवा-सुविधा देण्यात आल्या, त्यांना आपण समजून घेणार आहोत.

तसेच समाजात असाहाय्य, दुर्बल जे घटक असतात, त्यांना राज्यानेच पाठबळ पुरवणे आवश्यक असते. अपंग व्यक्तींचे आरोग्य तसेच त्यांना शिक्षण व रोजगार यासंबंधी सेवा, सुविधा व साहाय्य उपलब्ध करून दिले, तरच त्यांचे कल्याण साधता येईल. म्हणूनच भारतात अपंग कल्याणाकरिता आरोग्य, शिक्षण व रोजगार यासंदर्भात अनेक प्रयत्न झाले. या प्रयत्नांचा आढावा आपण या घटकात घेणार आहोत.

समाजात साहाय्याची व सुरक्षिततेची आवश्यकता असणारा आणखी एक घटक म्हणजे 'वृध्द' ज्यांनी आपल्या समाजाला खूप सेवा दिली, त्या वृध्दांना त्यांच्या जीवनाच्या संधीकाळात आरोग्यविषयक सोयी, सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे हे कोणत्याही राज्याचे कर्तव्य ठरते. भारतात यासाठी झालेल्या प्रयत्नांचा आपण या घटकात आढावा घेणार आहोत.

## २.३.१ युवक व सामाजिक कल्याण

वर्तमानकाळात भारताला 'तरुणाईचा देश' म्हणून ओळखले जाते. कारण भारताच्या एकूण लोकसंख्येत तरुणांची लोकसंख्या लक्षणीय आहे. कोणत्याही देशातील युवावर्ग हा त्या देशाची शक्ती असतो. आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात तसेच आवश्यक ते सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात 'युवावर्ग' खूपच महत्त्वाचा घटक असतो. परंतु या युवावर्गाला दारिद्र्य, बेकारी, व्यसनाधिनता, गुन्हेगारी, सामाजिक जाणिवांची उणीव, मूल्यांचा ऱ्हास, एड्स, बेजबाबदारपणा, दिशाहिनता, शैक्षणिक असुविधा इत्यादी समस्यांना तोंड द्यावे लागले तर युवावर्गाकडून समाज विकासात अपेक्षित योगदान लाभणार नाही. म्हणूनच युवकातील क्षमताना योग्य दिशा, मार्गदर्शन, प्रशिक्षण देण्याची गरज असते. भारतात केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवरून युवक कल्याणासाठी अनेक धारेणे, योजना, कार्यक्रम, उपक्रम राबविले जातात. विविध कायदे संमत केले जातात. या सर्वांच्या अंमलबजावणीतून 'युवा कल्याण' साधण्याचा प्रयत्न केला जातो. आजपर्यंत 'युवा कल्याणा'साठी झालेले प्रयत्न पुढीलप्रमाणे :-

### १. युवकासाठी शैक्षणिक धोरण :-

युवकांच्यामध्ये वाढलेली नकारात्मकता, वैफल्य इ. बाबी राष्ट्रनिर्मितीत अडथळा ठरतात तसेच युवकांचा जीवनविषयक दृष्टिकोन व त्यांचा सर्वांगीण विकास हा त्यांना प्राप्त होणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असतो. याबाबी समोर ठेवून १९८५ साली नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती करण्यात आली. हे धोरण तयार करताना पुढील उद्दिष्टे प्राप्त करण्याचा संकल्प होता.

१. युवकांचा सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकास साधण्यासाठी पारंपारिक शिक्षणाचा आराखडा बदलणे.

२. समाजाच्या सर्वच घटकातील युवकांना शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी आवश्यक त्या सोयी, सुविधा व सवलती प्राप्त करून देणे.

३. शिक्षणानंतर युवकांना रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व कोणीही बेकार राहू नये.

४. स्त्रीयांना शिक्षणाबाबत विशेष सोयी, सुविधा व सवलती प्राप्त व्हाव्यात.

५. मागासवर्गीय व दुर्बल गटातील युवकांसाठी विशेष सोयी, सवलती प्राप्त करून देता याव्यात.

## २. राष्ट्रीय युवा धोरण व शिक्षण :-

केंद्र सरकारने स्वामी विवेकानंदाच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधत 'राष्ट्रीय युवा धोरण २०१४' जाहीर केले. या धोरणात व यापूर्वीच्या धोरणातही 'युवक व शिक्षण' यासंबंधी पुढील उद्देश निश्चित करण्यात आले.

१. या धोरणानुसार 'युवका'च्या राहणीमान, पर्यावरण, त्याच्या कुटुंबाची सामाजिक व आर्थिक स्थिती, त्यांची स्वत:ची जीवनपध्दती इत्यादी घटक लक्षात घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे.

२. या धोरणात निश्चित करण्यात आलेल्या वय वर्षे १६ ते ३० या युवासमूहाचे तीन गटात वर्गीकरण करण्यात आले. त्यातील वय वर्षे १६ ते २० या युवासमूहातील युवकांना शिक्षणविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यास या धोरणात प्राधान्य देण्यात आले.

३. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सहकार्य, राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन, शिक्षण, क्रिडा, आरोग्य, सामुदायिक सेवा इत्यादीमध्ये युवकांचा सहभाग वाढवणे यांचा समावेश होतो.

४. या धोरणात पाच युवक मानके निश्चित करण्यात आली आहेत. ती म्हणजे शिक्षण, आरोग्य, युवक सबलीकरणासाठीच्या सुविधा, युवकांचे कार्य व युवकांचा विकासकार्यातील सहभाग ही होत.

## ३. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) :-

महाविद्यालयीन व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या चरित्र व व्यक्तीमत्त्वाची योग्य जडणघडण

व्हावी या उद्देशाने केंद्र शासनाकडून १९६९ सालापासून ही योजना सुरू झाली असून ती राज्याकडून चालवली जाते. विद्यार्थ्यांत सामाजिक जाणीव विकसित करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होय. या योजनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात व त्या माध्यामातून युवकांना शिक्षित केले जाते. उदा. पर्यावरण संतुलन, साक्षरता, जलभूमी विकास, रक्तदान, स्वच्छता साहस शिबीरे इ. शिबीरांचा समावेश असतो. या सर्व माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न केले जातात.

## ४. राष्ट्रीय छात्रसेना (NCC) :-

माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण व शिस्त या उद्देशाने १९४८ साली N.C.C. ची स्थापना झाली. 'एकता व अनुशासन' हे तिचे घोषवाक्य आहे. युवकात नेतृत्व, चारित्र्य, बंधुभाव व सेवाभाव या गुणांचा विकास करणे, युवकांना राष्ट्राच्या संरक्षणासाठी पुढे येण्याची प्रेरणा देणे ही या सेनेची उद्दिष्टे होत. या संबंधाने आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण, राष्ट्रीय छात्रसेनेमार्फत दिले जाते.

## ५. विविध शिष्यवृत्त्या :-

विद्यार्थी युवक-युवतींना आर्थिक अडचणीस्तव शिक्षण घेण्यात अडचण येवू नये तसेच विविध पातळ्यांवर यश प्राप्त विद्यार्थ्यांना तसेच अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास, भटक्याविमुक्त संवर्गातील युवकांना शिक्षण घेण्यास प्रेरित करणे व त्यासाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देणे, या उद्देशाने केंद्र व राज्य सरकारामार्फत विविध शैक्षणिक टप्प्यावर विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. उदा. भारत सरकार शिष्यवृत्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी 'गुणवत्ता शिष्यवृत्ती' तसेच विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांना 'गुणवत्ता शिष्यवृत्ती', क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवंत युवांना शिष्यवृत्ती 'उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती', 'परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती', 'सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती' इत्यादी अनेक विविध शिष्यवृत्त्यांच्या माध्यमातून युवकांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## ६. शैक्षणिक कर्ज योजना :-

युवक, युवतींना उच्च शिक्षण घेण्यासाठी विशेषत: व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी येणारा शैक्षणिक खर्च आर्थिक कमकुवतपणामुळे विद्यार्थ्याला करणे शक्य नसते. पण ते शिक्षण घेण्याची त्याची पात्रता असते, तेव्हा अशा युवकांसाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या माध्यमातून शैक्षणिक कर्ज प्राप्त होऊ शकते व त्याच्या परतफेडीसाठी पुरेसा अवधी दिला जातो.

## ७. राष्ट्रीय सद्भावना योजना :-

भारत सरकारने पूर्वीच्या 'राष्ट्रीय पुनर्रचना दल योजने'च्या जागी १ जून २००५ पासून ही योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये युवकांना विशेषत: किशोरवयीन युवकांना कौशल्यविषयक शिक्षण, करिअर मार्गदर्शन इत्यादीबाबत सल्ला व सहकार्य देणेसाठी स्वयंसेवकांची नियुक्ती केली जाते. या स्वयंसेवकांना यासंबंधीचे आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाते.

## ८. विद्यावेतन व निर्वाहभत्ता :-

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून विशेषत: अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जमातीतील युवांना शिक्षण घेणे शक्य व्हावे यामध्ये त्यांची आर्थिक कमकुवत स्थिती अडसर ठरू नये यासाठी विद्यावेतन व निर्वाह भत्ता देण्याच्या योजना आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन, व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन, सैनिकी शाळेतील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनांचा यामध्ये समावेश होतो.

## ९. शासकीय वसतिगृहे :-

ग्रामीण भागातील विशेषत: मागासवर्गीय युवकांना शहरामधील शिक्षण संस्थांत शिक्षण घेता यावे व तेथे त्यांच्या निवासाची, भोजनाची सोय व्हावी म्हणून शासकीय वसतिगृहांची स्थापना केली आहे. या वसतिगृहातून मोफत निवास, भोजनाची व्यवस्था करण्यात येते.

## १०. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-

केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्यलोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र शासनाकडून चालवली जातात. युवकांना या परिक्षांत यश प्राप्त होण्यासाठी या मार्गदर्शन केंद्राचा उपयोग होतो. विविध शैक्षणिक सुविधा या केंद्रातून उपलब्ध करून दिल्या जातात.

## ११. राष्ट्रीय युवा दल (NYC) :-

केंद्र सरकारने सन २०१०-११ पासून 'राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक योजना' व 'राष्ट्रीय सद्भावना योजना' या दोन योजनांना एकत्र करून 'राष्ट्रीय युवा दल' ही योजना कार्यान्वित केली आहे. या अंतर्गत वय वर्षे १८ ते २५ वयोगटातील युवक, युवतींना दोन वर्षे पूर्ण वेळ प्रशिक्षण देऊन स्वयंसेवक तयार केले जातात. या योजनेचे उद्देश म्हणजे राष्ट्रनिर्मितीसाठी समर्पित युवकांचे समूह तयार करणे व या

युवकांनी आपल्या कार्यातून एक आदर्श घालून द्यावा व लोकनितीशास्त्र, सत्यनिष्ठा व श्रमप्रतिष्ठेला गौरव प्राप्त करून द्यावा, यासाठी या घटकांचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

## १२. अखिल भारतीय युवक संमेलन 'सागर दर्शन' :-

युवकांना नौदल, बंदरे तसेच सागरी क्षेत्राशी संबंधीत विभागात असणाऱ्या करियरच्या व विकासाच्या संधी इत्यादीची माहिती व्हावी व त्यासाठी मार्गदर्शन व्हावे व त्यांनी या क्षेत्रातील संधीचा लाभ घ्यावा याकरिता 'आंतरराष्ट्रीय युवक वर्षा'तील एक मुख्य कार्यक्रम म्हणून अखिल भारतीय युवक संमेलन 'सागर दर्शन' अशी या कार्यक्रमाची ओळख आहे.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ *

**(अ) रिक्त जागा भरा.**

१. ............ यांच्या १५० व्या जयंतीविषयीचे औचित्य साधत 'राष्ट्रीय युवा धोरण २०१४' जाहीर करण्यात आले.

२. 'राष्ट्रीय युवा धोरण २०१४' मध्ये युवा म्हणून निश्चित करण्यात आलेला वयोगट .......... होय.

३. राष्ट्रीय सेवा योजना ............. सालापासून सुरू झाली.

४. युवक कल्याणासाठीची 'राष्ट्रीय सद्भावना योजना' ............ पासून सुरू करण्यात आली.

५. माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण व शिस्त याचे शिक्षण-प्रशिक्षण देण्यासाठी १९४८ ला .......... स्थापना करण्यात आली.

## २.३.२ युवक कल्याण - शिक्षण व रोजगार

## १. सेवायोजन कार्यालय :-

शासनामार्फत युवकांना रोजगार प्राप्त व्हावा यासाठी नोकरी, रोजगार नसणाऱ्या सुशिक्षित युवकांची माहिती घेणे, त्यांना त्यांच्या प्राप्त गुणवत्तेनुसार शासकीय, निमशासकीय नोकरीत समावेशीत करण्यासाठी उपलब्ध पदाची, नोकरीची माहिती देणे, सेवेत सामावून घेणेसाठी आवश्यक ती मदत करणे इत्यादीसाठी सेवायोजन कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. अपंग युवकांना सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी करणे सुलभ व्हावे याकरिता मुंबई येथे विशेष सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली आहे.

## २. ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगाराची शिक्षण योजना (ट्रायसेम) :-

ग्रामीण युवकांना ग्रामीण भागातच प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी १५ ऑगस्ट १९७९ ला हि योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत कुक्कुट पालन, मत्स्यबीज, मधुमक्षिका पालन, अगरबत्ती, साबण, चॉकलेट, खडू, मेणबत्ती इ. वस्तु उत्पादनाबरोबर सुतारकाम, लोहारकाम, हस्तकलासंबंधी व्यवसाय इत्यादी व्यवसायाचे शिक्षण देण्यात येते. वय वर्षे १८ ते ३५ वयोगटातील युवकांना या योजनेचा लाभ घेता येतो.

## ३. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय :-

सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन व सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय स्थापन करण्यात आले असून या कार्यालयाच्या माध्यमातून युवकांना रोजगार, स्वयंरोजगारांची माहिती देणे, आवश्यक ते मार्गदर्शन करणे व प्रशिक्षण देणे तसेच त्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्यासाठी कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी सहकार्य करणे इत्यादी उपक्रम राबवले जातात.

## ४. ग्रामीण स्वयंरोजगार योजना :-

सुशिक्षित बेकार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी शोधून त्याची माहिती त्यांना देणे, त्यंनी स्वत: स्वयंरोजगार करावा व इतरांनाही आपल्या व्यवसायात रोजगार उपलब्ध करून द्यावा यासाठी या योजनची निर्मिती करण्यात आली.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी वय वर्षे १८ ते ४० असावे. तसेच, त्यंनी शालांत परीक्षा किंवा औद्योगिक व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीण असले पाहिजे. त्यांना स्वयंरोजगारासाठी बँकाकडून कर्ज घेताना आवश्यक २५ टक्के मार्जीनपैकी १० ते १५ टक्के इतके मार्जीन बीज भांडवल म्हणून दिले जाते. या बीज भांडवल कर्जावरील व्याजाचा दर ४ टक्के असतो. मागास वर्गीय, गटातील उमेदवारांसाठी प्रकल्प खर्चाच्या २० टक्के बीजभांडवल दिले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मागासवर्गीय उमेदवारास प्रकल्प खर्चाच्या २५% बीज भांडवल दिले जाते.

## ५. युवकांसाठी राष्ट्रीय आयोग :-

१५ मार्च, २००२ मध्ये या आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाकडे पुढील कार्ये सोपवण्यात आली होती. (१) युवकांना बेरोजगारीच्या समस्येचा अभ्यास करून धोरणात्मक उपाय योजना सुचवणे. (२) युवकासंबंधीच्या ज्या योजना कार्यक्रम आहेत त्यामधून युवकांना रोजगार, नोकऱ्या

उपलब्ध होतात का? ती क्षमता त्यांच्यात आहे का? याची समीक्षा करणे. (३) नव्या राष्ट्रीय युवक धोरणांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व्हावी यासाठी उपाय योजना सुचविणे.

## ६. मोटार वाहन चालक प्रशिक्षण :-

दिनांक ४ फेब्रुवारी २००८ च्या शासननिर्णयानुसार अनुसूचित जाती व नवबौध्द युवकांना व दिनांक ३० जुलै २००९ च्या शासन निर्णयानुसार भटक्या विमुक्त जाती, इतर मागास वर्गातील युवकांना रोजगार प्राप्त व्हाया या उद्देशाने मोफत मोटार वाहन चालक प्रशिक्षण दिले जाते. स्वयंसेवी संस्थामार्फत ही योजना राज्यात राबवली जाते. त्यांना शासन प्रशिक्षण शुल्क आदा करते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परीक्षा घेऊन वाहन चालवण्याचा परवाना दिला जातो. या माध्यमातून युवक स्वयंरोजगार करू शकतो, शासकीय, निमशासकीय विभागात चालक म्हणून नोकरी आवश्यक त्या पात्रता, अटी पूर्ण करून प्राप्त करू शकतो.

## ७. सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र :-

अनुसूचित जाती व नवबौध्द, युवकांना सैन्य व पोलिस दलात नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, त्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, प्रशिक्षण त्यांना मोफत प्राप्त व्हावे यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आली असून जिल्हा सेवायोजन कार्यालयाकडून पात्र उमेदवारांची यादी घेवून त्यातील १०० उमेदवारांची निवड प्रशिक्षणासाठी या केंद्रात केली जाते. प्रति प्रशिक्षणार्थी रु. ८,५०० इतका खर्च तीन महिने कालावधीसाठी केला जातो.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❊

❑ **रिक्त जागा भरा.**

१. ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगाराची शिक्षण योजना (ट्रायसेम) ................ साली सुरू करण्यात आली.

२. ग्रामीण स्वयंरोजगार योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ............ ही वयाची अट आहे.

३. युवकासाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना ............. मध्ये करण्यात आली.

४. ग्रामीण स्वयंरोजगार योजनेअंतर्गत मागासवर्गीय, गटातील उमेदवारास प्रकल्प खर्चाच्या ................. टक्के बीजभांडवल दिले जाते.

५. मोटार वाहन चालक मोफत प्रशिक्षण योजना शासन ............ मार्फत राबवते.

## २.३.३ अपंग कल्याण – आरोग्य, शिक्षण व रोजगार

जन्मत:च किंवा अपघाताने अथवा एखाद्या आजारामुळे व्यक्तीच्या शरीराचा एखादा अवयव किंवा काही अवयव अंशत: किंवा पूर्णत: निकामी झालेले असतात. तर काही व्यक्तींचे मेंदूचे कार्य योग्यप्रकारे किंवा आवश्यक त्या पुरेशा कार्यक्षमतेने चालत नसते. अशा व्यक्ती इतर सर्व सामान्य व्यक्तीपेक्षा शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल असतात. त्यांना इतरासारखे सामान्य जीवन जगण्यात अडचणी येतात त्यांना शारीरिक अथवा मानसिकदृष्ट्या 'अपंगव्यक्ती' म्हणून ओळखतात.

शारीरिक अपंगत्वात अंध किंवा अल्पदृष्टी, मूकबधीर, श्रवणदोष, अस्थिव्यंग इत्यादी तर मानसिक अपंगत्वात मतिमंद इत्यादी व्यक्तींचा समावेश होतो. २००९ च्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात एकूण १ कोटी ५६ लाख ९ हजार ५८२ इतके शारिरीक व मानसिक अपंगत्व असलेल्या व्यक्ती आहेत. यामध्ये सर्वात जास्त अंध अपंगाची संख्या आहे. त्यानंतर अस्थिव्यंग, मतिमंद व मूकबधीरांची संख्या आहे.

या अपंग व्यक्ती यासुध्दा आपल्याच समाजाचा एक अविभाज्य भाग आहेत. त्यांचे कल्याण हे समाजाचे, शासनाचे कर्तव्य आहे. भारतात यासाठी अपंगाच्या सामाजिक कल्याणासाठी आरोग्य, शिक्षण व रोजगार यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याकरिता विविध कायदे, योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना विविध प्रकारच्या आरोग्यविषयक, शिक्षण विषयक व रोजगार विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्या सोयी-सुविधा आपण या ठिकाणी जाणून घेणार आहोत.

### ❒ अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी शैक्षणिक सोयी-सुविधा, योजना :-

### १. अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ (समान संधी, समान अधिकार, समान संरक्षण व पूर्ण भागीदारी) मधील अपंग कल्याणासाठी शैक्षणिक सुविधांबाबत तरतूदी :-

अपंग अथवा विकलांग व्यक्तींच्या कल्याणासाठी कायदेशीर तरतूद करण्याच्या उद्देशाने १९९५ ला हा कायदा संमत केला व १९९६ पासून त्याची अंमलबजावणी झाली. या कायद्यात अपंग कल्याणासंदर्भात शैक्षणिक सोयी-सुविधा संदर्भातील तरतूदी पुढील प्रमाणे :-

१. कलम २६ (अ) नुसार केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रत्येक अपंग बालकाला त्याच्या वयाच्या १८ वर्षांपर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात शिक्षणाची संधी देणे बंधनकारक ठरवण्यात अलो आहे.

२. कलम २६ (ब) नुसार अपंग मुलांचे समावेशन सामान्य शाळांमध्ये करण्यासाठी राज्यसरकारने प्रयत्न करावेत. प्रोत्साहन द्यावे व त्याकरिता आवश्यक विविध शैक्षणिक धोरणे व पध्दती राबवण्यात याव्यात. याद्वारे सर्व अपंग विद्यार्थ्यांना शाळेत समावेशीत करावे.

## २. सर्व शिक्षा अभियान व अपंग विद्यार्थी कल्याण :-

केंद्र सरकार पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत अपंग मुलांचे सामान्य शाळांत समावेश करून घ्यावे यासाठी प्राथमिक स्तरावर विशेष प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून अपंग मूलांच्या ज्या विशेष शैक्षणिक गरजा आहेत. त्या गरजांच्या पूर्तीसाठी संबंधित मुलांस प्रतिवर्षी रुपये १२००/- पुरविण्यात येत आहेत. या माध्यमातून देशभरात २० लक्ष अपंग मुलांचे निदान व वय वर्षे सहा ते चौदा वयोगटातील साधारण पंधरा लक्ष अपंग मुलांचा सामान्य शाळात समावेश झालेला आहे.

## ३. अपंग एकात्म शिक्षण योजना :-

केंद्र सरकार पुरस्कृत ही योजना अपंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी असून महाराष्ट्रात ती १९७८ पासून सुरू आहे. अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत समावेशीत करून सामान्य विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण देऊन त्यांच्यातील न्यूनगंडाची भावना कमी करणे, त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यास मदत करणे हा या योजनेचा मुख्य हेतू होय. या योजनेअंतर्गत अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत प्रवेश, मोफत शिक्षण, मोफत पुस्तके, गणवेश, पाठ्यवाचक भत्ता, आवश्यक वैयक्तिक शैक्षणिक साधने, उपकरणे, वाहतूक भत्ता इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्यात ‘अपंग एकात्म शिक्षण योजना कक्ष’ स्थापन केला आहे.

## ४. अपंग समावेशित शिक्षण माध्यमिक स्तर योजना (IEDSS) :-

प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शिक्षणामध्ये प्रवेशित अपंग विद्यार्थ्यांकरिता केंद्रशासनाची ही योजना आहे. अपंग विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरील शिक्षण प्राप्त व्हावे, त्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ही योजना आहे. या योजनेमार्फत प्रत्येक शाळेत अपंगाना शैक्षणिकदृष्ट्या पूरक वातावरण निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी रु. ३०००/- अनुदान शाळेला देण्यात येते. योजनेतून अपंग विद्यार्थ्यांस शैक्षणिक साहित्य, गणवेश, प्रवास भत्ता, पाठ्यवाचक भत्ता, अपंगत्वानुसार आवश्यक साधने, उपकरणे (उदा. ब्रेल पाटी, स्टायलस चष्मे, श्रवणयंत्र इ.) पुरवण्यात येते.

## ५. वसतिगृहात अपंग विद्यार्थ्यांना राखीव जागा :-

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहात ३ टक्के राखीव जागा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अनुदानित वसतिगृहात ५ टक्के राखीव जागा, शालेय शिक्षण विभागामार्फत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या वसतिगृहात ३ टक्के व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या असलेल्या वसतिगृहात ३ टक्के जागा अपंग विद्यार्थ्यांना राखीव आहेत.

## ६. माध्यमिक, उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये अपंग विद्यार्थ्यांना सवलती :-

अध्ययन अक्षमता, दृष्टिहीन, कर्णबधीर विद्यार्थ्यांना माध्यमिक, उच्च माध्यमिक परीक्षांत पुढील सवलती दिल्या जातात. वाचक लेखनिक देणे, त्याच्या घराजवळील परीक्षा केंद्र देणे, सामान्य परीक्षार्थीपेक्षा ३० मिनिटे जादा वेळ देणे, लेखी परीक्षेत आकृत्या, नकाशे, आलेख काढण्यापासून शिथिलता इत्यादी सवलती दिल्या जातात.

## ७. अपंग मूलांना प्रवेशासाठी राखीव जागा :-

अपंग मुलांच्या शैक्षणिक हिताकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, मान्यताप्राप्त खाजगी संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामध्ये अपंग मुलांना प्रवेशासाठी ३ टक्के जागा राखीव आहेत.

तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये व व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासकीय व अशासकीय तांत्रिक महाविद्यालयात शारीरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी ३ टक्के जागा राखीव आहेत.

## ८. अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :-

अपंग विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ५०/-, इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ७५/-, इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- शिष्यवृत्तीची तरतूद आहे. तसेच, मतिमंदाच्या विशेष अनिवासी शाळेतील अतिमंद विद्यार्थ्यांना दरमहा रु. ७५/- दिली जाते. इयत्ता ९ वी ते त्यापुढील सर्व शिक्षणासाठी दरमहा रु. ९० ते ४२५/- पर्यंत शिष्यवृत्ती दिली जाते.

याबरोबरच अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव भत्ता, अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता दिला जातो.

## ९. विशेष शाळांच्या माध्यमातून शिक्षणाची व्यवस्था :-

अतितीव्र अपंगत्व असणारे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेवू शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षणाची मोफत व्यवस्था विशेष शाळांच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाने केली आहे. शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्यामार्फत या शाळा चालवल्या जातात. या विशेष शाळांमधून दृष्ठिहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांग व मनोविकलांगासाठी विशेष शिक्षणाची मोफत सोय करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात २१ शासकीय, ७१० अनुदानित व ३८ विनाअनुदानित शाळांतून ५५,००० अपंग विद्यार्थी शिक्षण, प्रशिक्षण घेत आहेत.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✻

❑ **रिक्त जागा भरा.**

१. ‘अपंग व्यक्ती अधिनियम १९९५’ या कायद्याची अंमलबजावणी ................ सालापासून झाली.

२. सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चाकरिता प्रतिवर्षी ................ रुपये पुरविले जातात.

३. अपंग एकात्म शिक्षण योजना महाराष्ट्रात ................ सालापासून सुरू आहे.

४. अपंग समावेशीत शिक्षण माध्यमिक स्तर योजना (खएऊडड) अंतर्गत प्रति अपंग विद्यार्थी प्रतिवर्षी ................ रुपये शाळेला देण्यात येतात.

५. अपंग विद्यार्थ्यांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अनुदानित वसतिगृहात ................ जागा राखीव असतात.

## ❑ अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी रोजगार, नोकरी, स्वयंरोजगार विषयक सोयी–सुविधा :–

### १. अपंगाकरिता विशेष सेवायोजन कार्यालय :–

दिनांक २९ जुलै, २००४ च्या शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींना नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नावनोंदणी करणे सुलभ व्हावे याकरिता मुंबई येथे विशेष सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली आहे. तसेच इतर जिल्ह्यांच्या जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालयामध्ये अपंगासाठी ‘विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र’ स्थापन करण्यात आले आहे.

### २. सरळ सेवाभरतीमध्ये अपंगासाठी आरक्षण :–

शासकीय कार्यालयात सरळ सेवा भरतीतून जी पदे भरली जातात त्यामध्ये अपंग व्यक्तींना ३ टक्के आरक्षण आहे. हे ३ टक्के आरक्षण अंध/अल्पदृष्टी अपंग १ टक्का, कर्णबधीर १ टक्का, अस्थिव्यंग व मतिमंदासाठी १ टक्का असे विभागले आहेत. तसेच सरळ सेवेने भरल्या जाणाऱ्या प्रत्येक पदासाठी १०० बिंदू नामावलीमधील क्रमांक १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगासाठी आरक्षीत ठेवले आहेत.

## ३. अपंगांना नोकरीकरिता उच्च वयोमर्यादेमध्ये शिथिलता :-

अपंग व्यक्तींना शासकीय तसेच शासनाच्या अधिपत्याखालील सरळ सेवा भरतीमध्ये गट अ ते गट ड मधील पदावर नियुक्तीकरिता निर्धारित केलेल्या उच्च वयोमर्यादेत अपंगासाठी सरसकट वय वर्षे ४५ वर्षांपर्यंत शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे वयाच्या ४५ वर्षांपर्यंत अपंग व्यक्ती पात्र ठरू शकते.

## ४. अपंगाना पदोन्नतीमध्ये आरक्षण :-

शासकीय व निमशासकीय सेवेत असणाऱ्या कर्णबधीर, अस्थिव्यंग, अंध किंवा अल्पदृष्टी गटातील अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये तीन टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

## ५. अपंग व्यक्तीना लिपिक पदासाठी टंकलेखनात सूट :-

अस्थिव्यंग असणाऱ्या अपंग व्यक्तीस लिपिक पदावर नियुक्ती करताना ज्यास टंकलेखन करणे शक्य नाही, त्यांना टंकलेखनात सूट देऊन इतर लिपिक कार्ये दिली जातात. तसेच टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या हात व हाताची बोटे यामध्ये ६० टक्के अथवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असल्यास ३० शब्द प्रतिमिनिट ही परीक्षा देताना ७ मिनिटाऐवजी १० मिनिटे जादा वेळ दिला जातो.

## ६. अपंगासाठी केंद्र शासनाचे व्यावसायिक पुनर्वसन केंद्र :-

अपंग व्यक्तींना स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणासाठी हे केंद्र मुंबई येथे आहे. अपंग व्यक्तींचे वैद्यकीय, मनोवैज्ञानिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून मूल्यमापन करून स्वयंरोजगारासाठी आवश्यक असे अल्प कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते की, ज्यामुळे अपंग व्यक्ती स्वयंरोजगार प्राप्त करू शकेल.

## ७. राष्ट्रीय विकलांगता कोष योजना :-

दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या अपंग व्यक्तींचे जीवनमान सुधारण्यासाठी भारत सरकारने २००३ मध्ये 'राष्ट्रीय विकलांगता कोष योजना' सुरू केली. ही योजना पंचायतराज संस्थाच्या माध्यमातून कार्यान्वीत केली गेली. प्रत्येक जिल्ह्यातून वय वर्ष चाळीसच्या आतील तीस अपंग व्यक्तींची लाभार्थी म्हणून निवड केली जाते. या व्यक्तींना पोषण व स्वास्थ्य भत्ता, शिक्षण व प्रशिक्षण भत्ता, विकलांगता रोजगार भत्ता आणि विकलांग पेन्शन भत्ता प्राप्त करण्यास या व्यक्ती पात्र असतात. या माध्यमातून त्यांचा जीवनस्तर वाढवून त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान केली जाते.

## ८. राष्ट्रीय अपंग आर्थिक विकास महामंडळ :-

अपंगाच्या आर्थिक उन्नतीसाठी या मंडळाची स्थापना करण्यात आली. हे मंडळ अपंगाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करते. यामध्ये अपंगांना रोजगार, स्वयंरोजारासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, कर्जफेडीमध्ये विविध सवलती देणे, अनुदान प्राप्त करून देणे, स्वयंरोजगारासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, तसेच अपंगाना रोजगार, स्वयंरोजगाराकरिता आवश्यक तांत्रिक व उद्यमशील कौशल्ये आत्मसात करता यावीत यासाठी आवश्यक ती मदत करते.

## ९. अपंग अधिनियम १९९५ मधील तरतूदी :-

अपंग व्यक्ती कल्याणाकरिता १९९५ साली 'अपंग अधिनियम १९९५ (समान संधी, समान अधिकार व समान समान संरक्षण आणि पूर्ण भागीदारी) हा कायदा संमत केला. या कायद्याची अंमलबजावणी १९९६ पासून करण्यात येत आहे.

या कायद्यामध्ये अपंगाच्या आर्थिक उन्नतीसाठी, रोजगार, स्वयंरोजगारासाठी, नोकरीसाठी विशेष तरतूद असून त्यामध्ये अपंगासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, पदासंबंधीचे आरक्षण, रोजगार केंद्राची स्थापना, तसेच रोजगार व नोकरीची व्यवस्था करण्यासाठी सरकार किंवा खाजगी व्यावसायिकांकडून रिक्त पदाची माहिती मागविणे, स्वयंरोजगाराची निर्मिती करून देण्यासाठी योजना तयार करणे यांचा समावेश होतो. तसेच अपंगाच्यासाठी विशेष विमा योजना तयार करण्याची तरतूदही या कायद्यात करण्यात आली आहे.

## १०. पदोन्नतीची सुविधा :-

दिनांक १५ डिसेंबर, २००४ च्या शासन निर्णयानुसार शासकीय, निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तीची नियुक्ती करताना, सेवेत असणाऱ्या अपंग व्यक्तीची पदोन्नती करताना, बदली करताना संबंधित अपंग व्यक्तीच्या वास्तव्य असणाऱ्या ठिकाणी अथवा तेथून नजिकच्या ठिकाणी त्याची बदली, नियुक्ती व पदोन्नतीनंतरचे ठिकाण देण्यास प्राधान्य देण्याची सुविधा देण्यात आली आहे.

## ११. तेल, रसायने विक्रेते म्हणून प्राधान :-

केंद्रशासनाचे सर्व प्रकारचे तेल, रसायने विशेषतः पेट्रोल इत्यादी विक्रेते व एजंट नेमणुकीच्या ७.५ टक्के प्रतिशत विक्रेते व एजंट नेमणूकीत अपंगाना प्राधान्य ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

## १२. शासकीय सुविधांमध्ये प्राधान्य :-

भारत दूरसंसार निगममार्फत सार्वजनिक टेलिफोन बूथचे वितरण करताना अपंग व्यक्तीस प्रथम प्राधान्य देण्यात येते.

## १३. औद्योगिक तंत्र-प्रशिक्षण संस्थात प्रवेशासाठी आरक्षण :-

अपंग व्यक्तींना रोजगार, स्वयंरोजगार व शासकीय, खाजगी औद्योगिक क्षेत्रात कुशल कामगार म्हणून नियुक्ती याकरिता त्यांना तंत्र-शिक्षण-प्रशिक्षणाची आवश्यकता सामान्य व्यक्तीप्रमाणे असतेच. त्यांना असे तंत्र-प्रशिक्षण देणाऱ्या संस्थात प्रवेशासाठी आरक्षण मिळाले तर ते असे प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगार करतील अथवा त्यांना रोजगार, नोकरी प्राप्त होईल म्हणून दिनांक २८ फेब्रुवारी, २००२ च्या शासन निर्णयानुसार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थात प्रवेशासाठी शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या उमेदवारांना ३ टक्के जागा एकूण प्रवेश क्षमतेत राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४ ❊

❐ **रिक्त जागा भरा.**

१. अपंगाकरिता विशेष सेवायोजन कार्यालय महाराष्ट्रात ........... ठिकाणी स्थापन केले आहे.

२. शासकीय कार्यालयात सरळ सेवा भरतीतून भरल्या जाणाऱ्या पदामध्ये अपंग व्यक्तींना ................ आरक्षण आहे.

३. शासकीय नोकरीतील वर्ग-अ ते वर्ग-ड च्या पदावरील नियुक्तीकरता वयाची अट ............ वर्षापर्यंतची आहे.

४. भारत सरकारने 'राष्ट्रीय विकलांगता कोष योजना' ................ साली सुरू केली.

५. 'अपंग अधिनियम १९९५' कायद्याची अंमलबजावणी ......... सालापासून करण्यात आली.

## ❐ अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी आरोग्यविषयक सोयी-सुविधा :-

## १. अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे :-

यामध्ये अपंग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वानुसार व आवश्यकतेनुसार आवश्यक उपकरणे, साधने, कृत्रिम अवयव पुरविले जातात किंवा त्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाते. यामध्ये कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकली, श्रवणयंत्र, चष्मे, विशिष्ठ काठ्या यांचा समावेश आहे.

## २. मतिमंदाचे पालकत्व व केअर सेंटर्स :-

आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग व मतिमंद व्यक्तीकरिता 'राष्ट्रीय विश्वस्त कायदा १९९९' च्या तरतुदीनुसार 'राष्ट्रीय न्यास' स्थापन करण्यात आला असून या न्यासामार्फत मतिमंदाचे पालकत्व ही योजना राबविली जाते. त्यानुसार स्वयंसेवी संस्था, पालकत्व अशा मूलांच्या देखभालीसाठी त्यांचे पालकत्व सोपवण्यात येते. तसेच मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग व्यक्तींची काळजी घेण्यासाठी 'केअर सेंटर्स' स्थापून त्यामाध्यमातून अशा अपंगाची काळजी घेतली जाते.

## ३. ग्रामीण अपंग पुनर्वसन योजना :-

ग्रामीण भातील अपंगाना आवश्यक कृत्रिम अवयव, साधने व उपकरणे, आर्थिक अडचण व माहितीचा अभाव यामुळे घेता येत नाहीत. त्यांच्यासाठी ही योजना असून तिच्यामार्फत ग्रामीण भागातील अपंगाना मोफत किंवा अत्यल्प दरात कृत्रिम अवयव, साधने, उपकरणे उपलब्ध करून देण्यात येतात. महाराष्ट्रात कोल्हापूर, सिंधुदुर्ग, लातूर, औरंगाबाद, बुलढाणा, वर्धा येथे 'जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र' स्थापन करण्यात आले आहेत.

## ४. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम, १९८२ :-

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने हा कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत सर्वांना विशेषत: कमकुवत घटक व मागासांना किमान मानसिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच सर्वसाधारण आरोग्य सेवा आणि सामाजिक विकासाच्या कार्यात मानसिक आरोग्यविषयक ज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे आणि मानसिक आरोग्य सेवांच्या सुधारणासाठी यामध्ये समाजाचा सहभाग वाढवण्यास प्रोत्साहन देणे ही उद्दिष्टे या कार्यक्रमाची असून यातूनच १९९५ ला जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम सुरू केला आहे.

## ५. दृष्टिहीनासाठी राष्ट्रीय संस्था (एनआयव्हीएच) :-

०१ जानेवारी १९५० ला अंध व्यक्ती कल्याणांतर्गत अंध व्यक्तींना प्रशिक्षण केंद्र म्हणून ही संस्था कार्य करते. या संस्थेने हिंदीतील ब्रेल लघुलिपी व त्या लघुलिपीचे यंत्र संशोधित केले आहे. याचा फायदा व्यक्ती मंददृष्टीची, अंध असली तरी त्यांना स्टेनोग्राफर म्हणून रोजगार प्राप्त होऊ शकतो. तसेच मंददृष्टी, अंध व्यक्तींना सुसह्य जीवन प्राप्त व्हावे, जास्तीत जास्त सामान्य व्यक्तीप्रमाणे जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न करते.

## ६. अस्थिव्यंग अपंगासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय संस्था (एनआयओएच) :-

अस्थिव्यंग अपंगासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय संस्था, १९७८ मध्ये सामाजिक न्याय व

सबलीकरण मंत्रालयामार्फत स्थापन करण्यात आलेली एक स्वायत्त संस्था आहे. शारीरिक हालचाली करण्यास असमर्थ असणाऱ्या, अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी कार्यरत असणारी भारत सरकारची ही राष्ट्रीय पातळीवरील संस्था असून, अपंगाचे संपूर्णत: पुनर्वसन करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी विविध प्रकारच्या अस्थिव्यंग अपंगत्वावर मात करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना, कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन, अपंगाना साहाय्यभूत ठरणाऱ्या बाबी यासंदर्भात ही संस्था कार्य करते.

## ७. अलियावर जंग श्रवण अपंगासाठी राष्ट्रीय संस्था (एवायजेएनआयएनएच) :-

श्रवणशक्तीसंदर्भात अपंगत्व आलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी १९८३ मध्ये मुंबई येथे या संस्थेची स्थापना केली. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली ही संस्था कार्य करते.

या संस्थेमार्फत कर्णबधीरासाठी विशेष शाळा, प्रशिक्षण संस्था, श्रवणयंत्रे सहाय्यभूत साधने तसेच त्यांची देखभाल, अपंगत्व समस्येसंबंधी वैद्यकीय मार्गदर्शन केले जाते.

## ८. अखिल भारतीय भौतिक चिकित्सा व पुनर्वसन केंद्र :-

मुंबई येथे केंद्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत हे केंद्र चालवले जाते. या केंद्रात अस्थिव्यंग अपंगांच्या पुनर्वसनासंबंधी प्रशिक्षण, अस्थिव्यंग अपंगत्वावर सुधारित शस्त्रक्रिया त्याचबरोबर अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने बसविण्याचे कार्य केले जाते.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-५ ✻

❑ **रिक्त जागा भरा.**

१. आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग व मतिमंद व्यक्तीकरिता १९९९ साली ............ कायदा करण्यात आला.

२. ग्रामीण भागातील अपंगाना मोफत किंवा अत्यल्य दरात कृत्रिम अवयव, साधने व उपकरणे ............. योजनेतून देण्यात येतात.

३. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम भारत सरकारने .............. पासून सुरू केला.

४. अखिल भारतीय भौतिक चिकित्सा व पुनर्वसन केंद्र ................ या ठिकाणी भारत सरकारने सुरू केले.

५. श्रवण अपंगासाठीची राष्ट्रीय संस्था ................. नावाने ओळखली जाते.

## २.३.४ वृध्द कल्याण – आरोग्य व सुरक्षितता

प्रत्येक देशात असे काही विशिष्ट समुदाय असतात जे जगण्यास व आपली उपजीविका करण्यास असमर्थ असतात. उदा. अपंग, अनाथ, निराधार, वृध्द इत्यादी. या समुदायांच्या समस्या निराकरणाचे काम हे ते त्या समाजाचे असते. भारताच्या संदर्भात आधुनिक काळात ज्या अनेकविध सामाजिक समस्या निर्माण होऊन गंभीर रूप धारण करीत आहेत, त्यातील वृध्दांची समस्या ही एक महत्वाची सामाजिक समस्या होय. आज वृध्दांना शारीरिक, मानसिक, आर्थिक इत्यादी प्रमुख समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्याला अनेक कारणे कारणीभुत आहेत.

पूर्वी संयुक्त कुटुंबात आपल्यातील वृध्द, अपंग यांची काळजी घेतली जात. कुटुंबातील जास्त सदस्यसंख्या, परस्पराविषयीची बांधिलकी, कर्तव्य व समाजाचा याबाबतचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष आग्रह व दबाव यामुळे ते शक्य होते. पण औद्योगिकीकरण, शहरात वाढणारी कारखानदारी व ग्रामीण भागातील बेकारी त्यातून शहरात होणारे स्थलांतर, तेथील जागेची टंचाई, विभक्त कुटुंब व आर्थिक गरजपूर्तीसाठी विभक्त कुटुंबातील पती व पत्नी नोकरी, व्यवसायानिमित्त घराबाहेर राहावे लागल्याचे जास्त प्रमाण, वाढता व्यक्तीवाद, वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे वाढणारे आयुष्यमान, परिणामी वृध्दांची वाढती संख्या, नोकरी–व्यवसायानिमित्त राज्याबाहेर, देशाबाहेर राहायला जाणारी मुले व आपला गाव, घर सोडून इतरत्र राहायला न जाण्याची वृध्दांची मानसिकता, सामाजिक सबंधात वाढत असलेला यांत्रिकपणा इत्यादी अनेक कारणांच्यामुळे आज वृध्दाची समस्या वाढत आहे. परिणामी, भारतात सन २००० साली एकूण १००८ मिलियन लोकसंख्येत ६० वर्षांवरील ७६ मिलियन व ८० वर्षावरील ०६ मिलियन अशी एकूण ८२ मिलियन वृध्दाची लोकसंख्या आहे. ती सन २०५० ला एकूण ३७२ मिलियन होईल. म्हणूनच 'वृध्द कल्याणा'साठी प्रयत्न केले जात आहेत. ते पाहण्यापूर्वी वृध्दांच्या व्याख्या आपण अभ्यासू–

**व्याख्या :–**

१. ''प्राण्यांच्या शरिरात एक प्रकारची उष्णता असते. ती वाढत्या वयाबरोबर कमी होत जाऊन वृध्दत्व व शेवटी मृत्यू येतो.''– ***ॲरिस्टॉटल.***

२. ''व्यक्तीच्या जीवनकाळातील शेवटचा कालखंड म्हणजे वृध्दावस्था होय.''

***– सामाजिक कार्यज्ञान कोष.***

जागतिक स्तरावरही आज वृध्दांच्या कल्याणासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. प्रथमत: 'अर्जेटिना' या देशाने सन १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर वृध्द व्यक्तींच्या हक्कांचा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर १९६९ मध्ये 'माल्टा' देशाने तो उपस्थित केला. परिणामी, १९८२ मध्ये

ऑस्ट्रेलियाची राजधानी व्हिएन्ना येथे वृध्दांच्या प्रश्नासंबंधी जागतिक परिषद भरवली व या परिषदेने वृध्दासाठी एक आंतरराष्ट्रीय कृती योजना तयार केली. त्यानंतर १६ डिसेंबर, १९९१ साली संयुक्त राष्ट्रांनी 'संयुक्त राष्ट्रांची वृध्द व्यक्तीसाठीची तत्त्वे' जाहिर केली. तेव्हापासून आजपर्यंत वृध्द कल्याणाबाबत प्रयत्न सुरू आहेत. भारतानेही संयुक्त राष्ट्रांची तत्त्वे स्वीकारलीच. त्याशिवाय देशातील वृध्दांच्या कल्याणासाठी सातत्याने कायदे, योजना, कार्यक्रम या माध्यमातून विविध सेवा-सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. याठिकाणी आपण भारतात वृध्द कल्याणामध्ये वृध्दांच्या आरोग्यासंबंधी व सुरक्षिततेसबंधीच्या कल्याण कार्यक्रमांचा आढावा घेणार आहोत, तो पुढीलप्रमाणे :-

## १. 'वृध्द व्यक्तीसाठी राष्ट्रीय धोरण १९९९' मधील आरोग्यविषयक बाबी :-

या धोरणांतील वृध्द व्यक्तींच्या आरोग्यविषयक बाबींसंबंधी जे उद्देश आहेत, त्यामध्ये- (१) वृध्द व्यक्तींना आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणे. (२) त्यांची सेवा करणाऱ्यांना संशोधन व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे. (३) असाध्य रोगाने आजारी असलेल्या वृध्दांच्या संरक्षणाची व देखभालीची व्यवस्था करणे. (४) कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्यातील वृध्द सदस्यांची काळजी घेण्यासाठी प्रोत्साहित करणे, इत्यादी उद्देश समोर ठेवून वृध्द व्यक्तींसाठी विविध आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. पुढे २०११ च्या राष्ट्रीय धोरणातही या बाबींचा अंतर्भाव असल्याने त्यांचा उल्लेख येथे टाळला आहे.

## २. वृध्दांकरितांची राष्ट्रीय परिषद :-

केंद्र सरकारने २००५ साली पुर्नगठीत केलेली ही परिषद होय. ही परिषद वृध्दांचे कल्याणकारी कार्यक्रम व धोरणे तयार करण्यासंबंधी व त्यांच्या अंमलबजावणीसंबंधी सल्ला देणारी व शासनाच्या या संदर्भातील विविध प्रयत्नात समन्वय साधणारी देशातील सर्वोच्च संस्था होय.

या परिषदेमार्फत वृध्दांची आरोग्यविषयक देखभाल, वृध्दांच्यातील प्रमुख आजार व त्यासाठीचा प्रतिबंध, उपचार यंत्रणा, त्यांचा आहार-विहार इत्यादीसंबंधी तसेच त्यांना आवश्यक असणारी साधने, उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठीच्या योजना, कार्यक्रम याबाबत सातत्याने सल्ला व मार्गदर्शन देण्याचे कार्य करत आलेली आहे.

## ३. ज्येष्ठ नागरिकासाठीचे राष्ट्रीय धोरण २०११ :-

ज्येष्ठ अथवा वृध्दांच्या (६०+) कल्याणासाठीच्या राष्ट्रीय धोरण २०११ मधील धोरणात वृध्दांच्या आरोग्य कल्याणविषयक ज्या बाबी, तरतूदी स्पष्ट केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे :-

१. या धारेणात वृध्दकल्याणाअंतर्गत वृध्दांच्या आरोग्यसेवेस प्राधान्य देण्याचे मान्य करण्यात आले. त्यामध्ये (अ) आरोग्य विमा, (ब) सार्वजनिक आरोग्य सेवातून वृध्दांना सेवा, (क) स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे, (ड) खाजगी आरोग्य केंद्राची मदत घेऊन वृध्दांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

२. वृध्दांच्याकरिता आवश्यक प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे की, ज्या वृध्दांच्या आरोग्याला सुसह्य ठरतील.

३. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर वर्षातून दोनवेळा वय वर्षे ८० च्या वरील वृध्दांच्या घरी जावून त्यांची आरोग्य तपासणी करणे व त्यांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सोयी-सुविधा देणे.

४. वृध्दातील स्मृतीभ्रंशसारख्या मानसिक रोगाबाबत जाणीव-जागृती करणे, ज्यामुळे प्राथमिक स्तरावरच निदान झाले की उपचार करणे शक्य होईल.

५. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमात वृध्दांचे आरोग्य तपासणी व उपचार यांना प्राधान्य देण्यात येईल.

६. राष्ट्रीय व विभागीय स्तरावर वृध्दासाठी आरोग्य केंद्रे उभारली जातील. वृध्दांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यास प्राधान्य दिले जाईल.

७. वृध्दांकरिताच्या आरोग्यविषयक सुविधा सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी खाजगी संस्थांचा सहभाग घेतला जाईल.

८. वृध्द स्त्रियांना त्यांच्या विशिष्ट आरोग्यविषयक तक्रारीबाबत त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरेशा प्रमाणात पुरवल्या जातील.

## ४. वृध्दांच्या आरोग्याच्या काळजीसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रम (National Programme for Health Care of the Elderly- 'NPHCE')

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयांतर्गत या कार्यक्रमास ११ व्या पंचवार्षिक योजनेत मंजूरी मिळाली. ११व्या योजनेत आठ विभागात तीस बेडची आठ विभागीय वृध्द केंद्रे एकूण १०० जिल्ह्यासाठी व १२ व्या योजनेत यामध्ये अधिक २२५ जिल्ह्यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्याचे ठरले. ही विभागीय केंद्रे केवळ वृध्दासाठी आहेत, ती जिल्हास्तरावरील आरोग्य केंद्रे व त्याअंतर्गत असणाऱ्या उपक्रेंद्रावर देखरेख व नियंत्रण ठेवतात. याकरिता २०१३-१४ साठी १५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यापैकी ७५% केंद्र सरकार व २५% राज्य सरकारने तरतूद करावयाची आहे.

## ❒ उद्देश :–

विविध आर्थिक स्तरातील जेष्ठ/वृध्द नागरिकांना स्वतंत्र, विशेष अशी आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे व त्या माध्यमातून वृध्दांच्या आरोग्याची काळजी घेणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होय.

या कार्यक्रमांतर्गत देशात सुरवातीला निवडण्यात आलेल्या १०० जिल्ह्यामध्ये महाराष्ट्रातील, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, वाशिम, वर्धा, अमरावती. या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## ❒ तरतूदी/कार्यप्रणाली :–

### १. प्रतिबंधात्मक व सहायात्मक काळजी (Preventive and Promotive Care) :-

वृध्दांचे आरोग्य धोक्यात येऊ नये. ते विविध आजारापासून दूर रहावेत, यासाठी प्रतिबंधात्मक व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे. यामध्ये नियमीत शारीरिक व्यायाम, समतोल आहार, शाकाहार, तणाव व्यवस्थापन, याचबरोबर धुम्रपान, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळणे याबाबत वृध्दांचे समुपदेशन करणे. यासाठी वृध्दांना त्यांच्या घरी जावून भेट देणे व हे काम प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून करून घेणे. तसेच कुटुंबातील व्यक्तींना वृध्दांची काळजी घेण्यासाठी प्रोत्साहित करणे. वृध्दांच्या आरोग्याबाबत नियमित नोंदी ठेवणे व तपासणी करणे व आजारी अथवा अशक्त वृध्दांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये घेऊन जाणे व आरोग्यविषयक सुविधा पुरविणे.

### २. आजाराचे व्यवस्थापन :–

आजारी वृध्दांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वृध्दांकरिता प्राथमिक व विभागीय तसेच जिल्हा रुग्णालयात अंतरुग्ण व बाह्य रुग्ण विभाग विकसित करणे. या विभागातून जुनाट व असाध्य रोगासाठी वृध्दांना द्यावयाच्या सुविधांबाबत योग्य ते व्यवस्थापन करणे.

### ३. वृध्दांना आरोग्यविषयक सुविधा देण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे :–

वृध्दांचे रोग निदान व त्यांना सुविधा पुरवणेसंदर्भात आवश्यक व्यावसायिक ज्ञान असणाऱ्या विशेष प्रशिक्षित मनुष्यबळाचा तुटवडा आहे. त्यासाठी वैद्यकीय महाविद्यालये, विभागीय संस्थातून यासंबंधी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची सोय करणे. वृध्द आरोग्य तज्ज्ञांसंबंधीचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे. हा अभ्यासक्रम घेणाऱ्या विभागीय वृध्द केंद्रांना सहाय्यभूत सेवा–सुविधा उपलब्ध करून देणे.

## ४. वृध्दांना वैद्यकीयदृष्ट्या पूर्वपदावर आणणे व रोगनिवारणासाठी प्रयत्न :-

वृध्दांना शास्त्रीयदृष्ट्या व्यायाम तसेच दैनंदिन क्रियांबाबत योग्य ते ज्ञान व उपचार देणे, त्यासाठी आवश्यक औषधे, उपकरणे व इतर बाबी जिल्हा वैद्यकीय सेंटर, विभागीय वृध्द केंद्र यांना पुरवणे व त्यांच्या माध्यमातून आजारी वृध्दांना वैद्यकीयदृष्ट्या पूर्वपदावर आणणे आणि त्यांच्या रोगाचे निवारण करणे.

## ५. आरोग्यविषयक माहिती, शिक्षण व संप्रेषण :-

आरोग्यविषयक शिक्षण कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहचवणेसाठी दृक-श्राव्य माध्यमांचा व इतर संप्रेषणविषयक साधने, वाहिन्यांचा वापर करणे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोगी वार्धक्याचे महत्त्व, शारीरिक व्यायामाची वृध्दांना गरज, आरोग्यदायी सवयी, तणावरहित राहण्याचे फायदे यांची माहिती देणे. तसेच ही माहिती देण्यासाठी व आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करणे व त्यांची माहिती देणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव होतो.

## ६. उपरोक्त तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी पुढील यंत्रणा कार्यान्वीत करणेत आली आहे :-

१. वृध्दांच्या आरोग्यविषयक कळजी घेण्यासाठी देशातील विविध आठ विभागीय पातळीवर 'विभागीय वृध्द आरोग्य केंद्रा'ची स्थापना करणे. या केंद्राच्या माध्यमातून वृध्दांच्या आरोग्यासंबंधी संशोधन, प्रशिक्षित मनुष्य बळ पुरवणे, आवश्यक ते उपचार देणे, औधषे व उपकरणे उपलब्ध करून देणे.

२. देशात १०० निवडक जिल्ह्यातून वृध्दांची आरोग्यविषयक स्थिती पूर्वपदावर आणणे, यासंदर्भात त्यांचे पुनर्वसन करणेसाठी दवाखाने स्थापन करणे. यामध्ये १० बेडचा 'वृध्द विभाग' स्थापन करणे. या विभागासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, उपकरणे, औषधे पुरविणे.

३. निवडक १०० जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वृध्दांच्या आरोग्यासंबंधी विविध उपक्रम राबविणे. यामध्ये आठवड्यातून एकदा प्रशिक्षित आरोग्य अधिकाऱ्यामार्फत वृध्दांच्या आरोग्याची तपासणी करणे. आवश्यक त्या वृध्दांना आवश्यकतेनुसार जिल्हा आरोग्य केंद्राच्या माध्यमातून उपचार देणे.

४. निवडक १०० जिल्ह्यातील विभागीय आरोग्य केंद्राच्या माध्यमातून वृध्दांच्या आजारासंबंधी योग्य व आवश्यक उपचार, उपकरणे देवून त्यांची आरोग्यविषयक स्थिती पूर्वपदावर आणणे

व हे खास वृध्दांच्या आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाच्या माध्यमातून करणे.

अशा पध्दतीने या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृध्दांना आरोग्यविषयक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, जिल्हा रुग्णालयामध्ये वृध्दासाठी बाह्यरूग्ण विभाग तसेच दहा बेडचा वृध्द विभाग, सार्वजनिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून आठवड्यातून एकदा वृध्दांना भेट देणे, त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी जाणून त्याबाबत त्यांना आवश्यक ते सहाय्य देणे व हे सर्व प्रशिक्षित मनुष्यबळाच्या आधारे देणे इ. कार्य केले जाते.

५. **केंद्र सरकारच्या 'आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम २००७' :** या कायद्यानुसार, केंद्र सरकार व राज्य सरकारवरती वृध्द व्यक्तींच्या आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी, त्यांना आरोग्यविषयक आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरवण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

६. **वृध्दांचे आरोग्य सेवासंबंधी अनुदान :** केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीने शिफारस केलेल्या पुढील कारणासाठी थेट अनुदान दिले जाते. वृध्दांच्या केअर होमच्या व्यवस्थापनासाठी, वृध्दांना सेवा देणारी फिरत्या रुग्णालयासाठी, मनोविकार चिकित्सालया-करिता, वृध्दांकरिता हेल्पलाईन केंद्र, वृध्दांकरिता क्षेत्रीय प्रशिक्षण केंद्र, वृध्दांची सेवा करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग, वृध्द विधवा स्त्रियांसाठी बहुउद्देशीय सेवा केंद्र इत्यादी-करिता अनुदान दिले जाते. या माध्यमातून वृध्दाचे आरोग्य कल्याण साधण्याचा प्रयत्न केला जातो.

## ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-६ ❋

❑ **रिक्त जागा भरा.**

१. वृध्दांकरिताची राष्ट्रीय परिषद केंद्र शासनाने ............. साली पुर्नगठीत केली.

२. ज्येष्ठ नागरिकांसाठीचे राष्ट्रीय धोरणात ................ वयवर्षावरील वृध्दांच्या घरी जाऊन त्यांची आरोग्यतपासणी करणेची तरतूद आहे.

३. वृध्दांच्या आरोग्याच्या काळजीसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत देशात प्रथम निवडण्यात आलेल्या शंभर जिल्ह्यात महाराष्ट्रातील ................. इतक्या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

४. 'आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम' हा कायदा ............ साली संमत करण्यात आला.

५. वृध्दांच्या आरोग्याच्या काळजीसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रमांकरिता करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतूदीतील .......... टक्के रकमेची तरतूद केंद्र सरकारने करावयाची असते.

## ❑ वृध्द कल्याण - वृध्दांची सुरक्षितता

वृध्दांना अनेक शारीरिक, मानसिक, आर्थिक, समस्यांना सामोरे जावे लागते. समाजातील 'वृध्द' या घटकाला समाजाकडून, शासनाकडून विशेष सुरक्षिततेची आवश्यकता असते. याचा विचार करून भारतात वृध्द कल्याणाचा भाग म्हणून त्यांना विविध प्रकारच्या जास्तीत जास्त सुरक्षितता पुरविण्याचा प्रयत्न झालेला आहे व होत आहे. वृध्दांना देण्यात येणाऱ्या सुरक्षिततेचा अभ्यास आपणांस पुढील प्रमाणे करता येईल.

### १. 'वृध्दांसंबंधी राष्ट्रीय धोरण १९९९' मधील वृध्दांच्या सुरक्षिततेसंबंधी तरतूदी :-

१. व्यक्तीला त्यांच्या स्वत:च्या तसेच त्यांच्या जोडीदाराच्या वृध्दापकाळासाठी आवश्यक त्या तरतूदी करण्यासाठी समुपदेशन करणे, प्रोत्साहन देणे.

२. कुटुंबानी वृध्द व्यक्तींची काळजी घेण्यासाठी केलेल्या व्यवस्थेला स्वयंसेवी आणि गैरसरकारी संघटनांचे योगदान, सहाय्य घेणे.

३. वृध्द व्यक्तींना स्वतंत्र व स्वावलंबी नागरिक म्हणून स्वविकास साधता यावा, यासाठी काय करणे आवश्यक आहे, त्याची माहिती देऊन त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण करणे.

४. वृध्द विधवा स्त्रियांकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे आहे, कारण त्यांच्या वाट्याला तिहेरी अवहेलना येते. एक स्त्री म्हणून दुसरी विधवा म्हणून व तिसरी वृध्द म्हणून असे नमूद केले आहे.

५. विधवा स्त्रीयांच्या निवृत्ती लाभाच्या संदर्भातील समस्यांना विशेष प्राधान्य देऊन (सर्वच वयोगटातील विधवांना) त्यांच्या उचित देय रकमा पतीच्या निधनानंतर विनाविलंब मिळतील.

६. पुष्कळवेळा विधवेचा वारसा हक्क, घरात राहण्याचा हक्क आणि मालमत्ता विकण्याचा हक्क यांचे उल्लंघन तिची मुले अथवा कुटुंबीयच करतात यासाठी भारतीय दंड संहितेत संशोधन केले जाईल. (सर्व वयोगटातील विधवांकरिता ही तरतूद आहे.)

७. जे वृध्द घराच्या बाहेर पडू शकत नाहीत अशा वृध्दांना, विशेषत: दुर्बल स्त्रीयांना मदत करण्याकरिता त्यांचा एकाकीपणा दूर करण्याकरिता स्वयंसेवकांना प्रोत्साहित केले जाईल.

## २. ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र :-

ज्येष्ठ नागरिकांसाठीचे ओळखपत्र हे ऐच्छिक स्वरूपाचे आहे. वय वर्षे ६० वरील ज्येष्ठांना हे ओळखपत्र त्यांना तातडीने आवश्यक त्या सेवा-सुविधा मिळाव्यात यासाठी आहे. या ओळखपत्रावर ज्येष्ठ नागरिकाचे नांव, जन्मतारीख, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, रक्तगट, अचानक उद्‌भवलेल्या प्रसंगी कोणाशी संपर्क साधण्यात यावा त्या व्यक्तीचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, आजार असल्यास त्याचा उल्लेख, सध्या घेत असलेले वैद्यकीय उपचार अशा तपशीलाचा समावेश केलेला असेल. ज्येष्ठांच्या सुरक्षिततेसाठी, तातडीच्या उपचार व सहकार्यासाठी, ओळख पटण्यासाठी हे ओळखपत्र खूपच उपयुक्त ठरते. सदर पत्र तहसिलदारांच्या सहीशिक्क्यानिशी दिले जाते.

## ३. आरोग्य विमा :-

पूर्वी वय वर्षे ६० नंतरच्या व्यक्तींना आरोग्य विमा पॉलिसी विमा कंपन्या देत नसत. पण सध्या ६० ते ८० वयापर्यंत आरोग्य विभा पॉलिसी देणाऱ्या कंपन्या आहेत. सार्वजनिक विमा क्षेत्रातील तसेच खाजगी विमा कंपन्याकडून पॉलिसी घेता येते.

यामुळे आजारपणातील खर्चासाठी आर्थिक सुरक्षितता प्राप्त होते. या अंतर्गत हॉस्पीटलमध्ये भरती झाल्यापासूनचा खर्च मिळतो. म्हणजे बोर्डिंग व नर्सिंग, आय.सी.यु.चा खर्च, डॉक्टरांची फी, स्पेशालिस्टची फी, ऑक्सीजन फी, शस्त्रक्रिया खर्च, औषधे, एक्स-रे, डायलेसिस, केमोथेरपी, रेडियशन इत्यादी. अर्थात यासंदर्भात वेगवेगळ्या विमा कंपन्यांच्या वेगवेगळ्या सवलती व अटी असतात. या विम्यामुळे आजारी वृध्दास आरोग्य खर्चाबाबत सुरक्षितता प्राप्त होते.

## ४. ''आई-वडिल व ज्येष्ठ नागरिंच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २००७''

केंद्र सरकारने प्रथम ''आई-वडिल आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७'' दि. २९ डिसेंबर २००७ ला लागू केला. महाराष्ट्रात हा कायदा १ मार्च २००९ ला लागू केला. परंतु महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि. २३ जून, २०१० ला यासंदर्भात अधिसूचना प्रसारित केली व तिच्यामध्ये याचे नांव, 'आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम २०१०' असे स्पष्ट केले.

तथापि, मूळ २००७ च्या या कायद्यात पालकांच्या आणि वृध्दजनांच्या चरितार्थ व कल्याणासाठी पुढील तरतूदी किंवा नियम करून वृध्दांना सुरक्षितता देण्याचा कायद्याद्वारे प्रथमच प्रयत्न केला आहे.

१. या कायद्यानुसार सज्ञान मुले, नातू, पणतू आणि नातेवाईक यांच्यावर त्यांचे पालक, आई-वडिल, आजी-आजोबा, कुटुंबातील या वृध्दांची सर्वांगीण काळजी घेण्याची जबाबदारी निश्चित केली आहे.

२. या कायद्यात वृध्दांच्या मालमत्तेचे आणि जीवनाचे संरक्षण करणाऱ्या संस्थांमार्फत व्यवस्थात्मक यंत्रणा निर्माण करण्याची हमी घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

३. या कायद्यानुसार सरकारने वृध्द व्यक्तींच्या निवासाचा हक्क विशेषत: निराधार वृध्दांच्या संदर्भात मान्य करून त्यानुसार वृध्दाश्रमची प्रत्येक जिल्ह्यात स्थापना करण्याची योजना शासनाकडून राबवली जाईल.

४. जर वृध्दाला कोणत्याही मार्गाने कोणतेही उत्पन्न मिळत नसेल व त्याची मुले त्यांचा सांभाळ करत नसतील अथवा आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरवित नसतील तर वृध्दांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांच्याकडून निर्वाह भत्ता प्राप्त व्हावा यासाठी वृध्द कायदेशीर मदत घेऊ शकतो. यावेळी कमाल १०,००० रुपये किंवा ज्यांच्याकडून हा निर्वाहभत्ता घ्यायचा आहे, त्याचे सर्व मार्गांनी मिळणारे एकत्रित उत्पन्न भागिले त्याच्या कुटुंबातील व्यक्ती याप्रमाणे निर्वाह भत्ता देण्याचा आदेश देण्यात येईल.

५. या कायद्यातील प्रकरण सहा मधील तरतुदीनुसार जिल्हा पोलीस अधिक्षक आणि पोलीस आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त, ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करतील.

६. प्रत्येक पोलीस ठाणे यांच्या अधिकार क्षेत्रात राहत असलेल्या विशेषत: स्वतंत्रपणे राहत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची अद्ययावत यादी ठेवेल व त्या पोलीस ठाण्याचा प्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्ता महिन्यातून किमान एकवेळ भेटून त्यांना मदतीची गरज आहे काय? हे पाहून मदतीची मागणी केल्यास तात्काळ मदत पुरवतील.

७. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ज्येष्ठ नागरिक व जिल्हा प्रशासनामधील दुवा म्हणून काम करणारी एक समिती स्थापन करण्यात येईल.

८. जिल्हा पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत यांची विस्तृत माहिती प्रसार माध्यमातून व पोलीस ठाण्यामार्फत प्रसिध्द करतील.

९. ज्येष्ठ नागरिकांबाबत घडलेल्या अपराधासंबंधीचा सर्व महत्त्वाचा तपशील त्या-त्या पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंदवला जाईल. ही नोंदवही जनतेला निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिली जाईल. प्रत्येक अधिकारी सदर नोंदवहीचे पुनर्विलोकन करील.

१०. ज्येष्ठ नागरिकांच्या विनंतीवरून त्यांच्या घरात घरकाम अथवा इतर कामे करणाऱ्या व्यक्तींची पूर्वचरित्र पडताळणी तातडीने करण्यात येईल.

११. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी समाजातील इतर विविध घटकांच्या सहकार्याने सार्वजनिक बंदोबस्त ठेवण्यात येईल.

१२. प्रत्येक जिल्हा पोलीस अधिक्षक तथा पोलीस आयुक्त त्यांच्या अधिकार क्षेत्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी विनाशुल्क हेल्प लाईन सुरू करतील.

वृध्दांच्या सुरक्षिततेसाठी इत्यादी तरतुदी या कायद्यात करण्यात आल्या आहेत.

## ५. इंदिरा गांधी भूमिहीन वृध्द शेतमजूर साहाय्य योजना :-

महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजूरांची लक्षणीय संख्या आहे. हे शेतमजूर वृध्द झाल्यानंतर त्यांचा उदर-निर्वाहाचा प्रश्न गंभीर बनतो. या वृध्द भूमिहीन शेतमजूरांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र १९ नोव्हेंबर १९९१ पासून ही योजना राबवली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ती वृध्द व्यक्ती महाराष्ट्र राज्याची नागरिक असावी. ज्या खेड्यात ती शेतमजूर म्हूणून काम करायची त्याच खेड्यात वास्तव्यास असावी. त्या व्यक्तीच्या मालकीची कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन असणारी कोणतीही स्थावर आणि जंगम मालमत्ता नसली पाहिजे; पुरुष वय वर्षे ६५ व स्त्रीचे वय वर्ष ६० वर्षांवरील असावे. दुसऱ्या योजनेचा लाभ घेत नसावी. या अटी पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस दरमहा आर्थिक सहाय्य देण्यात येते.

## ६. संजय गांधी निराधार अनुदान योजना :-

स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नसणाऱ्या निराधार वृध्द व्यक्तींना आर्थिक सुरक्षितता त्यांच्या उदरनिर्वाहासाठी देणे. यासाठी दरमहा त्यांना विशिष्ट रक्कमेत अर्थसाहाय्य देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९८० ला संजय गांधी निराधार योजना सुरू केली. ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारा वृध्द व निराधार पुरुष व ६० वर्षांपेक्षा जास्त वय असणारी वृध्द व निराधार महिला तसेच ज्यांची मुले १८ वर्षांपेक्षा कमी वयाची आहेत. त्यांचा व स्वत:चा उदरनिर्वाह चालविण्यास असमर्थ असणाऱ्या विधवा महिलांना, अपंग किंवा असाध्य आजारी वृध्द की जो स्वत:चा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. अशा वृध्द व्यक्तींना दरमहा आर्थिक साहाय्य केले जाते.

## ७. ज्येष्ठ नागरिकांसाठी वरिष्ठ पेन्शन विमा योजना किंवा अटल पेन्शन योजना.:-

देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी, त्यांना आर्थिक सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी केंद्र सरकारकडून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने चालू केलेली ही योजना १५

ऑगस्ट २०१४ पासून पुनर्कार्यान्वीत करण्यात आली. सदर योजना अनुदानप्राप्त आणि निवृत्ती वेतन योजना आहे. या योजनेच्या प्रशासनाची जबाबदारी भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे सोपवण्यात आली आहे.

या योजनेत मासिक पेन्शनसाठी एकरकमी प्रिमियम भरण्याची सोय व किमान ५०० रुपये व कमाल ५००० रुपये मासिक पेन्शन असून पेन्शनची पध्दत मासिक, तिमाही, सहामाही किंवा वार्षिक अशी आहे.

## ८. वृध्दाश्रम :-

निराधार, एकाकी, पूर्णत: परावलंबी असणाऱ्या वृध्दांना 'मातोश्री वृध्दाश्रम' ही शासनाने दिलेली मोठी आधाराची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात एक अशी वृध्दाश्रमे कार्यरत असून यामध्ये वृध्दांना निवास, भोजन, कपडे, औषधोपचार, वाचनालये, मनोरंजन इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. केंद्रीय समाज कल्याण मंडळ व राज्य समाज कल्याण मंडळाच्या माध्यमातून ही वृध्दाश्रमे चालविली जातात.

## ९. निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी :-

केंद्र व राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यासाठी तसेच संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी वृध्दावस्थेत आर्थिक सुरक्षितता प्राप्त होणेसाठी निवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधी योजना कार्यान्वित केलेली आहे, यावरून निवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधीची रक्कम निश्चित केली जाते. तथापि, भविष्य निर्वाह निधी योजनेत कर्मचाऱ्याच्या वेतनातील काही टक्के रक्कम घेतली जाते व तेवढीच रक्कम सरकारही भविष्य निर्वाह निधीत जमा करते व कर्मचाऱ्यास निवृत्तीवेळी ती रक्कम दिली जाते.

### * स्वयं-अध्ययन प्रश्न-७ *

❑ **रिक्त जागा भरा.**

१. .................... कायद्यानुसार वृध्दांची सर्वांगीण काळजी घेण्याची जबाबदारी त्यांची सज्ञान मुले, नातू, पणतू व नातेवाईकांवर निश्चित करण्यात आली.

२. केंद्राच्या 'आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम २००७' या कायद्यासंदर्भात महाराष्ट्रात महाराष्ट्र शासनाने .................... साली अधिसूचना प्रसारित केली.

३. ऐच्छिक असणारे 'ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र' ..................... यांच्या सही शिक्क्यानिशी दिले जाते.

४. विधवा स्त्रीच्या हक्कांचे उल्लंघन याबाबत भारतीय दंड संहितेत संशोधन करण्याची तरतूद .................. धोरणानुसार प्रथम करण्यात आली.

५. सध्या ................. वयापर्यंतसाठी आरोग्य विमा पॉलिसी देणाऱ्या कंपन्या आहेत.

## २.४ सारांश

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, भारतात युवक, अपंग व वृध्दांच्या कल्याणासाठी विविध योजना, कार्यक्रम, उपक्रम व कायदे सातत्याने करण्यात आले आहेत. यांच्या माध्यमातून युवकांच्या शिक्षण व रोजगारासंबंधीच्या समस्या सोडवण्याचा व त्यांची सर्वांगीण प्रगती करण्याचा तसेच अपंग व्यक्तींना आवश्यक त्या आरोग्यविषयक सोयी-सुविधा, उपकरणे उपलब्ध करून देणे, त्यांच्या शिक्षणासाठी आरक्षण इत्यादी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या रोजगार, स्वयंरोजगार याकरिता विविध कायदेशीर तरतुदी करणे व त्यांना स्वावलंबी बनवणे तसेच वृध्दांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सोयी-सुविधा देण्यासाठी, त्यांना सुरक्षितता प्रदान करणेसाठी विविध कल्याणकारी निर्णय घेण्यात आल्याचे दिसते.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### * स्वयं-अध्ययन प्रश्न-१ *

(१) स्वामी विवेकानंद

(२) वय वर्षे १६ ते ३०

(३) सन १९६९

(४) १ जून, २००५

(५) राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.)

### * स्वयं-अध्ययन प्रश्न-२ *

(१) १९७९ साली

(२) वय वर्षे १८ ते ४०

(३) सन २००२

(४) २० टक्के

(५) स्वयंसेवी संस्था.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✻

(१) सन १९९६ (२) रुपये १२००/-

(३) सन १९७८ (४) रुपये ३०००/-

(५) पाच टक्के.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ✻

१. मुंबई २. तीन टक्के

३. वय वर्षे ४५ ४. सन २००३

५. सन १९९६

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-५ ✻

१. राष्ट्रीय विश्वस्त कायदा २. ग्रामीण अपंग पुनर्वसन योजना

३. सन १९८२ ४. मुंबई

५. अलियावर जंग.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-६ ✻

१. सन २००५ साली २. वय वर्षे ८०

३. सहा ४. सन २००७

५. ७५ टक्के

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-७ ✻

१. आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २००७.

२. सन २०१० साली

३. तहसिलदार

४. वृध्दांसंबंधी राष्ट्रीय धोरण, १९९९

५. ६० ते ८० वर्षे वयापर्यंत.

## २.६ सरावासाठी प्रश्न

**प्रश्न १ : टिपा लिहा.**

१. युवक कल्याण व रोजगार.

२. अपंग कल्याण व आरोग्य.

३. ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय धोरण, २०११.

४. 'वृध्दासंबंधी राष्ट्रीय धोरण, १९९९' मधील वृध्दांच्या सुरक्षिततेसंबंधी तरतूदी.

**प्रश्न २ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. युवकांचे शिक्षणाच्या माध्यमातून कल्याणासाठीच्या प्रयत्नांचा आढावा घ्या.

२. अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी शैक्षणिक सोयी-सुविधा स्पष्ट करा.

३. अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी रोजगार विषयक सोयी-सुविधा, तरतूदी स्पष्ट करा.

४. 'आई-वडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २००७' स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले,** *'भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४.

२. **महेश अभापुरे,** *'सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजना व सवलती'*, साकेत प्रकाशन, पुणे.

३. **मल्हार अरणकल्ले,** *'सकाळ वार्षिक अंक, २०१५'*, सकाळ प्रकाशन, पुणे.

४. *'मासिक योजना'*, मे, २००७.

५. **ना. ना. इंगळे,** संपादक, *'ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय धोरण, १९९९'*, फेस्कॉम, अकोला.

६. *'आई, वडिल आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१०'*, फेस्कॉम, अकोला.

७. *'National Policy for Senior Citizens'*, March, 2011.


❒❒❒

घटक–३

# सामाजिक कल्याण आणि शिक्षण
# (Social Welfare and Education)

## घटक संरचना

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

३.३.१ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद

३.३.१.१ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत व शिक्षण हक्काबाबत घटनात्मक तरतूदी

३.३.१.२ सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या हक्काचा कायदा २०१०

३.३.१.३ सक्तीच्या, मोफत प्राथमिक शिक्षणांकरिताच्या सोयी–सुविधा

३.३.२ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिक सुविधा

३.३.३ शिक्षण व महिला विकास

३.४ सारांश

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- समाजकल्याण आणि शिक्षण यांचा सहसंबंध समजून घेणे.

- भारतातील सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद समजून घेणे व त्यासाठीचे कायदे, घटनात्मक तरतूद देण्यात येणाऱ्या सुविधा समजावून घेणे.
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधा स्पष्ट करणे.
- शिक्षण व महिलांचा विकास समजावून घेणे. त्याकरिता महिला कल्याणासाठी करण्यात आलेल्या शैक्षणिक तरतूदी जाणून घेणे.

## ३.२ प्रस्तावना

सामाजिक कल्याण म्हणजे व्यक्ती व गटांनी समाधानकारक जीवन व आरोग्य संपादन करावे यासाठी त्यांना मदत करणारी सामाजिक सेवा व संस्थांची एक एकत्र रचना म्हणजे सामाजिक कल्याण होय. याचे मुख्य ध्येय व्यक्ती व समाज यांचे सहसंबंध दृढ करणे ज्यायोगे व्यक्तीची त्याच्या पूर्ण क्षमतेने प्रगती करता येईल.

अशा या समाजकल्याणाचे शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. हर्बर्ट स्पेन्सर हे समाजशास्त्रज्ञ शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात, 'सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय.' शिक्षणातून व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक विकास होतो. एक जबाबदार व समर्थ नागरिक घडवण्याचे कार्य शिक्षण करते. म्हणूनच 'शिक्षण व विकास', 'शिक्षण व सामाजिक कल्याण' यांचा संबंध घनिष्ठ असतो. समाजातील ज्या विशिष्ट समुदायांचे, म्हणजे दुर्बल, वंचित, असाहाय्य, शोषित घटकांचे अथवा समुदायांचे कल्याण साधण्याची जबाबदारी राज्य पार पाडत असते तेव्हा त्याला शिक्षण हे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य प्राधान्यक्रमाने हाती घ्यावे लागते.

भारताच्या संदर्भात आधुनिक शिक्षणाचा विचार करता शासकीय पातळीवरून प्रथमत: कंपनी सरकारने १८१३ ला आपल्या अंदाजपत्रकात सार्वजनिक शिक्षणासाठीच्या निधीची तरतूद केली. बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी १९०६ पासून आपल्या संस्थानात शिक्षण देण्यास सुरवात केली. तसेच राजर्षी शाहू राजांनी आपल्या संस्थानात दलितांना शिक्षण व नोकरीत राखीव जागा देत सामाजिक कल्याणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. अनेक समाज सुधारकांनी शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचा अट्टहास धरला व भरीव असे कार्य केले. ते शिक्षणाशिवाय सामाजिक कल्याणाचे कार्य शक्य नाही हे जाणूनच. यावरून सामाजिक कल्याण व शिक्षण यांचा परस्पर घनिष्ठ संबंध स्पष्ट होतो.

## ३.३ विषय विवेचन

या घटकात आपण शिक्षण व समाजकल्याण यांच्यातील परस्पर संबंध अभ्यासणार आहोत. प्रत्येक राज्याच्या समाजात काही घटक अथवा विशिष्ट समुदाय, व्यक्ती हे असाहाय्य, दुर्बल, शोषित म्हणून

जीवन जगतात. त्यांचा विकास, कल्याण साधणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य असते. हे कर्तव्य पार पाडताना त्या राज्याला शिक्षणाचा प्रभावी माध्यम किंवा साधन म्हणून वापर करणे अत्यावश्यक ठरते. कारण शिक्षणाशिवाय सामाजिक कल्याण ही वरवरची मलमपट्टी ठरेल. खऱ्या अर्थाने सामाजिक कल्याण साधताना विकास व परिवर्तनाचे साधन असणाऱ्या शिक्षणाची तरतूद शासकीय पातळीवरून करावी लागते. त्यासाठी विविध घटनात्मक तरतूदी, धोरणे, कायदे, योजना, उपक्रम इत्यादी बाबींचे निर्माण व संचलन करावे लागते. भारताच्या संदर्भात या घटकाचा विचार करताना तो पुढील मुद्यांच्या आधारे करावा लागेल.

१. भारतातील प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भातील ऐतिहासिक आढावा घेणे.

२. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीचा कायदा समजून घेणे.

३. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदींचा आढावा घेणे.

४. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा आढावा घेणे.

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सोयी-सुविधा जाणून घेणे.

६. शिक्षण व महिलांचा विकास अभ्यासणे.

## ३.३.१ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद (कायदा, घटनात्मक तरतूद व सोयी-सुविधा)

भारतात आधुनिक शिक्षणाची सुरवात खऱ्या अर्थाने ब्रिटिश राजवटीत झाली. शिक्षणाशिवाय समाजविकास व सामाजिक कल्याण साधणे शक्य नाही. म्हणून शिक्षणाची व्यवस्था करणे ही राज्याची जबाबदारी होय. शासकीय पातळीवर याबाबत १९व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरवात झाली. सन १८१३ मध्ये भारतात 'कंपनी सरकारने' प्रथमच आपल्या अंदाजपत्रकात सार्वजनिक शिक्षणासाठी निधीची तरतूद केली. सन १८८२ मध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी हंटर आयोगापुढे प्रथम मोफत व सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली. परिणामी, सामाजिक, राजकीय व शासकीय पातळीवर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या विषयावरील विचार मंथनाने वेग घेतला व त्यास चालना मिळाली व १८८३-८४ मध्ये शिक्षण हा विषय स्थानिक संस्थाकडे सोपवण्यात आला. म. जोतिबा फुले यांनी विशेषत: स्त्रीया व अनुसूचित जातीच्या बांधवाच्या कल्याणासाठी शिक्षणाची सुरवात केली. भारतात शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया, अनुसूचित जाती बांधवाच्या सामाजिक कल्याणाला त्यांनी सुरवात केली. सन १९०६ साली बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात राज्यकर्तव्य म्हणून शिक्षण देण्यास सुरवात केली. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक कल्याणात महत्त्वाचे पाऊल उचलले ते म्हणजे त्यांनी दलित

बांधवांना शिक्षण व नोकरीत राखीव जागा देऊन त्यांच्या कल्याणाचा प्रयत्न केला. गोपाळकृष्ण गोखलेनी सन १९१० ला शिक्षणाची व्यवस्था सरकारने करण्याची मागणी केली तर १९१६ मध्ये राजर्षी शाहूनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. १९१८ साली मुंबई विधानसभेने 'सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा' मंजूर केला. १९३७ साली वर्धा येथे 'पहिली शिक्षण परिषद झाली व शिक्षण योजना तयार करण्यात आली. या शिक्षण योजनेस १९३८ ला 'हरिपूरा' येथील काँग्रेस अधिवेशनात मान्यता देण्यात आली. याचदरम्यान भारतात प्रांतिक सरकारे स्थापन झाली व 'सोपीव खात्यात' शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला. परिणामी, शिक्षणाचे धोरण निश्चित करण्याचा अधिकार प्रथमच भारतीयांकडे आला. या कालखंडात भारतातील अनेक विचारवंत, समाजसुधारक, राजकीय व्यक्ती, तत्त्वज्ञ यांनी शिक्षणाच्या महत्त्वाबाबत आपली मते नोंदवली तसेच शिक्षणाचा, सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. परिणामी, भारतीयांनी वेळोवेळी मांडलेले शिक्षण विचार, धोरणे यांची अंमलबजावणी करण्यास, आवश्यक ते कायदे करण्यासाठी आवश्यक पोषक वातावरण तयार झाले. भारतीय सरकारने प्रथमपासूनच सामाजिक कल्याणासाठी शिक्षणाची अत्यावश्यकता मान्य करून त्या दिशेने पाऊले उचलण्यास सुरवात केली. त्यामध्ये 'सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा-२०१०', 'घटनात्मक तरतुदी' व 'शिक्षणविषयक सुविधा' यांचा आपण अभ्यास करणार आहोत, तो पुढीलप्रमाणे :-

### ३.३.१.१ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत व शिक्षण हक्काबाबत घटनात्मक तरतूदी

भारतीय राज्यघटनेत स्पष्ट केलेले व्यक्तीचे मूलभूत अधिकार व राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये शिक्षणाविषयी करण्यात आलेल्या तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. भारतीय राज्यघटनेतील कलम २९ (१) मध्ये हे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक नागरिकास स्वत:ची भाषा, लिपी किंवा संस्कृती यांची जपणूक करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यानुसार ती व्यक्ती आपल्या भाषा, लिपी व संस्कृतीचे जतन करू शकतो.

२. राज्यघटनेतील कलम २९ (२) नुसार, अशा कोणत्याही शैक्षणिक संस्था की ज्यांना राज्याकडून अनुदान प्राप्त होते. अशा संस्थात वंश, धर्म, पंथ, जात, वर्ग असा कोणताही भेदभाव करून कोणत्याही व्यक्तीस प्रवेश नाकारता येणार नाही.

३. राज्यघटनेतील कलम ३० (१) मध्ये हे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक नागरिकाला त्याच्या विकासासाठी त्याच्या इच्छेनुसार शिक्षण घेण्याचा हकक आहे.

तसेच अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे संचालन करण्याचा हक्क आहे. अशा अल्पसंख्यांकांच्या शिक्षणसंस्थांना मदत

करताना त्या अल्पसंख्यांकाच्या आहेत म्हणून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. तसेच,

१९५१ साली करण्यात आलेल्या घटना दुरुस्तीनंतर मागासजाती म्हणून निश्चित केलेल्या जातीबंधवांसाठी शिक्षणसंस्थात प्रवेशासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.

४. भारतीय राज्यघटनेत समाविष्ट राज्याची मार्गदर्शक तत्त्वाअंतर्गत कलम ४५ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, वय वर्ष १४ पेक्षा कमी वयाच्या सर्व मूला-मूलींना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारने घटनेच्या अंमलबजावणी वर्षापासून १० वर्षाच्या आत करावी.

५. राज्यघटनेच्या कलम ४६ नुसार दुर्बल, मागास जातीच्या विशेषत: अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील व्यक्तींना विविध सोयी, सवलती सरकारने द्याव्यात व त्यांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करावा. तसेच,

त्यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहतील व त्यांचे कोणत्याही प्रकारे शोषण होणार नाही, याची सरकारने दक्षता घ्यावी असे स्पष्ट करण्यात आले.

६. राज्यघटनेतील कलम ३५० (अ) नुसार 'भाषिक अल्पसंख्यांक गटा'तील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण हे त्यांच्याच मातृभाषेतून मिळावे यासाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न राज्य सरकार व त्यांचे स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी करावा.

७. ८६ व्या घटनादुरुस्तीन्वये (२००२) मोफत व सक्तीचे शिक्षण हा वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील बालकांचा मूलभूत हक्क ठरला आहे व ते देणे ही राज्याचीजबाबदारी ठरली आहे. घटना कलम २१ नंतर यासंदर्भातील कलम २१ (अ) भारतीय घटनेत नव्याने अंतर्भूत करण्यात आले आहे.

## ३.३.१.२ सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या हक्काचा कायदा २०१०

शिक्षणाच्या अधिकारासंदर्भातील 'उन्नीकृष्णन केस' (१९९३) चा जो निकाल देण्यात आला. यामध्ये हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, 'शिक्षण घेतल्याशिवाय व्यक्तीला सन्मानाने जगणे शक्य नाही, म्हणून राज्यघटनेतील कलम ४५ मधील शिक्षणाचा अधिकार वाचताना तो कलम २९ बरोबर वाचला पाहिजे. म्हणजेच, 'जगण्याच्या अधिकारामध्ये शिक्षणाच्या अधिकाराचा समावेश करावा' असा निर्णय देण्यात आला. याचे कारण,

कलम ४५ हे राज्यासाठीचे मार्गदर्शक तत्त्वातील कलम असून त्यातील शिक्षणाचा अधिकार राज्याने द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे राज्यावर हा शिक्षणाचा हक्क देण्याचे बंधन नाही, पण कलम २९ हे घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारापैकी 'शिक्षण संस्थेत भेदभाव करून प्रवेश नाकारता येणार नाही' हा मूलभूत अधिकार स्पष्ट करते. म्हणजेच 'उन्नीकृष्णन केस'च्या निर्णयातून कलम ४५ हे कलम २९ बरोबर वाचण्यात यावे याचा अर्थ शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकारात समाविष्ट करावा हे स्पष्ट करण्यात आले.

म्हणूनच या निर्णयामुळे घटना दुरुस्ती करून 'मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा कायदा २०१०' मंजूर केला गेला. यातील तरतूदी पुढीलप्रमाणे :-

१. वय वर्ष सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मूलांस तो वास्तव्यास असलेल्या ठिकाणापासून जवळच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे. चौदा वर्षांपर्यंत त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण न झाल्यास वयाच्या चौदा वर्षानंतरही त्याला मोफत प्राथमिक शिक्षण घेण्याचा हक्क असेल.

२. कोणत्याही कारणास्तव किंवा भेदभाव करून कोणाही मूलास प्रवेश नाकारला जाणार नाही. तसेच प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी त्याला शाळेतून काढता येणार नाही.

३. इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीपर्यंत म्हणजेच प्राथमिक शिक्षणात कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांस नापास करता येणार नाही किंवा त्याच वर्गात ठेवता येणार नाही.

४. वय वर्ष सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मुलांचा प्रवेश शाळेत व्हावा, तो शाळेत नियमित उपस्थित रहावा व त्याने प्राथमिक शिक्षण पूर्ण करावे याची जबाबदारी राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाची राहिल. म्हणून त्यांनी याबाबत काळजी घ्यावी व प्रयत्न करावेत.

५. वय वर्ष सहा ते चौदा वयोगटातील दुर्बल व वंचित गटातील मूलाबाबत प्राथमिक शिक्षण प्रक्रियेत कोणताही भेदभाव केला जाणार नाही याकडे राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाने लक्ष द्यावे.

६. राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाने प्राथमिक शिक्षण, शाळांकरिता आवश्यक पायाभूत व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

७. राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाने प्राथमिक शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा उत्तम ठेवण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी. याचाच एक भाग म्हणून प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे व प्राथमिक शाळांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी.

८. प्रत्येक अनुदानित व विनाअनुदानित खाजगी शाळांमध्ये एकूण मंजूर विद्यार्थी संख्येच्या २५% मुले वंचित व कमकुवत घटकातील असतील व त्यांची फी राज्य सरकार देईल.

९. वय वर्ष सहा ते चौदा वयोगटातील मुलांना शाळेत दाखल करणे हे त्या मूलांच्या पालकांचे कर्तव्य असेल.

१०. वय वर्ष सहा ते चौदा वयोगटातील मुलामुलींची नांवनोंदणी करून घेणे तसेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांची उपस्थिती पहाणे ही जबाबदारी राज्यसरकारची असेल. तसेच शाळा प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रात त्रुटी अथवा कमतरता आहेत, कागदपत्रांची पूर्तता झाली नाही म्हणून मुला-मुलींस प्रवेश नाकारता येणार नाही.

११. प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रत्येक मुलाला प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत कोणत्याही मुलांस शिक्षण मंडळाची परीक्षा द्यावी लागणार नाही.

१२. प्राथमिक शाळांचा वर्गवार अभ्यासक्रम तयार करताना पुढील गोष्टींना प्राधान्य द्यावे. राज्य घटनेतील मूल्यांचा आदर ठेवत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधणारा, मुलांना भिती, आघात, चिंता यापासून मुक्त ठेवणारा अभ्यासक्रम संबंधित यंत्रणेने तयार करावा.

१३. या कायद्यानुसार कोणत्याही शिक्षकाला खाजगी शिकवण्या घेण्याची परवानगी नाही. त्याला खाजगी शिकवणी घेता येणार नाही.

१४. केंद्र सरकारच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या किमान पात्रतेचे निकष निश्चित करावेत. तसेच सध्या सेवेत असणारे ज्या शिक्षकांनी निकष पूर्ण केलेले नाहीत, त्यांनी पाच वर्षात ते पूर्ण करावेत. तसेच शिक्षकांचे वेतन व भत्ते, सेवेचे नियम व इतर बाबींसंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी.

१५. या कायद्याने शिक्षकांच्या कर्तव्यासंदर्भात पुढील गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. (१) शिक्षकांनी शाळेत नियमित व वेळेत उपस्थित असावे. (२) नियोजनानुसार ठरलेल्या वेळेत आपला अभ्यासक्रम पूर्ण करावा. (३) शिक्षकांनी प्रत्येक मुलाच्या क्षमता व कमतरता लक्षात घेऊन आवश्यक असेल तर विशेष शिक्षण द्यावे. (४) मुलांच्या प्रगतीविषयी त्याच्या पालकांना नियमित माहिती पुरवावी. (५) आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या शिक्षकाविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जावी.

१६. केंद्र सरकारच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या यांचे गुणोत्तर प्रमाण निश्चित करावे व शाळेत मंजूर शिक्षक संख्येच्या १०% पेक्षा जास्त शिक्षकांची पदे रिक्त राहणार नाहीत याची संबंधित यंत्रणेने काळजी घ्यावी.

१७. शिक्षकांना जनगणना, सार्वत्रिक निवडणूका अथवा विविध आपत्तीतील मदत कार्य सोडून इतर कोणतेही अशैक्षणिक कार्य देता येणार नाही.

१८. संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून मान्यता घेतल्याशिवाय शाळा चालू करता येणार नाही. या कायद्यातील निकष व पात्रता प्रत्येक शाळेला पूर्ण कराव्या लागतील.

१९. कोणत्याही शाळेला 'कॅपिटेशन फी' आकारता येणार नाही. मुलांची निवड करणेसाठी पालक किंवा मुलांची छाननी प्रक्रिया करता येणार नाही.

२०. कोणत्याही शाळेला 'कॅपिटेशन फी' आकारता येणार नाही व या कायद्याचे उल्लंघन करत अशी फी घेणाऱ्या शाळेला घेतलेल्या 'फी' च्या दसपट दंड आकारला जाईल. तसेच प्रवेश देण्याकरिता मुलांच्या, पालकांच्या मुलाखती प्रक्रिया अथवा अशा पध्दतीच्या इतर प्रक्रियांचा अवलंब करता येणार नाही. तसे करणाऱ्या शाळेस २५,०००/- रुपये दंड व नंतर तसाच नियमभंग केल्यास ५०,०००/- रुपये दंड आकारला जाईल.

२१. शाळा व्यवस्थापन समिती : शाळेच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करावी. या समितीत स्थानिक प्रशासनातून निवड करण्यात आलेले प्रतिनिधी, शिक्षक, पालक यांचा समावेश करावा. तसेच वंचित व दुर्बल गटातील मुलांच्या पालकांना मुलांच्या संख्येच्या प्रमाणात किंवा किमान ३/४ इतके प्रतिनिधीत्व असेल. ही समिती देखरेख व नियंत्रणाशिवाय शाळेचा विकास आराखडा तयार करून त्यासंदर्भात शिफारस करेल.

२२. प्राथमिक शिक्षण व बालविकास क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तीकडून निवड करून केंद्र सरकार एका राष्ट्रीय सल्लागार परिषदेची स्थापना करेल. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सल्ला देण्याचे कार्य ही राष्ट्रीय सल्लागार परिषद करेल.

२३. या कायद्याचे निकष शाळांनी तीन वर्षात पूर्ण करावेत. निकष पूर्ण न करणाऱ्या शाळा तीन वर्षानंतर बंद करण्यात येतील.

### ३.३.१.३ सक्तीच्या, मोफत प्राथमिक शिक्षणांकरिताच्या सोयी-सुविधा

केवळ सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची कायदेशीर तरतूद करून सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करता येणार नाही. कारण दारिद्र्य, अज्ञान. पालकांची अनास्था, जवळच्या शाळांची कमतरता असे अनेक अडथळे या प्रक्रियेत येतात. या अडथळ्यांना दूर करण्यासाठी केवळ प्राथमिकच नव्हे तर पूर्वप्राथमिक पातळीपासूनच याबाबत कही सोयी-सुविधा पुरविणे गरजेचे आहे. हे ओळखूनच अगदी १९७४ च्या 'बालकांसाठीच्या राष्ट्रीय धोरणा'पासून आजपर्यंत अनेकविध सोयी-सुविधा शासनामार्फत

पुरवल्या जातात, त्यातील काही महत्त्वाच्या सोयी-सुविधा आपण या ठिकाणी अभ्यासणार आहोत, त्या पुढीलप्रमाणे :-

## १. बालकल्याण :-

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यापूर्वीच 'बालकल्याण' योजनेच्या माध्यमातून काही सोयी-सुविधा दिल्या जात आहेत. यामध्ये वय वर्ष पाच ते बारा या वयोगटातील मुलांची देखभाल करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अनुदान देणे, वसतिगृहाची निर्मिती करणे व त्याचा लाभ मुलांना देणे, मुलींची स्वतंत्र वसतिगृह निर्माण करणे व तिथे गृहमातेची नियुक्ती करणे, वय वर्ष १२ ते १८ वयोगटातील मुलांना व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षण देणेची सुविधा इ. सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

## २. अरविंद बाल केंद्र :-

चौथ्या पंचवार्षिक योजनेत अरविंद बाल केंद्राची निर्मिती करण्याची तरतूद करण्यात आली होती. या केंद्राकडून झोपडपट्टीतील शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा पुरविणे, मनोरंजनाची साधने उपलब्ध करून देणे, त्यांच्यातून चुकीच्या सवयी दूर करून त्यांना चांगले नागरिक बनवणे हे या केंद्राचे कार्य होते.

## ३. विशेष पोषक कार्यक्रम :-

सन १९७०-७१ पासून राज्यसरकारने सुरवात केलेल्या या कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी, अस्वच्छ वस्त्या, अविकसित क्षेत्रे, जनजातीक्षेत्रातील तसेच समाजातील कमकुवत घटकांतील शाळेत जाणाऱ्या मुलांना प्रोटीनयुक्त आहार दिला जातो. एका वर्षात किमान ३०० दिवस अशा स्वरूपातील आहार पुरविला जातो.

## ४. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :-

इयत्ता ५ वी ते ७ वी तसेच इयत्ता ८ वी ते १० वी च्या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थिनींची गळतीचे प्रमाण कमी करणेसाठी ही योजना प्रथम सन १९९६ ला व नंतर २००३ पासून सुरू केली असून इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थिनींसाठी दरमहा रु. ६० प्रमाणे १० महिन्यासाठी रु. ६००/- तर इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थिनींसाठी दरमहा रु. १०० प्रमाणे १० महिन्यासाठी रु. १०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती विभागून वर्षात तीन वेळा २६ जून, २२ सप्टेंबर व ३ जानेवारीला दिली जाते. यातील लाभार्थी विद्यार्थिनींना उत्पन्नाची, गुणांची अट नाही तसेच यासाठी अर्ज करण्याचीही आवश्यकता नाही.

## ५. मॅट्रिकपूर्व शिक्षण फी व परीक्षा फी प्रदान योजना :-

प्रथम सन २४ डिसेंबर १९७० व नंतर १३ जून १९९६ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व जमातीतील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनीचे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क शासनामार्फत आदा केले जाते. याकरिता संबंधित विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे गरजेचे आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्नाची अट नाही. तथापि, यासाठी विद्यार्थी मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असला पाहिजे.

## ६. प्राथमिक, माध्यमिक शाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती :-

इयत्ता ५ वी ते ७ वी तील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांतून प्रथम व द्वितीय येणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता ८ वी ते १० वी तील प्रथम व द्वितीय येणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. यासाठी किमान ५० टक्के गुणांची अट असते. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शाळेतील नियमित उपस्थिती, सामाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक आवश्यक असते, यासाठी उत्पन्नाची अट असत नाही. ही शिष्यवृत्ती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद हे मंजूर करतात. ५ वी ते ७ वी साठी दरमहा रु. ५० असे एकूण रु. ५०० तर ८ वी ते १० वी साठी प्रतिमहिना रु. १०० असे दहा महिन्यासाठी एकूण रु. १००० असे स्वरूप असते.

## ७. अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती :-

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण घेता यावे, ते शाळाबाह्य होऊ नयेत याकरिता अशा पालकांची जी मुले वसतिगृहात न राहता शिक्षण घेतात अशा इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ११० प्रमाणे १० महिन्यांकरिता रु. ११०० तर वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता दरमहा रु. ७०० प्रमाणे १० महिन्यांकरिता रु. ७००० याशिवाय वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांस तदर्थ अनुदान वार्षिक ७५० रुपये तर वसतिगृहात राहणाऱ्याला तदर्थ वार्षिक अनुदान १००० रुपये देण्यात येते.

## ८. महात्मा फुले शिक्षण हमी योजना :-

बालकामगार किंवा बालमजूर ही एक सामाजिक समस्या बनली असून ती दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करत आहे. हे बालकामगार साहजिकच शिक्षण घेण्याच्या वयात काम करत असतात, त्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहतात. अशी कित्येक मुले प्राथमिक शिक्षण व त्यानंतरच्या शिक्षणाला वंचित राहतात. या वंचित मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी ही योजना राज्यात राबविली जाते. दहा-वीस मुले एकत्र करून स्वयंसेवी संस्था त्यांच्यासाठी शाळा-केंद्र उघडतात व स्थानिक सेवाभावी शिक्षकांना दरमहा

रु. १०००/- मानधनावर त्या मुलांना शिकवण्यासाठी नेमले जाते. प्रत्येक शाळा केंद्रासाठी प्रती वर्षास रु. १८,६२५ रुपयांची तरतूद केली जाते. प्राथमिक शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी ही योजना कार्यान्वित केली आहे.

### ९. अंकशालीन वर्ग :-

आदिवासी जमातीतील अशी मुले की जी पर्याप्त शिक्षण घेऊ शकलेली नाहीत अशा ९ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी 'अंशकालीन वर्ग' चालवून त्यांना इयत्ता चौथी पर्यंतचे शिक्षण दिले जाते, यामध्ये त्यांना अभ्यासक्रमाची पुस्तके मोफत पुरविली जातात.

### १०. मध्यान्ह भोजन योजना :-

१५ ऑगस्ट १९९५ पासून देशात व राज्यात राबवली जाणारी ही योजना 'मिड-डे-मील स्कीम' म्हणून ओळखली जाते. यालाच 'नॅशनल प्रोग्रॅम ऑफ न्युट्रीशनल सपोर्ट टू प्रायमरी एज्युकेशन' हा पोषण आहार कार्यक्रमही म्हणतात.

प्राथमिक शाळेतील प्रवेशाचे व प्रवेशित मुलांच्या नियमित उपस्थितीचे प्रमाण वाढवणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, यासाठी हा कार्यक्रम कार्यान्वित केला गेला आहे. या योजनेचा फायदा १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिला जातो.

याअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी तील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १०० ग्रॅम व इयत्ता ५ वी ते ८ वी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १५० ग्रॅम धान्य पुरविले जाते तर अन्न शिजवण्याचा खर्च म्हणून इयत्ता १ ली ते ४ थी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. २.६९ तर इयत्ता ५ वी ते ८ वी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. ४.०३ याप्रमाणे दिला जातो. आचारी व मदतनीस यांना रु. १००० इतके मानधन दिले जाते.

### ११. आश्रमशाळा :-

अनुसूचित जाती, जमाती व दुर्बल घटकातील मुलांना शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी आश्रमशाळा चालवल्या जातात. यामध्ये विद्यार्थ्यांना राहण्याचा, जेवणाचा, कपडे, शैक्षणिक साहित्याचा खर्च शासन करते. त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी या माध्यमातून शासन घेते.

### १२. मोफत गणवेश :-

सर्व शासकीय अनुदानित प्राथमिक शाळेतील सर्व मुलींना तसेच या जिल्हा परिषद शाळातील सर्व मागास प्रवर्गातील मुला-मुलींना मोफत गणवेश दिला जातो.

### १३. मोफत वैद्यकिय तपासणी :-

शासनामार्फत प्राथमिक शाळातील सर्व मुलांच्या आयोग्याकरिता प्रत्येक शाळेत मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते व आवश्यक लसी दिल्या जातात.

### १४. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी आश्रमशाळा :-

या मुलांसाठी इयत्ती १ ली ते ६ वी व इयत्ता ८ वी ते १० वी प्रति वर्ग ४० प्रमाणे २४० प्रवेश क्षमता असणाऱ्या या आश्रमशाळेत भोजन, निवास, अंथरुण-पांघरुण, साबण इत्यादीसह मोफत शिक्षणाची सोय करण्यात येते.

### ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ❊

❒ **रिक्त जागा भरा.**

१. महात्मा जोतिबा फुले यांनी १८८२ मध्ये ............. आयोगापुढे शिक्षणाबाबत मत मांडले.

२. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा, १९१८ मध्ये .............. विधानसभेने मंजूर केला.

३. भारतीय राज्यघटनेतील .................. कलमानुसार प्रत्येक नागरिकाला त्याच्या विकासासाठी त्याच्या इच्छेनुसार शिक्षण घेण्याचा हक्क आहे हे स्पष्ट केले.

४. 'सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या हक्काचा कायदा, २०१०' नुसार वय वर्ष सहा ते चौथा वयोगटातील मुलांना शाळेत दाखल करणे हे ............. कर्तव्य असेल असे स्पष्ट करण्यात आले.

५. ५ वी ते १० वी तील मागासवर्गीय विद्यार्थिनींची शाळेतील गळती रोखण्यासाठी ............. शिष्यवृत्ती योजना सन १९९६ साली सुरू करण्यात आली.

## ३.३.२ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिक सुविधा

भारतीय समाजात अस्तित्वात असणारी जाती-व्यवस्था, तिच्यातील उच्चनिचतेची श्रेणी-रचना, त्यातून उदयाला आलेली व कित्येक शतके खोलपर्यंत रुजलेली अस्पृश्यता ही अमानवी प्रथा या सर्वांचा परिणाम म्हणून समाजजीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी सर्वच पातळ्यांवर अनुसूचित जाती व जमातीना देण्यात आलेला निम्न दर्जा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक विकास व परिवर्तनाचे साधन असणारे शिक्षणच या अनुसूचित जाती-जमातींना नाकारल्याने, त्यांना शिक्षणाच्या

हक्कापासून वंचित ठेवल्याने साहजिकच अनुसूचित जाती-जमातीना विकासापासून दूर ठेवण्यात आले. परंतु ब्रिटिश कालखंडात अनेक समाजसुधारकांनी या संदर्भात केलेले कार्य तसेच भारतीय राज्यघटनेतील तरतुदी यामुळे अनुसूचित जाती-जमातींच्या व्यक्तींना शिक्षणाची द्वारे खुली झाली. तरीही विविध कारणांनी या जाती-जमातींतील मुले शाळेपासून दूर होती, त्यांच्यात गळतीचे प्रमाणही चिंताजनक होते, म्हणूनच या जाती-जमातीतील अधिकाधिक मुले शाळेत यावीत, विद्यार्थी गळती होऊ नये यासाठी त्यांना विशेष सोयी-सुविधा पुरवणे गरजेचे होते. म्हणूनच शासकीय पातळीवरून यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले व अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीकरिता विशेष सोयी-सुविधा देण्यात आल्या, त्यातील काही प्रमुख शैक्षणिक सुविधा खालीलप्रमाणे :-

## १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती :-

शासन निर्णय दि. ११ जून २००३ नुसार अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी ही गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करून इयत्ता ११ वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विवद्यार्थ्यांस १० महिने कालावधीसाठी दरमहा रु. ३००/- असे एकूण रु. ३०००/- तर इयत्ता १२ वी करिताही याच पद्धतीने एकूण रु. ३०००/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी व त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा तसेच इतर सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत ते टिकून रहावेत याकरिता गुणवंत विद्यार्थ्यांना अधिक सक्षम व प्रोत्साहित करणेसाठी ही योजना सुरू केली आहे.

## २. भारत सरकार शिष्यवृत्ती :-

दिनांक ५ जानेवारी २००५ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापेक्षा कमी आहे. अशा शालांत परीक्षोत्तर व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता यासाठी दरमहा रु. १४० ते रु. ३३० इतका वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता निर्वाह भत्ता व वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. २३५ ते रु. ७४० निर्वाह भत्ता असे या शिष्यवृत्तीचे स्वरूप आहे.

## ३. उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :-

११ जून २००३ व ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार, जो विद्याथी अनुसूचित जाती-नवबौध्द आहे व तो महाराष्ट्राचा रहिवाशी असेल तसेच ज्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्याने महाराष्ट्र शासनमान्य संस्थेत प्रवेश घेतला असल्यास अशा विद्यार्थ्यांतून देशातील शासनमान्य नामांकित शिक्षण संस्थेत उच्च शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते.

या शिष्यवृत्तीत, संबंधित संस्थेचे शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क, क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य याकरिता प्रतिवर्षी रु. १००००/- शिष्यवृत्ती दिली जाते.

संबंधित विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध होऊन, आजच्या स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्याकरिता त्यांची जडण-घडण व्हावी या हेतूने ही शिष्यवृत्ती सुरू केली आहे.

## ४. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :-

मागासवर्गीय मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी तील मागासवर्गीय विद्यार्थिनींना १० महिन्यांसाठी दरमहा रु. ६० प्रमाणे रु. ६००/- व ८ वी ते १० वी तील विद्यार्थिनींसाठी दरमहा रु. १०० प्रमाणे रु. १०००/- इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीचा लाभ मिळवण्याकरिता गुणांची उत्पन्नाची अट नाही व अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

## ५. परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :-

दिनांक ११ जून २००३ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व जमातीतील मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली.

अनुसूचित जाती व जमातीतील असे विद्यार्थी की ज्यांच्याकडे गुणवत्ता व इच्छा असूनही केवळ कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे परदेशातील नामांकित विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी (पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रम) प्रवेश घेऊ शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते.

या शिष्यवृत्ती अंतर्गत संबंधित विद्यापीठाचा शिक्षण खर्च व इतर खर्च मंजूर केला जातो. विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासाठी यु.एस.डॉलर १४,०००/- तर यु.के. करिता पौंड ९,०००/- इतका देण्यात येतो. तसेच आकस्मिक खर्चासाठी यु.एस.डॉलर १३७५ व यु.के. साठी पौंड १००० देण्यात येतो. याशिवाय प्रवास खर्चही मिळतो.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी तो विद्यार्थी अनुसूचित जातीचा व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. त्याचे वय ३५ पेक्षा कमी असावे तसेच वार्षिक उत्पन्न कुटुंबाचे २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. त्याने प्रवेश घेतलेले विद्यापीठ मान्यताप्राप्त असावे. पीएच.डी. अभ्यासक्रमाला जाणाऱ्या विद्यार्थ्याने पदवीमध्ये किमान ५०% गुण प्रथम प्रयत्नात घेऊन उत्तीर्ण असावा.

## ६. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती :-

(या मुद्याचे विश्लेषण ''३.३.१.३ सक्तीच्या, मोफत प्राथकि शिक्षणाकरिताच्या सोयी-सुविधा''

या उपघटकातील मुद्दा क्रमांक '६. प्राथमिक, माध्यमिक शाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती' यामध्ये आहे.)

## ७. अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती :-

(या मुद्याचे विश्लेषण ''३.३.१.३ सक्तीच्या, मोफत प्राथमिक शिक्षणाकरिताच्या सोयी-सुविधा'' या उपघटकातील मुद्दा क्रमांक '७. अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती' यामध्ये आहे.)

## ८. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन :-

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी उपलब्ध व्हाव्यात, याकरिता आवश्यक तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा रु. ६०/- व समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. ४०/- असे विद्यावेतन व पूरक विद्यावेतन दिले जाते. ज्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून विद्यावेतन येत नाही, त्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. १००/- विद्यावेतन दिले जाते.

## ९. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन :-

अनुसूचित जातीतील अभियांत्रिकी, कृषी, वैद्यकीय, व्यवस्थापन, सामाजिक कार्य इत्यादी व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 'भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती' योजनेअंतर्गत निर्वाह भत्ता व विद्यावेतन दिले जाते.

यामध्ये व्यावसायिक पाट्यक्रमांशी संलग्न महाविद्यालयाच्या वसतिगृहातील विद्यार्थी ज्यांचा अभ्यासक्रम चार ते पाच वर्षांचा आहे. त्यांना रुपये ७४०, १० महिनेकरिता, दोन ते तीन वर्षाच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना १० महिनेसाठी रु. ६०० व दोन अथवा त्यापेक्षा कमी वर्षासाठीच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना १० महिनेसाठी रु. ५००/- तसेच वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असणाऱ्या परंतु बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यास चार-पाच वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी रु. १०००/-, दोन ते तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी रु. ७००/-, दोन वर्ष ते कमी कालावधीसाठी रु. ५००/- विद्यावेतन दिले जाते.

## १०. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतिगृहे :-

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. एक लाखापेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना ही सुविधा

उपलब्ध आहे. विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर ही वसतिगृहे असून इयत्ता ८ वी व त्यापुढील महाविद्यालयीन स्तरापर्यंत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, अंथरुण-पांघरुण, गणवेश, शैक्षणिक साहित्य या सुविधेसह त्यांना निर्वाह भत्ताही दिला जातो.

२६ जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांचा राजीव गांधी विमा योजनेअंतर्गत शासनामार्फत विम्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच २००७ व ११ जुलै २०१२ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, नवबौध्द युवक-युवतींची शिक्षण घेण्याची वाढलेली संख्या विचारात घेऊन त्यांच्याकरिता १००० विद्यार्थी क्षमतेची प्रत्येक विभागात एक अशी एकूण सात, १०० विद्यार्थी क्षमतेची प्रत्येक तालुक्यात एक अशी एकूण ३५३ शासकीय वसतिगृहे सुरू करण्याबाबतची ही योजना आहे.

## ११. तालुका स्तरावर १०० शासकीय निवासी शाळा :-

अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना, इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना या शाळेत प्रवेश दिला जातो. कमकुवत आर्थिक स्थितीमुळे मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी त्यांना तालुका स्तरावर शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या शासकीय निवासी शाळा सुरू करून त्या शाळेत मोफत निवास, भोजन व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

## १२. अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था :-

विभागीय स्तरावर या संस्था स्थापन केल्या असून संचालक, व्यवसाय व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेमार्फत त्या चालवल्या जातात. या संस्थेत एकूण बारा व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवण्यात येतात. या संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरवल्या जातात.

## १३. स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदान :-

दिनांक १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयानुसार देण्यात येते. वसतिगृहातील मुला-मुलींना निवास, भोजन, अंथरुण-पांघरुण, क्रिडा साहित्य इत्यादी सुविधा मोफत देण्यासाठी तसेच वसतिगृहातील अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन व इमारत भाडे यासाठी हे अनुदान दिले जाते. शासनाकडून या वसतिगृहात प्रवेशितासाठी १० महिनेकरिता दरमहा प्रत्येकी रु. ६३०/- इतके अनुदान दिले जाते. सध्या महाराष्ट्रातील अशा मुलांच्या १,८२० व मुलींच्या ५६८ वसतिगृहांना हे अनुदान प्राप्त होते.

## १४. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना :-

दिनांक ५ जानेवारी २००५ च्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय, सी.ए., एम.बी.ए. इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कमकुवत आर्थिक स्थितीमुळे अभ्यासक्रमाची पुस्तके घेण्यास अडचण येऊ नये याकरिता प्रत्येक दोन विद्यार्थ्यांमागे एक पुस्तक संच यापध्दतीने अनुदान दिले जाते. तर सी.ए., एम.बी.ए. व विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विद्यार्थ्याला एक संच दिला जातो.

## १५. सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र :-

अनुसूचित जाती व नवबौध्द युवकांना पोलिस व सैन्य भरतीपर्वू प्रशिक्षण देऊन त्यांना भरतीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी असे प्रशिक्षण केंद्र चालवले जाते. १२ वी पास युवकांना तीन महिने कालावधीचा हा कोर्स आहे. या केंद्रात प्रवेशीत विद्यार्थ्यांना भोजन, नाष्टा, निवास, कपडे, अंथरुण-पांघरुण व प्रशिक्षण मोफत दिले जाते.

## १६. अनुसूचित जाती, जमातीतील विद्यार्थ्यांना मोफत संगणक शिक्षण :-

सध्याच्या संगणक युगात अनुसूचित जाती, जमातातील विद्यार्थी, आर्थिक कमकुवतपणामुळे संगणक शिक्षणापासून वंचित राहू नयेत याकरिता त्यांच्यासाठी सक्तीचे, मोफत संगणक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. याकरिता १० व्या पंचवार्षिक योजनेत २.४५ करोड रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून संगणक शिक्षण व त्यासंबंधीच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

## १७. अनुसूचित जमातीकरिता शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम :-

अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठीच्या शाळा या आदिवासी भागात असून या डोंगराळ, आदिवासी भागातील शाळांत शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. तेथे इतर शिक्षक हजर होण्यास इच्छुक नसतात म्हणून आदिवासीतील, स्थानिक पात्रताधारक विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षकपदाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यातूनच शिक्षक निर्माण करणे व आदिवासी भागातील शाळातील शिक्षकांची रिक्त पदे भरून तेथील मुलांचा शिक्षणातील अडसर दूर करणेसाठी १०व्या पंचवार्षिक योजनेत ०.६० करोड रुपयांची तरतूद केली आहे.

## १८. शैक्षणिक यंत्रणा मजबूत व नियंत्रित करण्यासाठी स्थानिकांचा सहभाग योजना :-

अनुसूचित जाती-जमातीकरिताच्या आदिवासी भागातील शाळा व वसतिगृहावर देखरेख व

नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच शिक्षकांच्यासाठी कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित करणेसाठी व तेथील शाळा व वसतिगृहे व्यवस्थित व उद्देशपूर्ण रितीने चालणेसाठी स्थानिकांचा सहभाग असणाऱ्या 'स्वयंसेवक समित्या' स्थापन करण्याची तरतूद १०व्या पंचवार्षिक योजनेत असून याकरिता ०.३० करोड रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## १९. अनुसूचित जमातीसाठीच्या शाळांना अनुदान :-

आदिवासी बहुल भागात आदिवासी/अनुसूचित जमातींना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांनी सुरू केलल्या निवासी शाळांना १५ लाख, अनिवासी शाळांना १० लाख, वसतिगृहास १० लाख, संगणक प्रशिक्षणास शाळेस ३ लाख, कृषि कामगार प्रशिक्षणास ५ लाख असे अनुदान देण्यात येते. यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत आदिवासी कल्याण मंत्रालयाकडे अर्ज करावा लागतो.

## २०. आदिवासी भागात व्यावसायिक प्रशिक्षण :-

या योजनेअंतर्गत बेरोजगार आदिवासी युवकांना स्थानिक भागामध्ये रोजगार उपलब्ध करून देता येईल असे विविध १५ प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च दिला जातोच. शिवाय यामध्ये प्रवेश घेतलेल्या व्यक्तीस दरमहा रु. ३५० इतके विद्यावेतनही दिले जाते.

## २१. आदिवासी महिला साक्षरता :-

ज्या आदिवासी क्षेत्रात साक्षरता १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्या क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या मुली व त्यांचे पालक यांच्यातील साक्षरता वाढवण्यासाठी शैक्षणिक संकुल सुरू केले जाते. या अंतर्गत इयत्ता १ ली ते ३ रीच्या वर्गातील मुलीसाठी 'निवासी साक्षरता केंद्र' त्यांच्या पालकांच्यासाठी 'प्रौढ साक्षरता वर्ग' चालवले जातात. शाळेमध्ये वर्ग खोल्या, कर्मचारी निवासगृहे, क्रिडा साहित्य इ. सुविधांसाठी विद्यार्थिनी संख्येवर आधारित अनुदान दिले जाते. ते किमान १० लाख रुपये वार्षिक इतके असते.

### ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❋

❒ **रिक्त जागा भरा.**

१. इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करून इयत्ता ११ वीत प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना ................ शिष्यवृत्ती २००३ पासून सुरू करण्यात आली.

२. ५ जानेवारी २००५ च्या शासन निर्णयानुसार ............... विद्यार्थ्यांसाठी 'पुस्तकपेढी योजना' सुरू करण्यात आली.

३. इयत्ता ५ वी ते १० वी च्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांसाठी ............... स्तरावर शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आल्या.

४. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा विमा योजनेअंतर्गत शासनामार्फत विम्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

५. अनुसूचित जाती, जमातीतील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना ............. सालापासून सुरू करण्यात आली.

## ३.३.३ शिक्षण व महिला विकास

समाज कल्याणाचे व समाजप्रगतीचे तसेच सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे माध्यम किंवा साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. व्यक्तीची व देशाची सर्वांगीण प्रगती ही त्या देशातील, समाजातील शिक्षणावर अवलंबून असते. विनोबा भावे म्हणतात, 'यशस्वी शिक्षण ही यशस्वी जीवनाचा पाया आहे.' म्हणूनच 'शिक्षण व महिला विकास' या उपघटकामध्ये आपण शिक्षणाचा व महिला विकासाचा सहसंबंध अभ्यासणार आहोत. हा सहसंबंध पहात असताना आपण प्रथम शिक्षणाचा अर्थ व स्वरूप अभ्यासणे गरजेचे आहे.

### ❑ शिक्षण–अर्थ व स्वरूप :–

शिक्षणाला इंग्रजीमध्ये Education असे म्हणतात. Education हा शब्द लॅटिन भाषेतून आलेला असून त्याचा अर्थ संगोपन करणे, उन्नयन करणे, विकास करणे असा आहे. भारतीय विचारवंतानी शिक्षणाच्या व्याख्या अथवा उद्देश पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

### ❑ व्याख्या :–

१. ''उच्च प्रतीचे शिक्षण म्हणजे जे केवळ माहितीच देत नाही तर सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालून देते.'' – ***रविंद्रनाथ टागोर.***

२. ''ज्ञानापुरतेच जे शिक्षण मर्यादित असते ते शिक्षण नव्हे. व्यक्तीच्या सुप्त अंतर्गत शक्तीचा विकास करून जे शिक्षण त्याच्या अंगी मानवता, राष्ट्रीयत्व व विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करेल तेच खरे शिक्षण.'' – ***अरविंद घोष.***

शिक्षणातून व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक विकास होतो. शिक्षणातून व्यक्तीतील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्याचा विकास केला जातो.

## ❒ भारत व महिला शिक्षण :-

उपरोक्त विवेचनावरून आपणांस शिक्षण म्हणजे काय? शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व किती असाधारण आहे हे लक्षात येते. या शिक्षणाचा भारताच्यासंदर्भात विशेषत: भारतातील महिला शिक्षणाच्या संदर्भात विचार करता भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी लोकसंख्या असणाऱ्या महिलांना केवळ लिंगभेदामुळे शिक्षणाचे दरवाजे कित्येक शतके बंद होते. ब्रिटिश भारतात प्रथम खऱ्या अर्थाने काही समाजसुधारकांच्यामुळे, अधिकाऱ्यांच्यामुळे महिला शिक्षणाच्या आवश्यकतेवर चर्चा सुरू झाल्या. परिणामी, त्यांच्या अथक परिश्रमातून १९व्या शतकात भारतात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली व स्वतंत्र भारतात स्त्री शिक्षणाचा विकास झाला. हा विकास पाहण्यापूर्वी आपणांस स्त्री शिक्षणाची, स्त्री साक्षरतेची आवश्यकता व स्त्री शिक्षणासाठी झालेले प्रयत्न व स्त्री शिक्षणाची स्थिती अभ्यासावी लागतील.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतात स्त्री साक्षरता केवळ ८.६६ टक्के इतकी होती. यावरून भारतात शतकानुशतके असणारी स्त्री शिक्षणासंदर्भातील नकारात्मक विचारधारा व नकारात्मक भूमिका स्पष्ट होते. ही ८.६६ टक्के स्त्री साक्षरतासुध्दा ब्रिटिश काळात अनेक समाजसुधारकांनी, विचारवंतानी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे फलित होते. पण स्वातंत्र्यानंतर मात्र भारतीय राज्यघटनेतील तरतुदी व इतर प्रयत्नामुळे स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते. स्त्री सबलीकरणासाठी झालेले विशेष प्रयत्न व स्त्री सबलीकरणात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाल्याने स्त्री साक्षरतेच्या टक्का वाढत राहिला. १९५१ ला असणारी ८.६६ टक्के स्त्री साक्षरता २००१ मध्ये ५४.१६ टक्क्यांपर्यंत पोहचली ही टक्केवारीतील प्रगती पुरेशी नाही हे जरी खरे असले तरी ही प्रगती साधण्यासाठी सुध्दा ब्रिटिश काळापासून अनेक प्रयत्न करावे लागले. स्त्री शिक्षणाचे महत्त्व व आवश्यकता समाजमनाला पटवून द्यावे लागले. त्या प्रयत्नांचा आढावा घेण्यापूर्वी आपणास स्त्री शिक्षणाची स्त्रीयांच्या विकासासाठी आवश्यकता पहावी लागेल ती पुढीलप्रमाणे :-

## ❒ महिला विकासासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता :-

महिला विकासासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता पहात असताना स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने नेमके परिणाम स्त्रीयावर व एकूण समाजावर काय होतात हे पहावे लागेल. या परिणामावरूनच आपणास स्त्री शिक्षणाची आवश्यकता व महत्त्व समजून येईल. म्हणून ते परिणाम पुढीलप्रमाणे :-

### १. निरक्षरता व अज्ञान :-

स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्यांच्यात साक्षरता येणार नाही. निरक्षर असणाऱ्या स्त्रीला अक्षर ओळखच नसल्याने ती वाचनापासून दूर राहिल, ज्ञानप्राप्तीपासून वंचित राहते. निरक्षरतेमुळे ती स्वत:चाच नव्हे तर आपल्या कुटुंबाचा विकास करण्यास असमर्थ ठरते. आपल्या भावी पिढीच्या शिक्षण प्रक्रियेत योगदान देऊ शकणार नाही. एकूण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या अशी राहिली तर स्त्रीचाच

नव्हे तर तिच्याबरोबरीने एकूणच विकासाला बाधा पोहचते. म्हणूनच एकूण विकास प्रक्रियेसाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता आहे.

स्त्रिया शिक्षण प्रक्रियेपासून दूर राहिल्या तर त्या ज्ञानी होणार नाहीत. त्या अनेक बाबतीत अज्ञानी राहतात. त्यामुळे त्यांच्या व एकूण समाजाच्या समस्यात वाढ होते. अज्ञानामुळे त्यांना त्या आरोग्यविषयक माहिती, आरोग्य विषयक समस्याचे शास्त्रीय ज्ञान प्राप्त होणार नाही. परिणामी, त्यांना आवश्यक शारीरिक, मानसिक आरोग्य प्राप्त होणार नाही. अज्ञानामुळे चुकीच्या अमानवी प्रथा-परंपरांना त्या बळी पडतात. साहजिकच त्या विकासापासून वंचित राहतात, म्हणूनच विकास प्रक्रियेत स्त्री शिक्षणाची आवश्यकता आहे.

## २. परावलंबित्व :-

स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने त्या सर्वच बाबतीत परावलंबी राहतात. एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी लोकसंख्या सर्वच बाबतीत परावलंबी राहणे हे कोणत्याच देशाच्या विकास प्रक्रियेला परवडणारे नाही व असे परावलंबित्व केवळ लिंगभेदाने स्त्रियावर लादणे हे मानवतेलाही धरून नाही. शिक्षणच नसल्याने स्त्रीयांवर आर्थिक, परावलंबित्व लादले जाते त्यातून इतर सर्वच परावलंबित्व तिच्यावर लादले जाते. असे परावलंबित्व म्हणजे स्त्रीवरती केलेला एक अन्यायच. म्हणूनच स्त्री शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित होते.

## ३. हक्क व अधिकाराविषयी अज्ञान :-

शिक्षणाच्या अभावामुळे स्त्रीला एक व्यक्ती म्हणून, एक नागरिक म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य करण्यात आलेले हक्क व अधिकार याबाबत त्या अज्ञानीच राहतात. आपल्याला प्राप्त हक्क, अधिकारांची जाणीवच नसल्याने ते हक्क व अधिकार प्राप्तीसाठी ती प्रयत्न करणे शक्य नसते. जे हक्क व अधिकार तिच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहेत त्याचेच अज्ञान असल्याने त्या विकासापासून वंचित राहतात.

## ४. निर्णय प्रक्रियेत स्थान नाही :-

एका बाजूला स्त्रीला शिक्षणापासून जाणीवपर्वूक दूर ठेवणे व दुसऱ्या बाजूला स्त्री अज्ञानी असते, तिच्यात निर्णयक्षमता नसते, तिला काय कळते? असा युक्तीवाद करून कुटुंब, समाजजीवन, आर्थिक क्रिया, राजकारण इत्यादी सर्वच क्षेत्रात व सर्वच पातळ्यावर तिला गौण स्थान दिले जाते व निर्णय प्रक्रियेपासून तिला दूर ठेवले जाते व ती स्वत: ही शिक्षित नसल्याने निर्णय प्रक्रियेत ज्ञानाअभावी आवश्यक ते योगदान देण्यास असमर्थ ठरते.

## ५. निम्न सामाजिक दर्जा :-

शिक्षणापासून वंचित राहिल्याने आर्थिक व इतर बाबतीतील परावलंबन, निर्णय प्रक्रियेत स्थान नसणे, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात नाकारण्यात आलेला सहभाग. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे स्त्रीयांना निम्न सामाजिक दर्जा देण्यात आला. साहजिकच त्या सर्वांगीण विकासापासून वंचित राहिल्या. म्हणूनच स्त्री शिक्षणाची आवश्यकता असते.

## ❐ महिला शिक्षणासाठी झालेल्या प्रयत्नाचा आढावा :-

भारतात खऱ्या अर्थाने ब्रिटिश कालखंडापासून स्त्री शिक्षणाच्या जाणीव जागृतीबद्दल तसेच प्रचार-प्रसाराबद्दल प्रयत्न झालेले दिसतात. या संदर्भात ब्रिटिश शासनाकडून महत्त्वाचे प्रयत्न झालेले दिसतात ते पुढीलप्रमाणे :-

१. लॉर्ड डलहौसीने शिक्षणासंबंधीचे सरकारी धोरण जाहीर केले व स्त्री शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्विकारली.

२. वुडच्या शिक्षणविषयक खलित्यात 'स्त्री शिक्षणामुळे समाजाची सांस्कृतिक आणि नैतिक पातळी उंचावेल म्हणून स्त्री शिक्षण महत्त्वाचे मानावे असू नमूद केले.

३. १८८२-८३ साली नेमलेल्या 'भारतीय शिक्षण आयोगाने स्त्री शिक्षणासाठी निधी उपलब्ध करून दिले पाहिजेत व मुलीसाठी स्वतंत्र शाळा सुरू करणाऱ्या खाजगी संस्थांना अनुदान द्यावे अशी शिफारस केली.

४. व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने स्त्री शिक्षणास शासनाचा प्रत्यक्ष पाठिंबा जाहीर केला.

५. भारतातील शिक्षणविकासाबाबत नेमलेल्या 'सार्जंट कमिशन'ने मुला-मुलींना सारख्याच प्रकारचे शिक्षण दिले जावे असे सुचवले.

याचबरोबर खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणामध्ये गतीमानता, परिणामकारकता ही भारतीय समाज सुधारकांनी केलेल्या प्रयत्नातून साध्य झाल्याचे दिसते. पुढील समाजसुधारकांनी यासाठी प्रयत्न केले.

(अ) महात्मा जोतिबा फुले यांनी १८४८ मध्ये मुलींची शाळा सुरू केली. तसेच हंटर कमिशनसमोरच्या साक्षीत स्त्री शिक्षणाच्या आवश्यकतेचा विचार जोरकसपणे मांडला.

(आ) सावित्रीबाई फुले या पहिल्या भारतीय महिला शिक्षिका म्हणून कार्य केले व स्त्री शिक्षणाच्या विकासात प्रत्यक्ष योगदान दिले.

(इ) भारतीय शिक्षण पध्दतीच्या पुर्नरचनेसंदर्भात नेमलेल्या हंटर कमिशनसमोर १८८२ ला पंडिता रमाबाई यांनी स्त्री शिक्षणाच्या आवश्यकतेबाबत आपली साक्ष नोंदवली तसेच स्त्री शिक्षणाबाबत कार्य केले.

(ई) महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी जीवनभर अतुलनीय कार्य केले.

(उ) डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनीही स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

(ऊ) राजर्षी शाहू महाराज यांनीही आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराला चालना दिली.

(ए) याचबरोबर स्त्री शिक्षणासंदर्भात डॉ. आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे यांचे योगदानही मोलाचे ठरले.

(ऐ) तसेच ब्राम्होसमाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज यांचे स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञानही पूरक ठरले.

६. तथापि, स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्री शिक्षणासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न झाल्याचे स्पष्ट होते.

(अ) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार, उद्देश पत्रिका, मूलभूत तत्त्वे त्याचबरोबर कलम १४ व कलम १५ (३) यातील तरतुदी यामुळे स्त्री शिक्षणाला घटनात्मक पाठबळ लाभले.

(ब) शिक्षणाच्या संदर्भातील १९४८ चा राधाकृष्ण आयोगाने स्त्रीयांना शिक्षणासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात इत्यादी शिफारशी केल्या.

(क) १९५२-५३ च्या मुदलियार आयोगाने जे शिक्षण मुलांना मिळते ते मुलींनाही मिळाले पाहिजे अशी शिफारस केली.

(ड) १९५८ च्या दुर्गाबाई देशमुख समितीने, स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली जावी. पंचवार्षिक योजनेत स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देणे, त्यांना व्यावसायिक शिक्षणाची सोय करावी इत्यादी शिफारशी केल्या.

(इ) १९६१ च्या हंसा मेहता समितीने मुले-मुलींच्या शिक्षणातील दरी कमी करावी, अधिकाधिक शिक्षिकांच्या नेमणूका मुलींच्या शाळेत कराव्या इत्यादी शिफारशी केल्या.

(प) १९६४-६६ च्या कोठारी आयोगाने राष्ट्रीय परंपरा व गरजा यांचा योग्य समन्वय साधून स्त्री शिक्षणाचा आराखडा तयार करणे, दूरशिक्षण, व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या शिफारशी केल्या.

(फ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्त्री शिक्षणासाठी कालबध्द कार्यक्रम, त्यांना व्यावसायिक, तांत्रिक, तंत्रज्ञानबाबत शिक्षणाची सोय यासाठी आर्थिक तरतूदीची शिफारस केली.

(ब) राष्ट्रीय महिला आरोग, १९९०, महिला प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम १९८७, महिला सबलीकरण राष्ट्रीय धोरण २००१, महिला समानतेसाठी शिक्षणाचा कार्यक्रम 'महिला सामाख्या कार्यक्रम १९८९', राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद, १९६२, भक्तवत्सल्म कमिटी, १९६३, फूलरेणू गुहा समिती १९७१, आचार्य राममूर्ती समिती १९८८-८९, शिक्षण राष्ट्रीय कृती आराखडा १९९८-२०००, सर्व शिक्षा अभियान २००१ या सर्वांचे स्त्री शिक्षण विकासात महत्त्वाचे योगदान राहिले.

(भ) याचबरोबर स्त्री शिक्षण विकासासाठी शिष्यवृत्त्या, अनुदान, मोफत सायकल, शैक्षणिक साहित्य मोफत, मोफत शिक्षण इत्यादी सुविधा यामुळे, स्त्री शिक्षण व स्त्री साक्षरतेत विकास झाल्याचे पुढील विश्लेषणावरून दिसते.

## ❐ महिला शिक्षणाची स्थिती व विकास :-

भारतात ब्रिटिश कालखंडापासून आजपर्यंत झालेल्या स्त्री शिक्षणाच्या प्रसार-प्रचार कार्याच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून भारतात स्त्री शिक्षणाच्या बाबतीत उत्तरोत्तर विकास होत असलेला पुढील सांख्यिकी माहितीवरून स्पष्ट होते.

१. भारतात १९०१ ते २०११ या एकशे दहा वर्षात स्त्री साक्षरतेत झालेली प्रगती पुढील कोष्टकातील सांख्यिकीय माहितीवरून दिसून येते.

**कोष्टक क्र. १**

| वर्ष | स्त्री साक्षरता (%) | वर्ष | स्त्री साक्षरता (%) |
|---|---|---|---|
| १९०१ | ०.६० | १९६१ | १२.९५ |
| १९११ | १.०५ | १९७१ | १८.६९ |
| १९२१ | १.८१ | १९८१ | २४.८८ |
| १९३१ | २.९३ | १९९१ | ३९.०२ |
| १९४१ | ७.३० | २००१ | ५४.०० |
| १९५१ | ७.९३ | २०११ | ६५.४६ |
| **Source :** Census of India, 2011. | | | |

उपरोकत कोष्टक क्र. १ वरून हे स्पष्ट होते की, १९०१ मध्ये स्त्री साक्षरता ०.६० टक्के इतकी अल्प होती, ती २०११ मध्ये ६५.४६ टक्के इतकी झाली. तसेच हेही स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्री साक्षरतेचा टक्का अपेक्षेइतका नसला तरी ब्रिटिश कालखंडाच्या तुलनेत गतीने वाढला आहे.

**कोष्टक क्र. २ : उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग**

| अ. नं. | वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | १९५०-५० | १०.९० % |
| २. | १९६०-६१ | १६.२० % |
| ३. | १९७०-७१ | २१.९० % |
| ४. | १९८०-८१ | २७.२० % |
| ५. | १९९०-९१ | ३२.०० % |
| ६. | १९९५-९६ | ३४.१० % |
| ७. | २००२-०३ | ४०.०५ % |

**Source :** Karuna Chanana, 'Trading the Hollowed Halls : Women in Higher education in India', in Economic and Political weekly, Vol. 35, No. 12, March 18 PP 1022-2 & UGC, Annual Report 2002-03.

उपरोक्त कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, भारताच्या स्वातंत्र्यावेळी उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग हा केवळ १०.९ टक्के इतका होता. तर स्वातंत्र्याच्या ५५ वर्षांनंतर तो ४०.०५ टक्के इतका वाढला. अर्थात ही वाढ अपेक्षेपेक्षा कमी असली तरी सकारात्मक आहे.

**कोष्टक क्र. ३ : विविध ज्ञानशाखेनुसार उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागाचे वर्गीकरण**

| अ.नं. | ज्ञानशाखा | वर्ष व टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | १९७०-७१ | २००२-०३ |
| १. | कलाशाखा (आर्टस्) | ६७.९ % | ६४.३ % | ५१.१ % |
| २. | विज्ञान (सायन्स) | २१.० % | २५.७ % | १९.९ % |
| ३. | वाणिज्य (कॉमर्स) | ०.४ % | १.९ % | १६.५ % |
| ४. | शिक्षण (एज्युकेशन) | ३.१ % | ३.२ % | १.८ % |
| ५. | अभियांत्रिकी | ०.०४ % | ०.१ % | ४.२ % |
| ६. | वैद्यकीय | ५.८ % | ३.४ % | ३.६ % |
| ७. | कायदा (लॉ) | ०.७ % | ०.४ % | १.७ % |
| ८. | कृषी | १.१ % | ०.९ % | ०.३ % |

**Source :** U.G.C., University Development in India, Basic facts and figures 1995-96 to 2000-2001, Information and Statistics Bureau, New Delhi & Karuna Chanana artical in S. Chitnis and Philip & Altbach (eds), 'Higher Education and Social change in India, Sage, New Delhi, pp. 115-54.

उपरोक्त कोष्टकातील सांख्यिकीय माहितीवरून उच्च शिक्षणातील विविध ज्ञानशाखेचे शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण स्पष्ट होते. तसेच नोकरी, रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने महिलांचा उच्च शिक्षणाबाबत निवडावयाच्या ज्ञानशाखेसंदर्भातील बदलणारा कल लक्षात येतो.

## ❑ स्त्री शिक्षणाच्या विकासामुळे झालेला स्त्री विकास अथवा स्त्री शिक्षणाच्या विकासाचे परिणाम :-

**कोष्टक क्र. ४**

**संघटित व असंघटित क्षेत्रातील महिला रोजगाराची स्थिती (टक्के)**

| वर्ष | संघटित क्षेत्र | असंघटित क्षेत्र |
|---|---|---|
| १९७१ | ६.१६ % | ९३.८४ % |
| २००१ | ३०.८९ % | ९३.१० % |

**Source** : गोपाल १९९५ मॅनपॉवर प्रोफाईल-४, इयट्यूब २००३, आय.ए.एम.आर. दिल्ली, ई सेन्सेस इंडिया, इ. यू. नं. ६,२००.

वरील कोष्टकातील सांख्यिकीय माहितीवरून हे स्पष्ट होते की, १९७१ मध्ये स्त्रीयांचा असंघटित क्षेत्रातील रोजगाराचा वाटा ९३.८४ टक्के होता तो २००१ ला ९३.१० टकके झाला. यामध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही. पण, १९७१ मध्ये स्त्रीयांच्या संघटित क्षेत्रातील रोजगाराचा वाटा ६.१६ % होता तो २००१ सालापर्यंत ३० वर्षात २४.७३ टक्क्यांनी वाढून ३०.८९ टक्के इतका वाढला. स्त्रीयांचा शिक्षणातील सहभाग, त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण यांचा हा सकारात्मक परिणाम होय. त्यांच्या.सर्वांगीण विकासाला चालना मिळण्यास त्यांचा संघटित क्षेत्रातील रोजगाराचा वाढता टक्का सहाय्यभूत ठरेल.

### १. आर्थिक स्वावलंबन :-

महिलांच्यात झालेली शिक्षणविषयक जाणीवजागृती, त्यासाठी विविध पातळ्यांवरील प्रयत्नामुळे शिक्षित स्त्रियांचा टक्का अपेक्षेइतका नसला तरी वाढत आहे. त्यामुळे स्त्रीयांचा रोजगारात विशेषत: संघटित क्षेत्रातील टक्का वाढत आहे. त्यातून प्राप्त होणाऱ्या वेतनामुळे तसेच आर्थिक सेवा-सुविधांमुळे

स्त्रीया की, ज्या रोजगार, स्वयंरोजगार करू लागल्या. संघटित क्षेत्रात काम करू लागल्या त्या आर्थिकदृष्ट्या स्वालंबी बनल्या. हे प्राप्त झालेले आर्थिक स्वावलंबन त्यांच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच साहाय्यभूत ठरणारे आहे.

## २. हक्कांची जाणीव :-

शिक्षणातील स्त्रीयांच्या वाढत्या टक्क्याबरोबर आपल्याला प्राप्त असणारे हक्क व अधिकारांची जाणीव स्त्रीयांच्यात वाढू लागली. एक व्यक्ती म्हणून आपल्याला असणारे नैसर्गिक हक्क, भारतीय राज्यघटनेतून, वेळोवेळी झालेल्या स्त्री-विषयक कायद्यातून, स्त्री विकासाच्या धोरणातून आपल्याला कोणते अधिकार आहेत. आपले हक्क कोणते? यांची जाणीव स्त्रीला झाली. त्यामुळेच आपल्याला प्राप्त हक्क उपभोगता यावेत यासाठी ती चळवळी, आंदोलने, कायदेशीर लढाई लढू लागली व या बाबी त्यांच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत महत्त्वाच्या ठरल्या.

## ३. निर्णय प्रक्रियेत स्थान :-

शिक्षणापासून वंचित असणाऱ्या स्त्री वर्गाला अज्ञानी, त्यांना काय कळते? या दृष्टिकोनातून पाहत कुटुंबात तसेच सार्वजनिक जीवनातही तिला निर्णय प्रक्रियेपासून दूर ठेवले जात. अज्ञानामुळे तीहि गप्प बसत, पण शिक्षित झालेली स्त्री, नोकरी-व्यवसाय इ. सहभागी झालेली स्त्री निर्णय प्रक्रियेतही आपले मत नोंदवू लागली. कुटुंबाच्या, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत तिला सामावून घेणे साहाय्यभूत ठरू लागलं. हळू-हळू का असेना आज शिक्षणामुळे तिच्या बुद्धिमत्ता, बुद्धिकौशल्य यामुळे निर्णय प्रक्रियेत तिला महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे.

## ४. सार्वजनिक जीवनातील सहभाग :-

शिक्षणामुळे स्त्रीयांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढल्याचे दिसते. अर्थात विविध क्षेत्रात देण्यात आलेले स्त्री आरक्षण हे एक याचे कारण असले तरी स्त्रीया शिक्षितच झाल्या नसत्या तर ते आरक्षण केवळ कागदावरच राहिले असते. आज सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक इत्यादी विविध क्षेत्रासंबंधी सार्वजनिक क्षेत्रात स्त्रीचा केवळ सहभागच वाढतो असे नाही तर ती आपल्या कार्याचा ठसा उमटवत असलेचे दिसते. वेगवेगळ्या सामाजिक समस्यावर ती आज आपली मते निर्भिडपणे मांडताना दिसते ती शिक्षित झाल्यामुळेच.

## ५. स्त्रीयांच्या आत्मविश्वासात व आत्मसन्मानात वाढ :-

स्त्रीयांना शतकानुशतके शिक्षणापासून व सार्वजनिक जीवनापासून दूर ठेवून 'चूल व मूल' यात बंदिस्त केल्यामुळे तिच्यातील आत्मविश्वास व आत्मसन्मानच हिरावला गेला होता, तो शिक्षणामुळे

हळूहळू तिच्यामध्ये येत आहे. आपणही कोणत्याही क्षेत्रात, अगदी सीमेवर संरक्षण दलातही काम करू शकतो हा आत्मविश्वास व त्यातून तिला लाभलेला आत्मसन्मान तिच्या सर्वांगीण विकासात खूपच महत्त्वाचा ठरतो की, जो येण्यामध्ये तीचा शिक्षितपणा खूपच कारणीभूत आहे.

### ६. स्त्री दर्जात होत असलेली वाढ :-

स्त्रीयांना शिक्षणापासून दूर ठेवल्याने, सार्वजनिक जीवनातील तिचा सहभागही नाकारला गेला होता, ती केवळ एक वस्तू अथवा भोगदासी म्हणूनच तिच्याकडे पाहिले जात, पण शिक्षणात स्त्रीयांनी केलेल्या प्रगतीमुळे हळू-हळू त्या नोकरी-व्यवसाय करू लागल्या. सार्वजनिक जीवनात सहभाग घेऊ लागल्या, निर्णयप्रक्रियेत आपले मत नोंदवू लागल्या. या सर्वातून स्त्रीचे बुद्धीकौशल्य, निर्णयक्षमता व विकास प्रक्रियेतील तिची आवश्यकता याची ओळख तिने जगाला दिली व साहजिकच आज अपेक्षेएवढी नसली तरी स्त्रीच्या सामाजिक दर्जात वाढ होताना दिसत आहे.

### ७. अज्ञान, अंधश्रध्देच्या वाटेवरून ज्ञानविकासाच्या वाटेवर :-

स्त्री शिक्षित नव्हती त्यावेळी अज्ञानाने ती तिच्यावर लादलेली अनेक बंधने स्वीकारत होती की, जी मानवतावादाला धरून नव्हती. या अज्ञानातूनच तसेच अमानवी प्रथा-परंपरेतून ती विकासापासून वंचित राहिली. तिच्या अज्ञान व अंधश्रध्दांचा तिच्या विकासावर विघातक परिणाम झाला. पण ती शिक्षित झाल्याने, होत असल्याने तिच्यातील अंधश्रध्दा व त्यातून लादली गेलेली बंधने ती झुगारून देऊ लागली. चुकीच्या प्रथा-परंपरा नाकारू लागली. उदा. स्त्रीने पुर्नविर्वाह करू नये, पती हाच परमेश्वर, त्याचा छळही प्रसाद म्हणून स्वीकारावा इत्यादी. शिक्षणामुळे अज्ञान, अंधश्रध्देच्या वाटेवरून तिचा प्रवास ज्ञानविकासाच्या वाटेवरून सुरू झाला आहे. हा प्रवास तिच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे.

## ✲ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✲

❒ **रिक्त जागा भरा.**

१. उच्चप्रतीचे शिक्षण म्हणजे जे केवळ माहितीच देत नाही तर सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालून देते असे शिक्षणाबद्दलचे मत .............. व्यक्त केले आहे.

२. ............... या व्हॉईसरॉयने स्त्री शिक्षणास शासनाचा प्रत्यक्ष पाठिंबा जाहीर केला.

३. राष्ट्रीय परंपरा व गरजा यांचा योग्य समन्वय साधून स्त्री-शिक्षणाचा आराखडा तयार करण्याची व स्त्रीयांना व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची शिफारस ............. आयोगाने केली.

४. महिला सबलीकरण राष्ट्रीय धोरण ............... ला जाहीर करण्यात आले.

५. सन २०११ ला भारतातील स्त्री साक्षरता .............. टक्के होती.

## ३.४ सारांश

समाज विकासाचे शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'कोणत्याही समाजाची उन्नती ही त्या समाजाच्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते. तथापि, ब्रिटिश कालखंडापर्यंत भारतात शिक्षणाचा, साक्षरतेची स्थिती खूपच चिंताजनक होती. शिक्षणाचा अभाव व दारिद्र्य यांचा जवळचा सहसंबंध आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'भारतीयांच्या गरीबीचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव हे आहे.' ब्रिटिश कालखंडात शिक्षणाबाबतच्या जाणीव जागृतीचे कार्य खऱ्या अर्थाने सुरू झाले. ब्रिटिश शासन व विशेषत: भारतातील समाज सुधारकांचे याबाबतचे कार्य महत्त्वपूर्ण योगदान देणारे ठरले. त्यामुळेच भारतात विशेषत: स्वतंत्र भारतात शिक्षणावर भर देण्यात आला. यासाठी कायदे केले गेले तसेच विविध सेवा-सुविधा दिल्या गेल्या. शिक्षणाच्या चौकटीबाहेर ठेवलेल्या अनुसूचित जाती, जमाती व समस्त स्त्रीवर्गाला शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी अनेक सेवा-सुविधा देण्यात आल्या व त्याचे अपेक्षेएवढे नसले तरी निश्चितपणे सकारात्मक परिणाम दिसत आहेत.

तथापि, शिक्षणामुळे स्त्रियांच्या विकासाला, स्त्री-पुरुष समानता प्रक्रियेला सुरवात झाली आहे. आजही याबाबत आपण अपेक्षित यश प्राप्त करू शकलेलो नाही हे मान्य करावे लागेल. स्त्रीयांचा निर्णय प्रक्रियेत, सार्वजनिक जीवनातील सहभागाला सुरवात झाली आहे. तरीही त्यांच्यावरील अत्याचार, त्यांचे सामाजिक स्थान याकडे तटस्थपणे पाहता आजही स्त्री विकास खरंच झाला का? हा प्रश्न पुढे येतो. हे जरी खरे असले तरी विकासाच्या प्रवासाला सुरवात झाली आहे व अजूनही खूप मोठा पल्ला गाठणे बाकी आहे. यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे हे मान्यच करावे लागेल.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ✲ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ✲

१. हंटर आयोग

२. मुंबई

३. कलम ३० (१)

४. मुलांच्या पालकांचे

५. सावित्रीबाई फुले.

### ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ✻

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.

२. अनुसूचित जातीच्या.

३. तालुका स्तरावर.

४. राजीव गांधी.

५. २००३.

### ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✻

१. रवींद्रनाथ टागोर.

२. लॉर्ड कर्झन.

३. कोठारी.

४. सन २००१.

५. ६५.४६ टक्के.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

**प्रश्न १ : टिपा लिहा/लघुत्तरे लिहा.**

१. शिक्षणाचा हक्क व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबतच्या घटनात्मक तरतुदी स्पष्ट करा.

२. महिला विकासासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करा.

३. भारतात महिला शिक्षणासाठी झालेले प्रयत्न.

४. शिक्षणामुळे झालेला महिलांचा विकास.

५. सक्तीच्या, मोफत प्राथमिक शिक्षणांकरिताच्या सोयी-सुविधा.

**प्रश्न २ : पुढील प्रश्नांची दीर्घोत्तरे लिहा.**

१. सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या हक्काचा कायदा २०१० स्पष्ट करा.

२. सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाकरिताच्या सोयी-सुविधा स्पष्ट करा.

३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता देण्यात आलेल्या शैक्षणिक सेवा-सुविधा स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले,** *'भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४.

२. **महेश अभापुरे,** *'सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजना व सवलती'*, साकेत प्रकाशन, पुणे.

३. *'Economic Survey',* 2012 - 13.

४. *'Quinquennial Report',* Ministry of Education and culture.

५. *'Employment Review, 2005-2006'*, New Delhi.

६. *'आई, वडिल आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१०',* फेस्कॉम, अकोला.

६. *'National Policy for Senior Citizens'*, March, 2011.


❑ ❑ ❑

घटक–४

# कल्याणकारी योजना आणि कायदे
# (Welfare : Policies and Legislations)

## घटक संरचना

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ कामगार कल्याण

४.३.२ बालकामगार कल्याण

४.३.३ महिला कल्याण

४.४ सारांश

४.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. कामगारांच्या कल्याणकारी योजना माहीत होतील.

२. कामगारांसाठी असलेल्या विविध कायदेविषयक तरतुदी समजतील.

३. बालकामगार कल्याण योजना समजतील.

४. बालकल्याणविषयक कायद्यांची माहिती मिळेल.

५. महिला कल्याणविषयक योजना समजतील.

६. महिलांच्या कल्याणासाठी असलेल्या कायदेविषयक तरतुदी समजतील.

## ४.१ प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाजव्यवस्था विकसित करत असताना तेथील मानवी समाजाच्या विकासाचा विचार करणे गरजेचे आहे. म्हणूनच हे वास्तवतेत आणण्यासाठी निर्माण केलेल्या समाज कल्याणकारी योजना व कायद्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

समाजकल्याण ही अतिशय व्यापक संकल्पना असून तिच्या माध्यमातून विशिष्ट, दुर्बल समुदायाच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक गरजांची जोपासना केली जाते व मानवी जीवनाला भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणूक करते.

मानवी समाजातील दुर्बल घटक म्हणून समजले जाणारे महिला व बालक आणि कामगार या तीन घटकांच्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे येथे आवश्यक आहे. या सर्वांच्या संरक्षणासाठी व विकासासाठी निर्माण केलेल्या विविध कायद्यामुळे त्यांच्या अडचणी दूर होणे शक्य हाणार आहे. म्हणून या कायद्यांचाही सविस्तर अभ्यास करावा लागेल.

## ४.३ विषय विवेचन

समाजकल्याण अंतर्गत मानवी समाजातील काही महत्त्वपूर्ण घटकांच्या कल्याणाचा अभ्यास करणे अतिशय आवश्यक ठरते. भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय कल्याणाच्या दृष्टीने कामगार, बालकामगार व महिला कल्याणाचाही विकास व्हावा यादृष्टीने ते आपल्यात सामील झाले पाहिजेत. या प्रकरणात आपणास प्रथम कामगारांच्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करावा लागेल व त्याचबरोबर कामगारांच्या कायदेशीर तरतुदींही विचारात घेणार आहोत. त्यानंतर दुसऱ्या भागात बालकल्याणाच्या व बालकामगारांच्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करून बालकासंबंधाचे विविध कायदे पाहणार आहोत व प्रकरणाच्या तिसऱ्या भागात आपण महिलांसाठीच्या शासकीय व इतर विविध योजना अभ्यासून पुढे महिलांच्या कायदेशीर तरतुदींचा आढावा घेतला आहे.

### ४.३.१ कामगार कल्याण (Labour Welfare)

भारताचा आर्थिक विकास साधत असताना औद्योगिकीकरणाच्या विकासाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि हे साध्य करण्यासाठी कामगार कल्याणाची आवश्यकता आहे. कामगारांच्या हितासाठी, कल्याणासाठी केलेल्या योजना म्हणजे कामगार कल्याण होय. कामगारांना ज्या गोष्टी स्वत:साठी मिळवता येणार नाहीत, त्या पुरविल्याने त्यांचे जीवममान उंचावले जाते. कामगारांची कार्यक्षमता वाढेल, कामगार संतुष्ट, समाधानी राहतील व औद्योगिक कलह निर्माण होणार नाहीत, कामगारांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. या उद्देशाने कामगार कल्याण योजना अस्तित्त्वात आल्या.

कामगार कल्याण प्रामुख्याने तीन प्रकारातून केले जाते.

**१. कामगारांचे कायदेशीर कल्याण :-**

या प्रकारात मालक वर्गाला कायद्यातील तरतुदीनुसार कामाचे तास, वेतन, बोनस, सुट्ट्या, रजा, आरोग्यविषयक सोयी-सवलती द्याव्या लागतात. असे करण्याबाबत कायदेशीर बंधन मात्र राहते.

**२. कामगारांचे ऐच्छिक कल्याण :-**

या प्रकारात मालक स्वत:हून कामगारांसाठी सोयी-सवलती देतात. त्यामुळे कारखान्याचा नावलौकिक होतो. बाहेरचे कामगार या कारखान्यात नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करतात व प्रत्यक्ष तिथे काम करणाऱ्या कामगारांना नोकरी सोडून इतरत्र जावेसे वाटत नाही.

**३. कामगारांचे पारंपारिक कल्याण :-**

या प्रकारात कामगार आपण होऊनच आपली सोय व्हावी यासाठी प्रयत्न करतात. कामगार संघटना आपल्या कामगारांच्या सोयी सवलतीसाठी प्रयत्न करतात.

- आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या फिलाडेल्फिया घोषणेत १९४४ मध्ये कामगारांसाठी पुरेसे पोषण, गृहनिर्माण, मनोरंजनाविषयी सोयी-सवलती कामगारांना मिळवून देणे या गोष्टींचा उल्लेख आहे.
- १९४७ मध्ये तिसाव्या अधिवेशनात कामगारांसाठी पुरेशी उपहारगृहे, आरोग्यविषयक सोयी, विश्रांती, मनोरंजन, कामाच्या ठिकाणी येण्यासाठी वाहतुकीची सोय इ. सोयी असाव्यात असा ठराव केला.
- भारतात (१) कायदेशीर, (२) शासकीय, (३) ऐच्छिक, (४) कामगार संघटना व (५) इतर ऐच्छिक संस्थांमार्फत अशा पाच प्रकारे कामगार कल्याणाचे कार्य चालते.
- कामगार कल्याणांतर्गत पुढील प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे.
  १. भरपूर पाणी, स्नान व धुण्याची सोय असावी. स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.
  २. विश्रांतीसाठी जागा व प्रथमोपचार साधने उपलब्ध असावीत.
  ३. २५० किंवा अधिक कामगार असल्यास स्वच्छ व स्वच्छ उपाहारगृहे असावीत.
  ४. १५० पेक्षा अधिक कामगार असल्यास भोजनालयाची सोय असावी.
  ५. ५० किंवा अधिक स्त्री कामगार असल्यास पाळणाघराची सोय असावी.

६. ५०० पेक्षा जास्त कामगार असल्यास स्वतंत्र कामगार कल्याण अधिकारी (Labour Welfare Officer) नेमावा.

७. कामगार कल्याण योजना मालक व कामगार प्रतिनिधी यांनी ठरवाव्यात.

कामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. पण त्याचबरोबर कामगारांना कायदेशीर संरक्षणाची देखील आवश्यकता आहे. याचीही जाणीव निर्माण झाली व विविध प्रकारचे कामगारविषयक कायदे अस्तित्त्वात आले.

## ४.३.१.१ अ) कामगारविषयक कायदे :-

प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना व धोरणे आखली गेली. कामगार हा प्रथम एक माणूस आहे, त्याचे शोषण केले जाऊ नये, त्याला त्याचे हक्क मिळाले पाहिजेत. या संदर्भातून भारतात अनेक कामगारविषयक कायदे संमत करण्यात आले. त्यातील काही प्रमुख कायदे पुढीलप्रमाणे.

### १. किमान वेतन कायदा, १९४८ -

या कायद्यानुसार ज्या उद्योगव्यवसायात वेतनाचा किमान दर निश्चित करणे आवश्यक आहे, असे केंद्र व राज्य सरकारना वाटते त्या उद्योगव्यवसायांना हा कायदा लागू करण्याचा अधिकार या कायद्याने दिला. यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करून त्यांच्यामार्फत उद्योगाच्या स्वरूपानुसार व कामाच्या स्वरूपावरून किमान किती वेतन द्यावे हे निश्चित केले जाते. या कायद्याने कामगारांना देण्यात येणारे वेतन पैशाच्या स्वरूपात देण्याची तरतूद करण्यात आली.

### २. कामगार राज्य विमा कायदा, १९४८ -

या कायद्यांतर्गत पुढील तरतुदी लागू केल्या.

१. क्षय व कर्करोग सोडून इतर रोगांनी त्रस्त आजारी कामगारास ५६ दिवसापर्यंत सहाय्य करण्याची तरतूद.

२. कामगार कामावर असताना अपघात वा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई.

३. आरोग्यवियक सोयी-सुविधा.

४. स्त्री कामगारांना १९५९ पासून नैसर्गिक आपत्ती व आजारी काळात १२ आठवड्यापर्यंत संपूर्ण वेतन देणे.

५. स्त्रियांना प्रसूतीसंदभात वैद्यकीय सुविधा देणे.

## ३. कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ –

१९२३ साली स्वातंत्र्यपूर्ण भारतात संमत झालेल्या कायद्यात पुढील तरतुदी आढळतात.

१. कामगारांना काम करताना अपघात व मृत्यू झाल्यास अपघाताचे स्वरूप व कामगारांचे वेतन लक्षात घेऊन नुकसान भरपाई देणे.

२. भारतातील प्रमुख २७ प्रकारच्या उद्योगांना हा कायदा लागू करण्यात आला.

३. नुकसानभरपाई कारखानदाराने द्यावी.

४. अपघातानंतर चार दिवसाच्या आत पगाराची अर्धी रक्कम नुकसानभरपाई दिली जाते.

५. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आयुक्तांची नेमणूक केली जाते.

## ४. कारखाना कायदा, १९४८ –

भारतात १८८१ ला महिला कारखानाविषयक कायदा झाला, त्यानंतर १९३४ ला केलेल्या कारखाना कायद्यात पुढे वारंवार सुधारणा किंवा दुरुस्त्या केल्या. त्यानंतर स्वतंत्र भारतात सरकारने संपूर्ण कायदा नव्या स्वरूपात करून १९४८ मध्ये संमत केला. या कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. ज्या कारखान्यात विद्युतशक्ती वापरली जाते व तिथे १० पेक्षा जास्त कामगार आणि जिथे विद्युतशक्ती वापरली जात नाही तिथे २० पेक्षा जास्त कामगार काम करतात, त्या सर्व कारखान्यांना हा कायदा लागू.

२. प्रौढ कामगारांना एका आठवड्यात ४८ तासापेक्षा जास्त काम देता येणार नाही.

३. दिवसाला ९ तास काम द्यावे.

४. कामगाराला अर्ध्या तासाची विश्रांती दिली जावी.

५. १४ वर्षाखालील मुलांना कामावर घेता येणार नाही.

६. स्त्रियांना रात्रीचे काम देता येणार नाही.

७. कामगारांना पगारी रजा व सुट्ट्या देणेची तरतूद.

८. कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहे, विश्रांती कक्ष, जेवणाची खोली, महिला कामगारांच्या मुलांसाठी शिशुगृह, प्रथमोपचारांची सोय, धोक्यापासून संरक्षणाची तरतूद अशा अनेक तरतुदी या कायद्याने केल्या.

## ५. कामगार प्रॉव्हीडंड फंड कायदा, १९५२ –

केंद्र शासनाने औद्योगिक कामगारांना प्रॉव्हीडंड फंड, विमा, निवृत्ती वेतन यातून निवृत्तीनंतरही कामगारांना आर्थिक सुरक्षितता या कायद्याने मिळते. २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या उद्योग-व्यवसायातील कामगारांना हा लाभ मिळेल. या कायद्यांतर्गत कामगार प्रॉव्हीडड फंड १९५२, कामगार निवृत्ती वेतन योजना १९९५, कामगार डिपॉझीट लिक्विड इन्शुरन्स योजना १९७६ अशा तीन योजना तयार करण्यात आल्या.

## ६. बोनस वेतन कायदा, १९६५ –

केंद्र शासनाने कामगारांना हक्काचा बोनस दिला जावा या उद्देशाने १९६५ ला हा कायदा केला. यानुसार ज्या कामगारांचे मासिक वेतन ३५०० रुपयांपेक्षा जास्त नाही, त्यांना त्यांच्या मालकाने बोनस द्यावा अशी तरतूद केली.

## ७. कंत्राटी मजूर (नियमन व निर्मूलन) कायदा, १९७० –

१. या कायद्याने ज्या ठेकेदार व कंत्राटदाराकडे २० पेक्षा जास्त कामगार काम करत असतील त्यांना परवाना घेणे बंधनकारक केले.

२. एकाच ठिकाणी तीन महिन्यापेक्षा जास्त काळ असेल तर त्यांच्या राहण्याची व इतर सुविधांची सोय करावी.

३. कामाच्या ठिकाणी प्रथमोपचार सोय असावी.

४. कायम कामगार व कंत्राटी कामगाराच्या वेतनात फरक नसावा.

५. कामगारांचे वेतन कामाच्या ठिकाणीच दिले जावे.

## ८. समान वेतन कायदा, १९७६ –

१. या कायद्यानुसार स्त्री-पुरष कामगार जर सारखेच काम करत असतील, तर त्यांना समान कामासाठी समान वेतन दिले जावे.

२. कामगार भरती करताना स्त्री-पुरुष लिंगभेद करणेस मनाई करणेत यावी.

३. स्त्री रोजगार व नोकरीच्या संधी मिळवून देणेचा प्रयत्न करावे.

## ९. वेठबिगार पध्दती निर्मूलन कायदा, १९७६ –

या कायद्याने वेठबिगारी पध्दती बंद केली. वेठबिगारांची पिळवणूक व शोषण थांबवले. जर कोणी

वेठबिगारी राबवित असेल तर कायद्याने ते गुन्हेगार मानून त्यांना तुरुंगवास व दंडाची शिक्षा दिली जाते. वेठबिगारांना मुक्त करून त्यांचे पुनर्वसन करणेची ज्या-त्या राज्यांची जबाबदारी राहील.

याशिवाय कामगारांच्या हक्काबाबत व सुरक्षिततेसंबंधी आणखीही काही कायदे करण्यात आले ते पुढीलप्रमाणे :-

**१०. द इंडस्ट्रीयल डिस्पुट ॲक्ट, १९४७.**

**११. मळे व्यवसायविषयक कायदा, १९५१.**

**१२. खाणविषयक कायदा, १९५२.**

**१३. भारतीय व्यापारी जहाज कायदा, १९५८.**

**१४. मोटार वाहतूक कामगार कायदा, १९६१.**

**१५. कामाच्या अटी व कल्याण कायदा. वगैरे.**

### ❒ सारांश :-

कामगारांच्या कल्याणासाठी विविध कल्याणकारी योजनांचा व कायदेशीर तरतुदींचा आढावा वरील स्पष्टीकरणावरून लक्षात येते.

### ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ❋

**❋ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात किमान वेतन कायदा कोणत्या साली अस्तित्वात आला?

२. कामगार प्रॉव्हीडंड फंड कायद्यांतर्गत कोणत्या तीन योजना तयार करण्यात आल्या?

३. बोनस वेतन कायदा कोणत्या साली अस्तित्वात आला?

## ४.३.२ बालकामगार कल्याण (Welfare of Child Labour)

राष्ट्राची गुणवत्ता ही बालकल्याणावर आधारित आहे. मुलं ही राष्ट्रीय संपत्ती आहे. विश्वामध्ये बालक संभाव्य दृढशक्ती आहे असे म्हटले जाते. कोणत्याही राष्ट्राला आपल्या क्षमतांचे ज्ञान त्या राष्ट्रातील बालकांच्या माध्यमातून कळते आणि या सर्व बाबींचे मूल्यांकन त्या राष्ट्राने मुलांकरिता काय केले. कोणत्या योजना राबविल्या आहेत, या माध्यमातून होते. अशा सर्व गोष्टींचा विचार केल्यास

राष्ट्रविकास व बालकल्याण यांचा जवळचा संबंध आहे. असे जरी असले तरी भारतात बालकांच्या अनेक समस्या आहेत. बालकामगारांचे प्रमाणही वाढत आहे. लहान मुलांवर होणारे अत्याचार दूर करण्याच्या हेतुने १९७९ ला आंतरराष्ट्रीय बाल वर्ष तसेच १९९० ला आंतरराष्ट्रीय कन्या वर्ष घोषीत केले.

बालकल्याणाकरिता संयुक्त राष्ट्र बालकोष बाल अधिकार संम्मेलन किंवा विश्व शिखर संस्थांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

## १. संयुक्त राष्ट्र बाल कोष –

मुलांच्या स्थितीमध्ये सुधार घडवून आणण्याकरिता १९४६ ला संयुक्त राष्ट्र बाल आपत्ती कोष दुसऱ्या महायुद्धात पीडीत अनाथ युवकांना संकटकालीन सहाय्य करण्याकरिता स्थापन करण्यात आले. १९५३ ला या नावात विस्तारित बदल केला व UNICEF - युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन इमर्जन्सी फंड तयार करण्यात आला. कुपोषण, निरक्षरता, रोग दूर करण्यासाठी ही योजना निर्माण केली.

## २. संयुक्त राष्ट्र बाल अधिकार उपसंधी, १९८९ –

पोलंडमध्ये या उपसंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला, त्यानुसार मुलांचे जीवन, आरोग्य, शिक्षण, स्वतंत्रता, राष्ट्रीयता ग्रहण करणे इ. गोष्टींचा समावेश केला. प्रामुख्याने मानसिक व शारीरिक अशक्त मुलांवर विशेष लक्ष देऊन त्यांना दत्तक घेण्याबाबत पायवले उचलली.

## ३. संयुक्त राष्ट्र बाल विश्व शिखर परिषद –

या परिषदेचे आयोजन १९९० ला न्यूयॉर्क मध्ये केले गेले. यामध्ये स्वस्थ मुलांची परिकल्पना मांडली. आरोग्यविषयक सुविधा, चांगले भरण व पालनपोषण, बालक व मातापित्यांना शिक्षण या गोष्टींवर भर दिला गेला.

## ❑ भारतात बाल कल्याणाबाबत घटनात्मक तरतुदी :–

१. कलम १५(३), २३ व ३९ नुसार बालकामगार प्रथा बेकायदेशीर मानन्यात यावी. १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना कोणत्याही ठिकाणी काम करण्यास बंदी.

२. कलम २५ नुसार १५ वर्षाखालील कोणत्याही मुलाला कारखाना, खाण वा कोणत्याही धोकादायक ठिकाणी काम दिले जाणार नाही.

३. कलम ३९ नुसार बालकांना शोषणापासून संरक्षण दिले जाते आणि शासनाने बालकांच्या विकासासाठी राष्ट्रीय धोरणांची निर्मिती करावी.

४. कलम ४५ नुसार भारतीय राज्यघटनेच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या आतील सर्व बालकांना त्यांच्या वयाच्या १४ वर्षांपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद केली.

## ❑ मुलांविषयी राष्ट्रीय धोरण :-

भारतात राष्ट्रीय बाल नीती आयोगाने १९५१ ला नियोजन मंडळाची स्थापना झाल्यापासून बालकल्याणाला अधिक महत्त्व देण्यात आले. १९५९ ला विकलांग मुलांसंबंधित राष्ट्रीय समितीची भूमिका तसेच बालअधिकाराची घोषणा केली. १९६० ला सामाजिक व मागासवर्गीय कल्याण अभ्यास समिती नेमली. १९६४ ला शिक्षण मंत्रालयाने शाळेत न जाणाऱ्या मुलांचे अध्ययन केले व त्यांच्या शिक्षणाच्या विशेष तरतूदी केल्या. १९६७ मध्ये बाल कार्यक्रम निर्माण समिती स्थापन करण्यात आली. भारतीय बालविकास परिषदेने मुलांसाटी १९७३ मध्ये सुचविलेल्या आठ कलमी कार्यक्रम या सगळ्याचा परिणाम म्हणून १९७४ मध्ये मुलांसाठी राष्ट्रीय धोरण स्वीकारण्यात आले. १९७५ ला एकात्मिक बालविकास सेवा केंद्र (अंगणवाडी) स्थापन करण्यात आले. मुलांना पोषण आहार, आरोग्यविषयक सुविधा, मुलांचा शारीरिक, मानसिक, नैतिक, सामाजिक विकास करणे मोफत व सक्तीचे शिक्षण देणे, करमणुकीच्या सोयी-सुविधा करणे तसेच बालमृत्यू दर कमी करणे, कुपोषण समस्या सोडविणे, बालविकासात वाढ करण्यासाठी अंगणवाडीची सुरवात करण्यात आली.

## ❑ बालकांसाठी शिक्षण धोरण, १९८६ :-

२१व्या शतकात बालकांना शिक्षण देण्यासाठी राजीव गांधींनी १९८५ साली नवीन शिक्षण धोरण सुरू केले. भारतीय प्राचीन संस्कृतीची ओळख नवीन युवा पिढीला व्हावी हा उद्देश होता. तेव्हाचे शिक्षणमंत्री कृष्णचंद्रपंत यांनी आपला अहवाल त्यावर केला, त्यातील प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे :-

१. शिक्षण हे माणसाला सुसंस्कृत बनविण्याचे माध्यम आहे.

२. राष्ट्रीय एकता व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा.

३. संशोधन व विकास यावर भर असावा.

### धोरणे :-

१. बालविकास घडवून आणण्यासाठी पौष्टिक आहार.

२. 'दिवा देखरेख केंद्र' स्थापन करून गरीब व खेडेगावातील मुले शाळेत जावू शकतील अशी व्यवस्था करणे.

३. नवीन शिक्षणात क्रीडेला महत्त्व असेल.

४. प्राथमिक शिक्षणाबरोबर मुलांच्या पालनपोषणा व आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

५. प्राथमिक बाल्यावस्थेतील देखरेख व शिक्षण कार्यक्रम.

## ❑ बालविकास धोरण, २००२ :-

महाराष्ट्र शासनाने महिलांप्रमाणेच बालविकास धोरण २००२ ला जाहीर केले. या धोरणाच्या विकासासाठी रचनाबद्ध, शिस्तबध्द व नियोजित कार्यक्रम आखण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. या धोरणात पुढील तरतुदी करण्यात आल्या.

१. बालकांची आरोग्याची काळजी घेणे.

२. बालकांचे शिक्षण व मनोरंजनाची व्यवस्था करणे.

३. कुटुंब व समाजात बालकांना उचित स्थान प्राप्त करून देणे.

४. बालकांच्या संरक्षणाची व्यवस्था करणे.

## ❑ भारतीय राज्यघटना व बालकामगारांसंबंधी तरतूदी :-

१. **कलम २४ :** १४ वर्षांखालील मुलांना कोणत्याही कारखान्यात काम करणे किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी.

२. **कलम ३९(१) :** लहान मुलांचे शोषण, नैतिक व शारीरिक हानीपासून संरक्षण.

३. **कलम ४५ :** सर्व लहान मुलांना १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात येईल.

## ❑ भारत सरकारचे बालकामगारासंबंधी धोरण :-

१. भारत सरकारने बालकामगारासंबंधी एक राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यासंदर्भात एकूण १० योजना जाहीर केल्या व त्याची अंमलबजावणी केली. उदा. फिरोदाबाद येथील काच कारखान्यात बालमजूरी बंद केली. फटाक्याच्या कारखान्यातीलही बालमजूरीवर कडक कारवाई केली.

२. १९८७ साली बालकामगारांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी शाळा स्थापन केल्या.

३. १९९३ साली बालमजूरी नष्ट करण्याच्या हेतूने केंद्रीय कामगार मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली.

४. इ.स. २००० पर्यंत घातक उद्योगातील २० दशलक्ष बालकामगारांची सुटका करून त्यांच्या शिक्षणासाठी ८५० कोटी रुपयांची तरतूद केली.

५. सुप्रीम कोर्टाचे निर्देश : १० डिसेंबर १९९६ रोजी जनहित याचिकेच्या निकालात सुप्रीम कोर्टात बालकामगारांच्या कल्याणासाठी भारत सरकारला निर्देश देण्यात आले. उदा.

(१) घातक उद्योगात मुलांना काम कणऱ्यास बंदी.

(२) बालकल्याण पुनर्वसन कल्याण निधी उभारणे.

## ४.३.२.१ ब) बालकांच्या संदर्भातील विशेष कायदे :-

बालकल्याण अंतर्गत विविध योजना व धोरणे आखली व त्यानुसार बालकांच्या हक्कांचे संवर्धन करणेचा प्रयत्न केला जातो. अर्थात बालकांचा विकास करत असताना अनेक समस्या निर्माण होतात. भारतात बालकांच्या हककाचे उल्लंघन होऊ नये म्हणूनच भारतात बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी विविध कायदे करण्यात आले, ते पुढीलप्रमाणे :-

### १. बालक कायदा, १९६० –

बालविकासासाठी व बालकांचे पालनपोषण योग्यरित्या व्हावे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, त्यांना शिक्षणाच्या सोयी–सुविधा मिळाव्यात, निराधार व अपराधी बालकांचे पुनर्वसन योग्य पध्दतीने व्हावे. त्याचबरोबर भारतातील केंद्रशासित प्रदेशातील अपराधी बालकांची चौकशी याबाबतच्या तरतुदी असणारा १९६० चा बालक कायदा होय. या कायद्यातच बालकल्याणाकरिता बालकल्याण मंडळ व बालन्यायालयाची स्थापना करण्याची तरतूद आहे.

### २. बाल न्यायालय कायदा, १९८६ –

या कायद्यातील बालहक्कांसंबंधीच्या महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. मुलांचा छळ, शोषण वा पिळवणूक करणे हा दखलपात्र गुन्हा आहे.

२. या कायद्याची अंमलबजावणी विशेषत: अनाथ, दुर्लक्षित, टाकून दिलेल्या, वाईट मार्गाला लागलेल्या मुलांसाठी केली जाते.

३. दुर्लक्षित बालक व बालगुन्हेगारांना समूपदेशन करून त्यांचे आवश्यक ते संरक्षण देणे व पुर्नवसनाची तरतूद केली.

४. बालगुन्हेगारीची कारणे शोधून त्यावर मार्ग काढणे.

५. बाल न्यायालयात मुलांच्या मनावर आघात होऊ नयेत यासाठी पोलीस, वकील व न्यायाधिश हे सर्व साध्या वेषात राहतील. अशी तरतूद करण्यात आली.

### ३. मुंबईत बालसुधार कायदा, १९४८ –

बालगुन्हेगार हे गुन्हेगारी वातावरणातून दूर व्हावेत, त्यांच्यात सुधारणा व्हावी. म्हणून या कायद्यानुसार बालगुन्हेगारास तुरुंगात न ठेवता सुधारगृहात ठेवण्याची तरतूद आहे. शिवाय बालगुन्हेगारास फाशी, जन्मठेप या शिक्षा करता येत नाहीत.

### ४. भारतीय कारखाना कायदा, १९४८ –

या कायद्यातील बालहक्क व बालकल्याणविषयक तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. या कायद्यानुसार वय वर्ष १५ च्या आतील मुलास 'बालक' म्हणून संबोधण्यात येईल.

२. वय वर्षे १४ च्या आतील मुलास कारखान्यात कामावर ठेवता येणार नाही व १४ वय पूर्ण झालेल्या मुलास कामावर ठेवण्यास योग्यता प्रमाणपत्र त्या व्यवस्थापकाकडे असावे लागते.

३. १४ वर्षे पूर्ण झाले, पण १५ वर्षाच्या आतील असेल तर त्याला दिवसातून साडेचार तासापेक्षा जास्त वेळ कामावर ठेवता येणार नाही.

४. या वयातील मुलांना रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत कामावर ठेवता येणार नाही.

५. धोक्याच्या, अवघड कामावर बालकामगार ठेवता येणार नाही.

### ५. बालकामगार निर्मूलनासाठी कायदा, १९८८ –

या कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. वय १४ पेक्षा कमी असणाऱ्या मुलांना विशेष प्रकारच्या कार्यात कामावर ठेवणे निषेधात्मक असेल.

२. भारतात बालकांच्या हक्क व संरक्षणासंबंधी जे विविध कायदे करण्यात आले. या कायद्यातील 'बालक' व्याख्येत एकरूपता आणणे.

### ६. हिंदू अज्ञान संरक्षण कायदा, १९५६ –

या कायद्यानुसार अज्ञान मुला-मुलींच्या आई-वडील या दोघांचाही मृत्यू झाल्यास त्यांचा सांभाळ व संपत्तीचे संरक्षण न्यायालय करेल अशी तरतूद करण्यात आली. न्यायालयाच्या परवानगीशिवाय संबंधित मुलां-मुलींची संपत्ती विकता येणार नाही, अशी तरतूद या कायद्याने केली आहे.

## ७. बाल न्यायालय (मुलांची देखभाल आणि संरक्षण) अधिनियम, २००० –

राष्ट्रीय बाल कायदा १९८६ अधिनियमाच्या आधारे उपेक्षित व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लहान मुलांची देखभाल, संरक्षण, उपचार, विकास व पुनर्वसनाच्या संदर्भात हा कायदा करण्यात आला. या कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. देशातील सर्व बालकांना समान न्याय व हक्क प्राप्त व्हावेत यासाठी समान कायद्याची निर्मिती करणे.

२. मुलांना त्यांच्या हक्कांचा कोणी भंग केला तर त्यांना न्याय प्राप्त करून देण्यासाठीचे निकष निश्चित करणे.

३. बालगुन्हेगारी निर्मूलनाकरता निश्चित उपाय योजणे.

४. कोणतेही मूल तुरुंग व पोलिसांच्या ताब्यात जाणार नाही याची दक्षता घेणे.

५. बालविकासासंबंधी स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी, भूमिका व कार्यक्षेत्र निश्चित करणे.

६. मुलांची देखभाल, संरक्षण, विकास व पुनर्वसन करणे व त्यासाठी आवश्यक उपाय योजणे, या कार्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा स्तरावर 'बाल न्याय मंडळ' निर्माण केले जाते.

७. या कायद्यानुसार बाल गुन्हेगारांना निरीक्षण गृहात ठेवण्याची तरतूद आहे.

८. या अधिनियमानुसार बालगुन्हेगाराचे नाव, फोटो, सार्वजनिक स्वरूपात प्रसिध्द करता येत नाहीत.

## ८. बालहक्क संरक्षण कायदा, २००५ –

बालकाच्या सर्वांगीण विकासाकरिता त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे, योग्य अंमलबजावणी व्हावी याकरिता बालहक्क संरक्षण कायदा आयोगाची निर्मिती करण्यात आली.

या आयोगात एक अध्यक्ष व सहा सदस्य असावेत. सर्व सदस्य या स्त्रिया असाव्यात. त्यांची नियुक्ती केंद्रशासन करते. या आयोगाकडून पुढील कार्ये पार पाडली जातात.

१. बालकांच्या सुरक्षिततेसंबंधी करण्यात आलेल्या तरतुदींची अंमलबजावणी करणे.

२. बालकांच्या संरक्षणाकडे व त्यांच्या गरजांकडे लक्ष देणे.

३. बालहक्कांच्या संरर्भात बदलत्या परिस्थिती व समस्यांवर संशोधन करणे.

४. बालहक्कांच्या जन-जागृतीसाठी प्रोत्साहनासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.

५. बालहक्कांच्या उल्लंघनाबाबत घटनांचा शोध घेऊन त्याबाबतच्या शिफारशी शासनाला करणे.

## ९. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा कायदा, २०१० –

या कायद्यानुसार बालहक्क व बालविकासाशी संबंधित तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१. वय वर्षे सहा ते चौदा वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य केले.

२. या वयोगटातील कोणत्याही मुलास प्रवेश नाकारता येणार नाही.

३. प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलास शाळेतून काढता येणार नाही.

४. इयत्ता पहिली ते आठवी मुलांना नापास करता येणार नाही.

५. शासनाने दुर्बल व वंचित घटकांच्या मुलाबाबत भेदभाव करू नये.

६. शाळेत २५% जागा या दुर्बल व वंचित मुलांसाठी ठेवल्या जाव्यात.

७. शिक्षकांनी प्रत्येक मुलाच्या क्षमतेनुसार आवश्यक मुलास विशेष शिक्षण द्यावे.

८. मुलांना भीती, चिंता, आघातापासून दूर ठेवावे. व त्यानुसार सर्वांगीण विकासाचा अभ्यासक्रम द्यावा.

९. बालहक्क संरक्षण कायदा २००५ नुसार बाल हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापित राष्ट्रीय व राज्य आयोगाने शिक्षणाचा हक्क व कायद्याने दिलेल्या बालहक्कांचे संरक्षण करावे.

याशिवाय बाल गुन्हेगारांसाठी व बाल कामगारांसाठी काही इतर कायदेही आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत :-

१०. सुधारगृह कायदा, १८९७.

११. औद्योगिक कायदा, १९८१, १९९०.

१२. बालकामगार वेठबिगार प्रतिबंद कायदा.

१३. मळे कामगार कायदा, १९५१.

१४. खाण कामगार अधिनियम, १९५२.

१५. बोस्टल स्कूल कायदे.

वरीलप्रमाणे बालकांचे हक्क संरक्षणासाठी व बालकल्याणासाठी विविध कायदे अस्तित्त्वात आले.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❊

❋ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय बाल वर्ष कोणत्या साली साजरे केले?

२. भारतात राष्ट्रीय बालनीती आयोगाने १९५१ ला कशाची स्थापना केली?

३. बालक कायदा केव्हा अस्तित्वात आला?

४. २००५ साली बालकांसाठी कोणता विशेष कायदा अस्तित्वात आला?

## ४.३.३ महिला कल्याण (Women Welfare)

भारतातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. याचे गांभीर्य लक्षात घेऊन भारतात महिलांच्या सबलीकरणाचा विचार होऊ लागला. खरं म्हणजे १९७५ च्या जागतिक महिला वर्ष स्थापनेपासून महिला विकासाला एक दिशा मिळावी. परंतु स्त्री ही एक मानव समाजाची घटक म्हणून तिलाही मुलभूत हक्क आहेतच हेही लक्षात घेतले पाहिजे. देशाचा विकास करत असताना महिला विकासाबाबत धोरणे व योजना आखल्या गेल्या. घटनेमध्ये पंचवार्षिक योजनेतून महिला विकासाच्या तरतुदींचा प्रथम अभ्यास करून नंतर स्त्री अस्तित्व, स्त्री अत्याचाराबाबत निर्माण झालेल्या कायद्यांचा अभ्यास करणे सोयीस्कर होईल.

### ❒ भारतीय राज्यघटनेतील महिलांचे हक्क :-

भारतीय घटनेने महिला विकास व संरक्षणाबाबत असलेले हक्क २६ जानेवारी १९५० पासून लागू करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे :-

१. **कलम १४ :** राजकारण, अर्थकारण, समाजकारण यात महिलांना समान हक्क व संधी कायद्यापुढे समानता.

२. **कलम १५(१) :** धर्म, वंश, जात, लिंग यानुसार समानता.

३. **कलम १५(३) :** शासकीय योजना व कार्यक्रम यात समानता.

४. **कलम १६ :** नोकरीची समान संधी.

५. **कलम ३९(अ) :** जगण्याचा समान अधिकार.

६. **कलम ३९(ड) :** समान कामासाठी समान वेतन.

७. **कलम ४२ :** कामाच्या ठिकाणी मानवतेची वागणूक, प्रसूती काळात सवलती.

८. **कलम २४३ ड-३ :** पंचायतीमध्ये महिलांना ३३% राखीव जागा.

९. **कलम ३४३ :** महानगरपालिकेत महिलांना ३३% राखीव जागा.

वरील सर्व कलमानुसार स्त्रियांना समान दर्जा, शिक्षण, आरोग्य, संरक्षण, नोकरी, व्यवसाय इत्यादीबाबत हक्क दिले. स्त्री-पुरुष दोघांना त्यांच्या समान हक्कांची, समानतेची, मानवतेची जाणीवपूर्वक योजना केली. महिला कल्याणासाठी विविध प्रकारची धोरणे व योजना राबविण्यात आल्या, त्या पुढीलप्रमाणे :-

## १. पंचवार्षिक योजनेतील महिलांसाठीच्या योजना-

१९५३ साली केंद्रिय समाजकल्याण परिषद स्थापन झाली. त्याचे मुख्य उद्दिष्ट हे समाजकल्याण, महिला, मुले व समाजातील कनिष्ठ स्तरातील लोकांचा विकास करणे हा होता. विविध पंचवार्षिक योजनांच्याद्वारे महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना आखल्या.

१. **पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५६) :** प्रसूती आणि मुलांच्या आरोग्यासाठी केंद्र उघडणे व कुटुंब नियोजनाची व्यवस्था.

२. **दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६१) :** महिलांना प्रसूती अवस्थेत सुरक्षितता, लहान मुलांना पाळणाघरे.

३. **तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६६) :** महिलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष, गावात बालकल्याण केंद्र व महिलांना आरोग्य शिक्षण.

४. **चौथी पंचवार्षिक योजना (१९६७-७४) :** शिक्षण, आरोग्य व कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम.

५. **पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७९) :** कामावर जाणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षितता.

६. **सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५) :** महिलांना रोजगार मिळावा, आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी विशेष भर दिला.

७. **सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०) :** महिलांना स्वत:बद्दल अधिक आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून अधिकार.

८. **आठवी पंचवार्षिक योजना (१९९१-९५) :** लिंगभेद निवारण संकल्पनेवर विशेष भर.

९. **नववी पंचवार्षिक योजना (१९९६-२०००) :** शासकीय योजनेत किमान ३०% निधी.

१०. **दहावी पंचवार्षिक योजना (२००१–२००५) :** महिला विकास योजना व जेंडर बजेटिंग संकल्पना चळवळ.

अशा विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून महिलांसाठी अनेक कल्याणात्मक व विकासात्मक योजना आखल्या.

## ❑ राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९० –

सन १९९० हा अधिनियम संसदेत संमत होऊन त्यावर राष्ट्रपतींची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार ३१ जानेवारी १९९२ ला राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाला न्यायालयासारखे अधिकार असून तीन वर्षांचा कालखंड असतो. या आयोगात एक अध्यक्ष, पाच सदस्य व एक सचिव असतो. या आयोगाची प्रमुख कार्ये म्हणजे –

१. महिला संरक्षणाच्या कायद्याचे परीक्षण करणे.

२. कायद्यात त्रुटी असलेस दुरुस्ती सुचविणे.

३. कायदेशीर मदतीचा आढावा घेणे. अंमलबजावणीची शासनास सूचना करणे.

४. महिला अत्याचाराच्या चौकशीचा पाठपुरावा करणे.

५. सुधारगृह–कारागृहातील स्त्रीयांची स्थिती पाहणे.

६. महिला विकास कार्यक्रमात सहभागी होणे इत्यादी.

## ❑ महिला धोरण, २००१ –

महिलांच्या विकासासाठी व स्वावलंबनासाठी महिला सक्षमीकरण/सबलीकरण धोरण २००१ साली स्थापन झाले.

## ४.३.३.१ क) महिलांविषयक विशेष कायदे :–

भारतात महिलांसंबंधी अनेक कायदे करण्यात आले आहेत, ते पुढीलप्रमाणे. महिलांच्या संरक्षणासाठी व त्यांच्यावरील होणाऱ्या अन्यायातून त्यांना वाचवण्यासाठी हे कायदे अतिशय उपयुक्त पडतात.

## (अ) स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांविषयक कायदे –

### १. सतीप्रथाबंदी कायदा, १८२९ –

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे व विल्यम बेंटिक यांच्या सहकार्याने १८२९ ला सतीप्रथा

बंदी कायदा अस्तित्वात आला. पती निधनानंतर विधवा स्त्रीला जगण्याचा अधिकार नव्हता. तिला तिच्या पतीच्या चितेवर जीवंत जाळले जात असे. या कायद्यानुसार स्त्रीला पती निधनानंतर सती जाणे, स्त्रीला सती जाण्यास भाग पाडणे, प्रवृत्त करणे, इत्यादी कृत्ये बेकायदेशीर ठरवून ही प्रथा कायद्याने बंद केली.

## २. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा, १८५६ –

पती निधनानंतर सती जाणे किंवा विधवेचे जीवन जगावे लागत असे. विधवेचे जीवन म्हणजे अपशकुनी, वेदनामय, अपमान, छळ यांनी भरलेले असे. इ.स. १८५६ मध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नातून विधवा पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा करण्यात आला. या कायद्याने विधवा पुनर्विवाहाबाबत असलेले शास्त्राचे अडथळे दूर करण्यासाठी मदत झाली.

## ३. बालविवाह प्रतिबंधक कायदा, १८७२, १९२१, १९२९, १९७८ –

भारतात बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात होती. मुलामुलींची अगदी सहाव्या-सातव्या वर्षी लग्न होत असे. याचा परिणाम स्त्रीच्या आरोग्यावर होत असे म्हणून प्रथम १८७२ ला बालविवाह प्रतिबंद कायदा करून विवाहाचे वय मुलीस १४ व मुलांचे १८ केले. १९७८ ला स्वतंत्र भारतात यासंबंधी कायद्यामध्ये बदल केले व त्यानुसार विवाहाचे मुलाचे वय २१ व मुलीचे वय १८ वर्षे केले. वयोमर्यादाचे उललंघन करणारा विवाह हा बालविवाह समजण्यात आला.

## ४. घटस्फोटाचा कायदा, १८६९, १९५५, १९७६ –

हिंदू विवाह कायद्याने कायदेशीर घटस्फोट व विभक्तपणा या दोन्ही गोष्टी मान्य केल्या. १९७६ ला या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आणि व्यभिचार, क्रूर वागणे, गुप्तरोग, धर्मांतर, संन्यास अशा अनेक कारणांनी घटस्फोट मागता येतो.

## ५. मातृत्वविषयक कायदा, १९२९ –

या कायद्यानुसार नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर पगारी रजा दिली जाईल. (सहा आठवडे) हा कालावधी संपल्यानंतर संगोपन रजाही मिळते. स्त्री बाळंतपणाच्या रजेवर असताना तिला नोकरीवरून कमी करता येणार नाही. तसेच तिच्या आरोग्यावर परिणाम होईल असे काम तिला देण्यास कायद्याने बंदी घातली. १९६१ ला प्रसूतीविषयक सहाय्य कायदा सुधारित स्वरूपात संमत झाला.

## (ब) स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांविषयक कायदे :-

### १. हिंदू विवाह कायदा, १९५६ -

१९५६ साली हिंदू विवाह कायदा अस्तित्त्वात आला. हिंदू कायदा हा हिंदू धर्म मानणाऱ्या व्यक्तीस लागू आहे.

### २. कारखाना कायदा, १९४८ -

या कायद्याच्या माध्यातून स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणाची काळजी घेण्यात आली. या कायद्यानुसार कामाच्या ठिकाणी तीस किंवा त्यापेक्षा जास्त स्त्री कामगार असतील तर तेथे स्वतंत्र पाळणाघराची व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली. स्त्रियांची कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ७ या दरम्यान असावी. स्त्रीला ९ तासापेक्षा जास्त काम देऊ नये.

### ३. हिंदू उत्तराधिकारी कायदा, १९५६ -

हिंदू स्त्रियांना कायद्याने मालमत्तेत वाटा असावा. यासाठी हा हिंदू उत्तराधिकार कायदा, १९५६ ला अस्तित्वात आला. या कायद्यानुसार स्त्रीला आई, पत्नी व मुलगी म्हणून संपत्तीत समान वाटा तसेच वडिलांच्या संपत्तीत त्यांच्या मुलींनाही वाटा मिळावा, अशी तरतूद आहे.

### ४. हिंदू दत्तक व पालनपोषण कायदा, १९५६ -

या कायद्यानुसार मुलाप्रमाणे मुलीलाही दत्तक होता येऊ लागले. विधवा स्त्री एखाद्याला आपला वारस म्हणून दत्तक घेऊ शकेल. 'स्त्री-पुरुष दोघांनाही मुलांच्या पालनपोषणाचा अधिकार समान असेल. तसेच पत्नी, विधवा मुलगी, वृध्द आई-वडिल, अज्ञान व आश्रीत व्यक्तींनाही मालमत्तेत वाटा मिळू शकतो.

### ५. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ -

या कायद्यानुसार मुलींचा अनैतिक व्यापार व वेश्याव्यवसाय हा गुन्हा मानन्यात आला. यामध्ये स्त्रीला वेश्याव्यवसायास प्रवृत्त करणे, प्रोत्साहन करणे इत्यादीचा समावेश होतो. यासाठी केंद्र व आर्थिक दंडाची शिक्षेची तरतूद आहे.

### ६. हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ -

भारतात हुंडा प्रथा म्हणजे वधू पक्षाकडून वर पक्षाला विवाहावेळी दिली जाणारी रोख रक्कम,

सोने व इतर संपत्ती होय. या प्रथेमुळे वधू पक्षाचे शोषण होऊ लागले. तिचा छळ प्रसंगी बळी घेतला जाऊ लागला. म्हणून १९६१ ला हुंडाप्रतिबंधक कायदा संमत करण्यात आला. यानुसार हुंडा घेणारा व हुंडा देणारा अशा दोघांनाही अपराधी मानण्यात आले व त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली.

## ७. पोटगी कायदा, १९४६, १९५६ –

१९४६ ला हिंदू विवाहित स्त्रीला विभक्त राहून पोटगी मागण्याचा कायदा पास झाला. त्यानंतर १९५६ ला त्यात काही सुधारणा केल्या व त्यानुसार काही विशिष्ट हिंदू व्यक्तींना विशिष्ट परिस्थितीत पोटगी मागता येते.

## ८. जन्मपूर्व निदान तंत्रज्ञान (नियमन व गैरवापरास प्रतिबंध) कायदा, १९९४ (गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक कायदा) –

देशात मुलींची संख्या कमी होत आहे. सध्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे लिंगनिदान चाचणी करून मुलगा की मुलगी हे तपासले जाते व मुलगी गर्भ असेल तर तिला जन्माला येण्याआधीच मारून टाकली जाते. यावर बंदी घालण्यासाठी हा कायदा १९९४ ला केला. महाराष्ट्रात मात्र हा पूर्वीच १९८८ ला लागू करण्यात आला होता. हा कायदा लागू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

## ९. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, १९९७ (विशाखा आदेश) –

स्त्रियांना त्या जिथे काम करतात त्या-त्या ठिकाणी विविध प्रकारच्या मानसिक, भावनिक, लैंगिक छळ केला जातो. त्याला प्रतिबंध करणारा हा कायदा १९९७ साली संमत करण्यात आला. त्यामुळे स्त्रियांना काम करत असताना सुरक्षितता मिळवून देणारा आहे.

## १०. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ (महिला संरक्षण अधिनियम) –

देशांत घरगुती हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक आहे. तब्बल ३७% महिला घरगुती हिंसाचाराला बळी पडतात. घरगुती हिंसाचारापासून स्त्रियांना संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून हा कायदा करण्यात आला. घरगुतीहिंसाचार म्हणजे स्त्रीचा शारीरिक, मानासिक, शाब्दिक, भावनिक, आर्थिक छळ केला जातो. यालाच कौटुंबिक हिंसाचार मानण्यात येते. असा हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा व दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

## ११. बलात्कार विरोधी कायदा, २०१२ –

याकायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलींवर बलात्कार झाल्यास १० वर्षे ते जन्मठेप, दंड, सामूहिक बलात्कार केल्यास २० वर्षे ते जन्मठेप व दंड, सार्वजनिक जागी दिवसा बलात्कार केल्यास तीन ते सात

वर्षांची व दंडाची शिक्षा नोंदली आहे. या गुन्ह्यातील पीडित महिलांची तपासणी केली जाते व तिला न्याय मिळवून दिला जातो.

## १२. लैंगिक छळ विरोधी कायदा, २०१३ –

कामाच्या ठिकाणी स्त्रीवर होणाऱ्या लैंगिक छळाविरोधी हा कायदा असून अश्लील बोलणे, लैंगिक सुखाची मागणीकरणे, धमकावणे यास लैंगिक छळ समजण्यात येते. त्यासाठी शिक्षा व दंडात्मक कारवाई केली जाते. जर तेथील मालकाने याची दक्षता घेतली नाही. यासाठी सहकार्य केले नाही, तर त्यालाही दंडात्मक शिक्षा होते.

वरील कायद्यांबरोबरच आणखीही काही कायदे निर्माण केले गेले. ते असे–

१. मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३.

२. महाराष्ट्र देवदासी प्रतिबंध कायदा, २००५.

३. कुटंब न्यायालय कायदा, १९८४.

४. मानसिक आरोग्य कायदा.

५. विनयभंग प्रतिबंध कायदा.

६. मुली वा महिलांची छेडछाड प्रतिबंध कायदा.

महिलांविषयक विविध कायद्यांमुळे महिलांचे संरक्षण होणे शक्य झाले आहे.

## ✲ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✲

✺ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम केव्हा संमत झाला?

२. २००१ साली महिलांसाठी कोणते महत्त्वपूर्ण धोरण लागू केले?

३. सतीप्रथा बंदी कायदा कोणाच्या प्रयत्नाने संमत झाला?

४. हुंडा प्रतिबंधक कायदा केव्हा संमत झाला?

५. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा यालाच कोणता आदेश म्हणतात?

६. २००५ साली महिलांच्या अत्याचाराबाबत कोणता महत्त्वपूर्ण कायदा निर्माण झाला?

## ४.४ सारांश

भारतीय समाज व्यवस्थेचा विकास करत असताना त्या समाजातील प्रत्येक मानवी समाजाचा विकास होणे आवश्यक आहे. प्रत्येक मानवाला काही मानवी हक्क हे जन्मत: असतातच आणि त्याचबरोबर भारतीय घटनेने देखील असे काही मुलभूत हक्क प्रदान केले आहेत. असे असले तरी मानवाच्या कल्याणासाठी शासनाने काही कल्याणकारी योजना व धोरणे आखली आहेत. समाजातील दुर्बल घटक म्हणून महिला व बालकांच्या हितासाठी व संरक्षणासाठी कायदेशीर तरतूदही केली आहे. प्रस्तुत प्रकरणात कामगार, बालकामगार, बालक व महिलांविषयक कल्याणकारी योजना व कायदेशीर तरतूदींचे सविस्तर स्पष्टीकरण मिळते.

## ४.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ❋

१. १९४८.

२. कामगार प्रॉव्हीडंड फंड कायद्यांतर्गत (१) कामगार प्रॉव्हीडंड फंड १९५२ (२) कामगार निवृत्ती वेतन योजना, १९९५ (३) कामगार डिपॉझीट लिक्वीड इन्शुरन्स योजना, १९७६ या तीन योजना तयार करण्यात आल्या.

३. १९६५.

### ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❋

१. १९७९ २. नियोजन मंडळ.

३. १९६० ४. बालहक्क संरक्षण कायदा.

### ❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ❋

१. १९९०.

२. महिला सक्षमीकरण धोरण.

३. राजा राममोहन रॉय व विल्यम बेंटिंग.

४. १९६१.

५. विशाखा आदेश.

६. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

❑ **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. कामगार कल्याणविषयक धोरणे आणि कामगारविषयक विविध कायद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण लिहा.

२. बालकल्याणकारी योजनांचे स्पष्टीकरण देऊन बालकांविषयीच्या विविध कायद्यांचे स्पष्टीकरण द्या.

३. महिला कल्याणविषयक धोरणांचा आढावा घेऊन महिलांविषयक कायद्यांचे स्पष्टीकरण लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


❋ **प्रा. कोतापल्ले लक्ष्मण** :‘*भारतातील सामाजिक कल्याण, प्रशासन व समाजकार्य,* विद्या बुक पब्लिकेशन, जून २०१४.


❑❑❑